ठाणें

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय चरित्र

# हाराष्ट्र कविचरित्र

## भाग ६ वा.

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.

REFBK-0002479

किंमत १॥ रुपया.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

श्रीलक्ष्मी-केशव प्रसन्न

# महाराष्ट्र कविचरित्र

## भाग ६ वा.

REFBK-0002479

सं. इ. च. नं. २५२
ता. १९।५।१२

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर

माजी संपादक 'इंदुप्रकाश' व 'ज्ञानांजन' आणि
इसापनीति, भरतपूरचा वेढा, नेपाळवर्णन,
सं. प्रणयानंद नाटक, नित्यपाठ
भजनमाला इत्यादि पुस्तकांचा
कर्ता

दा. क. २४५

इ. स. १९२४

प्रकाशकः—जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.
मेरी बिल्डिंग, वांद्रें, जि. ठाणें.

प्रिंटरः—अनंत आत्माराम मोरमकर.
श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

# अर्पणपत्रिका

श्रीमंत महाराज खेम सावंत ऊर्फ बापूसाहेब
भोंसले सरदेसाई, संस्थान सावंतवाडी

यांस

त्यांचा एक नम्र प्रजाजन या नात्यानें
अत्यंत राजनिष्ठापूर्वक व कृतज्ञता-
पूर्वक, त्यांच्या परवानगीनें,
हा ग्रंथ समर्पण
करितों.

ग्रंथकर्ता.

# अनुक्रमणिका


| कवीचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ ज्ञानदेव ... ... ... ... | १ |
| २ विसोबा खेचर ... ... ... | ७७ |
| ३ जनी ... ... ... ... | ८४ |
| ४ मालो ... ... ... ... | ९२ |
| ५ बहिणाबाई ... ... ... | ९८ |
| ६ उत्तमश्लोक ... ... ... | १६३ |
| ७ नरहरि महीपति ... ... ... | १८३ |
| ८ ठाकुरदास बावा ... ... ... | २१३ |
| ९ दत्तनाथ उज्जनीकर ... ... ... | २२३ |
| १० त्र्यंबक अनंत ऊर्फ दादा नाईक भिडे ... ... | २३६ |
| ११ मकुंदसुत ... ... ... ... | २४७ |



मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रं.
ता.
ठाणे.

# प्रस्तावना

महाराष्ट्र कविचरित्राचा पहिला भाग इ. स. १९०७ सालीं प्रसिद्ध झाला व त्यानंतर दोनतीन वर्षांच्या अंतरानें पुढील चार भाग प्रसिद्ध होऊन, आज, भगवंताच्या कृपेनें, हा सहावा भाग प्रसिद्ध करण्याचा सुप्रसंग प्राप्त झाला आहे. या कामीं, महाराष्ट्रांतील सर्व धर्मांच्या व सर्व जातींच्या उदार व धनिक लोकांनीं आजपर्यंत मुक्तहस्तानें जें द्रव्यसाहाय्य दिलें, तें जर त्यांनीं दिलें नसतें, तर पहिल्या तीन भागांपुढचे भाग लिहिण्याचा उद्योग मला यापूर्वीच सोडून द्यावा लागला असता. परंतु 'सत्य संकल्पाचा दाता जो भगवान्' त्याच्या कृपेनें द्रव्याची उणीव मला आजपर्यंत फारशी भासली नाहीं व उरलेले पुढील भाग छापण्याच्या बाबतींतही ती भासणार नाहीं, असें माझी मनोदेवता मला सांगते.

या सहाव्या भागांत, एकंदर ११ संतकवींचीं लहानमोठीं चरित्रें, त्यांच्या कवितेंतील निवडक वेंच्यांसह दिलीं असून, मिळालेल्या माहितीची विश्वसनीयता कसोशीनें पारखून घेण्याचा प्रयत्न यथाबुद्धि केला आहे. कोणत्या कवीच्या चरित्राची माहिती कोठें मिळाली याचा स्पष्ट उल्लेख प्रत्येक चरित्रलेखांत केलेला असल्यामुळें, त्याची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, प्रो. शिवराम महादेव परांजपे, रा. सर्वोत्तम रघुनाथ पांडे व श्री. रा. शांताराम नारायण दाभोळकर यांच्या लेखांचा, अनुक्रमें ज्ञानदेव, बहिणाबाई, उत्तमश्लोक व ठाकुरदासबावा यांच्या चरित्रलेखनाच्या कामीं विशेष उपयोग झाला; नरहरि महीपति, दत्तनाथ उज्जनीकर व त्र्यंबक अनंत यांचीं चरित्रें ग्वाल्हेरचे प्रसिद्ध संशोधक, रा. भास्कर रामचंद्र भालेराव यांनीं मोठ्या परिश्रमानें लिहून पाठविलीं; व मुकुंदसुत या कवीचें चरित्र नांदेड येथील सद्गृहस्थ रा. गणेश अनंत सराफ यांनीं शोधपूर्वक लिहून पाठविलें, याबद्दल ह्या सर्व सज्जनांचा मी अत्यंत आभारी आहें.

ह्या भागाच्या छपाईच्या कामीं, बडोदें सरकार; श्रीमंत महाराज बापूसाहेब सरदेसाई, सं. सावंतवाडी; श्री. सर बाळासाहेब मिरजकर; श्रीमंत राजेसाहेब, सांगली; श्री. राजेसाहेब, जत. श्री. राजेसाहेब, फलटण; श्री. राजेसाहेब, जव्हार; श्री. राजेसाहेब, अक्कलकोट; श्री. राजेसाहेब, इचलकरंजी;

श्री. राजेसाहेब, जमखंडी; श्री. राजेसाहेब, विशाळगड; श्री. राजेसाहेब कुरुंदवाड (सीनियर); श्री. राजेसाहेब, रामदुर्ग ह्या संस्थानिकांनीं व श्री. रा. नारायण अनंत देसाई टोपीवाले, रा रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तखंड, रा. कासवजी जहांगिर रेडीमनी, मि. एफ्.ई. दिनशा, सॉलिसिटर, डॉ. मूळगांवकर, मि. जहांगिर बमनजी पेटिट, रा. शंकर सायन्ना परशा; श्री. सौ. सरोजिनी नायडू इत्यादि अनेक गृहस्थांनीं व भगिनींनीं पुष्कळच मदत केली. विशेषत:, मुंबईंतील प्रसिद्ध इंजिनीयर रा. मुकुंदराव सखाराम पाटकर बी.ए., एल्. सी. ई. यांनीं, प्रस्तुत भाग पुरा करून पुढील एक दोन भाग लिहिण्यास जें स्वस्थ्य पाहिजे होतें, तें मिळण्याइतकें द्रव्यसाहाय्य केलें. त्याचप्रमाणें, वसुधैव कुटुंबकं वृत्तीचे नामांकित पारशी देशभक्त मि. बरजोरजी फ्रामजी भरुचा, डॉ. एम्. बी. वेलकर, 'क्रॉनिकल' पत्राचे संपादक मि. ब्रेल्व्ही, मि. कानजी द्वारकादास, मि. जे. के. मेहता इत्यादिकांनीं ओळखीचीं पत्रें देऊन अनेकांकडून मदत मिळवून दिली. बेळगांव येथील विद्वान् मित्र रा. नागेश वासुदेव गुणाजी बी. ए. एलएल्. बी. यांनीं तेथील अनेक गृहस्थांकडून मदत मिळवून पाठविली. या सर्व थोर व्यक्तींचे मी किती उपकार मानूं ? आणि त्यांचा उतराई मी कसा होणार ?

आजपर्यंत या कामीं ज्या ज्या गृहस्थांनीं व कुलस्त्रियांनीं मदत केली व ज्यांच्याकडून पुढें मदत होईल त्या सर्वांची नामावली प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटल्या भागांत द्यावयाची असल्यामुळें, वर ज्यांच्या नांवांचा उल्लेख झाला नसेल त्यांनीं कृपा करून रागावूं नये, अशी नम्र विनंति आहे.

शेवटीं—

आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ॥
साळुंकी हे कैसी बोले मंजुळ वाणी । शिकविता धणी वेगळाचि ॥
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायांवीण ॥

ह्या प्रासादिक अभंगवाणीनें ही प्रस्तावना पूर्ण करितों.

वांद्रें
२० जानेवारी १९२४

ज. र. आजगांवकर

# महाराष्ट्र कविचरित्र.

## भाग ६ वा.

# ज्ञानदेव.

जो ज्ञानराज भगवान् श्रवणें सुज्ञान दे देव वाचा
अवतार गमे अकरावा कां सुज्ञा न देव देवाचा ।

' सन्मणिमाला,' मोरोपंत.

तीन्ही देव जैसे परब्रह्मींचे ठसे
जगीं सूर्य जैसे प्रगटले ॥ १
धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान
धन्य तो निधान ज्ञानदेव ॥ २
उपजतां ज्ञानी हें वर्म जाणोनी
आले लोटांगणीं चांगदेव ॥ ३
प्रत्यक्ष पैठणीं भटीं केला वाद
रेडयामुखें वेद बोलविले ॥ ४
सोहं सुकृताच्या सोडोनियां गांठी
केलीसे मराठी गीतादेवी ॥ ५
नामा म्हणे सर्व सुकृत लाहिजे
एक वेळ जाइजे अलंकापुरा ॥ ६

—नामदेव.

आज येथें मी ज्या विभूतीचें अल्प चरित्र लिहिण्यास बसलों आहें ती विभूति अशी होती कीं, तिच्या चरित्रवर्णनास खुद्द सरस्वतीचेंही शब्द-भांडार पुरें पडणार नाहीं. जगांत जें कांहीं सुंदर, उच्च, मधुर, पवित्र, मंगल,

अलौकिक आणि हृदयंगम असेल त्याचें सारसर्वस्व म्हणजे ज्ञानदेव महाराजांचें चरित्र होय, असें म्हटल्यास खचित अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्या अवतारी पुरुषानें आपल्या वयाच्या अठराव्या वर्षी ज्ञानेश्वरीग्रंथरूपानें महाराष्ट्र वाङ्मयाचा अभंग पाया घातला आणि वारकरी संप्रदायाचा ध्वज उभारला; ज्याच्या प्रासादिक वाणीचें मार्दव आणि माधुर्य पाहून वाङ्मयाधिष्ठात्री देवी शारदेनें देखील आपल्या हातांतील सुस्वर वीणा क्षणभर खालीं ठेवावी; नामदेव, एकनाथ, तुकारामादि सत्पुरुषांस ज्याचे अनुयायी म्हणविण्यांत मोठें भूषण वाटलें; भगवान् विष्णूचा अकरावा अवतार ही श्रेष्ठतम पदवी सगळ्या महाराष्ट्रानें ज्याला एकामुखानें दिली, त्या त्रिभुवनवंद्य महापुरुषाच्या चरित्रलेखानारंभीं मजसारख्या पामराची लेखणी क्षणभर कंपायमान होऊन स्तब्ध रहावी यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. परंतु, मूकं करोति वाचालं, हा ज्यांचा अधिकार त्याच संतांच्या कृपाप्रसादानें सुचलेले हे वेडेवांकडे दोन शब्द वाचकांच्या सेवेस सादर करण्याचें धाष्टर्य मी करीत आहें. दुसऱ्या कोणत्याही महाराष्ट्र कवीपेक्षां ज्ञानदेवांची योग्यता जशी मोठी आहे, त्याचप्रमाणें त्यांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टींविषयीं विद्वन्मंडलांत अनेक मतभेदही असल्यामुळें, चरित्रलेखनाचें हें काम अधिकच बिकट झालें आहे.

ज्ञानदेव, निवृत्ति, सोपान आणि मुक्ताबाई हीं चार भावंडें म्हणजे केवळ महाराष्ट्राच्याच किंवा हिंदुस्थानच्याच नव्हे तर एकंदर जगाच्या इतिहासांतील अद्वितीय विभूति होत. महाराष्ट्रांतील लोक तर त्यांस अवतारी व्यक्ति समजतात. ज्ञानेश्वरमहाराज हे मराठी भाषेचे आदि आणि श्रेष्ठ कवि असून ज्ञानेश्वरी अथवा भावार्थदीपिका हा मराठी भाषेंतला आद्य आणि श्रेष्ठ ग्रंथ होय. वारकरी पंथाचे आद्यप्रवर्तकही ज्ञानदेवच व ज्ञानेश्वरी हा त्या पंथाचा मुख्य ग्रंथ होय. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम, ही वारकरी संप्रदायाची परंपरा आहे. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई या नामचतुष्टयाचा आध्यात्मिक गूढार्थ लक्ष्यांत घेतां ज्ञानदेवमहाराजांचे तीर्थरूप विठ्ठलपंत यांनीं आपल्या मुलांस हीं नांवें बुद्धिपुरस्सरच ठेवलीं असलीं पाहिजेत

असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. विकल्पाची किंवा प्रपंचाची निवृत्ति झाल्यावर ज्ञानप्राप्ति होण्यास उशीर लागत नाहीं व या ज्ञानसोपानमार्गानें जाणारास मुक्ति दूर नाहीं हें सांगावयास नकोच.

अशा या ज्ञानदेवमहाराजांच्या चरित्राविषयीं अगदीं निर्भेळ सत्यात्मक आणि पूर्ण विश्वसनीय अशी कोणतीच माहिती उपलब्ध असूं नये ही केवढ्या दुःखाची गोष्ट ! त्यांची जी काय माहिती उपलब्ध आहे, ती बहुतेक सगळी दंतकथामय असल्यामुळें अगदीं संशयातीत असा भाग तींत अगदीं थोडा आहे. जुन्या ग्रंथांपैकीं सच्चिदानंदबाबाकृत ज्ञानेश्वरविजय, नामदेवकृत 'ज्ञानेश्वरांची आदि' आणि 'समाधिप्रकरण,' महिपतिकृत संतचरित्रविषयक ग्रंथ आणि निरंजन माधवकृत " ज्ञानेश्वरविजय " या ग्रंथांत व अर्वाचीन ग्रंथांपैकीं " भारतवर्षीय अर्वाचीन कोश, " कै. भिंगारकरबुवाकृत "ज्ञानेश्वरचरित्र" आणि "ज्ञानेश्वरकालनिर्णय," कै. बळवंत खंडूजी पारखकृत " ज्ञानेश्वरचरित्र " आणि रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकरकृत " ज्ञानदेव—चरित्र आणि काव्यविवेचन " ह्या ग्रंथांत ज्ञानदेवांचें बरेंच विस्तृत चरित्र दिलेलें आढळतें. याशिवाय. कै. भारदे यांच्या " ज्ञानेश्वरीचा कर्ता आळंदीचा ज्ञानदेव नव्हे " या निबंधांतही प्रस्तुत विषयाची बरीच चर्चा झालेली आहे. कविचरित्र नामक एका जुन्या पुस्तकांत ज्ञानदेवांचें संक्षिप्त चरित्र दिलेलें असून, 'नवनीतां' तही तें उद्धृत केलेलें आढळतें. पण ह्या सर्व एतद्देशीय लेखांशिवाय इंग्रजी भाषेंतही 'ज्ञानदेवांचें चरित्र आणि त्यांची कविता' या विषयाचें थोडेंसें उद्‌घाटन जे. मरे मिचेल एम्. ए., एल्. एल्. डी नामक आंग्ल गृहस्थानीं "The chief Marathi Poets" ह्या आपल्या निबंधांत केलें असून, सदर निबंध "Transactions of the ninth International Congress of Orientalists" नामक ग्रंथांत छापलेला आहे. ह्या सर्व ग्रंथांत व निबंधांत रा. पांगारकरकृत 'ज्ञानदेवचरित्र' अगदीं अर्वाचीन असून, तत्पूर्वकालीन बहुतेक सर्व ग्रंथांतील माहितीचा त्यांत समावेश झालेला असल्यामुळें, मुख्यतः त्याच्याच आधारानें प्रस्तुत निबंध मी लिहित आहें.

ज्ञानदेवमहाराजांनीं आपल्या ज्ञानेश्वरीच्या शेवटीं आपला काल असंदिग्ध रीतीनें नमूद करून ठेवलेला असल्यामुळें, त्यांच्या कालनिर्णयाच्या

बाबतींत तरी मतभेदास किंवा संशयास बिलकुल जागा नाहीं ही खरोखरच मोठ्या समाधानाची गोष्ट होय.' शके बाराशें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें† ' ही ओवी खुद्द ज्ञानदेवांची असो किंवा ज्ञानेश्वरीलेखक सच्चिदानंदबाबांची असो, ज्ञानेश्वरी ग्रंथ शालिवाहन शके १२१२ त पूर्ण झाला, येवढी गोष्ट ह्यावरून अगदीं निर्विवाद सिद्ध होते.

पैठणच्या पूर्वेस चार कोसांवर गोदावरीच्या उत्तरतीरीं आपेगांव नामक एव गांव आहे तेथें ज्ञानेश्वर महाराजांचे पूर्वज कुळकर्णी * होते. ही कुळकरणाची वृत्ति या घराण्याकडे वंशपरंपरेनें चालत आलेली होती. हे माध्यंदिन शाखेचे देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण; यांचें गोत्र पंचप्रवरात्मक वत्स. ज्ञानदेवांच्या पणजाचे पणजे हरिहरपंत कुळकर्णी हे शके १०६० च्या सुमारास आपेगांवचें कुळकर्ण पाहात होते. त्यांना तीन अपत्यें झालीं; दोन मुलगे व एक मुलगी. वडील मुलाचें नांव रामचंद्र, धाकट्याचें केशव व मुलीचें नांव मोहनाबाई. केशवाचा व्रतबंध झाल्यावर एक वर्षानें तो वारला. मोहनाबाई देवगड येथील नरहरपंत माचवे यांच्या पुत्रास दिली होती.हरिहरपंतांच्या पश्चात् रामचंद्रपंतांनीं कुळकर्णीपणाची वृत्ति चालविली. त्यांचा काल झाल्यावर त्यांचे पुत्र गोपाळपंत यांनीं व गोपाळपंत वारल्यावर त्यांचे पुत्र त्र्यंबकपंत यांनीं ती वृत्ति चालविली.हे त्र्यंबकपंत मोठे कर्तबगार पुरुष होते. त्या वेळीं जैत्रपाळ नामक राजा राज्य करीत होता, त्यानें एका बंडखोर देशमुखाचें पारिपत्य करण्याच्या कामगिरीवर त्र्यंबकपंतांचे पुत्र हरिपंत यांस पाठविलें. पंतांची व देशमुखांची लढाई होऊन तींत पंत धारातीर्थीं पतन पावले. होतकरू पुत्राच्या मृत्यूमुळें उदास होऊन त्र्यंबकपंत परमार्थमार्गास लागले. पढें महासाधु गोरखनाथ यांची स्वारी तीर्था-

---

† सबंध ज्ञानेश्वरींत ग्रंथकारानें स्वतःचा नामनिर्देश 'ज्ञानदेव' या नांवानें केला असून ह्या अखेरच्या एकाच ओवींत ज्या अर्थी 'ज्ञानेश्वर' हें नांव आलें आहे, त्या अर्थी ही ओवी सच्चिदानंदबाबाकृत असावी हा कित्येक विद्वानांचा तर्क पुष्कळ सयुक्तिक दिसतो यांत संशय नाहीं.

* यावरून महाराष्ट्रांतील कुळकर्ण्यांची परंपरा किती जुनी आहे हें कोणाच्याही सहज लक्ष्यांत येईल.

टन करीत आपेगांवास आली. तेव्हां त्र्यंबकपंतांनीं त्यांचा उपदेश घेतला. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पूर्वजांत, भगवद्भक्त या नात्यानें, त्र्यंबकपंत हे मूळपुरुष होत. यांची समाधि आपेगांवीं आहे.

त्र्यंबकपंतांचे ज्येष्ठ चिरंजीव गोविंदपंत यांचीं भार्या निराबाई हीस गोविंदपंतांच्या २५व्या वर्षी एक पुत्र झाला त्याचें नांव विठ्ठल. हेच विठ्ठलपंत ज्ञानेश्वरादि भावंडांचे जनक होत. निराबाई या पैठणकर कृष्णाजीपंत देवकुळे यांच्या भगिनी होत. हें देवकुळ्यांचें घराणें अद्याप पैठणास आहे. विठ्ठलपंतांच्या सातव्या वर्षी त्यांचा व्रतबंध झाला. पुढें अल्प काळांतच त्यांचें वेदशास्त्राध्ययन पूर्ण झाल्यावर वडिलांची आज्ञा घेऊन ते तीर्थाटणास निघाले. त्यांची प्रवृत्ति जन्मतःच परमार्थाकडे होती. द्वारका, पिंडारक, सुदामपुरी, मूळमाधव, भालुकातीर्थ, प्रभास, मुचकुंद गुंफा, सप्तशृंगी, त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर इत्यादि तीर्थें करीत करीत ते आळंदीस आले. तेथील कुळकर्णी त्रिप्रवरी वासिष्ठ गोत्री सिधोपंत या गृहस्थांनीं विठ्ठलपंतांची सदाचारसंपन्नता पाहून त्यांस आपली मुलगी दिली. पुढें विठ्ठलपंत दक्षिणयात्रेस निघाले. कृष्णा, कावेरी, तुंगभद्रा या नद्यांचीं स्नानें करून श्रीशैल, व्यंकटगिरी, रामेश्वर, शिवकांची, विष्णुकांची, गोकर्ण, करवीर, कऱ्हाड, माउली इत्यादि क्षेत्रें करीत करीत ते पुनः आळंदीस आले. तेथून आपली पत्नी रुक्मिणी व सासूसासरा यांसह, आपेगांवीं, आल्या आईबापांच्या दर्शनास ते गेले; व तेथेंच कांहीं दिवस राहिले. पुढें आईबाप निवर्तल्यावर संसार गळयांत पडला. परंतु संसाराकडे त्यांचें लक्ष नव्हतें. नवरा संसाराविषयीं उदासीन आहे व नित्य ईशचिंतनांत निमग्न असतो ही गोष्ट रुक्मिणीबाईनें आपल्या बापास–सिधोपंतास–कळविली तेव्हां पंत आळंदीहून मुद्दाम आपेगांवास आले व जामातास प्रेमाची विनंति करून मुलीसह त्यांस त्यांनीं आळंदीस आणलें.

विठ्ठलपंतांनीं आळंदी येथें कांहीं वर्षें कालक्रमणा केल्यावर 'अपत्यसंभवाभावीं' रुक्मिणीबाईच्या मागें त्यांनीं टुमणें लावलें, कीं, "मला काशीस जाऊन राहण्याची इच्छा आहे, तरी संन्यास घेण्याची आज्ञा दे". पतीची वैराग्यवृत्ति पाहून रुक्मिणीबाई सावध होत्या. त्यांनीं सिधोपंतांकडून


"संतति झाल्याशिवाय संन्यास घेऊं नये" असें पतीस सांगविलें. परंतु रुक्मिणीबाई एकदां बेसावध असतां "मी गंगेवर स्नानास जाऊं?" असें विठ्ठलपंतांनीं विचारलें. तेव्हां त्यांनीं सहज "जा" म्हटलें. तीच पडत्या फळाची आज्ञा मानून पंत जे तेथून तडक निघाले ते थोडयाच दिवसांत काशीस जाऊन पोंचले. तेथें प्रसिद्ध रामानंदस्वामी होते त्यांनीं पंतांस अनुग्रह दिला. "मी एकटा असून मला दारापुत्रादि पाश नाहींत; मी मोठ्या अनुतापानें आपणास शरण आलों आहें." असें पंतांनीं स्वामींस खोटेंच सांगितलें. परंतु त्यांस तें खरें वाटून त्यांनीं त्यांस मंत्रदीक्षा देऊन संन्यास दिला व 'चैतन्याश्रम' असें त्यांचें नांव ठेविलें. पंतांच्या या संन्यासदीक्षेची बातमी दक्षिणेंत कर्णोपकर्णीं रुक्मीणीबाईस समजली तेव्हां अर्थातच त्यांना फार वाईट वाटलें. तथापि 'आलिया भोगासी असावें सादर' असा विचार करून, आपलें शेष आयुष्य कडकडीत वैराग्यांत घालविण्याचें त्यानीं ठरविलें, व त्याप्रमाणें बारा वर्षें त्यांनीं खडतर अनुष्ठान केलें. पुढें कर्मधर्मसंयोगानें, रामानंदस्वामी रामेश्वराकडे जाण्यासाठीं दक्षिणेंत आले असतां, वाटेंत त्यांचा मुक्काम आळंदीस पडला. तेथील मारुतीच्या देवळांत स्वामी उतरले होते. रुक्मिणीबाई नित्याप्रमाणें सायंकाळीं मारुतीदर्शनास आल्या असतां, तेथें स्वामीस पाहून बाईनीं त्यांना वंदन केलें. तेव्हां स्वामीनीं सहज "पुत्रवती भव" असा आशीर्वाद दिला! तो ऐकतांच बाईस हंसू आलें. स्वामींनीं, हंसण्याचें कारण विचारलें तेव्हां पतीनें संन्यास घेतल्याचा वृत्तांत बाईनीं त्यांना सांगितला. पुढें बाईची व त्यांच्या पतीची सविस्तर हकीकत त्यांच्या तोंडून ऐकल्यावर काशींत ज्या गृहस्थास आपण संन्यास दिला तो चैतन्याश्रमच या बाईचा पति असावा ही गोष्ट स्वामींच्या लक्ष्यांत येऊन ते दचकले; व एका निष्पाप आणि सुशील तरुणीच्या संसारसुखांत व्यत्यय आणण्यास आपण कारणीभूत झालों, याबद्दल त्यांना मोठा खेद वाटला. पुढें रामेश्वरास जाण्याचा बेत रहित करून स्वामी एकदम काशीस गेले. चैतन्याश्रमाचे श्वशुर सिधोपंत हेही आपल्या कन्येसह स्वामींबरोबर काशीस गेले. स्वामीनीं चैतन्याश्रमास गांठून, स्वतःस खोटें वृत्त सांगून फसविल्याद्दल त्यांची चांगली कानउघाडणी केली, तेव्हां चैतन्याश्रमानीं आपली चुकी कबूल

करून स्वामींचे पाय धरले. इतक्यांत सिधोपंतही रुक्मिणीबाईसह तेथें आले. संतशिरोमणि नामदेव "ज्ञानेश्वरांची आदि" या प्रकरणांत म्हणतात:—

**उठवुनी श्रीपादें दिधलें आश्वासन। म्हणती करीं ग्रहण इचें आतां॥१॥**
**अविधि कर्माचें न धरावें भय। यासी आहे साह्य जगदीश ॥ २ ॥**
**स्वदेशीं जाउनी करावा आश्रम। सुखरूप स्वधर्म चालवावा ॥ ३ ॥**
**श्रीपादें मस्तकीं हात ठेवियला। निरोप दिधला चैतन्यासी ॥ ४ ॥**

गुर्वाज्ञेप्रमाणें विठ्ठलपंतांनीं रुक्मिणीबाईचा पुन: अंगीकार केला व गृहस्थाश्रमी होऊन, सिधोपंतांबरोबर ते आळंदीस येऊन राहिले. संन्याशानें पुन: गृहस्थाश्रम स्वीकारला हें पाहून कर्मठ ब्राम्हणाचें पित्त भडकलें. त्यांनीं विठ्ठलपंतांचा नाना प्रकारांनीं छळ केला, व पंतांनींही तो अगदीं निमूटपणें सोसला. पुढें विठ्ठलरुक्मिणीच्या अत्युत्कट पुण्यबलानें त्यांच्या पोटीं निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई हीं दैवी मुलें दोन दोन वर्षांच्या अंतरानें जन्म पावलीं.

## ज्ञानेश्वर महाराजांच्या घराण्याचा वंशवृक्ष.



**निवृत्तिनाथ**—जन्मकाल शके ११९५ श्रीमुख संवत्सर, माघ वद्य १ प्रातःकाल.

**ज्ञानदेव**—शके ११९७ युवा संवत्सर, श्रावण कृष्ण ८ मध्यरात्र.

**सोपान**—शके ११९९ ईश्वर संवत्सर, कार्तिक शुद्ध १५ प्रहररात्र.

**मुक्ताबाई**—शके १२०१ प्रमाथिनाम संवत्सर, आश्विन शुद्ध १ मध्यान्ह.

कित्येक स्थलीं हे जन्मशक पुढें दिल्याप्रमाणें आढळतात.:—

**निवृत्ति**—शके ११९० **ज्ञानदेव**—शके ११९३, **सोपान**—शके ११९६ व **मुक्ताबाई** ११९९.

या दोन कालांची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें सांगावयास नकोच. या दोहोंतील कोणता तरी एक काल कदाचित् खरा असेल किंवा बहुतकरून दोन्ही खोटे असतील.

या चारी मुलांचे जन्म आपेगांव येथेंच झाले असावे असें वाटतें.

मुलांचें मुंजीचें वय होत चाललें तसतशी विठ्ठलपंतांची काळजी वाढत चालली. संन्याशाच्या मुलांची मुंज करण्यास ब्राह्मण परवानगी देणार नाहींत हें पंत जाणून होते. शेवटीं "तुम्हीं काय सांगाल तें प्रायश्चित आम्ही घेतों, परंतु आमच्या मुलांचे व्रतबंध झाले पाहिजेत" अशी ब्राह्मणांस त्यांनीं विनंति केली. सगळे शास्त्रार्थ धुंडाळून अहृदय व सत्यधर्मपराङ्मुख ब्रह्मवृंदानें शेवटीं असा कठोर निर्णय दिला, कीं, "तुमच्या अपराधास शास्त्रांत कोठेंही प्रायश्चित्त सांगितलेलें नाहीं; व तुमच्या मुलांच्या मुंजी होण्यास शास्त्राची अनुज्ञा नाहीं! तुमचा अपराध येवढा भयंकर आहे, कीं त्यास देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरी शिक्षा नाहीं!!"

भोळे विचारे विठ्ठलपंत! ब्राह्मणांनीं फर्माविलेली ही कठोर शिक्षा आनंदानें भोगण्यास ते तयार झाले. प्रिय अर्भकांचा मोह सोडून पत्नीसह ते तडक निघाले व प्रयागास जाऊन त्या निर्दोष दांपत्यानें गंगायमुना-संगमांत आपल्या देहांचें विसर्जन केलें! ब्राह्मणांनीं आपल्या समजुती-प्रमाणें अगदीं कांटेतोल न्याय दिला आणि ब्रह्मवाक्य म्हणजे भगवद्वाक्य मानणाऱ्या विठ्ठलपंतांनीं तो न्याय निमूटपणें मान्य केला; पण त्या उभय-

त्यांच्या या कृत्याचा त्या चार लहान व निरपराधी अर्भकांवर किती वाईट परिणाम झाला असेल बरें ? नीतिशास्त्राच्या कोणत्याही नियमान्वयें जें कृत्य बिलकूल दोषास्पद ठरणार नाहीं असलें कृत्य—आणि तेंही केवळ गुर्वाज्ञेनें—केल्याबद्दल एका सुशील आणि सदाचारसंपन्न दांपत्यास, आपल्या चार कोमल पाडसांस मागें टाकून भलत्याच वेळीं जलसमाधि घेण्याचा प्रसंग यावा आणि धर्मसंरक्षणाच्या सबबीवर या असल्या गोष्टीचें कांहीं सुशिक्षितांनीं समर्थन करावें, याचें कोणत्याही सहृदय मनुष्यास सखेदाश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. आमचा सर्वसंग्राहक हिंदुधर्म खरोखरच का इतका निर्दय आहे ? अजामिळ, गणिका, गजेंद्रासारखे पशु इत्यादिकांचाहि उद्धार करण्यास समर्थ असलेल्या आमच्या सनातन धर्मास संन्याशाचा संसार आणि संन्याशाचीं मुलें पाहून इतका संताप यावा आणि त्याच्या भरांत विठ्ठलपंतांस आणि त्यांच्या पत्नीस त्यानें मृत्यूची भयंकर शिक्षा ठोठावावी हें सकृद्दर्शनींच किती विसंगत आणि विपरीत दिसतें ? अस्तु.

अगदीं अल्प वयांत,प्रिय आईबापांचा अशा अकल्पित आणि आकस्मिक रीतीनें कायमचा वियोग झाल्यावर निवृत्तिज्ञानदेवादि चारी भावंडें आपेगांवास–आपल्या पूर्वजांच्या गांवीं -राहण्यास गेलीं.परंतु तेथें गेल्यावर त्यांच्या भाऊबंदांनीं त्यांना घरांत येऊं दिले नाहीं व त्यांच्या मिळकतीचा वांटाही त्यांना मिळूं दिला नाहीं. शेवटीं, निवृत्ति व ज्ञानदेव यांनीं कोरान्नभिक्षेस बाहेर पडावें व सोपानदेवानें छोटया मुक्ताबाईस सांभाळावें असा क्रम त्यांनीं सुरू केला! त्या वेळीं निवृत्तिनाथाचें वय फार तर दहा बारा वर्षांचें, ज्ञानेश्वराचें आठ दहा वर्षांचें, सोपानदेवाचें सात आठ वर्षांचें व मुक्ताबाईचें चारपांच वर्षांचें असेल. एवढया लहान वयाच्या या कोमल बालकांवर दुर्दैवानें जो हा खडतर प्रसंग आणला तो त्यांनीं कसा सोसला असेल; सोपान आणि मुक्ताबाई यांनीं आईबापांची आठवण करकरून एकमेकांचीं अंगें अश्रूंनीं कशीं भिजवून टाकलीं असतील; त्यांची ती करुणाजनक स्थिति पाहून स्वतः साश्रुलोचन झालेल्या निवृत्ति–ज्ञानदेवांनीं त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न कसा केला असेल; त्या बालकांची ही पाषा-

णासही द्रव आणणारी दु:स्थिति पाहून त्यांच्या एकाही आप्ताच्या किंवा इतर कोणा गृहस्थाच्या किंवा गृहिणीच्या हृदयास पाझर कसा फुटला नाहीं, इत्यादि गोष्टींच्या नुसत्या कल्पनेनेंच अंग रोमांचित होतें, डोळे भरून येतात आणि जगाचें सौम्य स्वरूप दृष्टिआड होऊन त्याचें भीषण स्वरूप तेवढें डोळ्यांपुढें ढळढळीतपणें उभें राहून उदासीनतेनें सगळें हृदय पूर्णपणें व्यापून जातें. अस्तु.

पुढें कांहीं दिवसांनीं तीं चारी भावंडें ओपगांवाहून, आपल्या आजोळीं, आळंदीस गेलीं. स्वत:च्या व बंधूंच्या व्रतबंधाविषयीं निवृत्तिनाथ उदासीन होते, परंतु ज्ञानदेवांच्या आग्रहावरून पैठण येथील ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र मिळविण्याचा प्रयत्न करण्यासाठीं आपल्या भावंडांसह ते पैठणास गेले. तेथें ज्ञानदेवांनीं रेड्याच्या मुखानें वेद बोलवून आपल्या अलौकिकतेची प्रचीति ब्रह्मवृंदास आणून देतांच सर्व ब्राह्मणांनीं त्या चारी भावंडांचा जयजयकार केला व त्यांस शुद्धिपत्र* दिलें.

पुढें ही बालसंतचमु नेवासें येथें गेली. या नेवासें गांवाचा उल्लेख ज्ञानेश्वरींत आला आहे. या गांवांत एका पतिव्रता स्त्रीच्या मृतपतीस ज्ञानदेवांनीं आपल्या अमृतकरस्पर्शानें सजीव केलें. या गृहस्थाचें नांव सच्चिदानंदबाबा. ज्ञानेश्वरी ग्रंथाचे हे लेखक होत. "ज्ञानेश्वरविजय" या नांवाचा एक ओवीबद्ध ग्रंथ सच्चिदानंदबाबांनीं लिहिला असल्याचा उल्लेख व त्या ग्रंथांतील कांहीं उतारे भिंगारकरबुवांच्या "ज्ञानेश्वरकालनिर्णय" या निबंधांत आढळतात. यावरून सदर ग्रंथ बुवांच्या † अवलोकनांत आला होता असें

---

* या शुद्धिपत्राची नक्कल कै. श्रीपतिबुवा भिंगारकर यांस मिळाली होती व त्यांनीं "ज्ञानेश्वरकालनिर्णय" या आपल्या निबंधात ती छापली आहे. परंतु तिच्या अस्सलपणाविषयीं कांहीं लोकांस शंका वाटते, हेंही येथें सांगितलें पाहिजे.

† बुवा हयात असतांना तत्संबंधानें मी त्यांस विचारलें होतें, तेव्हां त्यांनीं सदर ग्रंथ स्वतः पाहिल्याचें खात्रीपूर्वक सांगितलें व ज्या अर्थीं त्यांनीं त्या ग्रंथांतल्या बऱ्याच ओव्या आपल्या निबंधांत उतरून घेतल्या आहेत त्या अर्थीं, या बाबतींत संशय घेण्यास मुळींच जागा नाहीं. बुवा आणखी कांहीं दिवस वांचते तर कदाचित् त्यांनीं ग्रंथाचा शोध लाविला असता.

दिसतें. ईश्वरकृपेनें हा ग्रंथ जर उपलब्ध होईल तर ज्ञानदेवाचें खरें चरित्र समजण्यास त्याचा फारच उपयोग होईल. ज्ञानेश्वरविजय या ग्रंथाच्या कोणत्या अध्यायांत कोणती कथा आहे हेंही कै. भिंगारकरांनीं खुलासेवार रीतीनें सांगितलें आहे. खुद्द ज्ञानेश्वरमहाराज विद्यमान असतांना, त्यांच्याच निकटवर्ती एका गृहस्थानें लिहिलेला हा महत्वाचा ग्रंथ जर आज उपलब्ध असता तर ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टींविषयीं आज सुमारें वीस वर्षें जो मोठा वाद माजून राहिला आहे त्याचा यापूर्वींच कायमचा निकाल लागला असता. सदर ग्रंथांत जी ज्ञानेश्वरचरित्रविषयक माहिती आली आहे ती येणेंप्रमाणें:– प्रथमाध्यायीं गणेशसरस्वतीवंदन व ज्ञानेदेवांच्या पूर्वजांचा वृत्तांत; दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायांत विठ्ठलपंतांचें सविस्तर चरित्र; चौथ्या अध्यायांत निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई यांचे जन्मकाल; पांचव्या अध्यायांत त्यांची बालक्रीडा व आळंदीच्या ब्राह्मणांकडून झालेला छळ; सहाव्या व सातव्या अध्यायांत त्र्यंबकेश्वरीं जाऊन ब्रह्मगिरीस प्रदक्षणा केल्याचा वृत्तांत व गहिनीनाथांचा निवृत्तिनाथांस अनुग्रह; आठव्यांत निवृत्तिनाथांचा ज्ञानदेवांस उपदेश; ९ व्या व १० व्या अध्यायांत पैठणास जाऊन महिषमुखानें वेद बोलविणें व ब्राह्मणगर्वपरिहार; ११ व्यांत मार्गक्रमण व म्हाळसापुरांत आगमन; १२ व्यांत मृत झालेल्या सच्चिदानंदबाबांस जीवंत केल्याचा वृत्तांत; तेराव्यांत भगवद्गीतेवर भावार्थदीपिका या नांवाची टीका करून तिचें सच्चिदानंदबाबांचे हातून लेखन करविलें; १४ व्यांत आळें या नांवाचे गांवीं येऊन रेड्यास समाधि दिली; १५ व्यांत पुनरपि आळंदीस आल्यावर विसोबा खेचरास उपदेश; १६ व्यांत आळंदीकर ब्राह्मणांस शुद्धिपत्र दाखवून विजय संपादन केला व उपसंहार. ग्रंथसमाप्तीचा काल:—

**शके बाराशें सप्तदशीं । मन्मथ नाम वत्सरासी ।**
**पंचमी शुक्ल मार्गशीर्षीं । ग्रंथ समाप्त केला पैं ॥**

ग्रंथ शके १२१७ सालीं पूर्ण झाला व त्यानंतर एक वर्षानें म्हणजे शके १२१८ सालीं ज्ञानदेव समाधिस्थ झाले. यामुळें समाधीचें वर्णन ग्रंथांत न येणें साहजिक आहे. परंतु नामदेवांसह ज्ञानेश्वरांनीं केलेल्या तीर्थयात्रेचा,

चांगदेव नामदेवादिकांचा व भिंत चालविल्याचा उल्लेख वरील अनुक्रमणिकेंत आढळत नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कदाचित् ह्या गोष्टी ग्रंथसमाप्तीनंतर घडल्या असतील. सच्चिदानंदबाबाकृत हा ज्ञानेश्वरविजय म्हणजे मराठी भाषेंतला पहिला चरित्रग्रंथ होय. असो. सच्चिदानंदबाबांनीं केलेलें हें विषयांतर सोडून आतां मुख्य विषयाकडे वळूं.

नेवासें येथें विसोबा खेचर नामक एक गृहस्थ राहत असे. तो " हीं संन्याशाचीं मुलें " असें म्हणून या चारी भावंडांचा नेहमीं उपहास करीत असे. शेवटीं ज्ञानदेवांनीं केलेला एक लोकोत्तर चमत्कार पाहून त्यांच्या अलौकिकत्वाविषयीं त्याची खात्री होऊन तो त्यांस शरण गेला व त्यांचा उपदेश ग्रहण करून तत्कालीन संतमंडळांत आपलें नांव त्यानें दाखल केलें. ज्ञानेश्वरी हा मराठी भाषेंतला ज्येष्ठ व श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानेश्वरमहाराजांनीं नेवासें येथेंच लिहिला. त्यांचा दुसरा ग्रंथ अमृतानुभव किंवा अनुभवामृत हा त्यांनीं अगदीं स्वतंत्र रीतीनें लिहिला असून, स्वतःचा वेदांतानुभव त्यांत त्यांनीं ग्रथित केला आहे. पुढें ज्ञानदेव व नामदेव हे, तत्कालीन इतर संतमंडळीसह तीर्थयात्रेस निघाले. या तीर्थयात्रेचें सविस्तर वर्णन, नामदेवकृत तीर्थावळीच्या अभंगांत आलें आहे. ज्ञानदेव व नामदेव यांचा जिव्हाळ्याचा प्रेमसंबंध होता. ज्ञान आणि भक्ति याचें तें संमेलनच होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ज्ञानदेवांच्या चरित्रांत त्यांनीं केलेल्या अलौकिक चमत्कारांच्या अनेक आख्यायिका दिल्या आहेत, परंतु त्यांचा येथें समावेश करणें अप्रासंगिक होईल. प्रसिद्ध चांगदेवाची कथा अशाच चमत्कारांनी भरलेली आहे ती जिज्ञासु वाचकांनीं रा. पांगारकरकृत ज्ञानेश्वरचरित्रांत पहावी. ज्ञानेश्वर हे विष्णुस्वामी सांप्रदायी होत, असें कै. भिंगारकरबुवांचें मत होतें. ह्या संप्रदायाची परंपरा येणेंप्रमाणें:—

---

+ प्रसिद्ध मराठी कवि निरंजनमाधव यांचाही ज्ञानेश्वरविजय नामक एक श्लोकबद्ध ग्रंथ प्रसिद्ध आहे. सदर कवीनें हा ग्रंथ सच्चिदानंदबाबाकृत ओवीबद्ध ज्ञानेश्वरविजयाच्याच आधारानें लिहिला असेल तरी कोण जाणे.

## आदिनाथ

- उमा
- मत्स्येंद्रनाथ
  - गोरक्षनाथ
    - गैनीनाथ
      - निवृत्तिनाथ
        - ज्ञानदेव — सोपान — मुक्ताबाई
    - चर्पटीनाथ
  - चौरंगीनाथ
- जालंधरनाथ
  - कानीफ
  - मैनावती

ज्ञानदेव महाराजांचें अवतारकार्य संपतांच जीवंत समाधी घेण्याचा आपला विचार त्यांनीं व्यक्त केला. हा ज्ञाननिधि आपणास आतां सोडून जाणार या विचारानें नामदेवादि संतांस मोठा खेद वाटला. शेवटीं शके १२१८ कार्तिक वद्य १३ रोजीं महाराजानीं आळंदी येथें जिवंत समाधि घेतली.त्या वेळीं त्यांचें वय २१ वर्षांचें होतें! या समाधिप्रसंगाचें अत्यंत हृदयद्रावक वर्णन नामदेवांनीं "समाधीचे अभंग" या प्रकरणांत केलें आहे. ज्ञानदेवांनीं समाधि घेतल्यावर, निवृत्तिनाथांसारख्या स्वस्वरूपलीन महानुभावासदेखील दुःखाचा आवेग आवरतां आला नाहीं; मग सोपान आणि मुक्ताबाई यांच्या मनःस्थितीचें काय वर्णन करावें? "आम्हां माता पिता नित्य ज्ञानेश्वर। नाहीं आतां थार विश्रांतीसी" असें म्हणून तीं स्फुंदस्फुंदून रडूं लागलीं. मग श्रीविठ्ठलानें सर्वांचें सांत्वन केलें. यानंतर एक वर्षाच्या आंतच राहिलेल्या तीन्ही भावंडांनीं आपापली इहलोकयात्रा पुरी केली. मार्गशीर्ष वद्य १३ शके १२१८ रोजीं सोपानदेव सासवड येथें समाधिस्थ झाले. तेव्हां "मार्ग हा मोकळा झाला आम्हां" असा मुक्ताबाईनें विचार केला. दिवसेंदिवस तिची उदासीनता वाढत चालली. पुढें

त्याच सालीं माघ वद्य ११ रोजीं चांगदेवांनीं समाधि घेतली. नंतर नामदेवांच्या विनंतीवरून, आपली जन्मभूमि जें आपेगांव, त्याचें शेवटचें दर्शन घेण्यासाठीं निवृत्तिनाथ मुक्ताबाईसह आपेगांवीं गेले. आपल्या पूर्वजांची ती जन्मभूमी पाहून त्या दोन्हीं भावंडांस अगदीं भडभडून आलें.

" निवृत्ति मुक्ताईनें पाहुनि स्थळ डोळां । आलासे उमाळा ओसंडोनि॥
तात आणि माता गेलीसे येथुनी । तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा ॥२॥
निवृत्ति ज्ञानेश्वर कोरान्नाचें अन्न । सांभाळी सोपान मजलागीं ॥ ३ ॥
तुझ्या योगें हरि क्रमियेलें काळा । फुटलासे मेळा तापसांचा ॥ ४ ॥
नामा म्हणे यांचें कळवळलें मन । करी समाधान पांडुरंग ॥ ५ ॥ "

मुक्ताबाईसारख्या कोमल बालिकेचे हे करुणोद्गार कोणा सहृदय मनुष्याचा हृदयभेद करणार नाहींत? " रडे ग्रावा तैसें हृदय अशनीचेंहि उलतें " तें असल्याच प्रसंगांमुळें. " हे पांडुरंगा! आमचे आईबाप आह्मांला येथूनच सोडून गेले. तेव्हां आम्हीं अगदीं लहान होतों. निवृत्ति आणि ज्ञानदेव हे कोरान्न भिक्षा मागण्यास जात आणि घरीं सोपान माझा सांभाळ करीत असे. देवा! तुझ्या कृपेनें इतके दिवस सुखांत गेले, पण आतां आमचा तो तापसांचा मेळा फुटला! " कोण हृदयद्रावक उद्गार हे!

आपेगांवाहून ही मंडळी वेरुळावरून तापीतीरीं माणगांव येथें गेली. तेथें शके १२१९ वैशाख वद्य १२ रोजीं,भयंकर मेघगर्जना होऊन विजेचा प्रचंड कडकडाट झाला व त्याच वेळीं मुक्ताबाई सहजस्वरूपीं मिळून गेली! देवकीच्या उदरीं जन्मलेल्या आदिमायेचे पाय धरुन कंस तिला शिळेवर आपटणार तोंच ती त्याच्या हातांतून निसटून जशी आकाशांत अंतर्धान पावली तद्वतच आदिमायावताररूपिणी मुक्ताबाई बसल्या जागींच एकाएकीं अदृश्य झाली. " होती ऐसी नाहीं झाली मुक्ताबाई । संत ठायीं ठायीं स्फुंदताती" असें वर्णन नामदेवमहाराजांनीं केलें आहे.मुक्ताबाई गुप्त झाली त्या ठिकाणापासून दोन मैलांवर तिचें देऊळ बांधलें आहे. आपलीं तिन्ही धाकटीं भावंडें थोडक्या दिवसांच्या अंतरानें आपल्या डोळ्यांदेखत समाधिस्थ झालेलीं पाहून निवृत्तिनाथ अत्यंत उदासीन झाले.

ज्येष्ठाच्याही आधीं कनिष्ठाचें जाणें । केलें नारायणें उफराटें ॥
उफराटें फार कळलें माझें मनीं । वळचणीचें पाणी आढ्या आलें ॥

अशा प्रकारचे त्यांचे उद्गार ऐकून, ह्यांचाही समागम आपणास आतां फार दिवस लाभत नाहीं, असें नामदेवांस वाटलें. पुढें थोड्याच दिवसांनीं, शके १८१९ सालीं, ज्येष्ठ वद्य १२ रोजीं त्र्यंबकेश्वर येथें निवृत्तिनाथानीं समाधि घेतली. चारी भावंडांचें हें निर्याण पाहून नामदेवांस परमावधीचें दुःख झालें.

लोपलासे भानु पडला अंधार । गेला योगेश्वर निवृत्तिराज ॥ १ ॥
गेल्या त्या विभूति अनादि अवतार । आतां देवा फार आठवतें ॥२॥
नामा म्हणे हरी धरवेना धीर । येतो गहिंवर ओसंडोनी ॥ ३ ॥

निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई हीं चारी भावंडें, एकाच वर्षांत थोड्या दिवसांच्या अंतरानें वैकुंठवासी झालीं, ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे, किंबहुना या चारी भावंडांचें सगळेंच चरित्र अगदीं अलौकिक आणि विस्मयकारक आहे असें म्हटल्यास चालेल. ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी लिहिला ही कथा जर खरी असेल तर एवढ्या लहान वयांत, इतका सर्वोत्कृष्ट ग्रंथ लिहिण्याचें सामर्थ्य देणारी विद्या त्यांनीं कशी संपादन केली असेल, हें समजणें कठीण आहे. अथवा त्यांनींच स्वत: ज्ञानेश्वरींत म्हटल्याप्रमाणें,

अथवा ज्ञानाग्नि हौत्री । जे परब्रह्म श्रोत्री ।
महासुखक्षेत्रीं । आदिवंत ॥
जे सिद्धांताचिया सिंहासनीं । राज्य करिती त्रिभुवनीं ।
जे कूजती कोकिल वनीं । संतोषाच्या ॥
जे विवेकद्रुमाचे मुळीं । बैसले आहाति नित्य फळीं ।
तया योगियांचिया कुळीं । जन्म पावे ॥
मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पाहांट फुटे ।
सूर्यापुढें प्रगटे । प्रकाश जैसा ॥

**तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।**
**बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥**
**तया सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।**
**मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥**

अशा प्रकारच्या उच्च कोटींतले ते होते असें म्हणणेंच अधिक शोभेल; येरवीं, वयाच्या सोळाव्या-अठराव्या वर्षीं देखील-ज्ञानेश्वरीसारखा गंभीर ग्रंथ लिहिण्यास कोणताही सामान्य मनुष्य केवळ असमर्थ होय.

ज्ञानदेवांच्या पूर्वीं वारकरी संप्रदायाची परंपरा महाराष्ट्रांत चालू होती कीं काय हें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु तशी परंपरा पूर्वी चालू नसावी असें वाटतें. ज्ञानदेव नामदेवांचा काल हाच वारकरी संप्रदायाचा उदय-काल होय. ज्ञानदेव, नामदेव, चोखामेळा, विसोबा खेचर, जनाबाई, परिसा भागवत, चांगदेव, गोराकुंभार हे सर्व संत थोड्याबहुत वर्षांनीं समकालीन होते.प्रसिद्ध संत सेना न्हावी यांनीं एके ठिकाणी म्हटलें आहे:-

**श्रीज्ञानराजें केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला ॥ १ ॥**
**विटेवरी उभा वैकुंठनायक । आणि पुंडलीक चंद्रभागा ॥ २ ॥**
**अविनाश पंढरी भूमीवरी पेंठ । प्रत्यक्ष वैकुंठ दाखविलें ॥ ३ ॥**
**सेना म्हणे चला जाऊं तया ठाया । पांडुरंग सखया भेटावया ॥४॥**

या अभंगावरून, वारकरी संप्रदायाचे आद्यप्रवर्तक श्रीज्ञानदेवच होत ही गोष्ट अगदीं निर्विवाद सिद्ध होते. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई या चारी भावंडांच्या पालख्या अद्याप प्रतिवर्षी नियमानें पंढरीस जात असतात.

ज्ञानेश्वरांनंतर दोन तीनशें वर्षांत त्यांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लुप्तप्राय झाल्यासारखा झाला होता. त्याचा जीर्णोद्धार एकनाथ महाराजांनीं शके १५१२ त म्हणजे, मूळ ग्रंथनिर्माणानंतर बरोबर तीनशें वर्षांनीं गोदातीरीं पैठण येथें केला. त्या संबंधाच्या नाथमहाराजांच्या खालील ओव्या प्रसिद्धच आहेत:-

श्रीशके पंधराशें बारोत्तरीं । तारण नाम संवत्सरीं ।
एका जनार्दन अत्यादरीं । गीता ज्ञानेश्वरी प्रती शुद्ध केली ॥
ग्रंथ पूर्वींच अतिशुद्ध । परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध ।
तो शोधोनियां एवंविध । प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥
नमो ज्ञानेश्वरा निष्कळंका । जयाची गीतेची वाचितां टीका ।
ज्ञान होय लोकां । अति भाविकां ग्रंथार्थियां ॥
बहुकाळ पर्वणी गोमटी । भाद्रमास कपिलाषष्ठी ।
प्रतिष्ठानीं गोदातटीं । लेखन कामाटी संपूर्ण झाली ॥
ज्ञानेश्वरी पाठीं । जो ओवी करील मराठी ।
तेणें रत्नखचिताचे ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥

पुष्कळ लोकांचा असा समज झालेला दिसतो, कीं, ज्ञानेश्वरी शुद्ध करण्याच्या मिषानें किंवा प्रसंगानें एकनाथांनीं तींत बरीच फिरवाफिरव केली असली पाहिजे व हल्लीं प्रसिद्ध असलेली ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीहून अर्थात्च भिन्न आहे. परंतु अशी समजूत करून घेण्यास वरील ओव्यांत कांहीं आधार नाहीं. कारण नाथमहाराज स्पष्ट सांगतात कीं, " ज्ञानेश्वरी ग्रंथ मूळचाच फार शुद्ध होता. परंतु कालांतरानें झालेल्या पाठभेदांमुळें त्याचें मूळस्वरूप बरेंच विकृत झालें. तेव्हां त्याचें पुनः संशोधन करून ही शुद्ध ज्ञानेश्वरी मी तयार केली आहे." म्हणजे याचा अर्थ असा कीं,ज्ञानेश्वरी ग्रंथ निर्माण झाल्यानंतरच्या ३०० वर्षांत, त्याच्या नकला होतां होतां भाषेंत होत चाललेल्या स्थित्यंतरामुळें व लेखकांच्या अज्ञानामुळें त्या ग्रंथाचें मूळ स्वरूप पुष्कळच बदलून गेलें. ग्रंथकाराची मूळ प्रत त्या वेळीं उपलब्ध असती तर हा घोटाळा सहज काढून टाकतां आला असता. परंतु तसल्या प्रतीच्या अभावीं त्या वेळीं प्रचारांत असलेल्या अनेक प्रती नाथमहाराजांस मिळवाव्या लागल्या व त्या सर्व प्रतींतील पाठांची तुलना करून, विचारदृष्ट्या व भाषादृष्ट्या जे पाठ मूळ ज्ञानेश्वरांचे असें त्यांस खात्रीपूर्वक वाटलें ते पाठ कायम करून त्यांनीं एक नवीन प्रत तयार केली. " अत्यादरीं " या शब्दानें, ज्ञानेश्वरीविषयींचा आपला आदरभाव नाथांनीं व्यक्त

केला असून, " ज्ञानेश्वरीपाठीं। जो ओवी करील मराठी। तेणें रत्नखचिताचे ताटीं। जाण नरोटी ठेविली " असा स्पष्ट निर्बंध त्यांनीं घालून ठेविला आहे. अशा स्थितींत, हा निर्बंध स्वतःच धाब्यावर बसवून, आपल्या पदरच्या कांहीं ओव्या ज्ञानेश्वरींत त्यांनीं घुसडल्या असतील, हें संभवनीय दिसत नाहीं. तेव्हां, इतक्या जुन्या काळीं, इतके परिश्रम करून, अगदीं सुधारलेल्या अर्वाचीन संशोधनपद्धतीनें ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत त्यांनीं तयार करून ठेविली याबद्दल त्यांजविषयीं कृतज्ञता व्यक्त करण्याचें सोडून, उलट, मूळ ग्रंथांत जांवईशोध केल्याचा आरोप नाथांवर कांहीं लोकांनीं लादावा हें सदभिरुचीचें लक्षण खास नव्हे. नाथांनी स्वतःच्या पदरच्या ओव्या तर ज्ञानेश्वरींत घुसडलेल्या नाहींतच, पण उलट, ज्ञानेश्वरींतील कांहीं ओव्या थोडयाशा फेरफारानें स्वतःच्या कवितेंत उतरून घेतल्या आहेत. नमुन्यासाठीं एकच उदाहरण येथें देतों:–

**देवकिया उदरीं वाहिला। यशोदे सायासें पाळिला।**
**शेखीं उपेगा गेला। पांडवांसी ॥ १३७ ॥**

ज्ञानेश्वरी, अध्याय ६ वा.

**देवकीनें वाहिला। यशोदेनें पाळिला।**
**पांडवांचा बंदिजन होउनियां राहिला ॥**

एकनाथ

वरील दोन उताऱ्यांत किती विलक्षण साम्य आहे ? याप्रमाणें एकटया एकनाथानींच नव्हे तर ज्ञानेश्वरांनंतर झालेल्या बहुतेक संतकवींनीं ज्ञानेश्वरींतल्या उपमा, कल्पना व वाक्यें यांचा मनमुराद उपयोग केलेला ठिकठिकाणीं आढळतो. ज्ञानदेवांच्या रचनेशीं ज्यांचें बरेंच साम्य दिसतें परंतु वस्तुतः जे ज्ञानदेवांचे नव्हत असे कांहीं लहानसहान ओवीबद्ध ग्रंथ व अभंग ज्ञानदेवांच्या नांवावर प्रसिद्ध झाले आहेत याचें कारण, मोठयाच्या नांवावर आपली कविता खपविण्याची कांहीं सामान्य लेखकांची महत्वाकांक्षा, हेंच होय. नामदेव, मुक्तेश्वर, तुकाराम, वामन इत्यादि बहुतेक

प्रसिद्ध कवींस उपरिनिर्दिष्ट उपद्व्यापी लेखकांकडून हा घुसडाघुसडीचा थोडाबहुत प्रसाद मिळालेला आहे, असें दिसून येतें. असो.

ज्ञानश्वरमहाराजांचीं जीं दोन तीन चरित्रें निरनिराळ्या लेखकांनीं लिहून प्रसिद्ध केलीं आहेत त्यांचा मुख्य आधार काय तो नामदेवकृत "ज्ञानेश्वराची आदि" व "समाधी प्रकरण" हीं दोन अभंगबद्ध प्रकरणें होत, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. परंतु गेल्या पंधरावीस वर्षांत "ज्ञानेश्वरीचा कर्ता आळंदीचा ज्ञानदेव नव्हे" हा एक नवाच वाद उपस्थित झालेला असून, त्याचा थोडासा उल्लेख केल्याशिवाय प्रस्तुत लेख पुरा करणें बरोबर होणार नाहीं. ह्या वादांतील मुख्य मुद्दे येणेंप्रमाणें:—

१ ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव व अभंगकर्ते ज्ञानदेव एक कीं दोन?

२ जर दोन असतील तर नामदेव हे त्यांपैकीं कोणत्या ज्ञानदेवाचे समकालीन?

३ ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव व अभंगकर्ते ज्ञानदेव जर एकच तर ज्ञानेश्वरी-अमृतानुभवाच्या आणि अभंगांच्या भाषेंत इतकें अंतर कां?

४ त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव आणि प्रसिद्ध साधु नामदेव हे जर समकालीन होते तर ज्ञानेश्वरीच्या आणि नामदेवकृत अभंगांच्या भाषेंत इतकी तफावत का?

५ ज्ञानदेव हे जर वारकरी पंथाचे आद्यप्रवर्तक तर त्यांच्या कोणत्याही ओवीबद्ध ग्रंथांत पंढरीचा किंवा पांडुरंगाचा उल्लेख कां आढळत नाहीं?

६ निवृत्ति किती? एक कीं दोन?

७ "बापरखुमादेवीवर" या नांवावर जे अभंग प्रसिद्ध आहेत, ते कोणाचे?

वरील प्रश्नांचों समर्पक उत्तरें देण्यापूर्वीं एक महत्त्वाची गोष्ट आरंभींच सांगितली पाहिजे ती ही कीं, ज्ञानदेव हें नांव धारण करणारे कमींत कमी तीन चार कवि महाराष्ट्रांत होऊन गेलेले आहेत; व कांहीं उपद्व्यापी लेखकांनीं स्वतःचा वेडीवांकडी कविता प्रसिद्ध ज्ञानदेवांच्या नांवावर बिनदिक्कत घुसडून दिलेली आहे. निवृत्तिनाथही कमींत कमी दोन व नामदेव कमतीकमी तीन झालेले आहेत.

वरील प्रश्नसप्तकांतील पहिला प्रश्न असा आहे कीं, "ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव व अभंगकर्ते ज्ञानदेव एकच कीं दोन?" या प्रश्नाचें उत्तर एका शब्दांत किंबहुना एका वाक्यांत देतां येण्यासारखें सोपें नाहीं. कारण, निरनिराळ्या चार पांच प्रकाशकांनीं प्रसिद्ध केलेल्या ज्ञानदेवकृत अभंगांच्या गाथ्यांत निरनिराळ्या अनेक ज्ञानदेवांच्या अभंगांची खिचडी केलेली आढळून येते. तथापि खालील अभंगासारखे कांहीं अभंग ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचेच असले पाहिजेत, याविषयीं फारसा मतभेद होईलसें वाटत नाहीं.

१

नभ नभाचेनि सळें । क्षोभु वाहिजे काळिंदीजळें ।
सासिन्नले जगाचे डोळे । तें रूप पाहावया ॥
भलतैसी हांव । मना न पुरे तेथींची धांव ।
लावण्यसिंधु सींव । सांडूनि जातो गे माये ॥ १ ॥

सुलभ परमात्मा ग माय । मुरोनी देखणेपण उरी ।
याचि कारणें उभा भिंवरेतीरीं । अनुपम्य जयाची थोरी गे माये ध्रु०

काळिंदीजळाचा भोंवरा । कीं माजी वेढूनि इंदीवरा ।
माळ बांधोनियां मधुकरा । रोमामाजी ॥ २ ॥
सकल सिद्धींचा मेळा । तेंवि विभूति शोभे भाळा ।
मुगुटीं रत्नकिळा । लिंग अनुपम्य गे माये ॥ ३ ॥

क्षीरसागरिंचें निवांत सुख । असो हें निमासुरें मुख ।
श्रीयेचें मनोहर देख । टवकारलें दो भागीं ॥
पहावया उरूंची शोभा । सकळ देवांची प्रभा ।
तेथें तारांगणें कैंचीं नभा । लेइला गे माये ॥ ४ ॥

कटावरी ठेवूनि हात । जना दावी संकेत ।
भवजलाब्धीचा अंत । इतुलाची ॥
समचरणींच्या खुणा । उभा पंढरीचा राणा ।
तो आवड जनमना । दुर्लभ गे माये ॥ ५ ॥

कैवल्याचा गाभा । कीं ब्रह्मविद्येचा वालभा ।
निकटपणाचिया लोभा । कैसा उभा असे ॥
देवा पायींची वीट । तेचि माये नीट ।
वरि येऊनि भीमातट । वोळग दावी गे माये ॥ ६ ॥
नेति नेतिचेनि बिरारें । उभऊनि श्रीकरारें ।
शृङ्गाराचेनि पडिभरें । चराचरें वोळगती ॥
हा मेखळेचा मध्यमणि । उदो केला ग्रहगणीं ।
मध्य नायकु तरणी किरणीं । विराजितु गे माये ॥ ७ ॥
आमुची हृदयींची श्रीमूर्ति । घेऊनि विठ्ठलवेषाची बुंथी ।
आतां चाळविसी किती । बापा पालटु नेघे ॥
बाप रखुमादेवीवरा विठ्ठला । त्वां मजशीं अबोला कां धरिला ।
जीवीं जीव आहे उरला । तो निघों पाहे ॥ ८ ॥

२

पूर्वदिशे भानु उगवला । नळनी कमळिणी विकासु केला ।
उष्णकरा अस्तु जाला । सीतकरु प्रवर्तला ।
कमळणी संकोचु केला गे बाईये ॥ १ ॥
पढियंतें मानसीं बहु वसे । असे दुरी तें जवळीच वसे रया ॥ध्रु०॥
दोलक्षीं सोम अंबरीं । त्याचे गण उमटती सागरीं ।
आंवसे कळाहिनु येरु दिसे अंधारीं । तैसा समंधु ये शरीरीं रया ॥२॥
गगनीं वोळली घनुचरें । तेणें क्षितीवरी नाचती मयूरें ।
सोम सीतळपणें कळा मिरवी । अमृत घेवों जाणती ते चकोररया ॥३॥
वोळलीं स्वातीचीं अंबुटें । तें तत्त्व झेलिती शुक्तिकासंपुष्टें ।
येरें नक्षत्रें वर्षती निकटें । काय जळ तयांचें वोखटें रया ॥ ४ ॥
चातकु चंद्रातें चिंतितु । तयाचे मनोरथ पुरवितु ।
बापरखुमादेवीवरु विठ्ठल तो । मी सदां असें हृदयीं ध्यातु रया ॥५॥

ह्या अभंगाच्या मूळ शुद्ध स्वरूपांत लेखकपरंपरादोषामुळें पुष्कळच बदल झालेला असला पाहिजे हें जरी उघड दिसतें तरी त्यांतील, सासि-

ऩळे, भलतैसी, इतुला, बुंथी, अंबुटें इत्यादी शब्द; शृङ्गाराचेनि, विराजतु या प्रकारचीं जुनीं रूपें; अकारांत शब्द उकारांत लिहिण्याची पद्धत आणि विशेषतः उपमाप्राचुर्य वगैरे साम्य पाहतां हे अभंग ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचे नव्हत असें म्हणण्याचें धाडस ज्ञानेश्वरीशीं परिचित असलेला कोणी मनुष्य करील असें वाटत नाहीं. वरील अभंगांतील कांहीं चरण वाचतांना तर, आपण ह्या ज्ञानेश्वरींतील ओव्याच वाचीत आहों कीं काय असा भास होतो. आतां सदर अभंगांच्या शेवटीं " ज्ञानदेव " हें ज्ञानेश्वरींतलें किंवा अमृतानुभवांतलें नांव नसून " बाप रखुमादेवीवर " हें दुसरेंच नांव असल्यामुळें हा अभंग ज्ञानदेवांचा नव्हे असें जर कोणी म्हणेल तर त्याच्या आक्षेपाचें खंडन करणें अशक्य आहे हें कबूल केलें पाहिजे. परंतु " बाप रखुमादेवीवरु" या नांवावर प्रसिद्ध असलेले अभंग ज्ञानदेवांचेच होत असा वारकरी सांप्रदायी लोकांचा समज असून, ज्ञानदेवांनीं आपले वडील विठ्ठलपंत व माता रुक्मिणीबाई यांचा उल्लेख " बाप रखुमादेवीवरु" या शब्दांनीं केला आहें असें कित्येकांचें म्हणणें आहे.

**जालेनि पाइकें गोसावीपण जिकें । परि स्वामिया सेवक साचा होय ।**
**एक एकेविणें स्वामीसेवकपण । मिरविती हे खूण स्वामी जाणें ॥ १ ॥**
**पाईक काय स्वामी स्वामिया काय पाईक ।असतां एके एक दोन्ही नव्हती ।**
**स्वामीचें काज पाईकपणें वोज । करितां होय चोज पैं गा ॥**
**बाप रखुमादेवीवरा विठ्ठलासी वोळगतां । पाइका स्वामी असतां**
**निवृत्ति ऐसा ॥ ३ ॥**

---

या अभंगांत तर निवृत्तिनाथांचा स्पष्ट उल्लेख आहे; यावरून ज्ञानदेवांनीं ज्ञानदेव व 'बापरखुमादेवीवर' या दोन्ही नांवावर अभंग लिहिले आहेत हें उघड दिसतें. एकाच कवीनें निरनिराळ्या दोन नांवावर कविता केल्याचें हें एकच उदाहरण नाहीं.प्रसिद्ध निरंजन माधव कवीनें आपल्या कांहीं काव्यांत "निरंजन माधव" व कांहीं काव्यांत "बनाजी" असा द्विविध स्वनामोल्लेख केला आहे.रामजोशी यांच्या कवितेंतही हाच प्रकार आढळतो.तात्पर्य, ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांनीं आपल्या ओवीबद्ध ग्रंथांशिवाय कांहीं अभंगही रचले

आहेत ही गोष्ट भाषासाम्यावरून सहज सिद्ध होण्यासारखी असल्यामुळें "ज्ञानेश्वरीचा कर्ता अभंग्या ज्ञानदेव नव्हे" या म्हणण्यांत कांहीं तथ्य नाहीं. आतां ज्ञानदेवांच्या नांवावर हल्लीं प्रसिद्ध असलेले सर्वच अभंग आद्य ज्ञानदेवांचे नसून त्यांच्या मागून होऊन गेलेल्या दुसऱ्या अनेक ज्ञानदेवांच्या अभंगांचाही त्यांत समावेश झालेला आहे, हें मी पूर्वी सांगितलेंच आहे. ज्ञानेश्वरीची भाषा आणि ज्ञानदेवी अभंगांची व तत्कालीन इतर संतांच्या अभंगांची भाषा यांत इतकें अंतर असण्याचें कारण, अभंगांची भाषा गेल्या सहाशें वर्षांत लेखकांच्या आणि पाठकांच्या दोषामुळें पुष्कळच बदलली आहे हें होय. एकंदरींत ज्ञानेश्वरीकार ज्ञानदेवांनीं अभंगरचना मुळींच केली नाहीं किंवा हल्लीं उपलब्ध असलेल्या गाथ्यांत त्यांचा एकही अभंग नाहीं या विधानांत बिलकुल तथ्य नाहीं.

"प्रसिद्ध अभंगकार नामदेव हे कोणत्या ज्ञानदेवाचे समकालीन?" असा दुसरा प्रश्न आहे. याचें उत्तर असें आहे कीं ज्ञानदेवाप्रमाणेंच नामदेव या नांवाचे संतकवीही महाराष्ट्रांत अनेक होऊन गेलेले आहेत; व हल्लीं प्रसिद्ध असलेल्या नामदेवाच्या गाथ्यांत या सर्व नामदेवांच्या अभंगांचा समावेश झालेला आहे. १ भारतकर्ता विष्णुदास नामा. भारताशिवाय तुलसीमाहात्म्य, एकादशीमाहात्म्य वगैरे कांहीं ओवीबद्ध प्रकरणें यानें रचलीं आहेत. "विष्णुदास नामा" हें नांव ज्या अभंगांच्या शेवटीं येतें ते अभंग कदाचित् त्याच नामदेवाचे असतील. नामदेवी भारताच्या कांहीं पोथ्यांत 'नामा पाठकु' हें नांव आढळतें. यावरून 'अश्वमेध' ग्रंथाचा कर्ता जो नामा पाठक तोच कदाचित् भारताचाही कर्ता असेल. २ ज्ञानदेवाचे समकालीन नामदेव. ज्या अभंगांच्या शेवटीं फक्त "नामा" हें नामाभिधान आढळतें ते अभंग बहुधा या नामदेवाचे होत. ३ 'नामा शिंपी' या नांवाचा आणखी एक तिसरा नामदेव होऊन गेला असून त्यानें अनेक संतांचीं चरित्रें अभंगवृत्तांत वर्णिलीं आहेत. हा तुकारामबुवांच्या पश्चात् होऊन गेला; कारण तुकारामचरित्रावर त्याचे कांहीं अभंग आहेत. त्यांशिवाय आणखी कांहीं नामदेव झाले, पण त्यांची विशेष प्रसिद्धि नाहीं. या तीन नामदेवांपैकीं दुसरा नामदेव ज्ञानदेवाचा

समकालीन असून ज्ञानदेवचरित्राचा कांहीं भाग त्यानें अभंगवृत्तांत वर्णिलेला आहे. "घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनीं पाहीन रूप तुझें" हें प्रसिद्ध कडवें ह्याच नामदेवाचें. याची कविता भक्तिप्रेमानें नुसती थबथबलेली आहे व ती इतर नामदेवांच्या कवितेपासून तात्काळ निवडून काढितां येते.

वरील मुद्द्यांपैकीं तीन व चार या मुद्द्यांचा विचार पूर्वीं झालाच आहे. आतां, "ज्ञानदेव हे जर वारकरी पंथाचे आद्य प्रवर्तक तर त्यांच्या कोणत्याही ओवीबद्ध ग्रंथांत पंढरीचा किंवा पांडुरंगाचा उल्लेख कां आढळत नाहीं ?" या आक्षेपाचा विचार करूं. पैठणचे एकनाथमहाराजही पंढरपुरचे वारकरी होते, निदान पांडुरंगाचे उपासक होते हें सर्वांस मान्य आहे. परंतु नाथांच्या भागवतांत, भावार्थरामायणांत, रुक्मिणीस्वयंवरांत, शुकाष्टकांत, हस्तामलकांत, चतुःश्लोकी भागवतांत किंवा दुसऱ्या कोणत्याही ओवीबद्ध ग्रंथांत पंढरीच्या विठोबाचा उल्लेख नाहीं याचें कारण काय ? अर्थात् कवीची मर्जी, याहून दुसरें काय सांगतां येणार ? तात्पर्य, ज्ञानदेव किंवा ज्ञानेश्वर या नांवाचे संतकवि कितीही झालेले असोत, परंतु आळंदी येथें ज्या ज्ञानदेवाची समाधि आहे त्यानेंच ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला याबद्दल सर्व जुन्या संतांनीं एकवाक्यतापूर्वक साक्ष दिलेली असल्यामुळें, भारद्वाजादि आक्षेपकांचे वरील आक्षेप अगदीं फोल असून, त्यांनीं उत्पन्न केलेल्या संशयी वातावरणामुळें कोणीही बुजून जाण्याचें बिलकूल कारण नाहीं.

ज्ञानेश्वरीपूर्वीं मराठी भाषेंत ग्रंथरचना झाली होती कीं नाहीं या प्रश्नाचा आतां थोडासा विचार करूं. महानुभाव सांप्रदायी लोकांनीं आपल्या पंथाचे कांहीं ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत त्यांतले कांहीं ग्रंथ ज्ञानेश्वरी पूर्वकालीन असावेत असें वाटतें. परंतु हे ग्रंथ विशिष्ट सांप्रदायी असल्यामुळें ज्ञानेश्वरीसारखें सार्वत्रिक महत्त्व त्यांस प्राप्त झालें नाहीं. "पट्टाधिष्ठित महादाचार्य श्रीभास्कर कवीश्वर महानुभाव" यांच्या नांवावर, "श्रीमद्भागवत दशमस्कंध" या नांवाचा ८२७ ओव्यांचा एक ग्रंथ रा. भास्कर महानुभाव पुणेंकर यांनीं सन १९११ सालीं "महात्म जनांस पाहण्यास धर्मार्थ प्रसिद्ध केला" आहे. ग्रंथाच्या शेवटीं ग्रंथकर्त्यानें ग्रंथरचनाकाल निर्दिष्ट केलेला

नाहीं, परंतु प्रकाशकांनीं " जि० बीड, ता० जामखेड, मौजे साकत सौताडे रानांत रामदरा येथें शके ११९६ सालांत केला." असा शेरा आरंभींच दिला आहे. हा स्थलकालोल्लेख आपण कोणत्या पुराव्याच्या आधारानें केला याची स्पष्टता प्रकाशकांनीं केलेली नाहीं. परंतु त्यांनीं दिलेला वरील शक जर बरोबर असेल तर हा ग्रंथ ज्ञानेश्वरीपूर्वी १६ वर्षे झाला होता असें मानणें भाग आहे. ग्रंथाची भाषा ज्ञानेश्वरीच्या भाषे-सारखी जुनी तर आहेच, परंतु अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं ओव्यांची रचनाही थेट अगदीं ज्ञानेश्वरी थाटाची आहे—इतकी कीं, त्यांतल्या कांहीं ओव्या जर ज्ञानेश्वरींत घुसडल्या तर तें मिश्रण अगदीं बेमालूम झालेलें दिसेल. उपमावैचित्र्यांत ज्ञानेश्वरीशीं हा ग्रंथ अगदीं सहज बरोबरी करील. पुढील ओव्या पहा:—

ना तरी मेघमंडळें । काई चातक लाचाविलें ।
कीं चंद्रें मूळ पाठविलें । चकोरासी ॥
भेटती द्रावक गोटे । तर लोहासी झरा फुटे ।
सोमकांता गळती थेंबुटें । चंद्रकरास्तव ॥
ना तर देखोनि रविमंडळ । विकासे कमळांचें बांबळ ।
कोंभेजे केतकीजौळ । मेघीकरोनि ॥
तैसा सुवर्म जोडे श्रोता । तर रसभावीं फुले कविता ।
तोवर येती सारस्वता । नवरसांचे ॥
सामतयाची आणि । रोउन वोविजे मुक्तामणि ।
तरी चक्रवर्तीचा कंठभूषणीं । योग्य होय ॥
तैसिया जाणाचिया सभा । शोधिजे शब्दरत्नांचा गाभा ।
तें मिरवे अळंकार शोभा । कवितावधूसी ॥
तिये कवितेची गोडी । कोकिळांची तराय मोडी ।
गीतसाळ करी कुडी । किन्नराची ॥
आपुला कलरवीं । कविता कलहंसातें पढवी ।
ते रंग माधुर्य शिकवी । मधुकरातें ॥

आंगींचिया सौरभ्यकळा । उणें आणि परिमळा ।
गांभीर्य करी अवकळा । गगनगंगेसी ॥
रतीचिये भृलतेसी । ते चातुर्य कासी ( ? ) ।
पडप दे संध्यावधूसी । अंगरागाचें ॥
पदप्रमेयाचें गुंफणें । श्यामा भुजबंधातें जिणें ।
कोंवळीक घाली सिरणें । शिरसपुष्पेंसी ॥
निच निच तारागण । वरी दिजे संध्यारागाचें रावण ।
तरी अक्षराचें रसरंगपण । अधिक दिसे ॥
पदाचा मेळावा । रत्नाकरा करी चढावा ।
प्रमेय करी हेवा । अमृतलहरींसी ॥
आंत चंद्रकरा । झळाळ दिसे सुधाकरा ।
तैसे पदाच्या पदराभीतरा । भाव डोळां दीसती ॥
पीळलिया चंद्रबिंब । सूटती अमृतधारांचे कदंब ।
तैसे फुटती तुंब । नवा रसांचे ॥
ऐसिये कवितालते । ब्रह्मविद्येचीं फुलें दिसती फांकते ।
तरी पसरलेनी हातें । कवण न तोडी ॥
पवित्रा गंगोदका । सरिसी परतिजे कस्तूरिका ।
तरि परिमळाचिया कवतिका । कवण न लवी ॥
कापूरकेळीचा पदरीं । दिसती तुळसीचिया मंजिरी ।
तरी तोडून कबरभारीं । कवण न बंधे ॥

अशा सुंदर उपमा सगळ्या ग्रंथभर पसरल्या आहेत. ह्या ग्रंथाचें नांव जरी " एकादशस्कंध " असें आहे, तरी सदर स्कंधांतील उद्धवकृष्णसंवाद हा एकच विषय त्यांत वर्णिला आहे. ह्या भास्कर कवीश्वरानें " शिशुपालवध " ग्रंथ मराठींत रचिला असल्याचाही उल्लेख, ह्याच ग्रंथांत आरंभीं आढळतो. कवीचा नक्की काल कोणता हें समजण्यास जरी कांहीं विश्वसनीय साधन नाहीं, तरी भाषासादृश्यावरून ज्ञानदेवाशीं हा कवि समकालीन असावा असें निश्चित वाटतें. ज्ञानेश्वरीच्या रचनेचें या "एकादश स्कंधा"च्या रचनेशीं किती विलक्षण साम्य आहे, हें पाहिलें, म्हणजे ह्या कवीनें

ज्ञानदेवांच्या रचनेचें किंवा ज्ञानदेवांनीं ह्या कवीच्या रचनेचें उघड उघड अनुकरण केलें असलें पाहिजे असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. कदाचित हा ग्रंथ मूळचा ज्ञानदेवकृत असून तत्कालीन किंवा तदनंतरच्या कांहीं महानुभावांनीं, त्यांत थोडासा फेरफार करून, स्वपंथीय ग्रंथांत त्याचा समावेश केला असण्याचाही संभव आहे.

मुकुंदराज हे मराठी भाषेचे आदिकवि, असा समज पुष्कळ लोकांचा आहे. ठाणें येथील संशोधक रा. विनायक लक्ष्मण भावे यांनीं आपल्या "महाराष्ट्र सारस्वत" नामक ग्रंथांत, मुकुंदराज हे ज्ञानदेवांच्या पूर्वीं होऊन गेले असें म्हटलें आहे. जैत्रपाळाच्या विनंतीवरून मुकुंदराजानीं आपला 'विवेकसिंधु' शके १११० मध्यें लिहिला असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु ज्ञानेश्वरीपूर्वीं १०२ वर्षें निर्माण झालेल्या विवेकसिंधूची व परमामृताची भाषा इतकी सुलभ कशी, या शंकेचें निराकरण त्यांनीं केलें नाहीं. असो.

आतां, ज्ञानदेवमहाराजांनीं व त्यांच्या भावंडांनीं कोणकोणते ग्रंथ लिहिले हें पाहूं. निवृत्ति[1]नाथांचें दोन तीनशें अभंग मात्र प्रसिद्ध आहेत. त्यांचा 'निवृत्तिबोध' नामक एक स्वतंत्र ओवीबद्ध ग्रंथ[2] असल्याचा उल्लेख पुष्कळ ठिकाणी आढळतो, परंतु तो ग्रंथ उपलब्ध नाहीं. सोपान आणि मुक्ताबाई यांचे थोडेसे अभंग मात्र प्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वरी ऊर्फ भावार्थदीपिका, अमृतानुभव ऊर्फ अनुभवामृत आणि चांगदेव पासष्टी हे तीन ग्रंथ ज्ञानदेवांचे अशी सर्व लोकांची समजूत आहे; परंतु चांगदेवपासष्टी हा ग्रंथ ज्ञानदेवांचा नसून 'चक्रपाणी' नामक पुरुषाचा आहे, असें, धुळें येथील प्रसिद्ध संशोधक कै. चांदोरकर यांनीं 'इतिहास आणि ऐतिहासिक' या मासिकांत सप्रमाण सिद्ध केलें आहे. वरील ग्रंथांशिवाय, ज्ञानदेवानीं योगवासिष्ठावर एक मराठी ग्रंथ लिहिल्याचा उल्लेख नामदेवांच्या अभंगांत

---

१ निवृत्तिदेव या नांवाचा आणखी एक कवि झालेला असून त्याचेही कांहीं अभंग उपलब्ध आहेत.

२ अगदीं कांटोतोलपणानें बोलावयाचें म्हटल्यास, हा 'निवृत्तिबोध' मराठींतला पहिला ग्रंथ होय.

आढळतो. हा ग्रंथ इतके दिवस अप्रसिद्ध होता, परंतु थोड्या वर्षांपूर्वी कै. चांदोरकर यांनीं तो मिळवून छापला आहे. या ग्रंथाची भाषासरणी जरी ज्ञानेश्वरीच्या भाषासरणीशीं पुष्कळ अंशी मिळती आहे व त्यांत 'ज्ञानदेव' हें कर्त्यांचें नांव जरी अनेक ठिकाणीं आले आहे, तरी त्याची एकंदर रचना ज्ञानेश्वरीसारखी प्रगल्भ दिसत नाहीं. कवीची काव्यरचनाशक्ति परिपक्व दशेस आलेली नव्हती, अशा वेळीं त्यानें हा ग्रंथ लिहिला असावा. याशिवाय गुप्तधन, भक्तराज, स्वात्मानुभव वगैरे कांहीं लहान ग्रंथ व सुमारें सात आठशें अभंग ज्ञानदेवांचे म्हणून प्रसिद्ध आहेत. ज्ञानदेवांचे बहुतेक अभंग अत्यंत गूढार्थबोधक असून, त्यांचा खरा अर्थ अधिकारयुक्त वाणीनें सांगणारे लोक महाराष्ट्रांत हल्लीं क्वचित् सांपडतील. कित्येक अभंग तर असे आहेत कीं त्यांतील कांहीं शब्दांचा मुळीं अर्थच होत नाहीं.

ज्ञानेश्वरांनीं आळंदी येथें भिंत चालविली या चमत्काराचा अप्रत्यक्ष उल्लेख ज्यांत आला आहे असा एक अभंग त्यांच्या गाथ्यांत सांपडला तो येथें देतों:—

" काय करिसी सकल देवांचे वैभवविलास ।
माझिया स्वामीविण ते अवघे उदास रया ॥ १ ॥

तपन त्या कमळा कमळीं विकासु ।
सुकवी मयंकु काय करिसी सुधांशु ॥ २ ॥

सातांही वारांचे दिवसु एकियाचि सुरिजें ।
तैसें सर्वां सर्वपण माझियेन श्रीराजें ॥ ३ ॥

सर्वज्ञ सुंदर देव होत कां भलतैसे ।
परि जडातें चेष्टविते आणिकां पैं नसे ॥ ४ ॥

जया नांव नाहीं रूप चिन्ह कांहीं ।
नामरूप चिन्ह स्वयेंचि पाहीं ॥५॥

बापरखुमादेविवरु आहे तैसाचि पुरे ।
काय करिसी आणिकां देवांचीं गोवारें रया ॥ ६ ॥

उपमाप्राचुर्य हें जें ज्ञानेश्वरी कवितेचें वैशिष्ट्य तें वरील अभंगांतही पूर्णपणें अनुभवास येतें. "जडातें चेष्टविते" या शब्दांनीं कोणती गोष्ट कवीनें ध्वनित केली आहे हें वाचकांनीच ठरवावें. या दृष्टीनें आमच्या जुन्या कवींचीं कविता लक्ष्यपूर्वक वाचणारांस, त्या कवींच्या चरित्रांतील किती तरी गोष्टींचे उल्लेख त्यांच्याच शब्दांत ग्रथित झालेले आढळतील.

संतशिरोमणि तुकारामबुवांनीं व इतर संतांनीं ह्या आदिकवीचें अनुकरण अनेक बाबतींत केलें आहे. घोंगड्याचे अभंग, पाइकाचे अभंग जसे ज्ञानदेवाचे आहेत तसेच तुकारामबुवांचेही आहेत. ज्ञानेश्वरी ग्रंथ तर सगळ्या भागवतधर्मीय वाङ्मयाची जननीच आहे. बहुतेक साधुसंतांस ज्ञानेश्वरीच्या वाचनानेंच काव्यस्फूर्ति झालेली दिसते. काव्य या नात्यानें-देखील ज्ञानेश्वरीची बरोबरी करणारा दुसरा ग्रंथ मराठींत नाहीं. गोडगोड मृदुमृदुल शब्दयोजना, वर्ण्य विषयाची तात्काल समजूत करून देणाऱ्या सुंदर व समर्पक उपमा, ग्रंथकाराचा अलौकिक पारमार्थिक अधिकार, परिणामकारक वक्तृत्व आणि विलक्षण भाषाप्रभुत्व यांच्या योगानें हा सर्वमान्य आणि सर्ववंद्य ग्रंथ अगदीं अपूर्व झाला आहे.—

ना तरि सर्व सुखाची आदि । जे प्रमेय महानिधि ।
नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे ॥
कीं परमधाम प्रगट । सर्व विद्यांचें मूळपीठ ।
शास्त्रजातां वसौट । अशेषांचें ॥
ना तरी सकळ धर्मांचें माहेर । सज्जनांचें जिव्हार ।
लावण्यरत्न भांडार । शारदेचें ॥
म्हणोनि हा काव्यां रावो । ग्रंथ गुरुवतीचा ठावो ।
एथूनि रसां जाला आवो । रसाळपणाचा ॥
तेविंचि आइका आणीक एक । एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक ।
आणि महाबोधीं कोंवळीक । दुणावली ॥
एथ चातुर्य शाहणें जालें । प्रमेय रुचीस आलें ।
आणिक सौभाग्य पोखलें । सुखाचें येथ ॥

माधुर्यीं मधुरता । शृंगारीं सुरेखता ।
रूढपण उचितां । दिसे भलें ॥
कीं प्रथम वयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी ।
प्रगटे जैसी आगळी । अंगनाअंगीं ॥
ना तरी उद्यांनीं माधवी घडे । तेथ वनशोभेची खाणी उघडे ।
आदिलापासोनि अपाडें । जियापरि ॥

हें, ज्ञानेश्वरीच्या आरंभीं खुद्द ज्ञानेश्वरांनीं केलेलें श्रीमद्भगवद्गीतेचें वर्णन तितक्याच यथार्थत्वानें ज्ञानेश्वरीसही लागू पडतें, इतकेंच नव्हे तर "माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ " ही स्वतःची प्रतिज्ञा ज्ञानदेवांनीं, ग्रंथाच्या आरंभापासून अगदीं अखेरपर्यंत अक्षरशः पाळली आहे. ज्ञानेश्वरींत अशी एकही ओवी सांपडणार नाहीं कीं, जी काढून टाकून तिच्या जागीं दुसरी ओवी घालावी असें कोणा रसिकास वाटेल.

अमृतानुभव हा ग्रंथ अत्यंत गहन आहे. त्यांत ज्ञानेश्वरांनीं आपला स्वानुभव वर्णिला आहे. या ग्रंथावर आजपर्यंत अनेक लेखकांनीं टीका लिहिल्या आहेत; त्यांपैकीं शिवकल्याणाची "नित्यानंदैकदीपिका" ही टीका फार विस्तृत असून, मूळ ग्रंथाचें खरें हृद्गत समजून घेऊं इच्छिणारानें ही टीका अवश्य वाचावी.

ज्ञानेश्वरांनीं आळंदी येथें जीवंत समाधि घेतल्यावर तीनशें वर्षांनीं एकनाथ महाराजांस त्यांनीं दर्शन दिल्याची आख्यायिका प्रसिद्धच आहे. त्यानंतर सुमारें १०० वर्षांनीं, तुकारामबुवांच्या हयातींत, कोणी एक ब्राह्मण आळंदी येथें ज्ञानेश्वरांच्या समाधीजवळ धरणें धरून बसला असतां त्यास, "तूं तुकारामाची भेट घे" असा दृष्टांत झाल्यावरून तो देहू येथें बुवांपाशीं गेला व त्यांनीं त्यास कांहीं अभंग करून दिले. त्यांत या कथेचा स्पष्ट उल्लेख आहे.

काय ज्ञानेश्वरीं उणें । तिहीं पाठविलें धरणें ॥ १ ॥
ऐकोनियां लिखित । म्हुण जाणवली हे मात ॥ २ ॥

तरी जाणे धणी । वदे सेवकाची वाणी ॥ ३ ॥
तुका म्हणे ठेवा । होतां सांभाळावें देवा ॥ ४ ॥

तुम्ही येथें पाठविला धरणेकरी ।
त्याची जाली परी आइका ते ॥ १ ॥
आतां काय पुढें वाढवुनी विस्तार ।
जाला समाचार आइका तो ॥ २ ॥
देवाचे उचीत एकादश अभंग ।
महाफळत्याग करुनि गेला ॥ ३ ॥
तुका म्हणे सेवा समर्पुनी पायीं ।
जालों उतराई ठावें असो ॥४॥

ज्ञानेश्वरांविषयीं तुकारामबुवांच्या मनांत केवढी आदरबुद्धि होती हें खालील अभंगांवरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

ज्ञानियांचा राजा गुरु महाराव ।
म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां ॥ १ ॥
मज पामरा हें काय थोरपण ।
पायींची वाहाण पायीं बरी ॥ २ ॥
ब्रह्मादिक जेथें तुह्मां वोळगणें ।
इतर तुळणें काय पुरे ॥३॥
तुका म्हणें नेणें युक्तीची ते खोली ।
म्हणोनी ठेविली पायीं डोई ॥४॥

बोलीलीं लेंकुरें । वेडीं वांकुडीं उत्तरें ॥ १ ॥
क्षमा करा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ॥ २ ॥
नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥ ३ ॥
तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥ ४ ॥

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ ।
अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ १ ॥
करील तें काय नव्हे महाराज ।
परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥ २ ॥
जेणें हे घातली मुक्तीची गवांदी ।
मेळविली मांदी वैष्णवांची ॥३॥
तुका म्हणे तेथें सुखा काय उणें ।
राहें समाधानें चित्ताचिया ॥४॥

तुकारामबुवांप्रमाणेंच, शिवकल्याण, एकनाथ, नामदेव, जनी, विसोबा खेचर, चोखामेळा, सावंतामाळी, सेना न्हावी, मुक्तेश्वर, जनी, श्रीधर, महीपति, मोरोपंत, निळोबा, उद्धवचिद्घन, निरंजन माधव, मध्वमुनीश्वर वगैरे बहुतेक सर्व संतकवींनी ज्ञानेश्वरांचें स्तुतिस्तोत्र गायिलें आहे. जनाबाईनें तर असें म्हटलें आहे कीं—

ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥
मरोनियां जावें । बा माझ्याच्या पोटा यावें ॥२॥
ऐसें करीं माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥ ३ ॥
जांइन वोवाळुनी । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

आतां आमच्या चालू वहिवाटीप्रमाणें कवीच्या काव्यांतले कांहीं सुरस वेंचे देऊन हा लहानसा निबंध पुरा करूं .

ह्या महाश्रेष्ठ कवीची शालीनता पाहून खरोखर मोठें आश्चर्य वाटतें:—

अहो अर्जुनाचिये पांती । जे परिसणया योग्य होती ।
तिहीं कृपा करूनि संतीं । अवधान द्यावें ॥
हें सलगी म्यां म्हणितलें । चरणा लागोनि विनविलें ।
प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणूनियां ॥
जसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा ।
तरी अधिक तयाचा । संतोष आथी ॥

तैसा तुम्ही मी अंगीकारिला । सज्जनीं आपुला म्हणीतला ।
तरी उण सहजें उपसाहला । प्रार्थूं कायी ॥
परि अपराध तो आणीक आहे । जे मी गीतार्थ कवळूं पाहें ।
तें अवधारा विनवूं लाहें । म्हणऊनियां ॥
हें अनावर न विचारितां । वायांचि धिंवसा उपनला चित्ता ।
येरवीं काय भानुतेजीं खद्योता । शोभा आथी ॥
कीं टिटिभू चांचूवरी । माप सूये सागरीं ।
मी नेणत त्या परीं । प्रवर्तें यथ ॥

× × ×

येऱ्हवीं तरी मी मूर्ख । जरी जाहला अविवेक ।
तरी संतकृपादीपक । सोज्वळ असे ॥
लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे ।
कां मृतही जीवित लाहे । अमृतसिद्धि ॥

× × ×

तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ।
करूनि घ्यावें हें तुमतें । विनवित असें ॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १ ला.

ज्ञानेश्वरींतील सुंदर स्थलें निवडून काढणें म्हणजे क्षीरसागराचें उदक कोणत्या स्थलीं अधिक गोड याचा शोध करण्याइतकेंच मूर्खपणाचें आहे. कारण समग्र ग्रंथच जेथें सर्वोत्कृष्ट काव्यकल्पनातंतूंनीं विणून काढलेला आहे तेथें त्या ग्रंथाचा अमूक भाग सरस आणि अमूक भाग नीरस असा भेद कसा करितां येईल ?

भारतीय युद्धारंभीं सेनापति द्रोणाचार्यांनीं आपल्या शंखाचें आस्फुरण करितांच—

तो गाजत असे अद्भुतु । दोन्हीं सैन्या आंतु ।
प्रतिध्वनि न समात । उपजत असे ॥ १२६ ॥

तयाचि तुलगासवें । वीरवृत्तीचेनि थावें ।
दिव्य शंख भीष्मदेवें । आस्फुरिला ॥ १२७ ॥

ते दोन्ही नाद मीनले । तेथ त्रैलोक्य बधिरीभूत जाहलें ।
जैसें आकाश का पडिलें । तुटोनियां ॥ १२८ ॥

घडघडीत अंबर । उचंबळत सागर ।
क्षोभलें चराचर । कांपत असे ॥ १२९ ॥

तेणें महाघोष गजरें । दुमदुमिताती गिरिकंदरें ।
तंव दळामाजि रणतुरें । आस्फुरिलीं ॥ १३० ॥

उदंड सैंध वाजतें । भयानकें खाखातें ।
महाप्रळय जेथें । धोकडासी ॥ १३१ ॥

आवेशें भुजा त्राहाटिती । विसणेले हांका देती ।
जेथ महामद भद्रजाती । आवरती ना ॥ १३२ ॥

तेथ भेडांची कवण मातु । कांचया केर फिटतु ।
भेणें दचकला कृतांतु । आंग नेघे ॥ १३३ ॥

एकां उभयांचि प्राण गेले । चांगांचे दांत बैसले ।
बिरुदाचे दादुले । हिंवताती ॥ १३४ ॥

ऐसा अद्भुत तुरबंबाळु । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळु ।
देव म्हणती प्रळय काळु । वोढवला आजी ॥ १३५ ॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १ ला.

युद्धाची सर्व तयारी होऊन आतां प्रत्यक्ष शरसंधान सुरू होणार, तोंच वीरशिरोमणि पार्थानें आप्तवधास भिऊन शोकसंविग्न मानसानें जेव्हां चापशरविसर्जन केलें तेव्हां भगवान् श्रीकृष्ण त्यास म्हणतातः—

म्हणे अर्जुना आदि पाहीं । हें उचित काय इये ठायीं ।
तूं कवण हें कायी । करीत आहासी ॥ ६ ॥

तुज सांगें काय झालें । कवण उणें आलें ।
करितां काय ठेलें । खेदु कायिसा ॥ ७ ॥

तूं अनुचिता चित्त नेदिसी । धीरु कंहीं न संडिसी ।
तुझेनि नांवें अपयशीं । दिशा लंबिजे ॥ ८ ॥
तूं शूरवृत्तीचा ठावो । क्षत्रियांमाजी रावो ।
तुझिया लाठेपणाचा आवो । तिहीं लोकीं ॥९॥
तुवां संग्रामीं हरु जिंकिला । निवात कवचांचा ठावो फेडिला
पवाडा तुवां केला । गंधर्वांसी ॥ १०॥
पाहतां तुझेनि पाडें । दिसे त्रैलोक्यही थोकडें ।
ऐसें पुरुषत्व चोखडें । पार्था तुझें ॥ २१ ॥
तो तूं कीं आजि येथें । सांडुनियां वीरवृत्तीतें ।
अधोमुख रुदनातें । करीत आहासी ॥१२॥
विचारीं तूं अर्जुनु । कारुण्यें कीजसी दीनु ।
सांग पां अंधकारें भानु । ग्रासिला आथी ॥१३॥
ना तरी पवनु मेघासि बिहे । कीं अमृतासी मरण आहे ।
पाहें पां इंधनचि गिळोनि जाये । पावकातें ॥१४॥
कीं लवणेंचि जळ विरे । संसर्गें काळकूट मरे ।
सांग पां महाफणी दर्दुरें । गिळिजे कायी ॥ १५ ॥
सिंहासी झोंबे कोल्हा । ऐसा अपाडु आथि कें जाहला ।
परि तो त्वां साच केला । आजि एथ ॥१६॥
म्हणौनि अझुनी अर्जुना । झणें चित्त देसी या हीना ।
वेगीं धीर करूनियां मना । सावधु होईं ॥१७॥
सांडीं हें मूर्खपण । उठीं घे धनुष्यबाण ।
संग्रामीं हें कवण । कारुण्य तुझें ॥१८॥
हां गा तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां ।
सांगें झुंजावेळे सदयता । उचितु कायी ॥१९॥
हे असतियें कीर्तीसी नाशु । आणि पारत्रिकासि अपभ्रंशु ।
म्हणे जगन्निवास । अर्जुनातें ॥ २० ॥

कित्ता, अध्याय २ रा.

ज्ञानेश्वरी ग्रंथाची भाषा फार जुनी व त्यामुळें ती बरीच कठीण आहे ह्यांत संशय नाहीं. परंतु नुसत्या भाषाकाठिन्यास भिऊन तो ग्रंथ वाचण्याचें जे लोक टाळतात त्यांच्यासारखे दुर्दैवी दुसरे कोणीही नसतील. परकीय इंग्रजी भाषेचें प्रभुत्व संपादन करण्यासाठीं जर आमचे होतकरू तरुण इंग्रजी शब्दकोशांचा तर्पेच्या तर्पे कीस पाडण्यास कमी करीत नाहींत, तर ज्ञानेश्वरीसारख्या परममनोहर ग्रंथांतळें काव्यामृत चाखण्यासाठीं त्या ग्रंथाची परिभाषा* समजून घेण्यांत जर त्यांनीं आपले पांच सहा महिने खर्च केले, तर ते अनाठायीं खर्च झाले असें खचित कोणीही म्हणणार नाहीं. परंतु जरुरीशिवाय श्रम करण्याची आमच्या तरुणास संवय नसल्यामुळें, ज्ञानेश्वरीसारख्या उच्च वाङ्मयाशीं त्यांचा परिचय अगदीं बेताबाताचाच आढळतो. सुदैवानें, मुंबई विश्वविद्यालयाच्या उच्च परीक्षांच्या अभ्यासक्रमांत मराठी वाङ्मयाचा प्रवेश आतां झालेला असल्यामुळें,इंग्रजी ग्रंथांप्रमाणेंच ज्ञानेश्वरीसारख्या प्राचीन मराठी ग्रंथांचाही पद्धतशीर अभ्यास आमच्या पदवीधरांकडून होऊं लागेल अशी आशा आतां उत्पन्न झाली आहे. असो.

" अशोच्यानन्व शोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासुंश्च नानुशोचंति पंडिता: ॥

ह्या महत्वाच्या श्लोकावरील पुढील सुंदर भाष्य पहाः—

मग अर्जुनातें म्हणितलें । आम्ही आजि हें नवल देखिलें ।
जें तुवां एथ आदरिलें । माझारींचि ॥ ९१ ॥

तूं जाणता तरी ह्मणविसी । परी नेणिवेतें न सांडिसी ।
आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी । बहुसाल नीति ॥ ९२ ॥

---

* ज्ञानेश्वरीतील सर्व शब्दांचा एक प्रचंड कोश तयार करण्याचें कार्य माझे प्रिय मित्र कै. हरि नारायण आपटे यांनीं हातीं घेतलें होतें, व मीही एक वर्षभर त्यांजबरोबर कोशाचें काम करीत होतों, परंतु हरिभाऊंच्या अकालमृत्यूमुळें तें कार्य आतां कायमचेंच मागें पडलें, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय.

जात्यंधा लागे पिसें । मग तें सैरा धांवे जैसें ।
तुझें शहाणपण तैसें । दिसतसे ॥ ९३ ॥
तूं आपणापें नेणसी । परी या कौरवांतें शोचूं पहासी ।
हा बहु विस्मय आम्हासी । पुढतपुढती ॥ ९४ ॥
तरी सांग पां अर्जुना । तुजपासनि स्थिति या त्रिभुवना ।
हे अनादि विश्वरचना । तें लटकें कायी ॥ ९५ ॥
एथ समर्थु एक आथी । तयापासूनि भूतें होती ।
तरी हें वायांचि काय बोलती । जगामाजी ॥ ९६ ॥
हो कां सांप्रत ऐसें जाहलें । जे हे जन्ममृत्यु तुवां सृजिले ।
आणि नाश पावे नाशिलें । तुझेनि कायी ॥ ९७ ॥
तूं भ्रमलेपणें अहंकृति । यांसि घातु न धरिसी चित्तीं ।
तरी सांगें कायि हे होती । चिरंतन ॥ ९८ ॥
कीं तूं एक वधिता । आणि सकल लोक हा मरता ।
ऐसी भ्रांति झणें चिता । येवों देसी ॥ ९९ ॥
अनादिसिद्ध हें आघवें । होत जात स्वभावें ।
तरी तुवां कां शोचावें । सांगें मज ॥ १०० ॥
परी मूर्खपणें नेणसी । न चिंतावें तें चिंतिसी ।
आणि तूंचि नीति सांगसी । आम्हांप्रती ॥ १०१ ॥
देखें विवेकी जे होती । ते दोहींतेंही न शोचिती ।
जे होय जाय हे भ्रांति । म्हणौनियां ॥ १०२ ॥

कित्ता, अध्याय २

ज्ञानेश्वरीची भाषा फार जुनी असूनही, फार शुद्ध आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ग्रंथकाराची विद्वत्ता तर पदोपदीं दृश्यमान होतेच, परंतु सृष्टीचें व मानवस्वभावचें विस्तृत अवलोकनही, दुसऱ्या कोणत्याही मराठी ग्रंथापेक्षां ज्ञानेश्वरींत विशेषत्वानें दृष्टीस पडतें. " कीं प्रथम वयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी । प्रगटे जैसी आगळी । अंगनाअंगीं "

किंवा 'वेश्या भोगीं कवडा वेंचे । मग दारही चेपूं नये तियेचें । ' अशा प्रकारच्या ओव्या वाचल्या म्हणजे ग्रंथकारानें आपला ग्रंथ बऱ्याच प्रौढ वयांत लिहिला असला पाहिजे असें मानण्याचा मोह वाचकास क्षणभर पडल्याशिवाय राहात नाहीं; परंतु ज्ञानेश्वर महाराजांचें सगळेंच चरित्र अलौकिक होतें, ह्या गोष्टीची आठवण होतांच हा मोह आपोआप नाहींसा होऊन, पूर्वीं उध्दृत केलेल्या "तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥ " या ओवीच्या स्मरणानें सर्व संशयाची निवृत्ति होते आणि "धन्य धन्य" असे उद्गार मुखावाटे आपोआप बाहेर पडून, ग्रंथकाराच्या मनोमय मूर्तीच्या पदकमलावर मस्तक विलीन होऊं लागतें.

वेदप्रतिपाद्य मार्गाविषयीं ज्ञानेश्वर ह्मणतात:-'

**विविध भेद सूचिले । जरी वेदें बहुत बोलिलें ।**
**तऱ्ही आपण हित आपुलें, । तेंचि घेणें ॥ २६० ॥**
**जैसा प्रगटलिया गभस्ती । अशेषही मार्ग दिसती ।**
**तरी तेतुलेहि काय चालिजती । सांगें मज ॥२६१॥**

**कां उदकमय सकळ । जऱ्ही जाहलें असे महीतळ ।**
**तरी आपण घेणें केवळ । आर्तीच जोगें ॥२६२॥**

**तैसे ज्ञानी जे होती । ते वेदार्थातें विवरिती ।**
**मग अपेक्षित तें स्वीकारिती । शाश्वत जें ॥२६३॥**

किता, अध्याय २

"आचार्यातें वाट पुसत" जाणाऱ्या ज्ञानेश्वरांनीं, "नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मण: । शरीरयात्राऽपिच ते न प्रसिद्ध्येदकर्मण: " या भगवद्गीतेच्या तृतीयाध्यायांतील कर्मयोगप्रतिपादक श्लोकावर केलेला टीका वाचली म्हणजे "मनुष्य केवढाही ज्ञानी झाला तरी त्याला कर्मांची न्यास करितां येणें शक्य नाहीं आणि म्हणून त्यानें निरपेक्ष बुद्धीनें कर्म केलेंच पाहिजे" ह्या लो० टिळकांच्या प्रतिपादनाशीं ज्ञानेश्वरांची पूर्ण एकवाक्यता असल्याचें स्पष्ट दिसन येतें. ज्ञानेश्वर म्हणतात:—

*म्हणौनि नैष्कर्म्य होआवें । तरी एथ तें न संभवे ।
आणि निषिद्ध केंवीं राहाटावें । विचारीं पां ॥७७॥

ह्मणोनि जें जें उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त ।
तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥७८॥

पार्था आणिकही एक । नेणसी तूं हें कवतिक ।
जें ऐसें कर्म मोचक । आपैसें असे ॥७९॥

देखें अनुक्रमाधारें । स्वधर्म जो आचरे ।
तो मोक्षु तेणें व्यापारें । निश्चित पावे॥८०॥

ज्ञानेश्वरी ग्रंथाचें जर एखाद्या शोधकबुद्धीच्या विद्वान् मनुष्यानें पांचदहा वर्षें बारकाईनें अध्ययन केलें तर त्याला, तत्कालीन देशस्थिति, प्रचलित दंतकथा, भाषापद्धति, चालीरीति इत्यादिकांवर एक बराच मोठा सुंदर निबंध सहज लिहितां येईल. परीस, पंधरा रुपये दराचें सोनें, चामड्यावर लिहिलेलीं राजाज्ञेचीं अक्षरें इत्यादि अनेक गोष्टींचा उल्लेख ज्ञानेश्वरींत आला आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला गेला तेवढ्या कालांत सोन्याचा भाव पंधरा-पासून साडेपंधरापर्यंत वाढला होता आणि तेव्हांपासून आज सहाशें वर्षांत हा भाव तीस रुपयांवर गेलेला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ज्ञानेश्वरींत जे जुन्या कथांचे उल्लेख आलेले आहेत, त्यांचें विवेचन प्रसिद्ध इतिहाससंशोधक महाराष्ट्रपंडित विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं धुळें येथील 'प्रभात' मासिकांत केलें आहे तें जिज्ञासूंनीं अवश्य पहावें. ज्ञानेश्वरी ग्रंथाचें अध्ययन करणारास चरितार्थासाठीं उद्योग करावा लागू

---

*भावार्थः—म्हणून कर्मरहित होणें या संसारांत असंभवनीय आहे; मग शास्त्रविरुद्ध आचारण कां करावें याचा विचार कर. म्हणून जें जें योग्य व समयानुसार प्राप्त झालेलें कर्म असेल, तें तें तूं निष्कामबुद्धीनें कर. पार्था, आणखी एक कौतुक तुला माहीत नाहीं; तें हें कीं, निष्काम बुद्धीनें केलेलें हें कर्म कर्मापासून म्हणजे संसारांतून सोडविणारें होतें. पहा; अधिकारा-प्रमाणें स्वधर्माचें जो आचरण करितो, तो त्या आचरणानेंच निश्चयेंकरून मोक्ष पावतो. ( साखरे ज्ञानेश्वरी )

नये म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांनीं किभयेची माहिती देणाऱ्या कांहीं ओंव्या आपल्या ग्रंथांत घातल्या होत्या, पण एकनाथमहाराजांनीं त्या मागाहून काढून टाकल्या असा लोकप्रवाद आहे. कै. श्रीपतिबुवा भिंगारकर यांनीं "ज्ञानेश्वरकालनिर्णय" या आपल्या निबंधांत, सदर आख्यायिकेच्या सत्यतेचा पुरावा म्हणून विद्यमान ज्ञानेश्वरींतल्या कांहीं ओंव्या दिल्या आहेत, त्या खरोखरच चिंतनीय आहेत. असो.

परित्राणाय साधुनां विनाशायच दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

ह्या प्रसिद्ध श्लोकावरील ज्ञानेश्वरी भाष्य महत्त्वाचें आहे:-

ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें । साकारू होऊनि अवतरें ।
मग अज्ञानाचें अंधारें । गिळूनि घालीं ॥
अधर्माची अवधी तोडीं । दोषांची लिहिलीं फाडीं ।
सज्जनाकरवीं गुढी । सुखाची उभवीं ॥
दैत्यांचीं कुळें नाशीं । साधूंचा मानु गिंवशीं ।
धर्मासीं नीतीसीं । शेज भरीं ॥
मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळीं ।
तैं योगियां पाहें दिवाळी । निरंतर ॥
स्वसुखें विश्व कोंदे । धर्मचि जगीं नांदे ॥
भक्तां निघती दोंदें । सात्विकाचीं ॥
तैं पापांचा अचळु फिटे । पुण्याची पहांट फुटे ।
जैं मूर्ति माझी प्रगटे । पंडुकुमरा ॥
ऐसेया काजालागीं । अवतरें मी युगीं युगीं ।
परी हेंचि वोळखे जो जगीं । तो विवेकिया ॥

विषयभोगांत खरें सुख नसून, उलट विषयसेवनानें मनुष्य दुःख मात्र भोगतो हें सांगतांना ज्ञानदेव म्हणतातः-

जिहीं आपणपें नाहीं देखिलें । तेचि इहीं इंद्रियार्थीं रंजले ।
जैसें रंकु कां आळुकैलें । तुषातें सेवी ॥ ११ ॥

ना तरी मृगें तृषापीडितें । संभ्रमें विसरोनी जळातें ।
मग तोयबुद्धी बरडीतें । ठाकुनी येती ॥१११॥

तैसें आपणपें नाहीं दिठें । जयातें स्वसुखाचें सदा खराटे ।
तयासीचि विषय हे गोमटे । आवडती ॥ ११२ ॥

येऱ्हवीं विषयीं सुख आहे । हें बोलगेंचि सारिखें नोहे ।
तरी विद्युत्फुरणें कां न पाहे । जगामाजी ॥ ११३ ॥

सांगें वात वर्ष आतपु धरे । ऐसे अभ्रच्छायाचि जरी सरे ।
तरी त्रिमाळिकें धवळारें । करावीं कां ॥ ११४ ॥

म्हणोनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे ।
जैसें महुर कां म्हणिजे । विषकंदातें ॥ ११५ ॥

ना तरी भौमा नाम मंगळु । रोहिणीतें म्हणती जळु ।
तैसा सुखप्रवादु बरळु । विषयिकु हा ॥ ११६ ॥

हे असो आघवी बोली । सांग पां सर्पफणीची साउली ।
ते शीतल होईल केतुली । मूषकासी ॥ ११७ ॥

जैसा आमिषकवळु पांडवा । मीनु सेवी तंवची बरवा ।
तैसा विषयसंगु आघवा । निभ्रांत जाणें ॥ ११८ ॥

हे विरक्तांचिये दिठी । जैं न्याहाळिजे किरीटी ।
तैं पांडुरोगाचिये पुष्टी । सारिखें दिसे ॥ ११९ ॥

म्हणोनि विषयभोगीं जें सुख । तें साद्यंतचि जाण दुःख ।
परि काय कीजे मूर्ख । न सेवितां न सरे ॥ १२० ॥

तें अंतर नेणती बापुडे । म्हणोनि अगत्य सेवणें घडे ।
सांगें पूयपंकींचे किडे । काय चिळसी घेती ॥ १२१ ॥

तयां दुःखितां दुःखचि जिव्हार । ते विषयकर्दमींचे दर्दुर ।
ते भोगजळींचे जलचर । सोडिती केवीं ॥ १२२ ॥

आणि दुःखयोनि जिया आहाती । तिया निरर्थका तरी नव्हती ।
जरी विषयांवरी विरक्ति । धरिती जीव ॥ १२३ ॥

ना तरी गर्भवासादि संकट । कां जन्ममरणींचे कष्ट ।
हे विसांवेवीण वाट । वाहवी कवणें ॥ १२४ ॥
जरी विषयी निषयो सांडिजेल । तरी महादोषीं कें वसिजेल ।
आणि संसारु हा शब्दु नव्हेल । लटिका जगीं ॥ १२५ ॥
ह्मणोनि अविद्याजात नाथिलें । तें तिहींचि साच दाविलें ।
जिहीं सुखबुद्धी घेतलें । विषयदु:ख ॥ १२६ ॥

ज्ञानेश्वरी, अ० ५

भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायांत अभ्यासयोगवर्णनाचे ४७ श्लोक आहेत, त्यांवर ज्ञानेश्वरांनीं ४९७ ओंव्या टीका लिहिली आहे, कारण तो त्यांचा अत्यंत आवडीचा आणि अनुभवाचा विषय. योगाभ्यासाचें इतकें अनुभविक वर्णन मराठींत दुसरीकडे कोठेंही सांपडणार नाहीं. “ शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मन: । नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिन कुशोत्तरम् ॥ ” या श्लोकावरील पुढील सुंदर भाष्य पहा:—

तरी विशेषें आतां बोलिजेल । परि तें अनुभवें उपेगा जाईल ।
ह्मणोनि तैसें एक लागेल । स्थान पहावें ॥
जेथ आराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे ।
वैराग्यासी दुणीव चढे । देखिलिया जें ॥
जो संतीं वसविला ठावो । संतोषासि सावावो ।
मना होय उत्सावो । धैर्याचा ॥
अभ्यासुचि आपणयातें करी । हृदयातें अनुभव वरी ।
ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥
जया आड जातां पार्था । तपश्चर्या मनोरथा ।
पाखांडियाहि आस्था । समूळ होय ॥
स्वभावें वाटे येतां । जरी वरपडा जाहला अवचितां ।
तरि सकामुही परि माघौता । निघों विसरे ॥
ऐसेनि न राहतयातें राहवी । भ्रमतयातें बैसवी ।
थापटूनि चेववी । विरक्तीतें ॥

हें राज्य वर सांडिजे । मग निवांता एथेंचि असिजे ।
ऐसें शृंगारियांहि उपजे । देखत खेंवो ॥
जें येणें मानें बरवंट । आणि तैसेंचि अति चोखट ।
जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ॥
आणिकही एक पाहावें । जें साधकीं वसतें होआवें ।
आणि जनाचेनि पायरवें । रुळेचिना ॥
जेथ अमृताचेनि पाडें । मुळाहि सकट गोडें ।
जोडती दाटें झाडें । सदा फळती ॥
पाउला पाउला उदकें । वर्षाकाळावीण अति चोखें ।
निर्झरें का विशेखें । सुलभें जेथ ॥
हा आतपुही अळुमाळु । जाणिजे तरी शीतळु ।
पवनु अति निश्चळु । मंद झुळके ॥
बहुत करूनि निशःब्द । दाट न रिघे श्वापद ।
शुक हन षट्पद । तेउतें नाहीं ॥
पाणिलगें हंसें : दोनी चारी सारसें ।
कवणें एके वेळे बैसे । तरी कोकिळ ही हो कां ॥
निरंतर नाहीं । तरी आलीं गेलीं कांहीं ।
होतु कां मयूरेंही । आम्ही ना न म्हणों ॥
परि आवश्यक पांडवा । ऐसा ठाव जोडावा ।
तेथ निगूढ मठ होआवा । का शिवालय ॥
दोहींमाजि आवडे तें । जें मानलें होय चित्तें ।
बहुतकरूनि एकांतें । बैसिजे गा ॥

यापुढील सर्व माहिती, प्रत्यक्ष योगसाधन केलेल्या मनुष्यानें द्यावी तशी, अगदीं पूर्ण अनुभवाची आहे; आणि ज्या विषयाचा ज्याचा विशेष व्यासंग त्या विषयावर तो बोलूं लागला म्हणजे त्याला जसें एक प्रकारचें स्फुरण येतें आणि शब्दांसाठीं अडखळावें लागत नाहीं, तसें हें अभ्यास-योगाचें ज्ञानेश्वरी विवरण अत्यंत सुलभ, आणि वर्ण्यविषय निव्वळ शास्त्रीय अर्थात् कमालीचा रुक्ष असतांही, नितांत मनोहर आणि कवित्वपूर्ण उतरलें

आहे. योगाभ्यासांत ज्ञानेश्वरमहाराजांची गति किती विलक्षण होती हें ज्यास पहावयाचें असेल त्यानें भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायांतील १४ व्या आणि १५ व्या श्लोकावरील ज्ञानेश्वरींतील टीका अवश्य वाचावी. ह्या दोन श्लोकांवर ज्ञानेश्वरांनीं ११३ ओव्या लिहिल्या आहेत ! योगसिद्धि झालेल्या माणसाचें स्थित्यंतर कसें होतें त्याचें खालील वर्णन चिंतनीय आहे:-

जैसी आभाळाची बुंथी । करूनि राहे गभस्ती ।
मग फिटलीया दीप्ति । धरून ये ॥
तैसा आहाच वरी कोरडा । त्वचेचा असे पातोडा ।
तो झडोनि जाय कोंडा । जैसा होय ॥
मग काश्मीरीचे स्वयंभ । कां रत्नबीजा निघाले कोंभ ।
अवयव कांतीची भांब । तैसी दिसे ॥
ना तरी संध्यारागींचे रंग । काढूनि वळिलें तें आंग ।
कीं अंतर्ज्योतीचें लिंग । निर्वाळिलें ॥
कुंकुमाचें भरींव । सिद्धरसाचें वोतींव ।
मज पाहातां सावेव । शांतिचि ते ॥
ते आनंदचित्रींचे लेप । ना तरी महासुखाचें रूप ।
कीं संतोषतरूचें रोप । थांवलें जैसें ॥
तो कनंकचंपकाचा कळा । कीं अमृताचा पुतळा ।
नाना सासिनला मळा । कोंवळिकेचा ॥
हो कां जे शारदियेचेनि वोलें । चंद्रबिंब पाल्हेलें ।
कां तेजचि मूर्त बैसलें । आसनावरी ॥
तैसें शरीर होये । जे वेळीं कुंडलिनी चंद्र पिये ।
मग देहाकृति बिहे । कृतांतु गा ॥
वार्धक्य तरी बहुडे । तारुण्याची गांठी त्रिघडे ।
लोपली उघडे । बाळदशा ॥
वयसा तरी येतुळेवरी । येऱ्हवीं बाळाचा बळार्थु करी ।
धैर्याची थोरी । निरुपमु ॥

कनकद्रुमाच्या पालवीं । रत्नकळिका नित्य नवी ।
नखें तैसीं बरवीं । नवीं निघती ॥
दांतही आन होती । परि अपाडें सानेजती ।
जैसी दुबाहीं बैसे पांती । हिरेयांची ॥
माणिकुलियांचिया कणिया । सावियाची अणुप्रमाणिया ।
तैसिया सर्वांगीं उघजती अणिया । रोमाचिया ॥
करचरणतळें । जैशीं का रातोत्पलें ।
पाखाळींव होती डोळे । काय सांगों ॥
निडाराचेनि कोंदाटें । मोतियें नावरती संपुटें ।
मग शिवणी जैसी उतटे । शुक्तिपल्लवांची ॥
तैसी पातियांचिये कवळिये न समाये। दिठी जाकळोनि निघां पाहे।
आधिलीचि परी होये । गगना कवळिती ॥
आईकें देह होय सोनियाचें । परि लाघव ये वायूचें ।
जे आप आणि पृथ्वीचे । अंशु नाहीं ॥
मग समुद्रापैलीकडील देखे । स्वर्गींचा आलोचु आइके ।
मनोगत वोळखे । मुंगियेचें ॥
पवनाचा वारिकां वळघे। चाले तरी उदकीं पाउल न लागे।
येणें येणें प्रसंगें । येती बहुता सिद्धि ॥

आणि महायोगी जे ज्ञानेश्वरमहाराज त्यांस ह्या सर्व सिद्धि वश झालेल्या असल्यामुळें, भिंत चालविणें, रेड्याच्या मुखानें वेद बोलविणें वगैरे चमत्कार त्यांच्या हातून सहज घडले. सिद्धींच्या जोरावर आपल्या ग्रंथाची प्रसिद्धि केल्याचा जो आरोप, नांव न घेतां,वामनपंडितांनीं आपल्या यथार्थदीपिकेंत ज्ञानेश्वरांवर केला आहे, तो यामुळेंच ! असो.

श्रीमद्भगवद्गीतेच्या सातव्या अध्यायांतील " दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ " ह्या श्लोकांत वर्णिलेल्या ' दुरत्यया ' मायेचें वर्णन ज्ञानेश्वरांनीं केलें आहे तें येणेंप्रमाणें:—

आतां महदादि हे माझी माया । उतरोनियां धनंजया ।
मी होइजे हें आया । कैसेनि ये ॥
जिये ब्रह्माचळाचा आधाडा । पहिलिया संकल्पजळाचा उभडा ।
सर्वेचि महाभूतांचा बुडबुडा । साना आला ॥
जे सृष्टिविस्ताराचेनि वोघें । चढत काळकळनेचेनि वेगें ।
प्रवृत्ति निवृत्तीचीं तुंगें । तटें सांडी ॥
जे गुणघनाचेनि वृष्टिभरें । भरली मोहाचेनि महापूरें ।
घेऊनि जात नगरें । यमनियमाचीं ॥
जे द्वेषाच्या आवर्ती दाटत । मत्सराचे वळसे पडत ।
माजि प्रमादादि तळपत । महामीन ॥
जेथ प्रपंचाचीं वळणें । कर्माकर्मांची बोभाणें ।
वरी तताती वोसाणें । सुखदुःखांचीं ॥
रतीचिया बेटा । आदळती कामाचिया लाटा ।
जेथ जीवफेन संघटा । सैंघ दिसे ॥
अहंकाराचिया चळिया । वरि मदत्रयाचिया उकळिया ।
जेथ विषयोर्मीच्या आकळिया । उल्लाळ घेती ॥
उदयास्तांचे लोंढे । पाडित जन्ममरणाचे चोंढे ।
जेथ पांचभौतिक बुडबुडे । होती जाती ॥
सम्मोह विभ्रम मासे । गिळिताति धैर्याचीं आमिषें ।
तेथ देव्हडे भोंवत वळसे । अज्ञानाचे ॥
भ्रांतीचेनि खडुळें । रेवलें आस्थेचेनि गाळें ।
रजोगुणाचेनि खळाळें । स्वर्ग गाजे ॥
तमाचे धारसे वाड । सत्वाचें स्थिरपण जाड ।
किंबहुना हे दुवाड । मायानदी ॥
पैं पुनरावृत्तीचेनि उभडें । झळंबती सत्यलोकींचे हुडे ।
घायें गडबडती धोंडे । ब्रह्मगोळकाचे ॥
तया पाणियाचेनि वहिलेपणें । अझुनी न धरती वोभाणें ।
ऐसा मायापूर हा कवणें । तरिजेल गा ॥

यथ एक नवलावो । जो जो कीजे तरणोपावो ।
तो तो अपावो । होय तें ऐक ॥
एक स्वयंबुद्धीच्या बाहीं । रिगाले तयांची शुद्धीचि नाहीं ।
एक जाणिवेचे डोहीं । गवेंचि गिळिले ॥
एक वेदत्रयाचिया सांगडी । घेतल्या अहंभावाचिया धोंडी ;
ते मदमीनाच्या तोंडीं । सगळेचि गेले ॥
एकीं वयसेचें जाड बांधलें । मग मन्मथाचिये कासे लागले ।
ते विषयमगरीं सांडिले । चघळूनियां ॥
आतां वार्धक्याच्या तरंगा । माजि मतिभ्रंशाचा जरंगा ।
तेणें कवळिजताति पैं गा । चहूंकडे ॥
आणि शोकाचा कडा उपडत । क्रोधाच्या आवर्तीं दाटत ।
आपदागिधीं चुंबिजत। उधवला ठायीं ॥
मग दुःखाचेनि बरटें बोबले । पाठीं मरणाचिये रेवे रेवले ।
ऐसे कामाचे कासे लागले । ते गेले वायां ॥
एकीं यजनक्रियेची पेटी । बांधोनि घातली पोटीं ।
ते स्वर्गसुखाच्या कपाटीं । शिरकोनी ठेले ॥
एकीं मोक्षीं लागावयाचिया आशा । केला कर्मबाह्यांचा भरंवसा
परी ते पडिले वळसां । विधिनिषेधांच्या ॥
जेथ वैराग्याची नाव न रिगे । विवेकाचा तागा नलगे ।
वरि कांहीं तरों ये योगें । तरी विपाय तो ॥
ऐसे तरी जीवाचिये आंगवणें । इये मायानदीचें तरणें ।
हें कासया सारिखें बोलणें । म्हणावें पां ॥
जरी अपथ्यशीळा व्याधी । कळे साधूसी दुर्जनाची बुद्धि ।
कीं रागी सांडी सिद्धि । आली सांती ॥
जरी चोरां सभा दाटे । अथवा मीना गळ घोटे ।
ना तरी भेडा उलटे । विवसी जरी ॥
पाडस वागुर करांडी । कां मुंगी मेरु बोलांडी ।
तरी मायेची पैलथडी । देखती जीव ॥

ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाच्या आरंभींचीं प्रस्तावना इतकी सुंदर आहे कीं, ग्रंथविस्तारभय घटकाभर बाजूस ठेवून, त्या प्रस्तावनेंतल्या थोड्या तरी ओंव्या येथें उतरून घेतल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. ज्ञानेश्वर म्हणतातः—

तरी अवधान येकलें दीजे । मग सर्व सुखासी पात्र होइजे ।
हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइका ॥
परी प्रौढी न बोलें हो जी । तुम्हा सर्वज्ञाच्या समाजीं ।
देयावें अवधान हे माजी । विनवणी सलगीची ॥
कां जे लळेयाचे लळे सरती । मनोरथांचे मनोरथ पुरती ।
जरी माहेरें श्रीमंतें होती । तुम्हाऐसीं ॥
तुमचेया दिठिवेयाचिये वोलें । सासिन्नले प्रसन्नतेचे मळे ।
ते साउली देखोनि लोळें । श्रांतु जी मी ॥
प्रभु तुम्ही सुखामृताचे डोहो ।
म्हणोनि आम्ही आपुलिया स्वेच्छा बोलावो लाहों ।
तेथही जरी सलगी करूं बिहों । तरी निवों कें पां ॥
ना तरी बाळक बोबडां बोलीं । वांकुडा विचुका पाउलीं ।
ते चोज करूनि माउली । रिझे जेंवी ॥
तेवीं तम्हां संतांचा पढियावो । कैसेनि तरी आम्हावरी हो ।
या बहुवा आळुकिया जी आहों । सलगी करीत ॥
वांचूनि माझिये बोलतिये योग्यते । सर्वज्ञ भवादृश श्रोते ।
काय भडयावरी सारस्वतें । पढों सिकिजे ॥
अवधारा आवडे तेसणा धुंधुरु । परि महातेजीं न मिरवे काय करूं ।
अमृताचिया ताटीं वोगरूं । ऐसी रससोय कैंची ॥
हां हो हिमकरासी विंजणें । कीं नादापुढें आइकवणें ।
लेणियाचि लेणें । हें कंहीं आथी ॥
सांगा परिमळें काय तुरंबावें । सागरें कवणें ठायीं नाहावें ।
हें गगनचि आडे आघवें । ऐसा पवाडु कैंचा ॥

तैसें तुमचें अवधान धाये । आणि तुम्ही म्हणा हें होये ।
ऐसें वक्तृत्व कवणा आहे । जेणें रिझा तुम्हीं ॥
तरि विश्वप्रगटितिया गभस्ती । काय हातिवेन न कीजे आरती
कां चुळोदकें अपांपती । अर्घ्यु नेदिजे ॥
प्रभु तुम्ही महेशाचिया मूर्ति । आणि मी दुबळा अर्चितसें भक्ती ।
म्हणोनि बोल जऱ्ही गंगावती । तऱ्ही स्वीकाराल कीं ॥
बाळक बापाचिये ताटीं रिगे । आणि बापातेंच जेवऊं लागे ।
कीं तो संतोषलेनि वेगें । मुखचि वोढवी ॥
तैसा मी जऱ्ही तुम्हांप्रती । चावटी करितसें बाळमती ।
तरी तुम्ही संतोषिजे ऐसी जाती । प्रेमाची असे ॥
आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें । तुम्ही संत घेतलें असा बहुवें ।
म्हणोनि केलिये सलगीचा नोहे । आभारु तुम्हा ॥
अहो ताऱ्हयाचें लागतां झटें । तेणें अधिकचि पान्हा फुटे ।
रोषें प्रेम दुणवटे । पढियंतयाचेनि ॥
म्हणऊनि मज लेंकुरवाचेनि बोलें । तुमचें कृपाळूपण निदैलें ।
तें चेइलें ऐसें जी जाणवलें । यालागीं बोलिलों मी ॥
येऱ्हवीं चांदणें पिकविजत आहे चेपणीं । कीं वारया घापत आहे वाहणीं ।
हां हो गगनासी गवसणी । घालिजे केंवी ॥
आइका पाणी वोथिजावें न लगे । नवनीतीं माथुला न रिगे ।
तेविं लाजिलें व्याख्यान निगे । देखोनि जयातें ॥
हें असो शब्दब्रह्म जिये बाजे । शब्द मावळलेया निवांतु निजे ।
तो गीतार्थु मऱ्हाटिया बोलिजे । हा पाडु काई ॥
परि ऐसियाही मज धिंवसा । तो पुढतियाचि येकी आशा ।
जे धिटींवा करूनि भवादृशां । पढियंतया होआवें ॥
तरि आतां चंद्रापासोनि निववितें । जें अमृताहूनि जीववितें ।
तेणें अवधानें कीजे वाढतें । मनोरथा माझिया ॥

कां जैं दिठिवा तुमचा वरुषे । तैं सकळार्थ सिद्धिमती पिके ।
येरव्हीं कोंभेला उन्मेषु सुके । जरी उदास तुम्ही ॥
सहजें तरी अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा ।
तरी दोंदें पेलती अक्षरां । प्रमेयाचीं ॥
अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावोचि अभिप्रायातें विये।
भावाचा फुलौरा होत जाये । मतिवरी ॥
म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे । तरी हृदयाकाश सारस्वतें वोळे।
आणि श्रोता दुश्चित तरी वितुळे । मांडला रसु ॥
अहो चंद्रकांत द्रवता कीर होये । परि ते हातवटी चंद्री कीं आहे ।
म्हणऊनि वक्ता तो वक्ता नोहे । श्रोतेनिविण ॥
परी आतां आमुतें गोड करावें । ऐसें तांदुळीं कासया विनवावें।
साइखडियानें काई प्रार्थावें । सूत्रधरातें ॥
तो काय बाहुलियांच्या काजा नाचवी । कीं आपलिये जाणिवेची कळा वाढवी ।
म्हणऊनि आम्हा या ठेवाठेवी । काय काज ॥

वरील ओव्यांतील विलक्षण वक्तृत्व पाहिलें म्हणजे मराठी ग्रंथकारांच्या एका संमेलनांत कै. लो. टिळकांनीं काढलेल्या पुढील उद्गारांची आठवण होते. मराठी भाषेंत शब्दसंग्रह कमी असल्यामुळें कांहीं विषयांवर लेख लिहितांना शब्दांचा तुटवडा भासतो अशी कुरकुर करणाऱ्या लेखकांस उद्देशून लो. टिळक म्हणाले, "भाषेंत भरपूर शब्द नाहींत, ही कुरकुर व्यर्थ आहे. आपल्या देशबांधवांस एखादी महत्त्वाची गोष्ट समजून द्यावी असें ज्या लेखकास अंतःकरणपूर्वक वाटत असेल; आपले अज्ञ देशबांधव सुज्ञ होऊन त्यांची सर्वांगीण उन्नति व्हावी या हेतूनें अत्यंत आस्थापूर्वक ज्याला एकादा संदेश त्यांस सांगावयाचा असेल त्याला शब्दांचा तुटवडा कधींही भासणार नाहीं. संस्कृतांतलें गूढ ज्ञान आपल्या महाराष्ट्र बांधवांस सुलभ करून द्यावें या उद्देशानें ज्ञानेश्वरमहाराजांनीं जेव्हां ज्ञानेश्वरी लिहिण्यास प्रारंभ केला तेव्हां--सहाशें वर्षांपूर्वीं सुद्धां—त्यांना शब्दांचा तुडवडा

भासला नाहीं." लो. टिळकाचें हें म्हणणें अक्षरशः खरें आहे. "वेद तीनच वर्णांच्या कानीं लागला" हें जाणून, उच्चवर्णेतर सामान्य जनता आणि स्त्रिया यांचा उद्धार व्हावा अशा कळकळीनें ज्ञानदेवांनीं आपली ज्ञानेश्वरी लिहिली.

अश्रद्दधाना पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।
अप्राप्य मां निवर्तंते मृत्यु संसार वर्त्मनि ॥ ३ ॥

श्रीमद्भगवद्गीता. अ० ९

मराठी ग्रंथ संग्रहालय ... दा. क्र. २४८ ... शाखा

या श्लोकावरील भाष्यांत ज्ञानेश्वर म्हणतातः—

पाहें पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदरा आड ।
परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्धचि सेविती ॥
कां कमलकंदा आणि दर्दुरीं । नांदणूक एकेचि घरीं ।
परि परागु सेविजे भ्रमरीं । येरां चिखलुचि उरे ॥
ना तरी निदैवाच्या परिवरीं। लोह्या रुतलिया आहाति सहस्रवरी ।
तेथ बसोनि उपवासु करी । कां दरिद्रें जिये ॥
तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्व सुखाचा आरामु ।
कीं भ्रांतासि कामु । विषयावरी ॥
बहु मृगजळ देखोनि डोळां । थुंकिजे अमृताचा गिळिलां गळाळा ।
तोडिला परिसु बांधिला गळां । शुक्तिकालाभें ॥
तैसीं अहंममतेचिये लवडसवडी । मातें न पवतीचि बापुडीं ।
म्हणोनि जन्ममरणाचिये दुथडी । डहुळितें ठेलीं ॥
येरव्हीं मी तरी कैसा । मुखाप्रति भानु कां जैसा ।
कहीं दिसे न दिसे ऐसा । वाणीचा नोहें ॥

अत्यंत समर्पक अशा अनेक उपमा देऊन प्रतिपाद्य विषय सुलभ करून सांगण्याची ज्ञानेश्वरांची हातोटी विलक्षण आहे. परंतु कित्येक स्थलीं या उपमांचा इतका अतिरेक झाला आहे कीं, ज्ञानेश्वरी ग्रंथाचा कमींत कमी एक तृतीयांश भाग या उपमानींच व्यापलेला आहे असें दिसून येईल. असो.

ज्ञानेश्वरांस योगमार्गाची आवड विशेष होती हें जरी त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट दिसतें, तरी जेथें जेथें भक्तिमार्गाचें व सगुण हरिभजनाचें महत्व वर्णन करण्याची संधि त्यांस मिळाली, तेथें तेथें ह्या दोन्ही साधनांचें सामर्थ्य त्यांनीं अगदीं मुक्तकंठानें केलें आहे. "सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रता:" या श्लोकावरील टीका पहा:—

" तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे ।
जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥
यमदमा अवकळा आणिली । तीर्थं ठायावरूनि उठविलीं ।
यमलोकींची खुंटली । राहटी आघवी ॥
यम म्हणे काय यमावें । दम म्हणे कवणातें दमावें ।
तीर्थं म्हणती काय खावें । दोष औषधासि नाहीं ॥
ऐसे माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें ।
अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥
ते पाहांटेविण पाहवीत । अमृतेंवीण जीववीत ।
योगेंवीण दावित । कैवल्य डोळां ॥
परी राया रंका पाड धरूं । नेणती सानेयां थोरां कडसणी करूं ।
एकसरें आनंदाचें आवारु । होत जगा ॥
कहीं एखाधेनि वैकुंठा जावें । तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें ।
ऐसें नामघोषगौरवें । धवळलें विश्व ॥
तेजें सूर्य तैसे सोज्वळ । परि तोही अस्तवे हें किडाळ ।
चंद्र संपूर्ण एखादे वेळ । हे सदा पुरते ॥
मेघ उदार परी वोसरे । म्हणऊनि उपमेसी न पुरे ।
हे निःशंकपणें सपांखरे । पंचानन ॥
जयांचे वाचेपुढां भोजें । नाम नाचत असे माझें ।
जें जन्मसहस्रीं वोळगिजे । एक वेळ यावया ॥
तो मी वैकुंठीं नसें । वेळ एक भानुबिंबींही न दिसें ।
वरी योगियांचींही मानसें । उमरडोनि जाय ॥

परी तयांपाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा ।
जेथ नामघोषु बरवा । करिती माझा ॥
कैसे माझ्या गुणीं धाले । देशकाळातें विसरले ।
कीर्तनसुखें सुखी जाले । आपणपांचि ॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामाचे निखिल प्रबंध ।
माजी आत्मचर्चा विशद । उद्दंड गाती ॥

सोमयाग करून स्वर्गास जाणाऱ्या दीक्षितांस स्वर्गलोकीं जीं सुखें भोगा-ण्यास मिळतात त्यांचें वर्णनः—

जेथ अमरत्व हें सिंहासन । ऐरावतासारिखें वाहन ।
राजधानी भुवन । अमरावती ॥
जेथ महासिद्धींचीं भांडारें । अमृताचीं कोठारें
जिये गांवीं खिल्लारें । कामधेनूंचीं ॥
जेथ ओळगे देव पाइका । सैंघ चिंतामणीचिया भूमिका ।
विनोदवनवाटिका । सुरतरूंचिया ॥
गंधर्व गात गाणीं । जेथ रंभेऐशिया नाचणी ।
उर्वशी मुख्य विलासिनी । अंतौरिया ॥
मदन वोळगे शेजारें । जेथ चंद्र शिंपे सांबरें ॥
पवनाऐसे म्हणियारे । धांवणे जेथ ॥
पैं बृहस्पती मुख्य आपण । ऐसे स्वस्तीश्रियेचे ब्राम्हण ॥
ताटिये सुरगण । बहुवस जेथें ॥
लोकपाळ रांगेचे । राऊत जिये पदवीचे ।
उच्चै:श्रवा खांचे । खोलणिये ॥

पण ह्या दीक्षितांचें पुण्य संपल्यावर त्यांची स्थिति कशी होते ?:—

मग तया पुण्याची पाउटी सरे । सवेंचि इंद्रपणाची उटी उतरे ।
आणि येऊं लागती माघारे । मृत्युलोका ॥
जैसा वेश्याभोगीं कवडा वेंचे । मग दारही चेपूं न ये तियेचें ।
तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें । काय सांगों ॥

एवं थितिया मातें चुकले । जिहीं पुण्यें स्वर्ग कामिले ।
तयां अमरपण तें वावो जालें । आतां मृत्युलोकु ॥
मातेचिया उदरकुहरीं । पचूनि विष्ठेच्या दाथरीं ।
उकडूनि नवमासवरी । जन्मजन्म मरती ॥
अगा स्वप्नीं निधान फावे । परि चेइलिया हारपे आघवें ।
तैसें स्वर्गसुख जाणावें । वेदज्ञाचें ॥

"पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ ह्या प्रसिद्ध श्लोकावरील पुढील टीका नितान्त सुंदर आहे:—

मग नि:सीमभाव उल्हासें । मज अर्पावयाचेनि मिसें ।
फळ एक आवडे तैसें । भलतयाचें हो ॥
भक्तु माझियाकडे दावी । आणि मी दोन्ही हात वोढवीं ।
मग देंठु न फेडितां सेवीं । आदरेंशीं ॥
पैं गा भक्तीचेनि नांवें । फूल एक मज द्यावें ।
तें लेखें तरि ऱ्या तुरंबावें । परि मुखींची घालीं ॥
हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडतें जाहलें ।
तें साजुकहि न हो सुकलें । भलतैसें ॥
परि सर्वभावें भरलें देखें । आणि भुकेला अमृतें तोखें ।
तैसें पत्रचि परि तेणें सुखें । आरोगूं लागें ॥
अथवा ऐसेंही एक घडे । जे पालाही परी न जोडे ।
तरी उदकाचें तंव सांकडें । नव्हेल कीं ॥
तें भलतेथ निमालें । न जोडितां आहे जोडलें ।
तेंचि सर्वस्व करूनी अर्पिलें । जेणें मज ॥
तेणें वैकुंठापासोनि विशाळें । मजलागीं केलीं राउळें ।
कौस्तुभाहूनि निर्मळें । लेणीं दिधलीं ॥
दुधाचीं शेजारें । क्षीराब्धी ऐसीं मनोहरें ॥
मजलागीं अपारें । सृजिलीं तेणें ।
कर्पुर चंदन अगरु । ऐसेया सुगंधाचा महामेरु ।

मज हातिवा लाविला दिनकरु । दीपमाळे ॥
गरुडासारिखीं वाहनें । मज सुरतरूंचीं उद्यानें ।
कामधेनूंचीं गोधनें । अर्पिलीं तेणें ॥
मज अमृताहूनि सुरसें । बोनीं वोगरिलीं बहुवसें ।
ऐसा भक्तांचेनि उदकलेशें । परितोषें गा ॥
हे सांगावें काय किरीटी । तुवांचि देखिलें आपुलिया दिठी ।
मी सुदामयाचिया सोडीं गांठी । पव्हयांसाठीं ॥
पैं भक्ति एकी मी जाणें । तेथ साने थोर न म्हणें ।
आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया ॥
येर पत्र पुष्प फल । हें भजावया मिस केवळ ।
वांचूनि आमचा लाग निष्कळ । भक्तितत्व ॥
म्हणोनि अर्जुना अवधारीं । तूं बुद्धि एकी सोपारी करीं ।
तरी सहजें आपुलिया मनोमंदिरीं । न विसंबें मातें ॥

ज्ञानेश्वरीचा नववा अध्याय सगळाच फार सुरस आणि बहारीचा आहे. परंतु ह्या अवतरणांमुळें लेख फार लांबत चालल्यामुळें, सदर अध्यायांतील आणखी कांहीं ओंव्या उतरून घेण्याचा मोह आवरल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं. भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायांतील विश्वरूपवर्णनाच्या ज्ञानेश्वरी ओव्यांत रौद्र, भयानक, शांत इत्यादि रसांचा परिपाक इतका उत्कृष्ट उतरलेला आहे कीं, ह्या आद्य मराठी कवीच्या जिव्हाग्रीं, त्या त्या रसांचीं स्वरूपें धारण करून सरस्वती सारखी नृत्य करीत आहे कीं काय, असें वाटतें व यावरून, असें स्पष्ट विधान करण्यास हरकत नाहीं कीं, ज्ञानेश्वरमहाराजांनीं भारतीय युद्धासारख्या किंवा रामरावणयुद्धासारख्या वीरसोत्पादक किंवा हरिश्चंद्राख्यान, नलोपाख्यान अशा करुणरसोत्पादक किंवा दुष्यंतशकुंतलाख्यानासारख्या शृंगाररसोत्पादक कथानकांवर काव्यें लिहिलीं असतीं तर तींदेखील फार उच्च प्रतींचीं उतरलीं असतीं. असो. आतां, अमृतानुभव आणि योगवासिष्ठ या ग्रंथांतला एकेक उतारा घेऊन व या चारी भावंडांचे थोडेसे सुंदर अभंग उद्धृत करून हा वाढत चाललेला लेख आटोपता घेतों.

"भावार्थदीपिका हा ग्रंथ जरी फार चांगला उतरला आहे, तरी तो स्वतंत्र ग्रंथ नव्हे. यासाठीं, तुम्ही एखादा स्वतंत्र ग्रंथ लिहाल तर बरें होईल" अशी निवृत्तिमहाराजानीं आज्ञा केल्यावरून ज्ञानदेवांनीं 'अमृतानुभव' किंवा "अनुभवामृत" हा सहस्त्र ओव्यांचा स्वतंत्र ग्रंथ लिहिला अशी आख्यायिका आहे. अमृतानुभवाची भाषा अगोदरच फार कठीण; शिवाय त्यांत वर्णिलेला विषयही तितकाच कठीण असल्यामुळें, नुसत्या शब्दार्थावरच संतुष्ट होणाऱ्या सामान्य वाचकांस त्यांतील रहस्य समजणें फार कठीण आहे. आणि ही अडचण लक्षांत घेऊन शिवकल्याण, हंसराज वगैरे प्राचीन कवींनीं व कै. विष्णुबोवा जोग वगैरे अर्वाचीन अधिकारी पुरुषांनीं अमृतानुभवावर विस्तृत पद्य व गद्य टीका लिहिल्या आहेत. ज्ञानेश्वरीवर मात्र कोणत्याही जुन्या कवीची टीका उपलब्ध नाहीं. अमृतानुभवावर प्रल्हादबुवा बडवे यांनीं केलेली संस्कृत टीकाही प्रसिद्ध आहे.

एकत्व न मोडतां व्यवहार कसा घडतो, याविषयीं दृष्टांत:—

अंगें अंगावरी पहुडे । चेइला वेगळा न पडे ।
तया वारुवाचेनि पाडें । घेणें देणें ॥
पाणी कल्लोळाचेनि मिसें । आपणपें वेल्हावे जैसें ।
वस्तु वस्तुत्वें खेळों ये तैसें । सुखें लाहे ॥
गुंफिवा ज्वाळांचिया माळा । लेइलियाही अनळा ।
भेदाचिया आहाळां । काय पडणें आहे ॥
कीं रश्मीचेनि परिवारें । वेढूनि घेतला थोरें ।
तरि सूर्यासि दुसरें । बोलों येईल ॥
चांदणियाचा गिंवसु । चांदावरी पडिलिया बहुवसु ।
काय केवळपणीं त्रासु । देखिजेल ॥
दळाचिया सहस्रवरी । फांको आपुलिया परी ।
परी नाहीं दुसरी । भास कमळीं ॥
सहस्रवरी बाहिया । आहाती सहस्रार्जुना राया ।
तरी तो काय तिया । एकोत्तरावा ॥

सौकटाचिया वोजा । पसरो कां बहु पुंजा ।
परि ताथुवीं दुजा । भाव आहे ॥
कोडीवरी शब्दांचा । मेळावा घरीं वाचेचा
मनिला तऱ्ही वाचा । मात्र कीं ते ॥
तैसे दृश्याचे डाखळे । नाना दष्टीचे उभाळे ।
उठती लेखावेंगळे । द्रष्टत्वेंचि ॥
गुळाचा बांधा । फुटलिया मोडीचा धांदा ।
जाला तरी नुसधा । गूळचि कीं तो ॥
तैसें हें दृश्य देखो । कीं बहु होऊनि फांको ।
परी भेदाचा नव्हे विखो । तेचि म्हणोनि ॥
तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा ।
जऱ्ही विश्वा अशेखा । भरला आहे ॥
दुबंधा क्षीरोदकीं । वाणें परी अनेकीं ।
दिसती तरी तितुकीं । सुतें आथी ॥
पातयाचि मिठी । नुकलितां दिठी ।
अवघियाचि सृष्टि । पाविजे जरी ॥
न फुटतां बीजकणिका । माजी विस्तारे वटु असिका ।
तरी अद्वैत फांका । उपमा आथी ॥
मग मातें म्यां न देखावें । ऐसेही भरे हांवे ।
तरी आंगाचिये विसवे । सेजेवरी ॥
पातयाचि मिठी । पडलिया कीजे दिठी ।
आपुलेचि पोटीं । रिगोनि असणें ॥
कां नुदेलिया सुधाकरु । आपणपें भरे सागरु ।
ना कूर्मी गिळी विस्तारु । आपेंआप ॥
आंवसेचिये दिवसीं । सतराविये अंशीं ।
स्वयें जैसें शशी । रिगणें होय ॥
तैसें दृश्य जिणतां द्रष्टे । पडले जैताचिये कुटे ।
तया नांव वावटे । आपण पयां ॥

अमृतानुभव, प्रकरण ७ वें.

श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत म्हणून जें "योगवासिष्ठ" कै. चांदोरकर यांनीं प्रसिद्ध केलें आहे, त्याचे अध्याय १० असून ओंवीसंख्या ११२४ आहे. "श्रीयोगवासिष्ठ हा ग्रंथ अवघा आठशें ओवींचा आहे," असें कै. चांदोरकरांनीं प्रस्तावनेंत म्हटलें आहे, परंतु प्रत्यक्ष ओव्या मोजून पाहतां त्या ११२४ भरल्या! चांदोरकरांची ही १८ पृष्ठांची प्रस्तावना फार वाचनीय आहे. योगवासिष्ठाची भाषा जरी ज्ञानेश्वरीसारखी जुनी दिसते तरी ज्ञानेश्वरीतलें काव्य किंवा शब्दसौष्ठव त्यांत फारसें नाहीं! त्यामुळें हा ग्रंथ ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचाच असेल काय, असा प्रश्न मनांतल्या मनांत हळूच डोकावतो. परंतु ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या दोन ग्रंथांशिवाय योगवासिष्ठ ग्रंथही ज्ञानदेवांनीं लिहिल्याचा उल्लेख तत्कालीन इतर संतांच्या अभंगांत आढळत असल्यामुळें, हा ग्रंथ ज्ञानदेवकृतच आहे असें धरून चालणें भाग आहे. विसोबा खेचरांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहेः—

भगवद्गीतेवरी टीका। केली भावार्थदीपिका।
अमृत अनुभव करूनि निका। योगवासिष्ठ स्वात्मपत्र ॥

योगवासिष्ठाच्या रचनेवरून, तो ग्रंथ ज्ञानेश्वरींपूर्वीं लिहिला गेला असला पाहिजे असें जरी माझें स्वतःचें मत मी मागें नमूद केलें आहे तरीं खुद्द योगवासिष्ठ ग्रंथांतल्या

तंव बोलिला धूर्जटीकुमरु। म्हणे पारु पारु।
तुज आम्ही अभयकरु। केला सत्य ॥
जैं तुवां गीता केली मऱ्हाटी। जैं स्तुति केली उमेटी।
तैंचि तुज कृपादृष्टी। अवलोकिलें ॥

ह्या ओंव्यांवरून सदर ग्रंथ ज्ञानेश्वरीनंतर झाला हें उघड दिसतें. परंतु एकंदर ग्रंथाची रचना, पूर्वीं लिहिल्याप्रमाणें, एकंदरींत सामान्य प्रतीचीच दिसते. 'तुझी कृपादृष्टी उघडे। तरी ब्रम्हविद्याभांडार उघडे।' अशा प्रकारचे एकाच अर्थाचे यमक अनेक ओव्यांत आले आहेत. ज्ञानेश्वरींत किंवा अमृतानुभवांत असले यमक प्रायः सांपडणार नाहींत. या योगवासिष्ठांतल्या थोड्याशा ओंव्या मासल्यासाठीं येथें देतों.

ग्रंथारंभींच्या ओव्याः—

नमन भवसिंधुतारका । सर्व दुरितहारका ।
प्राप्तिबोधकारका । विघ्नेश्वरा ॥
तूं रचनादि सर्व कर्ता । अज्ञानअंधकारुहर्ता ।
तूं बोध करिसी पूर्णता । स्वप्रकाशींचा ॥
तूं परमात्मपदींची मूस । अनर्घ्यरत्नांची मांदूस ।
तूं स्वस्वरूपप्रकाश । निरंतरु ॥
तूं कैवल्यदाता सुखतरु । प्राप्तिकथनींचा सद्गुरु ।
तूं स्वस्वरूपींचा पारु । स्वकीय दाविसी ॥
तुझी कृपादृष्टि ज्ञानबोधी । परस्वरूपातें साधी ।
निजतत्त्व वेधी । स्वप्रकाशें ॥
जें तूं प्रकटविसी आपुला विवेकु। निरसिशी दुर्गसंसार भयार्णकु।
विश्ववंद्या वरिष्ठ विनायकु । विश्वव्यापी ॥
तुझी कृपादृष्टी उघडे । तरी ब्रह्मविद्याभांडार उघडे ।
उन्मेषासी पूट चढे । प्रज्ञामतीचें ॥
नमन संसारसर्वज्ञवेद्या । तूं विघ्नसर्वांसी आद्या ।
तूं विवेकमार्गीं ब्रह्मविद्या । प्रकाशिसी ॥
तूं परवस्तूचा मेळा । सर्व सुरवरांचा वाळा ।
प्राप्तिपद दाविसी डोळां । अवलिळाची तूं ॥
तूं आनंदाचा आनंदु । उद्बोधाचा उद्बोधु ।
तूं ब्रह्मविद्येचा युवनमदु । बालचंद्रु ॥
तूं नवरस नाट्यनृत्या । वाद्यविद्यामय प्रीत्या ।
तुझे सर्वही भृत्य । सुरासुर ॥
मिनले सुर सर्व समस्तहि । योजितां अभिप्रायप्राप्ति
त्रैलोक्य आदि तुज नमिती । श्रेष्ठा म्हणौनी ॥
कैलास पर्वतीं ईशान्यु । आधीं वंदी गजाननु ।
अपार अर्थ गहनु । काये वर्णूं ॥

तूं अष्टसिद्धिची जोडी । कल्पतरूची वाडी ।
ज्ञानामृतसागराची गोडी ।
तूं स्वकीय मूर्च्छाना फुडी । मोक्ष पदाची ॥
नमन बाळचंद्र साध्या । कृपा कथिसी ब्रह्मविद्या ।
निमिक्षें ग्रासिशी अविद्या । ऊर्ध्वदृष्टी ॥
तुझी करणी अनादि । अपार रचिली आदि ।
मग तृतीय अंशु रचिला अनादि । सीवरूपू ॥

असें हें गणेशस्तवन सुमारें ३२ ओव्या आहे. आतां सरस्वतीस्तवनाच्या पुढील ओव्या पहा:—

आतां नमन माते सरस्वती । तूं परम योगिणी मुक्ति ।
तुझें करणें अकळशक्ति । दिव्यरूपे ॥
विरींचि जो चतुर्मुखु । तो परब्रम्हाचा वपु ।
तो तुझा आजा * विशेषु । निर्धारु हा ॥
अनुक्रमें बोलिजेसी नाती । उभयगती सून म्हणती ।
या खुणा जे जाणती । ते आत्मज्ञानिये ॥
आणिकें येकें अर्थें पाहतां । चतुराननु तुझा जनिता ।
तूं त्याची जनिता । हें नवल थोर ॥
तुझा कृपाकटाक्षु गोमटा । तो लावी प्रेमतत्त्वाचिया वाटा ।
छेदुनी सांडी फांटा । संसाराचा ॥

जरी अवलोकिसी कृपा करुनी । तरी तुटे भवार्णवभ्रमणी ।
गुण निर्गुणाची करणी । तूंचि जाणसी ॥
तुझीये रचनेची थोरी । ते काई वर्णूं ॐ सुंदरी ।
वेद दरूसणें उदरीं । तुझां माते ॥

---

* शारदा ही 'ब्रह्मकुमारी' म्हणून प्रसिद्ध आहे, परंत येथे तिला ब्रह्मदेवाची नात म्हटलें आहे.

नमन आदिशक्ति । तूं परशिवाशक्तिची प्राप्ती ।
तुज वंदून वर्तती । मुक्ति चतुर्विधा ॥
तूं आगमासी निर्गमा । वेदविद्या अगोचर क्षमा ।
तूं दिव्य कांती श्यामा । योगमार्गींची ॥
तूं विवेकदुर्गाची चरी । ज्ञानमूर्ताची भरोवरी ।
निराळंब पक्षी खेचरी । क्षमारूप ॥
तूं प्रबोधचंद्राची कळा । आत्मनाथ योगियाची मेखळा ।
तुवां अवलोकितां अवळीला ॥ आगम वेदशास्त्रें ॥
तूं वैराग्यकुसुमांचा आमोदु । प्राप्तिकथनींचा बोधु ।
दर्शन उपदर्शना तुझा सोधु । नव्हेचि माते ॥

निवृत्तिनाथांचा उल्लेख या ग्रंथांत अनेक ठिकाणीं आला असून, "मग संतोषोनि म्हणे सारजा । आईक पां निवृत्तिनाथ–आत्मजा॥" या ओवींत तर निवृत्तिनाथांचा आपण पुत्र आहें, असें कवि म्हणत आहे. ज्ञानेश्वरीचा कर्ता आपेगांवचा ज्ञानदेव हा निवृत्तिनाथाचा भाऊ नसून पुत्र होता असा तर्क "निवृत्तिनाथसुतें" इत्यादि ज्ञानेश्वरींतील कांहीं शब्दांच्या जोरावर 'भारद्वाज' पक्षानें लढविला आहे त्याला योगवासिष्ठांतील ह्या पुराव्यानें एक प्रकारचा दुजोरा मिळत आहे ! असो.

श्रीमद्भगवद्गीतेच्या खालोखाल योगवासिष्ठ हा ग्रंथ महाराष्ट्रांतील अध्यात्मप्रिय कवींचा मोठा आवडता दिसतो, कारण ह्या ग्रंथावर ज्ञानदेवांशिवाय, पूर्णानंद शिवराम, माधवदास नारायणांकित, रंगनाथ, हरिदास, व्यंकट वगैरे अनेक कवींनीं टीका केली आहे. आतां, ज्ञानदेवकृत योगवासिष्ठांतील विषयविवरणाचा नमुना म्हणून थोड्याशा ओव्या येथें देऊन मग ज्ञानदेवांच्या अभंगांकडे वळूं.

चतुर्युगधर्मविवरणः—

असो वसिष्ठ ऋषीतें । प्रश्णु केला रघुनाथें ।
सर्वदा अभ्यासावें योगातें । कीं युगपरत्वें ॥ ११ ॥

यावरी रामाचिये मनींचें जें । जाणितलें ऋषिराजें ।
यासी अपेक्षित युगधर्मांचें । जाण वसे ॥१२॥

तरी सांगों युगधर्म । निरसूनि अज्ञानतम ।
अज्ञुनी यांचे मनोधर्म । निरसती ना ॥१३॥

पुसतुसे आर्ती । परि राजमदु चित्तीं ।
तो निरसावा बहु प्रतीति । दाऊनियां ॥१४॥

मग बोलिला श्रीगुरुनाथु । हा युगधर्मु समस्तु ।
वेदें बोलिला यथोक्तु । तें सांघों तुज ॥ १५ ॥

तरि कृत युग बत्तीस लक्ष । तेथ येकविस ताड उंच * मनुष्य ।
तेयांसि येक लक्ष आयुष्य । दो अवस्था ॥ १६ ॥

तेयांचे अस्थिगत प्राण । इंद्रियां नांदणूक स्वल्प जाण ।
निश्चिळत्व करणें । बहुतेयांसी ॥ १७ ॥

मनाची प्रवृति थोकडी । निश्चळत्वाची अपार गोडी ।
कृतयुगींची परवडी । बरवी देखा ॥१८॥

ते गमन करिती । तरी पदीं पदीं ग्रामु उलंघिती ।
दिनमानें काई करिती । तें चतुरीं जाणावें ॥१९॥

तिये युगीं धर्मु आत्मउपास्ति । जे यथोक्त आचरती ।
ते चैतन्यप्राप्ति पावती । निर्धारेंसी ॥२०॥

तेथ धर्मु हे उक्ति । जयां घडे निरुती ।
अधर्मास्तव पतित आथी । खालुतें येणें ॥ २१ ॥

विकारनिमित्यें अंतु । तेणें होये देहपातु ।
ते जन्मती त्रेतांतु । भर्वसेनी ॥ २२ ॥

---

* ह्या एकवीस ताड उंच माणसांचीं घरें किती उंचीची असतील याची कल्पनाच केली पाहिजे ! अमेरिकेंत हल्लीं पस्तीस चाळीस मजली घरें बांधतात, पण त्या घरांत सुद्धां ह्या कृतयुगांतल्या माणसास ताठ उभें राहतां आलें नसतें हीं नाहीं याचा संशयच आहे !

इतक्या ओंव्यांवरून योगवासिष्ठाच्या स्वरूपाची कल्पना वाचकांस होईल.

एकनाथस्वामींच्या पूर्वींची ज्ञानेश्वरीची प्रत रा. राजवाडे यांनीं प्रसिद्ध केली आहे, परंतु ती जितकी जुनी आहे असें भासविण्याचा प्रयत्न रा. राजवाडे यानीं केला आहे तितकी जुनी ती खरोखरच असेल असें मानण्यास कांहीं पुरावा नाहीं. गोंधळेकर, माडगांवकर, कुंटे, जगदीश्वर छापखाना, तुकाराम तात्या इत्यादिकांनीं छापलेल्या ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रति प्रसिद्ध आहेत. पण त्या सर्वांत अधिक शुद्ध प्रत कोणती हें सांगणें कठीण आहे. तरी त्यांतल्या त्यांत माडगांवकराच्या प्रतींत, निरनिराळ्या अनेक पोथ्यांतले निरनिराळे पाठ टिपांत दिलेले असल्यामुळें, तुलनात्मक दृष्टीनें, त्या प्रतीची उपयुक्तता विशेष आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्ञानेश्वरीचा नुसता शब्दार्थच ज्यांस समजून घ्यावयाचा असेल त्यांस साखरेबुवांची सार्थ ज्ञानेश्वरी उपयुक्त वाटेल. पंडित पांडुरंग शर्मा यांनीं "ज्ञानेश्वरींतील तत्त्वज्ञान" या विषयावर * 'चित्रमय जगत्' मध्यें प्रसिद्ध केलेले लेखही वाचनीय आहेत.

ज्ञानदेवांच्या नांवावर प्रसिद्ध असलेल्या अभंगांची संख्या सुमारें १२०० असून, त्यांत ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचे अभंग फार तर चारपांचशें असतील नसतील. त्यांतील पांच सुंदर अभंग येथें देतों:—

१

त्रिभंगी देहुडा ठाण मांडुनिया सधे ।
कल्पद्रुमातळीं वेणु वाजवितो आहे ॥१॥
गोविंदु वो माये गोपाळु वो ।
सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदु वो ॥ ध्रु० ॥
सांवळें सगुण सकळां जीवांचें जीवन ।
घनानंद मूर्ति पाहतां हारपलें मन ॥ २ ॥
शून्य स्थावर जंगम व्यापुनि राहिला अकळ ।
बाप रखुमादेविवरु विठ्ठलु सकळ ॥३॥

* चित्रमयजगत् वर्ष १२।१३.

२

निळिये रजनी वाहे मोतिया सारणी ।
निळेपणे खाणी सांपडली ॥१॥
आंगणीं चिंतामणि जळधरु सिंपणी ।
अमृतसंजीवनी जीवनकळा ॥ २ ॥
सुमनाचे शेजे विरहिणी विराजे ।
शयनीं सुलजे आरळ सेज ॥ ३ ॥
माजयानें हटीं मुखकमळ टेंकी ।
निळिये अवलोकी कृष्णमूर्ति ॥ ४ ॥
कमळणी आमोद सुस्वाद मकरंद ।
चंदनाची अभेद उटी अंगीं ॥ ५ ॥
कर्पूरपरिमळें दिव्य खाद्य फळें ।
ठेवूनि सोज्वळें वाट पाहे ॥ ६ ॥
मन तों निळिये गोविंदाचिये सोये ।
विरहिणी पाहे वाटुली ऐसी ॥ ७ ॥
ज्ञानदेवीं निळिये वाटुली गोविंदीं ।
कृष्ण निळिये पदीं ठाव जाला ॥ ८ ॥

३

अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनंदें भरीन तीन्ही लोक ॥ १ ॥
जाईन गे माय तया पंढरपुरा ।
भेटेन माहेरा आपुलिया ॥ २ ॥
सर्व सुकृताचें फळ मी लाहीन ।
क्षेम मी देईन पांडुरंगीं ॥ ३ ॥
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलेशीं भेटी।
आपुले संवसाटी करूनि ठेला ॥ ४ ॥

गोकुळीं कमळ विस्तारलें साचें ।
ध्यान श्रीधराचें करावया ॥
यमुनेच्या पाबळीं मूर्ति देखिली सांवळी ।
चिदाकाशींची वोतिली प्रेमतनु गे माये ॥ १ ॥

आवडीचें वालभ ब्रह्म पुंजाळलें ।
गोपवेषें गाई राखे ।
कांबळीची बुंथी घेउनि कल्पद्रुमातळीं ।
त्रिभंगी ठाण मांडियलें गे माये ॥ ध्रु० ॥

योगमायेचेनि विलासें उभा देहुडा पाउलीं ।
तेथें दीप्ति जे उद्देली तेजाकारें ॥
अंगुष्ठीं अंगुष्ठ स्थापियेलें मूळपीठ ।
सुनीळ नभाचेनि काळीवटे अंगोळिया गे माये ॥ २ ॥

शेष गुढारीं विसंचला कीं भूमि पावो ठेविला ।
तोचि विन्यस्त उभारला तेजःपुंज ॥
कुंकुम पिंजरिचेनि सळे मा पार्वती रातोत्पळें ।
तळवाचे रंग बाहळें पाउलीं श्लाघे गे माये ॥ ३ ॥

चरणकमळीं कमळा कैसी विराजली बाळा ।
तेथें जाला एकवळा ये कमळीं कमळा ॥
ध्वज वज्र अंकुशरेखा, चरणीं वोळलें पीयूष ।
नखें मरळीं देखा काळेपणाचेनि गे माये ॥ ४ ॥

घोटीं सुनीळ निरावकाशें काश पाहतां भासलासे ।
जानुजघन प्रकाशे नभ धवळलें ॥
कासे कसिला सोनसळा खवे आला मध्यस्थळा ।
रत्नजडित मेखळा शोभतसे गे माये ॥ ५ ॥

द्वितीय कमळीं प्रजापति कीं रोमराजी झळकती ।
तेथें उपनली दीप्ती काळी त्रिवळीची ॥

उदर वक्षस्थळ द्विजपद निर्मळ ।
स्तन चंद्र पोकळो ढिसाळ काळिमा जैसी गे माये ॥ ६ ॥

उदधीचेनि प्रेमसळें आपाद वैजयंती माळे ।
वरी शोभताती सोहळे सगुणाचे ।
दशनदीप्ति झळाळी रत्नकिळा मागों आली ।
दिसे हनुवटी बुजाली प्रभेचेनि गे माये ॥ ७ ॥

प्रणवाचा मरिगळा पूजनासी आला भाळा ।
तुर्येसहित त्रिपुंड्र टिळा अर्ध ऊर्ध्व मात्रीं ॥
अभीनव महाकारणीं । पवनपंचकाची खेंवणी ।
कुंडलें पेरावाणी कर्णीं ढाळ देती गे माये ॥ ८ ॥

माथां मोरपिसावेठी गंडस्थळीं पडे दीप्ति ।
स्वयें विस्मित श्रीपति तेजःपुंज गे माये ॥
तरुबोंस खोंविले शिरीं वेणु ठेवूनि अधरीं ।
नंदरायाचा खिल्लारी वोज काय सांगो गे माये ॥९॥

सप्तरंध्रीं सप्तस्वर चाळी अंगोळिया मनोहर ।
मुद्रिका शोभती साकार रत्नजडित गे माये ॥
तिया वेगुचिया किळा गोपी वेधल्या सकळा ।
अवघिया जाल्या पैं काळया कृष्णरूपें गे माये ॥१०॥

ऐसा नटनाट्य वेषधारी । सर्वें संवगडे वारिधारी ।
कैसा त्रिभंग कुसरी उभा असे गे माये ॥
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलु सुखाचें निधान ।
तें मी हृदयीं संपूर्ण सांठविलें गे माये ॥११॥

५

हरि आला रे हरि आला रे ।
संतसंगें ब्रह्मानंदु जाला रे ॥ध्रु०॥

हरि येथें रे हरि तेथें रे ।
हरिवांचुनि न दिसे रितें रे ॥१॥

हरि पाहीं रे हरि ध्याईं रे ।
हरिवांचूनि दुजें नाहीं रे ॥२॥
हरि वाचे रे हरि नाचे रे ।
हरि पाहतां आनंदु सांचे रे ॥ ३ ॥
हरि आदी रे हरि अंतीं रे ।
हरि व्यापकु सर्वां भूतीं रे ॥ ४ ॥
हरि जाणा रे हरि वाना रे ।
बाप रखुमादेवीवरू राणा रे ॥ ५ ॥

ज्ञानदेवानंतरच्या अनेक संतकर्त्रींनीं, ज्ञानेश्वरींतल्या कल्पना, उपमा आणि विचार जशाचे तसे आपल्या कवितेंत उतरले आहेत, असें जें विधान पूर्वीं केलें आहे, त्याच्या समर्थनार्थ, आणखी एक पुरावा सहज सांपडला, तो येथें नमूद करून ठेवितों. संतशिरोमणि चोखामेळा यांचा एक अभंग प्रसिद्ध आहे, त्याचे पहिले दोन चरण असे आहेत:—

ऊंस डोंगा परी रस नाहीं डोंगा ।
कां रे भुललासी वरिलिया सोंगा ॥
नदी डोंगी परी नीर नाहीं डोंगा ।
कां रे भुललासी वरिलिया सोंगा ॥ २ ॥

या दोन चरणांतील ऊंस आणि नदी यांच्या उपमा ज्ञानेश्वरींतील पुढील ओवींतून घेतलेल्या दिसतात:—

"आणि वांकुडेन वोघेंसी । गंगा वाहे उजूचि जैसी ।
कां पुढींवळा उसीं । गोडी जैसी ॥

अध्याय १८, ओवी ८४२

निवृत्तिनाथांचा 'निवृत्तिबोध' नामक एक ओवीबद्ध ग्रंथ असल्याची प्रसिद्धि आहे, परंतु तो उपलब्ध नाहीं. याशिवाय, 'काव्यसंग्रह' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या 'लघुकाव्यमाले'च्या पहिल्या भागांत 'परमप्रकाश' नामक ८५ ओव्यांचें एक अध्यात्म-प्रकरण 'निवृत्तिनाथकृत' म्हणून छापलें आहे, परंतु सदर प्रकरणाची भाषा ज्ञानेश्वरीच्या व निवृत्तिनाथकृत अभं-

गांच्या भाषेहून बरीच अर्वाचीन असून, शेवटीं 'निवृत्तिनाथ अवधूत' असा आपल्या नांवाचा स्पष्ट उल्लेख कर्त्यानें दोन वेळां केलेला असल्यामळें ज्ञानदेवबंधु निवृत्तिनाथांचा हा ग्रंथ नव्हे हें निस्संदेह रीतीनें सिद्ध होतें. निवृत्तिनाथांचे सुमारें ३०० अभंग गाथ्यांत छापले आहेत, त्यांची भाषा पुष्कळच जुनी असल्यामुळें त्यांच्या कर्तृत्वाविषयीं मात्र शंका बाळगण्याचें कारण नाहीं. त्यांतले फक्त पांचच अभंग येथें उतरून घेतों, म्हणजे निवृत्तिनाथांच्याही कवितेचा एकाच लेखांत परामर्श घेतल्यासारखें होईल.

१

अवीट अमोला घेतां पैं निमोला।
तो प्रत्यक्ष देखिला भीमातटीं ॥ १ ॥
अव्यक्त साकार आकारिला अंकुर।
क्षरला चराचर भक्तिकाजें ॥ २ ॥
अनुमान विटे सर्व घटीं माजिटें।
तें परब्रह्म इटे भक्तिसाह्य ॥ ३ ॥
निवृत्ति घनवट पिकलिसे पेंठ।
पुंडलिकें प्रगट केलें असे ॥ ४ ॥

२

मृगजळाभास लहरी अपार।
हा प्रपंचपसारा उदरीं जया ॥ १ ॥
तें रूप वैकुंठ कृष्णरूपें खेळे।
गोपाळांचे लळे यमुनातटीं ॥ २ ॥
जाळूनि इंधन उजळल्या दीप्ति।
अनंत स्वरूपीं एक दिसे ॥ ३ ॥
निवृत्ति सागर ज्ञानार्क आगर।
कृष्णचि साचार बिंबलासे ॥ ॥ ४ ॥

३

म्हणवितो नंदाचा बाळ यशोदेचा।
आपण चौवाचातीत कृष्ण ॥ १ ॥

शब्दासी नातुडे बुद्धीसी सांकडें ।
तो सप्रेमें आतुडे स्मरतां नाम ॥ २ ॥

उपचाराच्या कोटी न पाहे परवडी ।
तो प्रेमळाचीं घोडीं धोई अंगें ॥ ३ ॥

निवृत्तीचें तप फळलें अमूप ।
गयनीराजें दीप उजळिला ॥ ४ ॥

४

विश्वामाजी अक्षर क्षरलें साचार ।
त्या रूपा आधार पुससी काई ॥ १ ॥

आपणचि विश्व आपणचि विश्वेश ।
जेथें द्वेषाद्वेष मावळले ॥ २ ॥

निवृत्ति म्हणे तें रूप संतांसमीप ।
ध्याती आपेआप वोसंडत ॥ ३ ॥

५

देहाची दिवटी अखंड पैं सतेज ।
चंद्र सूर्य भोज नाहीं तेथें ॥ १ ॥

नाहीं तेथें रवि नाहीं तेथें चंद्र ।
अवघाचि महेंद्र एका तत्त्वें ॥ २ ॥

दीपकेंचि दीपक विस्तार अनेक ।
अवघाचि त्रैलोक्य एका तत्त्वें ॥ ३ ॥

निवृत्ति संपन्न एक तत्त्व सेवी ।
सर्वत्र गोसावी दिसे आम्हा ॥ ४ ॥

वरील तिसऱ्या अभंगांत निवृत्तिनाथांनीं "गयनीराज" ( गहिनीनाथ ) या शब्दानें आपल्या गुरूचा स्पष्ट उल्लेख केला आहे व तो ज्ञानेश्वरीकार ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीच्या शेवटीं निर्दिष्ट केलेल्या स्वतःच्या गुरुपरंपरेशीं जुळतो. पुढील ओव्या पहाः—

क्षीरसिंधुपरिसरीं । शक्तीचा कर्णकुहरीं ।
नेणों कैं श्रीत्रिपुरारि । सांगितलें जें ॥

तें क्षीरकल्लोळा आंत । मकरोदरीं गुप्त ।
होता तयाचा हात । पैठें जालें ॥

तो मत्स्येंद्र शतशृंगीं । भग्नावयवा चौरंगी ।
भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण जाला ॥

मग समाधि अव्यत्यया । भोगावी वासना या ।
ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ॥

तेणें योगाब्जिनीसरोवरु । विषयविध्वंसकु वीरु ।
तें पदीं कां सर्वेश्वरु । अभिषेकिलें ॥

मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव ।
संपादिलें सप्रभव । श्रीगैणीनाथा ॥

तेणें कळिकळित भूतां । आला देखौनि निरुता ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १८, ओंव्या १७५२–१७५८.

ह्यावरुन, अभंगकर्ते निवृत्तिनाथ हेच ज्ञानेश्वरीकर्त्या निवृत्तिनाथांचे गुरु होत ही गोष्ट अगदीं निस्संदेह रीतीनें सिद्ध होत असून, भारद्वाजादिकांनीं उडविलेल्या धुळीनें ज्यांची साशंकवृत्ति झालेली असेल त्यांना यापुढें, ती वृत्ति कायम ठेवण्याचें बिलकुल कारण नाहीं. त्याचप्रमाणें, ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव, त्यांचे गुरु निवृत्तिनाथ व प्रसिद्ध संत नामदेव हे समकालीन होते हें सिद्ध करणारा भरपूर पुरावा निवृत्तिनाथांच्या अभंगांत सांपडतो. पुढील अभंग पहा:—

१

आनंद सर्वांचा काला अरुवार ।
नामया साचार फुंदतसे ॥१॥

राही रखुमाई सत्यभामा माता ।
आलिया त्वरिता काल्यामाजी ॥२॥
उचलिला नामा प्रेमाचें फुंदन ।
नुघडी तो नयन कांहीं केल्या ॥३॥
बुझावीत राही रखुमादेवी बाही ।
पीतांबर साई करी हरि ॥४॥
ज्ञानासी कवळु सोपानासी वरु ।
खेचरा अरुवारु कवळु देतु ॥५॥
निवृत्ति पूर्णिमा भक्तीचा महिमा ।
नामयासी सीमा भीमातीरीं ॥६॥

२

तंव आनंदला हरि परिपूर्ण लोटला ।
मुक्ताई लाधला प्रेमकवळु ॥१॥
चांगयाचे मुखीं घालित कवळु ।
आपण गोपाळु दयासिंधु ॥२॥
दिधलें तें तूं घेईं पूर्ण तें होईं ।
सप्रेमाचे डोहीं संतजन ॥ ३ ॥
नामया विठया नारया लाधलें ।
गोणाई फावलें अखंडित ॥ ४ ॥
राही रखुमाई कुरवंडी करिती ।
जिवें वोवाळिती नामयासी ॥ ५ ॥
निवृत्ति खेचर ज्ञानदेव हरि ।
सोपान झडकरी बोलाविला ॥ ६ ॥

३

नुघडुनियां दृष्टि नामा पाहे पोटीं ।
आनंदाची सृष्टी तया जाली ॥ १ ॥

[library stamp]

घे रे नाम्या कवळु आनंदाचा होसी ।
तुजमाजी निवासी हरि आहे ॥ २ ॥
नामा पसरी मुख आनंदला तृप्त ।
कवळु पूर्ण भरित हरिराज ॥ ३ ॥
निवृत्तीनें सेविला कवळु हा हरि ।
तूंचि चराचरीं दिससी आम्हां ॥ ४ ॥

. ह्या तीन अभंगांत, निवृत्तिनाथानीं, ज्ञानदेव, विसोबा खेचर, नामदेव गोणाई, विठा, नारा, सोपान, चांगदेव आणि मुक्ताबाई ह्यांचा स्पष्ट उल्लेख केला आहे. याशिवाय, सावंता माळी, नरहरि सोनार, परिसा भागवत आणि जगमित्र नागा इतक्या संतांचा उल्लेख निवृत्तिनाथांनीं इतरत्र केला आहे. निवृत्तिनाथांच्या नांवावर प्रसिद्ध असलेले हे अभंग बनावट आहेत असें मानण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. अशा स्थितींत, उपरिनिर्दिष्ट सर्व संतमंडळी समकालीन असून, ज्ञानदेव-नामदेवाची जोडी फोडण्याचा भारद्वाजादिकांचा प्रयत्न सपशेल फसला आहे असें धरून चालण्यास, माझ्या मतें, आतां बिलकुल प्रत्यवाय नाहीं. असो.

ज्ञानदेवांचे बंधु सोपानदेव यांच्या नांवावर 'प्राकृत गीता' आणि 'पंचीकरण' हीं दोन ओवीबद्ध प्रकरणें 'काव्यसंग्रहां'त प्रसिद्ध झालीं असून त्यांची ओवीसंख्या अनुक्रमें ७७ आणि ६२ आहे. या प्रकरणांची भाषा व एकंदर रचनाशैली इतकी अर्वाचीन दिसते कीं, ज्ञानेश्वरीकार ज्ञानदेवांचे बंधु सोपान हेच ह्या प्रकरणांचे कर्ते असतील असें म्हणण्यास मन धजत नाहीं. सोपानदेवांचे म्हणून सुमारें ५० अभंग गाथ्यांत छापले आहेत ते मात्र निर्विवादपणें त्यांचेच असल्यामुळें त्यांतील पांच अभंग येथें देतोंः—

१

दिव्य व्योम तारा ग्रहगण शेखीं ।
एक हृषीकेशी सर्व आम्हां ॥ १ ॥
ब्रम्हेवीण नाहीं रिता ठावो पाहीं ।
निवृत्तीच्या ठायीं बुडी देत ॥ २ ॥

सर्व हें निखळ आत्माराम सर्व ।
नाहीं देहभाव विकल्पता ॥ ३ ॥
सोपान निकट गुरुनाम पेठे ।
नित्यता वैकुंठ जवळी असे ॥ ४ ॥

२

आपरूप हरि आपणचि देव ।
आपणचि भाव सर्व जाला ॥ १ ॥
सर्व हरि हरि बाह्य अभ्यंतरीं ।
एक चराचरीं आत्माराम ॥ २ ॥
सर्व काळ सम नाहीं तेथें विषम ।
आपणचि राम सर्व ज्योतीं ॥ ३ ॥
सोपान तिष्ठत रामनामीं लीन ।
मन तेथें मौन्य एकपणें ॥ ४ ॥

३

राम सर्वोत्तम या नामें निखळ ।
जन हें सकळ दिसताहे ॥ १ ॥
भिन्न नाहीं दुजें सर्व आत्मराज ।
नाचताती भोज योगीराज ॥ २ ॥
मातापिता देव गृह दारा जन ।
सर्व जनार्दन सर्वां रूपीं ॥ ३ ॥
सोपान खेचर ब्रह्माजिवडें ।
ब्रह्मांडाएवढें आत्माराम ॥ ४ ॥

४

चला हो वैष्णव जाऊं पंढरीसी ।
प्रेमामृत खूण मागों त्या विठ्ठलासी ॥ १ ॥
चालले गोपाळ दाविताति वांकुल्या ।
भरले प्रेमरसें मग ते वाहताति टाळिया ॥ २ ॥

दिंडी गरुडटके मृदंगाचे नाद ।
गाताति विठ्ठलनाम करिताति आल्हाद ॥ ३ ॥

पावले पंढरी भीमा देखियेली दृष्टी ।
वैष्णवांचा गजरु आनंदें हेलावली सृष्टि ॥ ४ ॥

गजरू गोपाळांचा श्रवणीं पडियेला ।
शंख चक्र करीं विठ्ठल सामोरा आला ॥ ५ ॥

कांसवदृष्टी न्याहाळुनी रंगीं नाचत् पैं उगला ।
सोपान म्हणे आम्ही वाळुवंटीं केला काला ॥ ६ ॥

५

माझा मी पूर्णता गुरुनासीं संपन्न ।
निवृत्ति निधान पूर्ण गंगा ॥ १ ॥

अमृताचा पाट वाहे इंद्रायणी ।
नित्यता पर्वणी हरिच्या दासा ॥ २ ॥

ज्ञानदेव निधि पूर्ण माझें मन ।
मुक्ताईनें खूण सांगितली ॥ ३ ॥

सोपान बागडा सर्वे संवगडा ।
नित्य तो पवाडा विठोबाचा ॥ ४ ॥

मुक्ताबाईचे फक्त ५०।६० अभंग प्रसिद्ध आहेत. त्यांतले पांच अभंग येथें देऊन हा लेख पुरा करितों:—

१

निर्गुणाची शेज सगुणाची बाज ।
तेथें केशीराज पहुडले ॥ १ ॥

कैसें याचें करणें दिवसा चांदणें ।
सावळें उठणें एका तत्त्वें ॥ २ ॥

नाहीं या ममता अवघीच समता ।
आदि अंतु बिंबतां नलगे वेळू ॥ ३ ॥

मुक्ताई सघन सर्वत्रनारायण ।
जीव शिव संपूर्ण एका तत्त्वें ॥ ४ ॥

२

दिवसा शीतळ निशियेसी बरळ ।
अध ऊर्ध्व केवळ निजबीज ॥ ५ ॥

या आदि नाहीं अनादिहि नाहीं ।
कैंचा मोहप्रवाहीं दिसेचिना ॥ २ ॥

शक्तीचे संपुष्टीं मुक्तामुक्त घट ।
अवघें वैकुंठ दिसताहे ॥३॥

मुक्ताई परिपाक अवघें रूप एक ।
देखिलें सम्यक सोहंभावें ॥४॥

३

मुक्तलग चित्तें मुक्त पैं सर्वदा ।
रामकृष्ण गोविंदा वाचे नित्य॥१॥

हरि हरि छंदु तोडी भवकंदु ।
नित्य नामानंदु जपे रया ॥ २॥

सर्वत्र रूपडें भरलेंसे दृश्य ।
ज्ञाता ज्ञेय भासे हरिमाजी ॥३॥

मुक्ताई सधन हरिरूप चित्तीं ।
संसारसमाप्ति हरिच्या नामें ॥४॥

४

शांति क्षमा वसे देहीं देव पैसे ।
चित्त समरसें मुक्तमेळु ॥१॥

निर्गुणें उपरमु देव पुरुषोत्तम ।
प्रकृति संगमु चेतनेचा ॥२॥

सज्ञानी दिवटा अज्ञानी तो पैठा ।
निवृत्तीच्या तटा नेतु भक्ता ॥३॥

मुक्ताई दिवस अवघा हृषीकेश ।
केशवेंवीण वास शून्य पैसे ॥४॥

५

आधीं तूं मुक्तचि होतासि रे प्राणिया ।
परि वासने पापिणिया नाडलासी ॥
आधींचें आठवीं मग घेईं परी ।
हरिनाम जिव्हारीं मंत्र सार ॥१॥

आदि मध्य हरि ऊर्ध्व पैं वैकुंठ ।
जाईल वासना हरि होइल प्रगट ॥ ध्रु० ॥

एकतत्त्व धरीं हरिनाम गोड ।
येर तें काबाड विषय ओढी ॥
नाम तें सांडी वासना पापिणी ।
एक नारायणीं चाड धरीं ॥ २ ॥

मुक्ताई मुक्तलग सांडिली वासना ।
मुक्तामुक्ति राणा हरिपाठें ॥
नामाचेनि घोटें जळती पापराशी ।
न येसी गर्भवासी अरे जना ॥ ३ ॥

शेवटीं, प्रस्तुत चरित्रलेखाच्या निमित्तानें तरी ह्या चार दैवी भावंडांच्या वाङ्मयावलोकनांत, आयुष्याचा थोडासा काल गेला, याबद्दल धन्यता मानून हा लेख पुरा करितों.

# विसोबा खेचर.

साधु विसोबा खेचर राखे चरणानतासि सुज्ञानें ।
केला कृतकृत्य क्षणमात्रें ज्या नामदेव सुज्ञानें ॥

सन्मणिमाला, मोरोपंत.

विसोबा खेचर हे प्रसिद्ध सत्पुरुष ज्ञानदेव–नामदेवांचे समकालीन; नामदेवांच्या गुरुत्वाचा मान यांजकडे आहे. कवि या नात्यानें जरी यांचा महाराष्ट्रकविमंडळांत विशेष प्रसिद्धि नाहीं,तरी महाराष्ट्रांतील भागवतधर्माचे एक प्रसिद्ध प्रवर्तक या दृष्टीनें, त्यांची योग्यता मोठी असल्यामुळें, त्यांच्या चरित्राचा प्रस्तुत ग्रंथांत यथाशक्ति परामर्श घेणें हें महाराष्ट्रकविचरित्रकाराचें कर्तव्यच होय. महीपतिकृत 'भक्तविजय' ग्रंथांत, ज्ञानदेव व नामदेव यांच्या चरित्रांत विसोबा खेचरांचा उल्लेख आला आहे.

असें सांगतात कीं, खेचरांचें मूळ वास्तव्यस्थान आळंदी असून, पुढें त्यांची वस्ती औंढया नागनाथ क्षेत्रीं असे. यांच्या जन्ममृत्युकालाविषयीं निश्चित अशी कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. परंतु, शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकाच्या पूर्वार्धांत हे विद्यमान होते व ते बरेच वृद्ध होऊन मरण पावले असें ढोबळ अनुमान करण्यास हरकत नाहीं. यांचेच समकालीन दुसरे प्रसिद्ध साधु जोगा परमानंद यांचें काव्य हे उतरून ठेवीत असत, अशी माहिती एका जुन्या अभंगांत आढळते.

विसोबांनीं आपल्या पूर्ववयांत एकदां ज्ञानदेवादि भावंडांचा छल केला होता व त्या वेळीं ज्ञानदेवांनीं आपल्या योगसामर्थ्यानें आपला जठराग्नि प्रदीप्त करून, आपल्या तप्तोदरावर मुक्ताबाईकडून मांडे भाजविले व तो चमत्कार पाहून विसोबा ज्ञानदेवांस शरण गेले अशी कथा भक्तविजयांत आहे. यावरून विसोबा खेचरांचे गुरु ज्ञानदेवच असावेत असें वाटतें. त्यांच्या एका अभंगाचा शेवटचा चरण असा आहेः—

"मग म्हणे खेचरू । मज ज्ञान हेचि गुरु। तेणें अगोचरू केला नामा ॥

ह्यावरून वरील अनुमानास बळकटी येते.

पंढरिनाथानें नामदेवांस गुरूपदेश घेण्याची आज्ञा केली, तेव्हां बारशी येथें ते विसोबा खेचरांचा शोध करण्यास गेले असतां, लोकांनीं त्यांस महादेवाच्या देवळांत जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें नामदेव देवळांत जाऊन पाहातात तों तेलानें लडबडलेल्या नव्या वाहणा पायांत घातलेला एक गलितकुष्ट असा वृद्ध पुरुष शंकराच्या पिंडीवर आपले पाय ठेवून अस्ताव्यस्त पसरलेला त्यांच्या दृष्टीस पडला. त्या वृद्धाच्या अंगावरील जखमांतून पू येत असल्यामुळें त्याच्या सर्वांगावर माशा घोंघावत होत्या व दुर्गंधी इतकी सुटली होती कीं, नाकास पदर लावल्यावांचून त्याच्याजवळ जाण्याची सोय नव्हती. आपल्या भावी गुरुवर्यांची ही स्थिति पाहून नामदेवांस सखेदाश्चर्य वाटलें. ते विसोबांपाशीं जाऊन त्यांस म्हणाले, "अहो महाराज, नीट उठून बसा आणि पिंडीवर आपले पाय पडले आहेत ते काढून घ्या." विसोबा म्हणाले, "बाबा रे, मी वृद्ध असल्यामुळें माझीं इंद्रियें माझ्या स्वाधीन नाहींत, याकरितां कृपा करून तूंच माझे पाय पिंडीवरून खालीं काढ." नामदेवांनीं, त्याप्रमाणें, त्यांचे पाय खालीं काढून जमिनीवर ठेवले व पाहतात तों पायांखालीं दुसरें शिवलिंग ! पुनः विसोबाचे पाय त्यांनीं दुसरीकडे उचलून ठेवले तों तेथेंही शिवलिंग ! हा चमत्कार पाहून नामदेव अगदीं विस्मित झाले व देवानें ज्याच्याकडे मला पाठविलें तोच हा योग्य पुरुष होय असें समजून विसोबांच्या चरणांवर त्यानीं आपलें मस्तक ठेविलें. नंतर कांहीं दिवस तेथें राहून विसोबांची त्यांनीं भक्तिपुरस्सर सेवा केल्यावर विसोबांनीं त्यांस अनुग्रह दिला. विसोबा खेचरांचा आपणास उपदेश झाल्याचा उल्लेख नामदेवांनीं आपल्या कवितेंत अनेक ठिकाणीं केला आहे. पुढील चरण पहा:—

तो देव नामया हृदयीं दाविला ।
खेचरानें केला उपकारू हा ॥

* * *

अवघी सत्ता आली हाता।
नामयाचा खेचर दाता॥

नामदेवांस उपदेश करण्यासाठीं विसोबा खेचरांनीं लिहिलेले कांहीं अभंग प्रसिद्ध आहेत, त्यांतील एक दोन अभंग येथें देतोः-

आधीं चैतन्य आपैतें करोनी। मग संचरें ताहण्यवनीं।
कामक्रोध तुज देखोनी। जाती पळोनि बारा वाटा॥ १॥

तुजपाठीं कवण धांवे। कवण टाकी कवण पावे।
कामक्रोधें जग सोहावें। कासयासी खोववी पोटीं पाय॥ २॥

माया मोहजाळ तुटेल। पळेल पा काळवेळ।
कां रे स्मरसी ना गोपाळ। मिथ्या व्याकुळ काजेंवीण॥३॥

वैराग्यें दृढ होईं निरुता। कासया भितोसी चपेट घाता।
परस्त्री तितुकी मानीं माता। विषय निमित्ता आल्यासाठीं॥ ४॥

धर्मांचेनि मार्गे रिघाला कर्ण। शिबी चक्रवर्ती जाला जीवित्वहीन।
तयामाजी सांग नाडला कोण। लटकी झकपण कां बोलती॥५॥

इंद्रियां गोड तें आरोगिजे। मग धणीवरी धावा पोखरिजे।
काय सांगूं शहाणपण तुझें। खेचर विसा म्हणे अरे नामयां॥६॥

२

पार्वतप्राय पापराशी होती दग्ध। वाचेसी मुकुंद उच्चारितां॥ १॥
अच्युत श्रीहरि केशव नरहरि। माधव हरहरि रामकृष्ण॥ २॥
नामासी साधन करिशील पूर्ण। तें प्रपंचाचें भान उरों नेदी॥ ३॥
उदासीन वृत्ति आचरावें कर्म। नाहीं देहधर्म गुण माया॥ ४॥
ऐसा हा अनकळित मार्ग साधेल तुज। खेचर विसा गुज सांगे नाम्या॥

'ज्ञानेश्वरी' चे लेखक सच्चिदानंदबावा यांनीं 'ज्ञानेश्वरविजय' नामक ग्रंथ लिहिल्याचें प्रसिद्ध असून, त्याचा उल्लेख, तो ग्रंथ प्रत्यक्ष पाहून, कै. श्रीपतिबुवा भिंगारकर यांनीं "ज्ञानदेवकालनिर्णय" या आपल्या निबंधांत

केला आहे. हा ग्रंथ सध्यां उपलब्ध नाहीं, परंतु ज्ञानदेवांनीं विसोबा खेचरांस अनुग्रह दिला होता या गोष्टीचा उल्लेख सदर ग्रंथांत असल्याचें कै. भिंगारकर बुवांच्या उपरिनिर्दिष्ट निबंधावरून समजतें.

विसोबा खेचर हे शिवलिंगावर पाय ठेवून निजले होते अशी जा. आख्यायिका वर दिली आहे तिला पोषक असा एक अभंग ''सन्मणिमाला-कवितासंग्रह'' या मासिकांत आढळला तो येथें देतों:—

'खेंचरीं धरिली माव । लिंगावरी ठेविला पाय ।
पहावया भाव । नामयाचा ॥ १ ॥
नामा तेथें आला । देव नमस्कारिला ।
देखोन बोलला । वचन त्यासी ॥ २ ॥
लिंगावरी चरण ठेविले । काढा जी वहिले ।
दिसतां वरी भले । करणी न कळे ॥ ३ ॥
तंव येरू बोलिला । नाम्या तूं भला ।
मज नाहीं कळला । देव तुझा ॥ ४ ॥
जेथें नाहीं देव । तेथें ठेवीं पाव ।
सर्वज्ञ सदैव । तूंचि असशी ॥ ५ ॥
मीपणीं भुललों पाहीं । मज न कळेचि कांहीं ।
देव नसे ते ठायीं । पाय ठेवीं ॥ ६ ॥
तंव होय नामा विचारी । शब्दाची कुसरी ।
पाहतां निर्धारीं । सान नोहे ॥ ७ ॥
देवाविण ठाव । हें बोलणेंचि वाव ।
परतोनि संदेह । पडला मज ॥ ८ ॥
आपुलें उमाणें । आपण उमगावें ।
मजसी तारावें । भवसागरीं ॥ ९ ॥
नामा धरी चरण । अगाध तुमचें ज्ञान ।
आपुलें नाम कोण । सांगा स्वामी ॥ १० ॥

येरू म्हणे तंव खेचर विसा पैं जाण ।
लौकिकीं मिरवणें । अरे नाम्या ॥ ११ ॥
नाम आणि रूप । दोन्ही जया नाहीं ।
तोचि देव पाहीं । येर मिथ्या ॥ १२ ॥
जळ स्थळ आणि काष्ट हे पाषाण ।
पिंड ब्रह्मांड व्यापून । अणुरेणु ॥ १३ ॥
सर्वत्र साक्षीभूत । हें जाणोनि पाहत ।
खेचर म्हणे नाम्यांत । अवघा देवो ॥ १४ ॥

शेवटच्या नामोल्लेखावरून हा अभंग विसोबा खेचरांचा दिसतो व त्याची भाषाही बरीच जुनी दिसते, पण तेवढ्यावरून तो नक्की विसोबांचाच आहे असें समजणें चुकीचें होईल. कारण प्रसिद्ध संतकवींच्या नांवांवर घुसडून दिलेले शेंकडो बनावट अभंग जुन्या वह्यांतून आढळतात हें मी पूर्वीं अनेक वेळां सांगितलेंच आहे. असो.

विसोबांनीं एकंदर किती कविता लिहिली होती हें समजण्यास आतां मार्ग नाहीं. त्यांचे उपलब्ध असलेले अभंग वीसपंचवीसांहून अधिक नाहींत. त्यांतले आणखी कांही अभंग येथें देऊन हा लेख संपवितों.

१

मुळु वदनाचा उधानु नेत्रांचा । अंगुळु हस्ताचा स्वामी माझा ॥ १ ॥
मुगुट जयाचा केवळया आगळी काठी । पवित्रु तळवटीं चरण ज्याचे॥२॥
सेली ते भागले पोकु वेडावले । अंगुळु मागें जाले थकित रया ॥ ३ ॥
ढकारु वदनाचा आला वर्णावया । जिव्हा चिरलिया न कळे त्यासी॥४॥
सद्भावें शरण अवारु जोडुनी । खेंचर विसा चरणीं विनटला ॥५॥

२

भवजलधि अगाध तरावया दुस्तर । रचिलें पंढरपुर चंद्रभागीं ॥ १ ॥
तारूं पंढरिनाथु मोलेंविण उतरितु । उभला असे तिष्टतु वाट पाहे ॥२॥
बुडत्याचें भय नाहीं संसारीं । कलिमाजी पंढरी नाव थोर ॥ ३ ॥
राव रंक दोन्ही बैसवोनी वरी । उतरितु पैलतीरीं भरंवसेनी ॥ ४ ॥
आठराही आवले जे नावेसी लागले। साही खण भरले मिरवताती ॥५॥

चौमुखीं वर्णितां न कळे याचा पार । वेदा अगोचर सहस्रमुखा ॥ ६ ॥
सडियातें कासे लावीत आपण । कुटुंबिये जाण नावेवरी ॥७॥
प्रेमाचे पेटे बांधोनिया पोटीं । उतरी जगजेठी पैलपारू ॥८॥
आप अंगें उडी बुडत्यातें कडे काढी।ऐसे लक्ष कोडी तारियेले ९
सहस्र नाम पेटे बांधी मग पोटीं । तारी जगजेठी लावी कासे ॥ १०॥
आदिकरोनि सर्वही तारिले । उतरुनी नेले पैलतीरीं ॥ ११॥
ऐसे पक्षी कीटक गुल्मल तारिले । खेचर विसा म्हणे तारी
मातें पुंडलीक ॥१२॥

वरील अभंगांतील शेवटचा चरण "खेचर विसा म्हणे तारी मातें पुंडलीक" याचा अर्थ नीट लागत नाहीं; व्याकरणदृष्ट्या हें वाक्य अशुद्ध नाहीं, परंतु मागील चरणांतील अर्थाचा संदर्भ सुटलेला दिसतो. शिवाय यमकही जुळत नाहीं. यावरून हा चरण लेखकाच्या चुकीमुळें बदललेला दिसतो. असो.

'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ निर्माण झाल्यावर, त्यांतील नुसत्या प्रमेयांचाच नव्हे तर वाक्यांचा व शब्दांचादेखील तत्कालीन व तदनंतरच्या पुष्कळ कवींनीं आपल्या कवितेंत मनमुराद उपयोग केलेला आढळतो; किंबहुना, सावंता माळी, जनी, एकनाथ, तुकाराम, निळोबा, चोखामेळा या वारकरी सांप्रदायी कवींची बरीच कविता ज्ञानेश्वरी-भाष्यात्मक आहे असें म्हटल्यास चालेल. उदाहरणार्थ विसोबांच्या वरील अभंगांतील जाडया अक्षरांत दिलेलीं वाक्यें ज्ञानेश्वरींतील पुढील ओव्यांशीं ताडून पहा:—

"भवसिंधूचेनि माजें । कवणासि धाकु नुपजे ।
तेथ जरी कीं माझे । बिहिती हन ॥ ८८ ॥

म्हणोनि गा पांडवा । मूर्तीचा मेळावा ।
करूनि त्यांचिया गांवा । धांवतु आलों ॥ ८९ ॥
नामाचेया सहस्रवरी । नावा इया अवधारीं ।
सजूनियां संसारीं । तारूं जाहलों ॥ ९० ॥
सडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले ।
परिग्रही घातले । तरियावरी ॥९१॥

प्रेमाची पेटी । बांधली एकाचियां पोटीं ।
मग आणिळे तटीं । सायुज्याचिया ॥ ९२ ॥
परि भक्तांचेनि नांवें । चतुष्पदादि आघवे ।
वैकुंठींचिये राणिवे । योग्य केले ॥ ९३ ॥

ज्ञानेश्वरी, अध्याय ९

नामदेवांचा पुत्र विठा यांच्या कांहीं अभंगांत विसोबा खेचरांचा विनोदपूर्वक उल्लेख केलेला आढळतो. नमुना पहा:—

"तंव धाउनी गेला चरणीं लागला ।
देवा तूं दाखविला ठेवा माझ्या मायबापाचा ॥ १ ॥
जाऊन तो धरीन न सोडीं मी आतां ।
जे मज पंढरिनाथा ग्वाही दिधली ॥ २ ॥
तंव खेंचरू तेथें स्नान संध्या करी ।
तंव ओढोनि पाय धरी विठा नामयाचा ॥ ३ ॥
तंव तो अवचिता खडबडोनि भ्याला ।
कोठुनी घाला पडिला धाडी मजवरी ॥ ४ ॥
उठीं परता तूं कोणाचा रे काय ।
ठायीं ठायीं राहें हालूं नको ॥ ५ ॥
तुझिया वडिलांसी जाब देईन ।
धरोनि नेईन हें पोर कोणाचें ॥ ६ ॥
लाडिकें लडिवाळ आपुलें बा धांवे पायीं ।
तूज कोणी नाहीं मग तूं निलाजिरें ॥ ७ ॥
छंद ना बंद झोंबतोसी धीट ।
बांधीन चोहटा चौघाचारीं ॥ ८ ॥
फजीत करितील तुज कीं मज जाण ।
खेचर विसोबा म्हणे तुज विठोची आण ॥ ९ ॥

# जनी

हरिहरजनपदभजनें प्रकटी अद्भुत रुचि प्रभाव जनी
स्पष्ट महासत्यधिका भरलीच इची शुचिप्रभा वजनीं ॥

सन्मणिमाला, मोरोपंत.

महाराष्ट्रांत कवींप्रमाणेंच कवयित्रीही पुष्कळ होऊन गेल्या आहेत; आणि मुक्ताबाई, प्रेमाबाई, वेणाबाई, बयाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, साखराई, गोणाई इत्यादि अनेक कवयित्रींची थोडीबहुत कविता सुदैवानें आज उपलब्धहीं आहे, परंतु त्या सर्वांत जनाबाईइतकी प्रसिद्धि कोणत्याही कवयित्रीची नाहीं. ज्ञानदेव-भगिनी मुक्ताबाई आणि तुकारामानुग्रहीता बहिणाबाई यांचा पारमार्थिक अधिकार फार मोठा होता आणि त्यांची कविताही शुद्ध आणि सुसंस्कृत आहे; रामदासपरंपरेंतील वेणाबाईंस तर संस्कृत देखील येत होतें आणि त्यांचा " सीतास्वयंवर " हा ग्रंथही फार रसाळ आहे, परंतु भाविक महाराष्ट्रास आज सुमारें ६०० वर्षें, भोळ्या **जनी**ची साधी भोळी पण प्रेमळ कविताच फार प्रिय होऊन राहिली आहे. अभंग रचणाऱ्या सर्व कवींत जी तुकारामाची योग्यता तीच अभंग रचणाऱ्या सर्व कवयित्रींत जनाबाईची. अशी ही भाग्यवती जनाबाई मूळची कोठली, तिची जात कोण, तिचे पूर्वज कोण होते, तिचा जन्ममृत्युकाल कोणता इत्यादि बाबतींत कोठेंच कांहीं विश्वसनीय माहिती सापडूं नये ही केवढी सखेदाश्चर्याची गोष्ट ! पण वस्तुस्थिति अशी आहे खरी. बिचाऱ्या महीपतींनीं आपल्या संतचरित्रविषयक ग्रंथांत नामदेवचरित्रानुषंगानें जनाबाईची थोडी तरी हकीकत नमूद करून ठेविली आहे म्हणून आज माझ्यासारख्यास ह्या चार ओळी तरी लिहितां येत आहेत, नाहीं तर " जनी " ह्या नामोल्लेखापलीकडे जनाबाईविषयीं एक शब्ददेखील लिहितां येणें जवळजवळ अशक्यच होतें. अस्तु.

जनीविषयीं महीपतीनीं जी माहिती दिली आहे ती येणेंप्रमाणें:— गोदातीरीं गंगाखेड नामक एक गांव आहे. तेथें दमा या नांवाचा एक शूद्र

महाभगवद्भक्त होता. त्याच्या स्त्रीचें नांव करुंड; तीही मोठी पतिव्रता होती. दमा प्रत्येक वारीस पंढरीस जात असे. असा क्रम पुष्कळ वर्षें चालला होता. परंतु संतति नसल्यामुळें तीं उभयतां जरा दुःखी असत. एकदां तीं पंढरीस गेलीं असतां, "आम्हास पुत्र व्हावा" अशी पांडुरंगाची त्यांनीं प्रार्थना केली. त्या रात्रींच दमा निद्रित असतां त्यास असें स्वप्न पडलें कीं "तुला पुत्र कांहीं होणार नाहीं. परंतु एक कन्या फार सद्गुणी होईल व ती तुझ्या कुळाचा उद्धार करील. ती कन्या कृतयुगांत पद्मिनी, त्रेतायुगांत मंथरा, द्वापरयुगांत कुब्जा होती; तीच तुझ्या उदरीं येईल. तिचें नांव जनाबाई असें ठेव व नामदेवाच्या चरित्राशीं तिचा संबंध येणार असल्यामुळें नामदेवाचा बाप दामशेटी यास ती अर्पण कर."

कालांतरानें दमाची स्त्री करुंड ही गर्भिणी होऊन नऊ मास भरतांच प्रसूत झाली. कन्या झाली तिचें नांव 'जनाबाई' असें ठेविलें. ती कन्या पांच सात वर्षांची होतांच दमानें तिला पंढरीस नेऊन दामशेटीच्या स्वाधीन केली. पुढें दामशेटीनें तिचें कन्येप्रमाणें पालन केलें. दामशेटीचें घराणें मोठें भक्तिमान् असल्यामुळें, त्या घराण्यांतील माणसांच्या, विशेषतः नामदेवांच्या सहवासानें जनाबाई मोठी भगवद्भक्त निपजली. प्रत्यक्ष नारदमुनींनीं तिला मंत्रोपदेश केला अशी आख्यायिका आहे. एके समयीं पंढरपुरास रात्रीच्या वेळीं फार वारा सुटला व पाऊसही पडूं लागला. तेव्हां नामदेवांची चंद्रमौळी झोंपडी वाऱ्यानें उडून गेली! झोंपडींत नामदेवांच्या घरचीं सगळीं माणसें निजलीं होतीं. पांडुरंगानें त्यांच्या संरक्षणार्थ आपलें सुदर्शन पाठविलें व मागाहून स्वतः येऊन त्यांची झोंपडी पूर्ववत् बांधून दिली! देवास फार श्रम झाले म्हणून जनी त्याची पाठ रगडीत बसली होती. जनीचा भक्तिभाव पाहून देव इतका संतुष्ट झाला कीं,

"दळण कांडण धुणें धुवोनी पांटी डोईवरी।
गंवऱ्या वेंचुन आणी घरीं ॥"

अशा प्रकारें जनीच्या कामांत त्यानें तिला साहाय्य केलें. एकदां देवाचा पीतांबर आणि पदक चोरल्याचा आळ जनीवर आल्यामुळें तिला

सुळीं देण्यास नेलें असतां, तिनें पांडुरंगाचा धांवा करितांच सुळाचें पाणी झालें ! पुढें एके दिवशीं पांडुरंग जनाबाईची कविता लिहीत बसले असतां, ज्ञानदेव दर्शनास येत असल्याचें ऐकून त्यानीं कागद लेखणी लपवून ठेविली. तें अंतर्साक्ष ज्ञानदेवांनीं जाणून देवास विचारलें "देवा, आपली स्तुति आपल्याच हातानें लिहीत बसतां, हें आश्चर्य आहे." देव म्हणाले "ज्ञानोबा, मला जनाबाईचें गाणें अतिशय आवडल्यामुळें मी तें लिहीत बसलों होतों." नंतर देव आणि ज्ञानोबा नामदेवांचे घरीं आले. तेथें अगोदरच सांवता माळी, परिसा भागवत, गोराकुंभार, चोखामेळा इत्यादि संतमंडळी येऊन बसली होती. त्या वेळीं जनाबाई माळावर गोंवऱ्या वेचण्यास गेली होती. देवांनीं जनाबाईस बोलावणें पाठविलें. देव आल्याचें वर्तमान तिला समजतांच तिनें धांवत येऊन देवभक्तांचें दर्शन घेतलें. नंतर देव म्हणाले "ज्ञानेश्वरा, जनाबाईचें कवित्व उतरून घेण्याची कामगिरी मी स्वतःकडे घेतली आहे. इतर संतांच्या लेखकांचें काम कोणी कोणी करावें हें आतां सांगतों—

## ओव्या.

**ज्ञानेश्वराचीं शब्दरत्नें । तीं सच्चिदानंद लिहील ब्राह्मण ।**
**निवृत्तीचा लेखक सोपान । जो अवतार पूर्ण विधीचा ॥**

**आणिक मुक्ताबाईचे अभंग । ज्ञानदेव लिहितील निजांगें ।**
**जोगा परमानंद अंतरंग । त्याचे विसोबा खेचर लिहीतसे ॥**

**सांवतामाळी भक्त वैष्णव । त्याचा लेखक काशिबा गुरव ।**
**कूर्मदेत्राचा काईत सुदेव । देवाधिदेवें नेम केला ॥**

**अनंतभट ब्राह्मण । तो चोखामेळ्याचें करील लेखन ।**
**आणि नामया–जनीचें बोलणें । रुक्मिणीरमण लिहीतसे ॥**

**ऐसी करून दिधली वांटणी । मग ज्ञानदेवासी म्हणे चक्रपाणी ।**
**आतां जनीचे अभंग ऐकतां कानीं । संकोच मनीं न धरावा ॥**

भक्तविजय, अध्याय २२

या कथाभागांतील अतिशयोक्तीचा भाग जरी वजा केला तरी, त्यावरून तत्कालीन संतमंडळांत जनाबाईची योग्यता फार मोठी होती येवढा निष्कर्ष काढण्यास हरकत नाहीं. जुन्या ग्रंथांत जनाबाईचा समाधिकाल, आषाढ वद्य १३ शके १२७२ हा दिला आहे.

नामदेवांनीं शतकोटि अभंग लिहिण्याची प्रतिज्ञा करून आपल्या कुटुंबांतील माणसांच्या अभंगांसुद्धां त्यांनीं एकंदर ९६ कोटी अभंग पुरे केले व त्यांत जनीचे अभंग साडेबारा कोटी होते अशी आख्यायिका आहे. परंतु हल्लीं तिचे जे अभंग उपलब्ध आहेत त्यांची संख्या ३०० पेक्षां अधिक नाहीं व या ३०० अभंगांत खुद्द जनीचे असे अभंग फारच थोडे असून बनावट अभंगांचाच भरणा मोठा आहे. जनाबाई ही जरी ज्ञानदेवांची समकालीन होती तरी तिच्या अभंगांची भाषा नामदेवांच्या अभंगांच्या भाषेसारखी अगदीं सोपी आहे. जनीच्या नांवावर प्रसिद्ध असलेल्या ३०० अभंगांत बनावट अभंग पुष्कळच आहेत असें जें वर म्हटलें आहे त्याचें प्रत्यंतर पहाः—

जनाबाईकृत द्रौपदीवस्त्रहरणाच्या अभंगांत पुढील अभंग आहेः—

**नष्ट बोले दुर्योधन । बैस मांडीवरी म्हणे ॥ १ ॥**
**भोग विलास सदनीं । तुज करीन पट्टराणी ॥ २ ॥**
**शब्द प्रत्यक्षचि बाण । अंगीं खडतरे दारुण ॥ ३ ॥**
**म्हणे काय खळा । दुष्ट दुर्जना कंस खळा ॥ ४ ॥**
**जळो जळो तुझी वाणी । विष्टा भक्षिसी कां जनीं ॥ ५ ॥**
**वीज कडकडूनि माथां । पडो दुष्टा तुझ्या आतां ॥ ६ ॥**
**दृष्टि झडो रे पापिया । प्राणें विघडो तुझी काया ॥ ७ ॥**
**गुण लावण्य सुंदरी । गदा शोभे भीमाकरीं ॥ ८ ॥**
**तुज नवरी साजे चांग । तुझें निववील सर्वांग ॥ ९ ॥**
**बहुलें तें रणचत्वारीं । आयुष्य अंतरपाट धरी ॥ १० ॥**
**रक्त हळदीचें लेपन । माथां अक्षता तेच बाण ॥ ११ ॥**
**अचुक भेदें रक्त भाळीं । तेचि मळवटू कपाळीं ॥ १२ ॥**

स्त्रिया आक्रंदती भारी । तेंचि वाद्य नाना परी ॥ १३ ॥
रुदन करिती सकळ । सुखें भोगिसी सोहळे ॥ १४ ॥
रणमंचक शेजेवरी । पहुडें तुझे मांडीवरी ॥ १५ ॥
परते करुनी प्राणातें । सुखें सेवीं कां एकांत ॥ १६ ॥
जागा न होसी कोणे काळें । सुखें भोगीं सर्व काळ ॥ १७ ॥

आतां वरील अभंग, मुक्तेश्वरकृत सभापर्वांतील द्रौपदीवस्त्रहरणाध्यायांतल्या खालील ओंव्यांशीं ताडून पहा म्हणजे असें स्पष्ट दिसून येईल कीं, सदर अभंग म्हणजे मुक्तेश्वरी ओव्यांचें वेडेंवांकडें "शब्दांतर" ( पॅराफ्रेज ) आहे:—

हें देखोनि दुराचारी । म्हणे "वो द्रुपदाचे कुमरी ।
येऊनि बैसें मांडीवरी । होईं अंतुरी पट्टाची " ॥ १०९ ॥
पापशब्द पडतां कानीं । हृदयीं धडकला क्रोधाग्नि ।
म्हणे 'दुरात्मिया ही वाणी । जळो तुझी पापिष्ठा ॥ ११० ॥
प्रळयवीज माथां पडो । दृष्टि जळोनि जिव्हा झडो ।
कायेपासूनि प्राण घिघडो । तात्कालिक पैं तुझा ॥ १११ ॥
भीमाकरीं जे केळवली । गदा नोवरी सगुणाथिली ।
वाग्निश्चयें तुज नेमिली । गोत्रघटित निर्धारें ॥ ११२ ॥
बाहुलें योजिलें रणतळवट । आयुष्य अवधीचा अंत्रपाट ।
हातें सारूनि बळी वरिष्ट । लग्न लावील स्वहातें ॥ ११३ ॥
रक्तहरिद्रा तनुलेपनीं । माथां अक्षता पायपिटणी ।
स्त्रियाप्रलाप वाद्यध्वनी । सुखसोहळा भोगिसी ॥ ११४ ॥
ते गदा घेऊनि मांडीवरी । रणमंचकीं निद्रा करीं ।
प्राण पारखे दवडूनि दुरी । मग एकांतीं पहुडें कां ॥ ११५ ॥

मुक्तेश्वरी सभापर्व, अध्याय १५

आतां यावर कोणी असा आक्षेप घेईल कीं, जनाबाई ही मुक्तेश्वरांपूर्वी होऊन गेलेली असल्यामुळें तिच्याच कवितेंतील कल्पना मुक्तेश्वरांनीं

कशावरून उचलल्या नसतील? हा कोटिक्रम सकृद्दर्शनीं निरुत्तर करणारा दिसतो खरा, पण सबंध महाभारतावर कविता करणारा मुक्तेश्वरासारखा महाकवि, जनाबाईच्या नांवावर घुसडून दिलेल्या या अप्रसिद्ध द्रौपदीवस्त्र-हरणांतील कल्पना आपल्या ग्रंथांत उतरून घेईल ही गोष्ट मला तरी निदान बिलकुल संभवनीय दिसत नाहीं.

बनावट अभंगांचा दुसरा मासला:—

**विठो माझा लेंकुरवाळा । संगें लेंकुरांचा मेळा ॥ १ ॥**
**एकनाथ खांद्यावरी । कबीराचा हात धरी ॥ २ ॥**
**पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ॥ ३ ॥**
**गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ॥ ४ ॥**
**बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ॥ ५ ॥**
**जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ॥ ६ ॥**

जनाबाईच्या कालानंतर ३०० वर्षांनीं झालेल्या एकनाथांचा उल्लेख वरील अभंगांत आहे. कदाचित् दुसरी एखादी जनाबाई होऊन गेली असेल तर कोण जाणे !

आतां माझ्या समजुतीप्रमाणें खुद्द नामदेवकालीन जनाबाईचेच असे सुंदर १० अभंग येथें देऊन हा संक्षिप्त लेख पुरा करितों.

१

**ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥**
**भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीच्या गंगा ॥ २ ॥**
**इतुक्यांसहित त्वां बा यावें । माझे रंगणीं नाचावें ॥ ३ ॥**
**माझा रंग तुझे गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥**

२

**नोवरीया संगें वऱ्हाडियां सोहळा ।**
**मांडे पुरणपोळ्या मिळे अन्न ॥ १ ॥**
**परिसाचेनि संगें लोहो होय सोनें ।**
**तयाचीं भूषणें श्रीमंतांसी ॥ २ ॥**

जनी म्हणे जोड झाली विठोबाची ।
दासी नामयाची म्हणोनियां ॥ ३ ॥

३

आंधळ्याची काठी । अडकली कवणें बेटीं ॥ १ ॥
माझिये हरणी । गुंतलीस कोणे रानीं ॥ २ ॥
मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहें वास ॥ ३ ॥
तुजविण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं ॥ ४ ॥
आतां जीव जाऊं पाहे । धांव घालीं माझे आये ॥ ५ ॥
माझी भेटवा जननी । संतां विनवी दासी जनी ॥ ६ ॥

४

ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥
मरोनियां जावें । बा तुझ्याचि पोटा यावें ॥ २ ॥
ऐसें करीं माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥ ३ ॥
जावें वोवाळुनी । जन्मोजन्मीं म्हणे जनी ॥ ४ ॥

५

गंगा गेली सिंधूपाशीं । त्यानें अव्हेरिलें तिसी ॥ १ ॥
तरि तें सांगावें कवणाला । ऐसें बोलें बा विठ्ठला ॥ २ ॥
जळ काय जळचरा । माता अव्हेरी लेंकुरा ॥ ३ ॥
जनी म्हणे शरण आलें । अव्हेरितां ब्रीद गेलें ॥ ४ ॥

६

यातिहीन चोखामेळा । त्यासी भक्तीचा कळवळा ॥ १ ॥
त्याचा झाला म्हणियारा । राहे घरीं करी थारा ॥ २ ॥
देव बाटविला त्यानें । हांसे जनी गाय गाणें ॥ ३ ॥

७

पाय जोडुनि विटेवरी । कर ठेवुनि कटीवरी ॥ १ ॥
रूप सांवळें सुंदर । कानीं कुंडलें मकराकार ॥ २ ॥
गळां वैजयंती माळा । तो हा मदनाचा पुतळा ॥ ३ ॥
गरुड सन्मुख उभा । जनी म्हणे धन्य शोभा ॥ ४ ॥

८

हरिहर ब्रह्मादिक । नामें तरले तिन्ही लोक ॥ १ ॥
ऐसा कथेचा महिमा । जाली बोलायाची सीमा ॥ २ ॥
जपें तपें लाजविलीं । तीर्थें शरणागत आलीं ॥ ३ ॥
नामदेवकीर्तनीं । ध्वजा आल्या स्वर्गाहुनी ॥ ४ ॥
वेद श्रुति देती ग्वाही । जनी म्हणे सांगू काई ॥ ५ ॥

९

देव भावाचा लंपट । सोडुनि आलासे वैकुंठ ॥ १ ॥
पुंडलीकापुढें उभा । समचरणाची शोभा ॥ २ ॥
हातीं चक्र पायीं वांकी । मुख भक्तांचें अवलोकी ॥ ३ ॥
उभा बैसेना सर्वथा । पाहे कोडें भक्तकथा ॥ ४ ॥
सर्व सुखाचा सागर । जनी म्हणे शारंगधर ॥ ५ ॥

१०

वैकुंठींचा हरि । तान्हा यशोदेच्या घरीं ॥ १ ॥
रांगतसे हा अंगणीं । माथां जावळाची वेणी ॥ २ ॥
पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे ॥ ३ ॥
धन्य यशोदा माय । दासी जनी वंदी पाय ॥ ४ ॥

देवानें मला न्हाऊं घातलें, माझें दळणकांडण केलें, माझ्याबरोबर गाणें गायिलें, इत्यादि गोष्टींचा ज्या अभंगांत उल्लेख आला आहे ते अभंग खुद्द जनाबाईचे असतील असें मला वाटत नाहीं. शिवाय जनाबाईच्या अभंगांत ज्ञानदेवांच्या कवितेंतले जुने मराठी शब्द मुळींच सांपडत नाहींत हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

# मालो.

वंदन मंद न करु त्या ज्याचें प्रख्यात नाम मालो हें ।
मळ जाया स्पर्शावें त्या अजडस्पर्शमणिमया लोहें॥

सन्मणिमाला, मोरोपंत.

महीपतींच्या ग्रंथांत दिलेल्या माहितीशिवाय या कवीची दुसरी कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. त्यामुळें याचा कालही निश्चित करितां येत नाहीं.

मालोपंत हे देशस्थ ब्राह्मण वऱ्हाडांत राहत असत. यांस नरहरि नांवाचा एक मुलगा होता तोही मोठा भगवद्भक्त असून, त्याची कांहीं कविता प्रसिद्ध आहे, तींत त्यानें "नरहरि मालू" या शब्दांनीं स्वनामनिर्देश केला आहे. मालोपंतांचें चरित्र अद्भुत आहे. ते उदरभरणासाठीं कांहीं व्यवसाय करीत असत, परंतु पांडुरंगनामस्मरणांतच त्यांचा बहुतेक काल जात असे. व्यापारानिमित्त ते कुटुंबपरिवारासह कर्नाटकांत जाऊन राहिले होते. गरीबगुरीब, पांथस्थ, रोगी, साधुसंत यांचा आदरपूर्वक समाचार घेऊन त्यांच्या मनास आनंद द्यावा, असा त्यांचा नित्यक्रम असे. ते असत्याचा अगदीं तिटकारा करीत. कांही काळानें त्यांची पत्नी निवर्तली, तेव्हां त्यांस मोठें दुःख झालें. यांच्या घरची अडचण पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं त्यांस दुसरें लग्न करण्याची सल्ला दिली. परंतु एक मुलगा वंशास आधार आहे व दुसरें लग्न केल्यानें ईश्वरचिंतनांत व्यत्यय येणार हें लक्षांत घेऊन लोकांच्या सांगण्याकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. परंतु लोकांनीं लग्नाचा आग्रह सोडला नाहीं. त्यांच्या सोयऱ्याधायऱ्यांनीं आपलाच हट्ट खरा करून, भलत्याच एका मुलीशीं त्यांचें लग्न लावून दिलें ! आणि हेंच लग्न पुढें त्यांच्या दुःखास कारण झालें. कां कीं, ती मुलगी एका अतिशूद्राची असून, कांहीं लुटारू लोकांनीं तिच्या बापाच्या घरावर दरोडा घालून त्या मुलीस पळवून आणलें होतें व ती मुलगी ब्राम्हणाची आहे असें मालोपंतांस त्यांनीं खोटेंच सांगितल्यामुळें पंतांनीं त्यांजकडून ती विकत घेतली होती. पुढें कांहीं

दिवसांनीं त्या मुलीचा बाप तिच्या शोधार्थ फिरत फिरत त्या गांवांत आला असतां, पंतांच्या दारीं अंगण झाडीत असलेली ती मुलगी त्याच्या दृष्टीस पडली! केसांची वेणी घालून व लुगड्याचा पदर कंबरेस खोवून ब्राम्हणी थाटानें आपली मुलगी ब्राम्हणाच्या घरांत वावरत आहे हें पाहून तो महार आश्चर्यचकित झाला. त्यानें मालोपंतांस भेटून मुलीविषयींची खरी हकीकत त्यांस सांगितली; व माझी महाराची मुलगी तुमच्यासारख्या ब्राह्मणानें आपली बायको करावी हा केवळ अनाचार आहे असें म्हणून त्यांस दोष दिला. हा प्रकार पाहून पंतांस मोठा पश्चात्ताप झाला. त्यांनीं आपल्या पत्नीस हाक मारून "हा तुझा बाप काय?" असा प्रश्न केला. तेव्हां लज्जायमान होऊन ती खालीं मान घालून स्तब्ध उभी राहिली. तेव्हां पंतांनीं त्या महारास सांगितलें कीं, तूं आपली मुलगी घेऊन जा. हें ऐकून तो म्हणाला, हें विटाळलेलें पात्र आतां मी परत नेऊन काय करणार? मला जातीबाहेर रहावें लागेल. इतकें बोलून, मुलीस न नेतां तो महार निघून गेला. मालोपंतांनीं, ह्या संकटांतून आपणास मुक्त करण्याविषयीं पांडरंगाचा धांवा केला. ती आश्चर्यकारक गोष्ट सगळ्या गांवभर पसरली तेव्हां ज्या ब्राह्मणांनीं तें लग्न जमविलें होतें ते पळून गेले! आणि पंतांच्या आप्तांनींही त्यांस बहिष्कार घातला. त्यांचा पुत्र नरहरि यानें मात्र आपल्या पित्याचा त्याग केला नाहीं. अर्थात् त्यालाही लोकांनीं बहिष्कृत केलें. नंतर पंतांनीं ब्राह्मणांस बोलावून आपलें घर त्यांजकडून लुटविलें व स्वत:मुलासह गांवांतील विठ्ठलमंदिरांत राहून, निरिच्छ अंत:करणानें भगवद्भजनांत काल घालवूं लागले. कांहीं दिवसांनीं पंतांनीं ब्राह्मणांस विचारलें कीं, "आतां तुम्ही मला कोणतें प्रायश्चित्त देतां?" ब्राह्मणांनीं ठरावीक उत्तर दिलें. ते म्हणाले, "देहांत प्रायश्चित्ताशिवाय तुमच्या अनाचारास दुसरें प्रायश्चित नाहीं." तेव्हां पंतांनीं त्यांस विचारलें, "हें प्रायश्चित्त मी कोणत्या रीतीनें घेऊं?" ब्राह्मणांनीं सांगितलें, चिंचेच्या झाडाच्या ढोलीसभोंवतीं गोवऱ्या लांकडें रचून तींत बसावें आणि स्वहस्तानें अग्नि लावून जळून जावें." पंतांनीं त्याप्रमाणें एक चिंचेची ढोल पाहिली आणि तिच्यासभोंवतीं लांकडें रचलीं. मग स्वत: ढोलींत बसून लांकडें पेटविलीं व "देहाचें बंधन सुटल्यावर निरंतर तुझें सान्निध्य असावें" असा पांडुरंगाचा त्यांनीं धांवा केला. कांहीं

वेळानें चिंचेचें झाड जळून पडलें, परंतु पंतांस अग्नीपासून तिळमात्र पीडा झाली नाहीं; ईश्वरकृपेनें उलट ते तेजःपुंज होत्साते बाहेर आले. हा चमत्कार पाहतांच पंतांवर भगवंतांची कृपा आहे अशी लोकांची खात्री झाली. पुढें मालोपंतांच्या स्त्रीसही, आपली जात लपवून पतीच्या दुःखास कारणीभूत झाल्याबद्दल पश्चात्ताप होऊन ती त्यांस म्हणाली, " महाराज, जसें माझ्या नशिबीं होतें तसें झालें. आतां मला कांहीं तरी तरणोपाय सांगा." "तेव्हां पंत तिचें शांतवन करून तिला म्हणाले "यांत तुझा फारसा अपराध नाहीं. तुझा बाप तुला नेण्यास कबूल नाहीं. तेव्हां आम्ही तुला अन्नवस्त्र देऊं. तूं सुखानें हरिभजन करीत रहा." मग गांवाबाहेर एक झोंपडें बांधून त्यांत त्यांनीं तिला ठेविलें. पुढें कालांतरानें, नित्य हरिस्मरणाच्या योगें तिलाही साक्षात्कार झाला. पुढें कांहीं दिवसांनीं ती मरण पावली, तेव्हां तिचें प्रेत कोणी श्मशानांत नेईना. मग पंत स्वतः झोंपडींत गेले व प्रेतावरचें वस्त्र त्यानीं काढलें तों तिच्या देहाचीं पुष्पें झालेलीं त्यांच्या दृष्टीस पडलीं !

मालोपंत कोणत्या कालीं विद्यमान होते व ते कोणत्या सालीं समाधिस्थ झालें वगैरे हकीकत समजण्यास कांहींच आधार नाहीं. त्यांचे अभंग, पदे वगैरे थोडीशी कविता उपलब्ध आहे. ही कविता अत्यंत साधी, फार प्रेमळ व भक्तिरसानें नुसती ओथंबलेली आहे. मालोपंतांचा "मालूतारण" या नांवाचा एक ग्रंथ असल्याची प्रसिद्धि आहे. परंतु दुर्दैवानें तो उपलब्ध नाहीं. पंतांच्या कवितेंतले कांहीं वेंचे येथें देतों:—

## कीर्तन ( अभंग )

शुद्ध सत्वभावें सप्रेम कीर्तन ।
नर्तनीं उद्वर्तन उसंत वाढे ॥ १ ॥

महावाक्यउपदेशें घनानंद वृष्टि ।
निःसीम निजात्मदृष्टी समता पाहे ॥ २ ॥

धन्य ते सत्कथा धन्य तें कीर्तन ।
तत्वीं तन्मय मन निमोनि जातें ॥ ३ ॥

अक्षरीं तद्विदु चिद् चिन्मय मूर्ति ।
वदनीं ब्रह्मस्फुर्ती स्फुरों लागे ॥ ४ ॥

अद्वैत विचार स्वरूप साक्षात्कार ।
मुक्त महाद्वार चौथ्या अंगें ॥ ५ ॥

शुद्ध बुद्ध मुक्त सत्य स्वभावें आगळा ।
निर्विकल्प कळा कळों ये ऐसी ॥ ६ ॥

नि:सीम निमाला मालो मालोपणें ।
प्रीतीचें बोलणें उद्गार तो ॥ ७ ॥

## अभंग

आकाश तुटोनि पडो नाना संकटें घडो ।
परि माझें मन तुजसी जडो रे विठोबा ॥ १ ॥

सुधारस रस प्यालों स्वर्गीं इंद्रचि जालों ।
न पवेचि विश्रांति येथेंचि आलों रे विठोबा ॥ २ ॥

जन निंदो वंदो परि मालो तुझा तुझे घरीं ।
आतां तुझें उचित तूं करिं रे विठोबा ॥ ३ ॥

## अभंग

काय अतीतासी झालों पाठमोरी ।
दोष हा पदरीं घालीं माझ्या ॥ १ ॥

किंवा ब्राह्मणाचा केला अपमान ।
बोलिलों वचन कठोर हें ॥ २ ॥

गाई वत्साचा तो विघडचि केला ।
वृक्ष तो छेदिला अश्वत्थाचा ॥ ३ ॥

मालो म्हणे श्वान लावियलें मागें ।
खंडविलें रागें भिक्षुकासी ॥ ४ ॥

अभंग.

पायीं ठेविला पिंड आतां दंड नाहीं ।
दंड नाहीं गा विठोबा ॥ ध्रु० ॥
संपत्तींचीं सखीं होतीं आप्त केलीं ।
अंतीं सर्व सांडुनि गेलीं गा विठोबा ॥ १ ॥
अन्यायी अन्यायी म्हणुनी हांक फोडी ।
माला नरहरि रंक तुझे द्वारीं गा विठोबा ॥२॥

अभंग.

जेवीं लग्नघडी साधिती वऱ्हाडी ।
तैसी माझी घडी सांभाळावी ॥ १ ॥
जेवीत असला आंचवाया येईं ।
तरी विठाबाई होय भेटो ॥ २ ॥
हातींचा तांबूल मुखीं नका घालूं ।
फार काय बोलूं पांडुरंगा ॥ ३ ॥
मालो म्हणे मज घालावें पाठीसी ।
ठाव पायांपाशीं देईं देवा ॥ ४ ॥

अभंग.

चांगला विठोबाचि मनीं चांगली रखुमाई ।
मुक्तीचें माहेर माझी पंढरीची आई ॥ १ ॥
चांगलें पद्माळें वर तुळशीचें वन ।
चांगला वेणुनाद तेथें विसावलें मन ॥ २ ॥
चांगले हे चंद्रभागेमध्यें वसे पुंडलीक ।
चांगलें हें वाळुवंट मिळती सनकादिक ॥ ३ ॥
चांगला हा चौक बरवें विठोबाचें घर ।
म्हणे मालो आलों धालों आनंदें निर्भर ॥ ४ ॥

## पद

कां रे अनाथबंधु येवढें कां केलें निर्वाण ।
किती अंत पाहशील माझा कंठिं राहिला प्राण ॥ ध्रु० ॥

ब्रम्हादि वंदितीं पाय तूं त्रैलोक्याचा धनी ।
तुझा मी म्हणवितों मज कां चिंतेची कांचणी ॥ १ ॥

सुवर्णाची लंका नेउनि दिधली शरणागता ।
जगदीश जगन्नायका तुझी कळिकाळावर सत्ता ॥ २ ॥

कामधेनु कल्पतरु क्षीरसागर तुजपाशीं ।
वितभर पोटासाठीं तोंड वासूं कवणासी ॥ ३ ॥

मुक्तीच्या माहेरा ऋद्धि सिद्धि तुझ्या दासी ।
क्षीरार्णवा रंक मालो मरतो उपवासी ॥ ४ ॥

वरील अभंगा वरून, मालोपंतांची सांपात्तिक स्थिति अगदींच खालावलेली असून, कधीं कधीं तर त्यांस उपासही काढावे लागत, हें स्पष्ट दिसतें. आणि तशा स्थितींतही भगवंतावरील त्यांचा विश्वास कमी न होतां शेवटपर्यंत ते त्याचे गुणानुवाद गातच राहिले.

नवविधा भक्तीवर मालोपंतांनीं केलेले अभंग फार सुंदर आहेत. तें जिज्ञासूंनीं "सन्मणिमाला-कवितासंग्रह, पुस्तक २ रें," यांत पहावे.



[library stamp]

# बहिणाबाई.

जुन्या संतकवींपैकीं ज्या थोड्या कवींनीं आपल्या कवितेंत थोडेंबहुत आत्मवृत्त दिलें आहे अशा कवींपैकीं संत बहिणाबाई या एक होत. संतशिरोमणि तुकारामबुवा देहूकर यांचा प्रत्यक्ष उपदेश बहिणाबाईंस झाला होता व त्यांची जी थोडीशी कविता रा. धोंडो विश्वनाथ उमरखाने यांनीं प्रसिद्ध केली आहे, ती लक्ष्यपूर्वक वाचून पाहतां, बाईंचा पारमार्थिक अधिकार फार मोठा होता, ही गोष्ट सकृद्दर्शनींच लक्ष्यांत येते. रा. उमरखाने यांनीं प्रसिद्ध केलेल्या "संत बहिणाबाईकृत कवितासंग्रहां"त आरंभींच बाईंच्या आत्मचरित्राचे ५३ अभंग दिले आहेत, त्यांच्या आधारानें त्यांचें थोडेंसें चरित्र येथें देऊन नंतर त्यांच्या कवितेकडे वळूं.

बाई म्हणतातः—"वेरूळच्या पश्चिमेस असलेलें **देवगांव** हें माझें माहेर. या देवगांवांत सर्व देवांनीं वस्ती केली आहे. हिमालयांतून **अगस्ति** ऋषि दक्षिणेंत आले तेव्हां त्यांनीं या देवगांवीं चातुर्मास्यांत मुक्काम केला होता. गांवाच्या पश्चिमेस **'शिवनद'** वाहात असून तें मोठें तीर्थ आहे. या पवित्र स्थलीं अगस्ति मुनि अनुष्ठानार्थ नित्य सूर्योदयीं येत असत. या तीर्थानजीक असलेल्या लाक्षाग्रामांत " लक्ष तीर्थीं वास करितील व तेथें स्नानदान आणि जप अनुष्ठान करणाऱ्या मनुष्यास सिद्धि प्राप्त होईल " असा वर अगस्ति मुनीनीं दिला आहे. अशा या पुण्यपावन देवगांवीं तेथील 'लेखक' **आऊजी** कुळकर्णी यांच्या कुळांत माझा जन्म झाला. माझ्या पित्याचें नांव **आऊदेव** व मातेचें नांव **जानकी**. पहिल्यानें त्यांस कांहीं संतति नव्हती, म्हणून त्यांनीं लक्षतीर्थावर नित्य स्नान करून शिवाचें अनुष्ठान आरंभिलें. पुढें कांहीं दिवसांनीं आऊजी यांस स्वप्नांत दृष्टांत झाला कीं "होईल संतान कन्या दोन पुत्र." नंतर एका वर्षानें माझा जन्म झाला."

"बारशाचा उत्साह मोठा थाटाचा झाला. ब्राम्हण जेऊन आपापल्या घरीं गेले व आऊदेव अरण्यांत गेले. त्यांस अरण्यांत वेरूळच्या वाटेवर पीतांबराचे गांठीस बांधलेली मोहर सांपडली तेव्हां घरीं येऊन ते आनंदानें म्हणाले, " कन्या आमच्या लाभावर जन्मली आहे." वीरेश्वर ब्राम्हण नामक ज्योतिषानें माझी पत्रिका तयार केली. " होईल कल्याण ईचेनि तुमचें। ऐसें पत्रिकेचें फळ वाची." या मुलीची देवभक्तीकडे विशेष प्रवृत्ति होईल व ही दीर्घायुषी होईल असेंही ज्योतिषीबुवांनीं सांगितलें. तेव्हां त्यांस आऊदेव यानीं वस्त्र व गाय देऊन त्यांची संभावना केली. पुढें योग्य वेळीं कन्यादानाचा प्रश्न उपस्थित झाला तों सुदैवानें सीऊर येथील एक नातेवाईक अकस्मात् घरीं आला व त्यानें मला मागणी घातली. पुढें सुमुहूर्तावर लग्न झालें. लग्नानंतर थोडया दिवसांनीं आऊदेव यांस पुत्र झाला; तेव्हां लोक म्हणू लागले कीं, "ही मुलगी भाग्यवान् आहे."

बहिणाबाई सांगतात, " माझ्या पित्याचें गोत्र मौनस व भ्रताराचें गोत्र गौतम. माझा भ्रतार शिवपूर येथील ज्योतिषी होता.त्याची पहिली बायको वारली होती. त्याच्याशीं, त्याच्या वयाच्या तिसाव्या वर्षी माझें लग्न झालें. "द्वितीय संबंधी वरुषां तिसांचा । नोवरा भाग्याचा ज्ञानवंत.' त्यास कन्यादान करून "आंदण दिधलें सर्व कांहीं." माझें लग्न होऊन चार वर्षें झाल्यावर, माझ्या बापाचा एक गोत्रज होता त्याच्याशीं माझ्या बापाचें वैमनस्य येऊन वृत्तीविषयीं कलह उत्पन्न झाला.तेव्हां माझ्या बापानें माझ्या भ्रतारास निरोप पाठविला कीं,

**"गोत्रजाची फेडा बाकी साकी रीण । मागती लिहून शेत मळा ॥**
**आतां येथोनियां जावें परदेशासी । तरीच आम्हासी सुख होय ॥**
**तूं सखा सोयरा जांवाई मित्र तूं । आमुचा हा अंतु पाहूं नको ॥**
**घातलेंसे बंदी सोडवील कोण । तूं सखा होऊन सोडवावें ॥"**

निरोप मिळतांच माझे भ्रतार देवगांवीं गेले व मध्यरात्रीं घर व गांव सोडून आम्ही सर्व मंडळी गोदातीरीं आलों. प्रवरासंगमीं गोदास्नान करून आम्ही सिद्धनाथाचें दर्शन घेतलें. नंतर आम्ही महादेवास जाण्यास निघालों. परंतु:—

'गंगा देखोनियां सिद्धेश्वर देव । तेथोनियां जीव निघों नेणें ॥
आवडीचा हेतु पूर्वील संस्कार । श्रवणीं आदर कीर्तनाचे ॥
पुराणश्रवण पूजा देवस्थान । ब्राह्मणपूजन प्रीति यांची ॥
संन्यासी सज्जन संत महानुभाव । यांचे पायीं जीव लागलासे ॥
निघतां तेथून थोर वाटे दुःख । अदृष्टें करंटें काय कीजे॥
बहेणि म्हणे पुढें महादेवा जावें । भ्रतार गौरवें नेत आम्हां ॥'

वाटेंत आम्ही आपला निर्वाह भिक्षेवर चालविला होता. नाना प्रकारचे कष्ट सोसले. माता पिता,बंधु यांसह आम्ही महादेव-वनांत जाऊन नरसिंह-दर्शन घेतलें व पुढें भीमातीरीं पंढरपुरास आलों. तेथील सुखसोहळा काय वर्णावा ?

"भीमा चंद्रभागा पुंडलीक भक्त । वेणुनादीं मुक्त प्राणिमात्र ॥
पद्मालयीं स्नान देवाचें दर्शन । नामसंकीर्तन आइकिलें ॥
राही रखुमाई सत्यभामा सर्व । देखियलें पूर्वद्वारयुक्त ॥
महाद्वारांतूनी करितां प्रवेश । वाटलें मनास महासौख्य ॥
पांडुरंगमूर्ति देखोनि पवित्र । संतोषले नेत्र इंद्रियेंसी ॥
केली प्रदक्षिणा महाहर्षयुक्त । चित्त हें विरक्त करूनियां ॥
वाटे मनामाजी रहावें येथेंची । परी प्राक्तनाची दशा नाहीं ॥
जीव जावो परी पंढरीचें स्थळ । न संडावें जळ ऐसें वाटे ॥
बहेणी म्हणे पंचरात्री पंढरीस । केला आम्ही वास पुण्ययोगें ॥"

याप्रमाणें पंढरीस पांच दिवस मुक्काम करून चैत्र पौर्णिमेस आम्ही महादेवास गेलों व तेथील यात्रा पाहिली.शंकराचें ध्यान पाहून मला मोठें समाधान वाटलें. "तुझा अभयकर मस्तकीं असूं दे" अशी भक्तियुक्त अंतःकरणानें शंकराची मीं प्रार्थना केली. शंभुमहादेव येथें पांच रात्री मुक्काम करून आम्ही शिंगणापुरास आलों. तेथें-

कोराधान्याचे कण सहज मिळवूं । तेणें सुखी जीऊ होय माझा ॥
अमृताचे परी वाटे गोड अन्न । पाप जळे जाण भक्षिलिया ॥

या वेळीं माझें वय नऊ वर्षांचें होतें. भ्रतारानें असा विचार केला कीं, शिंगणापूर येथें फारशी ब्राह्मणवस्ती नसल्यामुळें हें ठिकाण आपल्या वास्तव्यास योग्य नाहीं. रहिमतपूर येथें ब्राह्मणांचा मोठा समुदाय आहे, तेथें जाऊन आपण वसाहत करूं. हा विचार आम्ही लवकरच अमलांत आणिला.आम्ही रहिमतपूर येथें जाऊन राहिलों व भिक्षेवर आपला चरितार्थ चालवूं लागलों. माझे भ्रतार मोठे कर्मठ असून,देवाची त्यांजवर कृपा होती. रहिमतपूरच्या ग्रामोपाध्यांचा काशीस जाण्याचा विचार होता, म्हणून त्यांनीं आपल्या गैरहजिरींत रहिमतपूरची आपली वृत्ति चालविण्याची कामगिरी माझ्या भ्रताराकडे सोंपविली व नंतर ते काशीस गेले. या उपाध्यायांचें नांव **रत्नाकर** ज्योतिषी.येणेंप्रमाणें रहिमतपूर येथें आम्ही एक वर्ष वास्तव्य केलें. त्यानंतर उपाध्येबुवा काशीहून परत आले व त्यांनीं आणखी एक वर्ष आमचा निर्वाह चालविला. इतक्यांत माझ्या वयास अकरा वर्षें झालीं. संतांचे संगतींत असावें असें मला वाटूं लागलें.

**"कथा आईकावी पुराणश्रवणीं । ब्राह्मणपूजनीं चित्त रिझे ॥**
**तेथूनी प्राक्तनें ओढूनियां जाण । तें स्थळ सोडून चालियेलों ॥**
**उदास अंतर नावडेचि कांहीं । प्राक्तनासी नाहीं उपाय तो ॥"**

अशा रीतीनें अत्यंत विषण्ण चित्तानें रहिमतपूर सोडून'अतिपवित्र क्षेत्र कोल्हापूर' येथें आम्हीं गेलों. तेथें **बहिरंभट** नामक एक वेदांती ब्राह्मण रहात असे. तो यजुर्वेदी असून त्यानें दोन शास्त्रांचें अध्ययन केलें होतें. त्याच्या गृहीं अग्निहोत्र असून, पुष्कळ विद्यार्थी पठणास येत असत. ब्राह्मणाच्या घरीं आम्ही बिऱ्हाड करून राहिलों. **जयराम गोसावी** नित्य हरिकथा करीत असत. भागवताचेंही पारायण होत असे. त्या पवित्र स्थलीं आत्मचर्चा करण्यांत आमचा काल आनंदानें जाऊं लागला. माझ्या अकराव्या वर्षीं, एका सोमवारीं कसलेंसें मोठें व्रत आलें, तेव्हां त्या दिवशीं, बहिरंभटाच्या यजमानानें त्यास एक सवत्स कपिला गाय दान दिली—

**काळी ते कपिला काळें तिचें वस्त्र । प्रदक्षणे पुच्छ निवेदिली ॥**
**सुवर्णाचीं शृंगें रुपियाचे खूर । वर पीतांबर पांघुरिला ॥**
**सर्व उपचारें गोदान दिघलें । पहावया आले सर्व जन ॥"**

२४५८

अकराव्या दिवशीं बहिरंभटाच्या ऊर्फ हिरंभटाच्या स्वप्नांत येऊन एका ब्राह्मणानें त्यास सांगितलें कीं "तुझ्या ओसरीस हा ब्राह्मण आहे, त्यास ही गाय तूं देऊन टाक." या दृष्टांताप्रमाणें हिरंभटानें ती गाय सवत्स आह्मांस दिली. आमच्या सर्व मंडळीस मोठा आनंद झाला. नित्य गोसेवा आमच्या हातून घडूं लागली. माझे आईबाप गाईसाठीं चारा आणण्यास जात. आम्ही मोठ्या काळजीनें गाईची शुश्रूषा चालविली."

पुढील वृत्तांत खुद्द बहिणाबाईच्या शब्दांनीं ऐकण्यांतच विशेष स्वारस्य असल्यामुळें तो वृत्तांत त्यांच्याच शब्दांत येथें देतों:—

गाईचें तें वत्स तेंही पैं कपिला । माझ्या ठायीं तिला हेत बहू ॥
मीच सोडीं तरी वत्स रिघे दोहा । करितां दोहना सेवे[1] माझी ॥
मीच पाणी [illegible]ीं तृण घालीं मीच । मजवीण कांच[2] मनीं वाहे ॥
मी जाय [illegible]गया ओरडे तें वत्स । गाय वाया पुच्छ सवें चाले ॥
कर[illegible] लोक नवलाचे राहती । उगेच पाहती वत्स गाई ॥
म[illegible]कळेंचि वत्स असोनियां जाण । नवचे आपण गाईपाशीं ॥
तृण घालीं तरी भक्षिती आपण । पाजिल्या जीवन तेव्हां पिती ॥
रात्रीच्या अवसरीं वत्स निजे सेजे । पुराणीं तें फुंजे[3] श्रवणकालीं ॥
कथेपासीं जाय सवें तेंही येत । उभेंचि निवांत कथा ऐके ॥
गाय गोठां घरीं आपण कथेसी । जातां मी स्नानासी सवें चाले ॥
करिती अपूर्व हें तुझें संबंधी । लोक नाना शब्दीं बोलताती ॥
कोणी म्हणे आहे योगभ्रष्ट वत्स । कोणी म्हणती नष्ट सवे ईची ॥
कोणी म्हणती जन रिणाईत ईचें । रीण फिटे तिचें तैंच सूट ॥
ऐसें नाना परी वत्स तें न सोडी । मजहि तें आवडी तयापाशीं ॥
न देखतां वत्स हेचि तळमळी । उदकेंवीण मासोळी तैसें वाटे ॥
दळितां कांडितां वाहतांही पाणी । वत्सेंवीण जनीं नावडे हो ॥
भ्रतार रागीट नावडे कीं तया । परी त्यासी माया मनीं आली ॥
म्हणे असो तुज नाहीं मूलबाळ । हाचि तुझा खेळ जाण मनीं ॥
तुजही आवडी कथापुराणाची । संगती फुकाची तुज झाली ॥

---

१ संवय २ खंती ३ स्फुंदे.

असा त्या वासराचा विलक्षण लळा बहिणाबाईस लागला होता. बहिणाबाईच्या चरित्रांत ज्या कित्येक गूढ व विलक्षण गोष्टी आहेत, त्यांपैकीं ही एक गोष्ट होय. बाईनीं आपल्या तेरा पूर्वजन्मांची हकीकत कांहीं अभंगांत दिली आहे, ती तर याहून अधिक आश्चर्याची आहे. असो.

त्या वासराच्या लडिवाळपणांत बहिणाबाईचें कालक्रमण चालू असतां एके दिवशीं जयराम गोसावी सहज करवीरीं आले, त्यांची घरोघर कीर्तनें होऊं लागलीं. रात्रंदिवस कीर्तनाचा व ब्राह्मणसंतर्पणाचा थाट सुरू झाला. बहिणाबाई म्हणतातः "गोसावीबुवांचीं कीर्तनें ऐकण्यास माझे आईबाप जात असत त्यांजबरोबर मीही जात असें व मजबरोबर माझें वांसरूही जात असे. माझ्या आईजवळ मी बसत असें, तेथें माझें वांसरूंही धांवत येऊन उभें रहात असे.

**हागेना तें मुते उभेंची श्रवण । आयके कीर्तन नामघोष ॥**
**आरती झालिया नमस्कार होती । आपणही क्षिती ठेवी डोकें ॥**
**देखोनियां जन हांसती सकळ । परी तें प्रेमळ आल्हादची ॥**
**म्हणती योगभ्रष्ट पूर्वील हरिभक्त । गोवत्स विरक्त पहा कैसें ॥**

पुढें एके दिवशीं **मोरोपंत** नामक गृहस्थानीं आपल्या घरीं जयरामस्वामीस कीर्तनास बोलाविलें. तो एकादशीचा दिवस होता. दोन प्रहरीं मोठ्या आनंदानें हरिकीर्तन सुरू झालें. जयराम गोसावी आपल्या शिष्यसमुदायासह सभास्थानीं बसले असून, टाळमृदंगादि वाद्यघोषांत हरिगुणगायन चाललें होतें. मीही माझ्या आईबापांसह कीर्तनश्रवणास गेलें होतें व माझें वांसरूंही मजपाशींच बसलें होतें. परंतु लोकांनीं त्यास तेथून काढून दरवाजांत नेलें. "येथें माणसांस बसण्यास जागा नाहीं, तेथें जनावराची काय प्रतिष्ठा ?" असें ते म्हणाले. मला फार वाईट वाटून मी रडूं लागलें. तेव्हां, वांसराचें ओरडणें ऐकून मला रडूं येतें ही गोष्ट जयराम गोसावी यांस लोकांनीं सांगितली—

म्हणती एक मुली हिरंभटा घरीं । ते आली श्रीहरिकीर्तनासी ॥
तिजसवें वत्स एक असे त्यासी । सांगातें तयासी हिंडविते ॥
तें वत्स बाहेरी घातलें अडचणी । त्यालागीं ते सुनी रडत असे ॥
तें वत्स आरडत बाहेरी तिष्ठतें । रडत हे येथें गलबला ॥

हें वर्तमान ऐकतांच विश्व ब्रह्ममय पाहणाऱ्या जयरामस्वामींनीं काय केलें ? बहिणाबाई सांगतात—

साक्ष अंतरींचा तो स्वामी जयराम । वत्स-अंतर्याम ओळखिलें ॥
म्हणे आणा त्यासी वत्सासी अंतरीं । काय नाहीं हरि आत्मवेत्ता ॥
कथेलागीं होतो जीव कासावीस । पशु कीं तयास म्हणों नये ॥
आणविलें वत्स बैसवी आसनीं । पाहोनि नयनीं तोष वाटे ॥
मजहि कृपावंत कृपेचिये शब्दें । बोलावी प्रारब्धें पूर्वपुण्यें ॥
कुरवाळूनी दोघां पाहे पूर्ण दृष्टी । न मानेचि गोष्टी जनालागीं ॥
कथा होत असे गजर महाथोर । चित्त हें निर्भर वैष्णवांचें ॥
जयराम गोसावी याचें मनोगत । पुण्यशील सत्य उभय वर्ग ॥
कथेमाजी वत्स उभेंचि तिष्ठत । रूपीं सर्व चित्त आणूनियां ॥
हे मुली लहान वय इचें थोडें । श्रवण हें आवडे नवल मोठें ॥
म्हणे इचें कोणी आहे ये कथेसी । माय बाप तीसी सांगितला ॥
भ्रतारही इचा आहे बहु योग्य । परि इचें वैराग्य थोर दिसे ॥
मायबापासवें येतसे पुराणीं । वत्सही घेऊनी समागमें ॥
मग त्यां आपुलें आपण पाहिलें । चरणीं घातलें लोटांगण ॥
वत्सही तैसेंचि पायावरी पडे । अपूर्वता घडे सर्व जनां ॥
हिरंभट आणि आणीकही जन । म्हणती हें चिन्ह कोण कळा ॥
बहेणी म्हणे ऐसें कोल्हापुरीं होय । पुढीलही सोय तुम्हां सांगों ॥

बहिणाबाई म्हणतात— 'जयराम गोसावी यांच्या कीर्तनांत असा प्रकार घडल्यावर कीर्तन समाप्त होतांच आम्हीं सर्व मंडळी घरीं आलों. त्या वेळीं सुमारें दोन घटका रात्र झाली होती. गाईनें वत्साला दूध पाजलें. अग्निहोत्रासाठीं हिरंभटानें प्रातःस्नान केलें व आकाशांत कार्तिकाचे दिवे लावले. पुढें—

सडे संमार्जन केलें स्नान तेथें । गोचें शृंग हातें कुरवाळिलें ॥
भ्रतारानें स्नान केलें आपुलिया । दक्षिणेची गया कोल्हापुर ॥

तों मिराबाई नामक कोणी स्त्री होती तिनें कीर्तनांत घडलेला सर्व वृत्तांत तिच्या भ्रतारास सांगितला.

वत्साचा वृत्तांत माझेंही रुदन । भ्रताराचे कान तृप्त केले ॥
जयराम गोसावी विदेही अवस्था । तेणें हात माथां ठेवियेला ॥
थोर इचें भाग्य तो यांसी बोलिला । आशीर्वाद दिला योग्य तेणें ॥

मिराबाईच्या तोंडून ही हकीकत ऐकतांच बहिणाबाईच्या भ्रतारास मोठा क्रोध आला. बाई म्हणतात;—

जातीचा भिक्षुक आला बहुत राग । धांवला सवेग गृहाप्रती ॥
धरुनियां वेणी मारिलें यथेष्ट । हिरंभटा कष्ट फार झाले ॥
नावरे मारितां गायही ओरडे । वत्सही तें रडे कासावीस ॥

बहिणाबाईचें वय त्या वेळीं ११ वर्षांचें होतें. बाईच्या भ्रतारानें त्यांस इतकें बेदम मारलें, तरी बाईचे आईबाप किंवा बंधु कांहीं बोलले नाहींत. कांहीं वेळानें पतीचा क्रोध शांत झाला, असें पाहून बाईच्या आईबापांनीं त्यास विचारिलें कीं, मुलीवर इतके कां रागावतां? तिनें असा कोणता भयंकर अपराध केला?

"येरू म्हणे रात्रीं कथेंत प्रतिष्ठा । काय याची निष्ठा देखियेली ॥
कैंचें तें पुराण कैंची हरिकथा । मारीन अन्यथा नव्हे येथ ॥
इतकें बोलोनियां भ्रतार पुनरपि । क्रोध तो नाटोपी अग्नी ऐसा ॥
बहेणी म्हणे तेव्हां देह संकल्पिले । प्राक्तनाचें केलें कोण वारी ॥

* * *

आलें मना तंव मारिलें बळकट । बांधोनियां मोट टाकियेली ॥
हिरंभट म्हणे व्हा तुम्ही बाहेरी । हा दिसे हत्यारी चांडाळ कीं ॥

बिचाऱ्या बहिणाबाईनीं केवळ हरिप्रेमासाठीं एवढ्या लहान वयांत इतका छळ सोसला, हें ऐकून परमभागवत प्रऱ्हादाची आठवण कोणास होणार

नाहीं ? बहिणाबाईंचे गुरु भक्तशिरोमणि **तुकारामबुवा** यांचा तर असा स्पष्ट आदेश आहे कीं—

**भगवंतीं जेणें घडे अंतराय । हो कां बाप माय त्यजावे ते ॥**
**तेथ प्रिया पुत्रा कोण करी लेखा । करिती ते दुःखा पात्र शत्रु ॥**

परंतु, आपल्या ईशप्रेमांत अंतराय आणणाऱ्या भ्रताराचा त्याग करण्याची कल्पनादेखील बहिणाबाईंच्या मनांत आली नसेल व कोणत्याही अस्सल आर्यस्त्रीच्या मनांत तशी कल्पना कधीं येणारही नाहीं. शिवाय अकरा वर्षांच्या मुलीला असले विचार कोठून सुचणार ? असो. बहिणाबाई पुढें सांगतात—

**मग मातापिता हिरंभटालागीं । प्रार्थुनियां वेगीं स्थिर केलें ॥**
**म्हणती कृपा करा आजी दिवसभरी । प्रातःकाळीं दुरी ठाव पाहों ॥**
**तयावरी वत्स गाय दोघेजण । न खाती कीं तृण जळेंसहित ॥**

हा त्या जनावरांनीं केलेला सत्याग्रह पाहून बहिणाबाईंच्या निष्ठुर पतीनें, बाईंची मोट बांधली होती ती सोडली व त्यांस गाई-वत्सापाशीं नेलें तेव्हां

**............... । हुंबरली जैशीं पुत्र माता ॥**
**आपण देखिले वत्स आणि गाय । म्हणे प्राण जाय तरी बरा ॥**
**बहेणी म्हणे तयां तृणा पाणी पाजी । न घेती ते माझी थोर माया ॥**

त्या दिवसापासून त्या गाईनें आणि तिच्या वत्सानें अन्नपाणी वर्ज्य केलें, इतकेंच नव्हे तर आपल्या जागेवरून उठण्याचेंही त्यांनीं बंद केले. त्यामुळें बहिणाबाईनींही अन्नोदकाचा त्याग केला. त्या तिघांचा तो निग्रह पाहण्यास गांवांतले सर्व लोक येऊं लागले. कांहीं लोकांनीं हा वृत्तांत जयरामस्वामीस कळविला, तेव्हां तेही हिरंभटाच्या घरीं आले. बहिणाबाईच्या भ्रतारानें स्वामीस नमस्कार केला. हिरंभटानें त्यांस आसनावर बसवून त्यांचें पूजन केलें. लोकही पुष्कळ जमा झाले होते. एकंदर प्रकार पाहून स्वामीस मोठा आनंद झाला—

म्हणती ब्राह्मणा तूं इचा भ्रतार । सांगतों निर्धार एक चित्तें ॥
योगभ्रष्ट ईचीं साधनें बळकट । तूं रे ईस कष्ट करूं नको ॥
स्त्रधर्मेंचि तुझी करील हे सेवा । उद्धरील जीवा आपुलिया ॥
तुझें कांहीं पदरीं पूर्वील सुकृत । तेणें हा सांगात प्राप्त झाला ॥
गाई आणि वत्स हे इचे सांगाती । अनुष्ठानें होती ऐक्यभावें ॥
इचा हेच गुरू हें इचें साधन । तोडील बंधन आपुलें हें ॥
बहेणी म्हणे ऐसें बोलोनी जयराम । शिष्याचा संभ्रम फार होता ॥

जयरामस्वामी आणखी म्हणाले, " हीं तिघेंही पूर्वजन्मीं एका जागीं अनुष्ठान करीत असत. ह्या दोघांच्या अनुष्ठानांत कांहीं अंतराय होऊन तें अपूर्ण राहिल्यामुळें, ह्यांस गाईचा जन्म प्राप्त झाला. ह्या मुलीचें अनुष्ठान मात्र पूर्ण झालेलें असल्यामुळें हिची चित्तशुद्धि झाली." अशा प्रकारें बहिणाबाईच्या पतीची समजूत करून जयरामस्वामीं स्वस्थानीं गेले. पुढें द्वादशी होतांच त्या वत्साचा देहांतसमय जवळ आला, तेव्हां हिरंभटानें "मूकं करोति०" या श्लोकाचा प्रथमार्ध सहज म्हटला असतां त्या वत्सानें मनुष्य-वाणीनें "यत्कृपा तमहं वंदे०" हा सदर श्लोकाचा उत्तरार्ध स्पष्ट उच्चारला. ही गोष्ट लोकांनीं प्रत्यक्ष पाहिली व ते आपापसांत त्यासंबंधानें बोलत असतां वत्सानें अकस्मात् प्राण सोडला. तेव्हां बहिणाबाई त्याजपाशीं धांवून गेल्या. बाई म्हणतात:—

प्राणासवें प्राण जाऊं पाहे माझा । प्राक्तनासी दुजा प्रयत्न नाहीं ॥
गाई हुंबरडे दोहींवरी मान । टाकी परी जाण शब्द कैंचा ॥
बहेणी म्हणे देह प्राक्तनें राखिलें । पुढें काय झालें कोण जाणे ॥

वत्सानें देह ठेवल्याचा वृत्तांत जयरामस्वामीस कळतांच ते संतमंडळीसह त्या ठिकाणीं आले.

मग सर्व श्रेष्ठ संतसाधुजन । करीत कीर्तन वत्स नेलें ॥
दिंडी पताकानें मिरविलें वत्स । गाय सवें तुच्छ यानीं देह ॥

हुंबरडा हाणोनी चाले मागें मागें । गाय अंतरंगीं महादुःखी ॥
पुरूनियां वत्स आले सर्व जन । करूनियां स्नान गृहा गेले ॥
गाय वत्सापाशीं जाउनी हुंबरे । मागुती ते फिरे गृहासी ये ॥
मज अवलोकितां मी तों अचेतन । माझा देहीं प्राण आढळेना ॥
ऐसे दिवस चारी लोटलियावरी । प्रतिपदेमाझारीं मध्यरात्रीं ॥
बोलिला ब्राह्मण येऊनि सन्मुख । सावध विवेक धरा बाई ॥
सावध सावध सावध तूं मनीं । ऐकोनी श्रवणीं देह काये ॥
तंव गाय नाहीं वत्स ना ते लोक । माय ते सन्मुख बैसलीसे ॥
बंधु पिता आणि भ्रतार बैसला । सोज्वळ लागला दीप असे ॥
तेथुनियां मन करुनी सावध । स्मरणीं स्वतःसिद्ध चित्त केलें ॥
बहेणी म्हणे देह सर्वही विकळ । परि तें निश्चळ चित्त माझें ॥
उघडोनियां नेत्र पाहें जंव पुढें । तंव दृष्टि पडे पांडुरंग ॥
देखिली पंढरी ध्याना तेचि येत । जयराम दिसत दृष्टीपुढें ॥
ब्राह्मण स्वप्नांत देखिला तो जाण । त्याची आठवण मनीं वाहे ॥
न दिसे आणिक नेत्रांपुढें जाण । नामाचें स्मरण मनीं राहे ॥
पूर्वील हरिकथा आयकिल्या । त्या मनीं मागुत्या आठवती ॥
तुकोबाचीं पदें अद्वैत प्रसिद्धें । तयांच्या अनुवादें चित्त झुरे ॥
ऐसीं ज्याचीं पदें तो मज भेटतां । जिवासी या होता तोष बहु ॥
तुकोबाचा छंद लागला मनासी । ऐकतां पदांसी कथेमध्यें ॥
तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ॥
तुकोबाची कानीं ऐकेन हरिकथा । होय तैसें चित्ता समाधान ॥
तुकोबाचें ध्यान करुनी अंतरें । राहें त्या भितरीं घरामाजी ॥
बहेणि म्हणे तुका सद्गुरु सहोदर । भेटतां अपार सुख आहे ॥

बहिणाबाईचें केवढें हें पूर्वपुण्य ! एवढ्या अल्पवयांत इतकी अंतःशुद्धि होऊन तुकोबांचे अभंग कानीं पडतांच त्यांच्या दर्शनाचा ध्यास मनास सारखा लागून रहावा, हें पारमार्थिक भाग्याचें पूर्वचिन्ह होय; व यावरून पूर्वजन्मीं बहिणाबाईची पारमार्थिक उन्नति पुष्कळच झालेली असली पाहिजे हें उघड

दिसतें. नाहीं तर तुकारामबुवांचे अभंग खुद्द त्यांच्या मुखांतून ऐकणारे लोक त्या वेळीं काय थोडे होते? असो. तुकाराम महाराजांचा ध्यास आपणास कसा लागला होता हें सांगतांना बहिणाबाई म्हणतातः—

मत्स्य जैसा जळावांचुनी चरफडी। तैसी ते आवडी तुकोबाची ॥
अंतरींचा साक्ष असेल जो प्राणी। अनुभवें मनीं जाणेल तो ॥
तृषितासी जैसें आवडे जीवन। तैसा पिंड प्राणेंवीण तया ॥
बहेणि म्हणे हेत तुकोबाचे पायीं। ऐकोनियां देही पदें त्याचीं ॥

तुकारामबुवांच्या हयातींतच त्यांची कविता कोल्हापुरापर्यंत प्रसार पावली असून कीर्तनादिकांतून तिचा उपयोग होऊं लागला होता, हें यावरून उघड दिसतें. असो.

बाई पुढें म्हणतातः-"संचित नाहींसें करील असा सद्‌गुरूशिवाय दुसरा कोण समर्थ आहे? यासाठीं सद्‌गुरु चांगला असावा, कीं ज्याच्या कृपेनें आणि उपदेशानें संसारांतील श्रमाचा परिहार होईल. सद्‌गुरूशिवाय त्रिविध तापांची शांति कोण करील? सद्‌गुरु जर भेटला नाहीं तर जन्ममरणाचा फेरा कोण चुकवील? मला असें वाटूं लागलें कीं, सद्‌गुरु तुकोबा जेव्हां मला भेटतील तेव्हांच माझ्या वासनेचा क्षय होईल." "बहेणी म्हणे माझा जाऊं पाहे जीव। कां बा नये कींव तुकोबा रे."

न बोलवे शब्द अंतरींचा धांवा। नाइके तुकोबा काय कीजे ॥
अदृष्ट करंटें साह्य नव्हे देव। अंतरींची हांव काय करूं ॥
तेरा दिवस ज्यानें वह्या उदकांत। घालुनियां सत्य वांचविल्या॥
महाराष्ट्र शब्दांत वेदांतींचे अर्थ। बोलिला लोकांत सर्वद्रष्टा ॥
अंतर साक्ष आहे निरूपणीं हेत। जडे परी चित्त ओळखेना ॥
बहेणी म्हणे मीच असेन अपराधी। अन्याय त्रिशुद्धि काय त्याचा ॥

तुकारामबुवांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीच्या उदकांत तेरा दिवस सुरक्षित राहिल्या या प्रचलित लोकवार्तेच्या खरेपणाचा बहिणाबाईनीं

काढलेले हे उद्गार म्हणजे एक मोठाच विश्वसनीय पुरावा होय. असो. पुढें बहिणाबाईंनीं:--

बहुत अंतरीं शोक आरंभिला । कां मज विठ्ठला मोकलिलें ॥
त्रिविध तापानें तापलें मी बहू । जाईना कां जीऊ प्राण माझा ॥
तंव अकस्मात सातविया दिनीं । नामसंकीर्तनीं घोषयुक्त ॥
तुकारामरूपें येउनि प्रत्यक्ष । म्हणे पूर्व पक्ष सांभाळिजे ॥
नको करूं चिंता आहें मी तुजपाशीं । घेईं अमृतासी हातींचिया ॥
गाय केलें वत्स मुखीं निघे धार । अमृत हें सार सेवीं हेंची ॥
ठेउनियां कर मस्तकीं बोलिला । मंत्र सांगितला कर्णरंध्रीं ॥
म्याही पायावरी ठेविलें मस्तक । दिधलें पुस्तक मंत्र गीता ॥
कार्तिकांत वद्य पंचमी रविवार । स्वामींचा विचार गुरुकृपा ॥
आनंदलें मन चिद्रूप कोंदलें । उठोनि बैसलें चमत्कारें ॥
मंत्र आठवती तुकोबा स्वरूपें । स्वप्नामाजी कृपा पूर्ण केली ॥

तुकारामबुवानीं बहिणाबाईस स्वप्नांत दृष्टांत दिला त्या वेळीं ते जिवंत होते, परंतु समाधिस्थ झाल्यावरही, पट्टशिष्य निळोबा यांस व त्यानंतर शंभर वर्षांनीं संतचरित्रकार महीपतिबावांस त्यांनीं दर्शन दिल्याची आख्यायिका प्रसिद्धच आहे. स्वप्नांत तुकारामबुवांनीं बाईस जें अमृत पाजलें त्याची चव कशी होती ?

अमृत पाजिलें चवी अनारसी । साक्षी ज्याची त्यासी मनामाजी ॥

पुढें तुकारामबुवांविषयींची स्वतःची भावना बाईनीं वर्णन केली आहे:—

जयाचीया पदें होतसे विश्रांति । त्याची देहाकृति विठ्ठलचि ॥
विठ्ठलासी तया नाहीं भेदभाव । ऐसें माझें मन साक्ष आहे ॥
पांडुरंग तुका, पांडुरंग तू का । वेगळीक देखा कैंची होय ॥
कलियुगीं बौधरूप धरी हरी । तुकोबाशरीरीं प्रवेशला ॥
तुकोबाची बुद्धि पांडुरंगरूप । मन तें स्वरूप तुकोबाचें ॥
तकोबाचीं सर्व इंद्रियेंचालक । पांडुरंग देख सत्य आहे ॥

तुकोबाचे नेत्र तेही पांडुरंग। श्रोत्र ते अभंग रूप त्याचें ॥
तुकोबाचे हात लिहिताति जें जें। तें तें तें सहजें पांडुरंग ॥
सर्वही व्यापार तुकोबाचे हरि। आपणचि करी अद्वयत्वें॥
बहेणी म्हणे रूपें व्यापक तुकोबा। ध्यान माझ्या जीवा हेंचि वाहे ॥

तात्पर्य, तुकारामबुवांची अमृतमय अभंगवाणी श्रवण करून बहिणाबाईंस त्यांचा अगदीं ध्यास लागून राहिला; ध्यानीं, मनीं, स्वप्नीं त्यांस तुकोबा दिसूं लागले. रामदास, रंगनाथ, जयराम, वामन, आनंदमूर्ति, शिवरामस्वामी, हरिनारायण, केशवस्वामी इत्यादि अनेक ब्राह्मण सत्पुरुष महाराष्ट्रांत त्या वेळीं विद्यमान होते व त्यांपैकीं जयरामस्वामीचा तर बाईंशीं चांगलाच परिचय होता. असें असतां, या ब्राह्मण स्त्रीची प्रवृत्ति अब्राह्मण तुकारामबोवांच्या उपदेशाकडे झाली हा केवळ ऋणानुबंधच समजला पाहिजे.

पुढें बहिणाबाई सांगतातः—"भ्रतारानें माझी मोट बांधून मला मारलें त्याचें दुःख त्या वत्सास होऊन त्यानें चौथ्या दिवशीं प्राण सोडला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. पुढें एका ब्राह्मणानें स्वप्नांत येऊन सांगितलें कीं "बाई, सावधान चित्त कर." त्याप्रमाणें मी सावधान होऊन राहिलें असतां तुकोबांच्या दर्शनाची मला मोठी उत्कंठा लागून राहिली. वत्साच्या मरणानंतर सातव्या दिवशीं रात्रीं तुकोबांनीं स्वप्नांत येऊन--

केलें समाधान पाजिलें अमृत। वत्सासी करीत गाय भेटी ॥
अमृत पाजुनी सांगितला मंत्र। जो का हा सर्वत्र लोक जपती ॥
मस्तकीं हस्त ठेवुनियां कृपा। केली त्या स्वरूपा तोचि जाणे ॥
कृपेचा महिमा आहे तो अपार। वत्स बोले सार श्लोक अर्ध ॥
आठवे दिवशीं सावध इंद्रियें। अमृतें धालींयें तुकोबाच्या ॥
तेधवां ते गाय देखिली सन्मुख। निमालिसी देख वत्स कळे ॥
म्हणे या वत्सातें पाजिलें अमृत। तयासी तो मृत्यु कदा नाहीं ॥
अमर तें वत्स आहे मजपाशीं। चित्त अमृतेंसी घेत गोडी ॥

इतक्या सगळया गोष्टी अवध्या आठ दिवसांत घडून आल्या. पुढें "ज्ञाननिधि समर्थ जयरामस्वामींनीं अंतर्दृष्टीनें माझी स्थिति पाहिली व हिरंभटास बोलावून माझी विचारपूस केली. हिरंभटानें आपल्या घरीं झालेला सर्व वृत्तांत स्वामीस कथन केला. तो म्हणालाः—

**स्वप्नगत गुरु तुकोबाचे रूपें । स्वप्नींचिया कृपें बोध केला ॥**
**सावध होउनी ते मुली बैसली । गाय संबोधिली कुर्वाळुनी ॥**
**दुग्ध दोहुनियां घेतलें तियेनें । पाणी आणि तृण भक्षितसे ॥**
**परि ते मुलीचें रूप पालटलें । पूर्ण तें दाटलें हृदय तिचें ॥**
**तुकोबाचा छंद अंतरीं लागला । मायबापें तिला सांगताती ॥**
**भ्रतार हा तिचा वेडावला राहे । उगाचि तो पाहे तियेकडे ॥**
**छांदस होउनी बैसला घरांत । तुकोबासी चित्त लावुनियां ॥**

बाईची व तिच्या भ्रताराची ही हकीकत ऐकून जयरामस्वामींस संतोष वाटला. त्यांच्या मनांत बाईविषयीं कृपा उत्पन्न होऊन तिचा भाव पाहण्यासाठीं ते तिच्या घरीं आले. त्यांना पाहून बाईंस मोठा आनंद झाला व प्रेमानें त्यांचा कंठ दाटून आला. त्यांनीं मनातल्या मनांतच स्वामीचें वंदन करून त्यांस आरती केली. बाई म्हणतात—

**मजवरी दृष्टि कृपेची ओतली । प्रेमाची गुंतली माय जैसी ॥**

मग बाईंची मानसपूजा ग्रहण करून स्वामी स्वस्थलीं गेले. तेथें ते आसनावर स्वस्थचित्तानें बसले असतां, तुकारामबुवांनीं त्यांस मनोमय दर्शन देऊन

**करी नमस्कार भेटुनी आनंदें । अत्यंत आल्हादें स्वामी सखा ॥**

इतकेंच नव्हे तर त्याच वेळीं बुवांनीं बहिणाबाईंसही मनोमय दर्शन देऊन त्यांच्या मुखांत कवळ घातला व

**मज म्हणे आलों जयरामभेटीसी । तुजही मानसीं ओळखिलें ॥**
**तुम्ही आतां इथें नका राहूं कदा । आत्मज्ञानबोधा न संडावें ॥**

बाईस अशा रीतीनें तुकारामबुवांचें दर्शन होऊन, तुम्ही आतां येथें राहूं नका, अशी आज्ञा झाल्याचें वर्तमान लोकांत प्रगट होतांच बाईंच्या दर्शनास लोकांच्या झुंडींच्या झुंडी लोटूं लागल्या. परंतु आपल्या घरीं लोक जमलेले पाहून बाईच्या भ्रताराचें मस्तक अगदीं भणाणून गेलें व बाईबद्दल त्याचा तिरस्कार विकोपास गेला:--

**म्हणे ही बाईल मरे तरी बरें । ईस कां पामरें भेटताती ॥**
**काय आतां घुमें येईल अंगासी । देव इचें पोसी पोट कैसें ॥**
**बहेणी म्हणे ऐसी भ्रताराची चिंता । जाणोनी अनंता कळों आलें ॥**

बाईच्या भ्रताराचें म्हणणें असें कीं, आम्ही वेदपठण करणारे ब्राह्मण; आणि तुकाराम हा तर शूद्र. त्यानें माझ्या बायकोस स्वप्नांत दर्शन दिलें त्यामुळें ती बिघडली ! आतां मी काय करूं ?

**कैंचा जयराम कैंचा पांडुरंग । माझा झाला भंग आश्रमाचा ॥**
**आम्ही काय जाणों नाम हरिकथा । भक्ति हे तत्वता नसे स्वप्नीं ॥**
**कैंचे संतसाधु कैंची भावभक्ति । भिक्षुकाचे पंक्ती वसों सदा ॥**

अशा रीतीनें भलताच युक्तिवाद करून, बाईच्या भ्रतारानें बाईचा त्याग करून वनांत जाण्याचें ठरविलें. " लोक हिला नमस्कार करणार, आणि ही मला तृणाप्रमाणें लेखणार ! लोक येऊन हिच्याबरोबर कथानुवाद करीत बसणार आणि ही आम्हाला नीच मानणार ! हिची विचारपूस करीत लोक आमच्या घरीं जमतात आणि आम्ही ब्राह्मण असून आम्हांस कोणी ढुंकूनसुद्धां विचारीत नाहीं ! गोसावीणबाई या प्रतिष्ठित नांवानें लोक हिला संबोधितात आणि आमचे कोणी नांवही घेत नाहीं ! " या वस्तुस्थितीबद्दल बाईंच्या भ्रतारास इतकें वाईट वाटलें कीं, वनांत जाण्याचा आपला निश्चय त्यानें कायम केला. मग सासूसासऱ्यास नमस्कार करून तो म्हणाला, " माझी पत्नी तीन महिन्यांची गरोदर आहे. हिला देवपिसें असल्यामुळें हिची चांगली

काळजी ध्या व हिचें हें वेड घालविण्याचा प्रयत्न करा. मजविषयीं म्हणाल, तर अतःपर हिचें मुखावलोकनही करण्याची माझी इच्छा नाहीं.

न पाहें मी मुख सर्वथा इयेचें । हीनत्व आमुचें कोण फेडी ॥
भंडिमा सोसून कोण राहे येथें । ऐसिया स्त्रियेतें कोण पाळी ॥

भ्रताराचें हें अप्रिय भाषण ऐकून बहिणाबाईस मोठा विचार पडला. पण त्यासंबंधाची हकीकत बाईच्याच शब्दांत ऐकणें विशेष मनोरंजक असल्यामुळें तो संपूर्ण अभंग येथें देतों:—

काय स्यां अदृष्टा करावें आपण । आलें जें ठाकून सोसिजे तें ॥
नाहीं येत वारें अंगासी माझिया । घुमारीन काया नव्हे माझी ॥
स्वधर्म आपुला रक्षुनियां मनें । शास्त्राच्या श्रवणें देव साधूं ॥
भ्रताराची सेवा तोचि आम्हा देव । भ्रतार स्वयमेव परब्रह्म ॥
तीर्थ भ्रताराचें सर्व तीर्थ जाण । तया तीर्थाविण निरर्थक ॥
भ्रतार-वचनासी उल्लंघन जरी । पापें माझ्या शिरीं पृथिवीचीं
धर्म-अर्थ-काम-मोक्षासी अधिकार । भ्रतार साचार वेद बोले ॥
हा माझा निश्चय मनांतील हेत । भ्रतारेंसी चित्त लाविलेंसे ॥
भ्रतारसेवेनें सांग हा परमार्थ । भ्रतारेंच स्वार्थ सर्व आहे ॥
भ्रतारावांचुनी अन्य देव जरी । येईल अंतरीं ब्रह्महत्या ॥
सद्गुरु भ्रतार साधन भ्रतार । हा सत्य निर्धार अंतरींचा॥
बहेणि म्हणे देवा भ्रताराचे मनीं । तुवां प्रवेशोनी स्थिर केलें ॥

२

भ्रतार गेलिया वैराग्य घेउनी । पांडुरंगा जनीं जिणें काय ॥
प्राणेंवीण देह काय पावे शोभा । रात्रीवीण प्रभा चंद्राचिया ॥
भ्रतार तो जीव देह मी आपण । भ्रतार कल्याण सर्व माझें ॥
भ्रतार जीवन मी मत्स्य तयांत । कैसेनि वांचत जीव माझा ॥
भ्रतार तो रवी मी प्रभा तयाची । वियोग हा त्यासी केविं घडे ॥
बहेणि म्हणे माझ्या जीवाचा निर्धार । बोले पैं विचार हरि जाणे ॥

३

भ्रतारें वैराग्य घेतलीयावरी । जीव हा निर्धारीं देईन मी ॥
वत्सासाठीं देह अचेतन पडे । हा तंव रोकडें परब्रह्म ॥

भ्रताराचें तीर्थ न सांपडे जरी । पापें माझ्या शिरीं त्रैलोक्याचीं ॥
चित्त हें भ्रताराविण जरी जाय । तरी केविं राहे प्राण माझा
भ्रतारदर्शनावीण जाय दीस । तरी तेचि राशी पातकाच्या ॥
बहेणि म्हणे मज आज्ञाचि प्रमाण । ब्रह्म सनातन स्वामी माझा ॥

४

पाषाण विठ्ठल स्वप्नांतील तुका । प्रत्यक्ष कां सुखा अंतरावें ॥
घेईन उदंड सेवासुख हेंही । साक्ष या विदेही आहे मज ॥
भ्रताराची सेवा पतिव्रता करी । तरी ते उद्धरी उभय कुळें ॥

प्रिय वाचक हो, परमार्थमार्गांत जिची पुष्कळच प्रगति झाली होती व परमार्थदृष्ट्या जिचा दर्जा तिच्या भ्रताराहून फार मोठा होता, अशा एका हिंदु स्त्रीचे हे पतिविषयक विचार वाचून तुम्ही 'रोमांचव्याप्तकाय' झालां असाल, नाहीं ? जगांतील इतर स्त्रिया आणि अस्सल हिंदु स्त्रिया यांच्या चारित्र्यांत जें मोठें अंतर आहे तें हेंच होय. नवऱ्यानें लहानपणापासून इतका छल केला, ताडन केलें, कटु शब्दांची लाखोली वाहिली व शेवटीं, मुखावलोकन न करण्याच्या निश्चयानें तो अरण्यांत जाण्यास निघाला, तरी साध्वी बहिणाबाईनें त्याजविषयीं एक तरी तिरस्कारव्यंजक शब्द उच्चारला काय ? असो.

बहिणाबाईच्या पतीनें तिला टाकून जाण्याचा निश्चय केला खरा, पण तो सिद्धीस गेला नाहीं. बाई म्हणतात, "त्यांच्या शरीरास अकस्मात् कांहीं व्यथा जडली. एकसारखा सात दिवस त्यांच्या शरीराचा दाह होऊं लागला! ओळखीच्या माणसांचें भाषणदेखील ते ऐकून घेईनात. मी मात्र अहोरात्र त्यांजपाशीं सारखी बसून होत्यें. ते औषध घेईनात; एक महिनाभर त्यांनीं अन्नग्रहण केलें नाहीं. त्यांना भयंकर वेदना होत होत्या. पुष्कळ देवदेवतांना गाऱ्हाणीं केलीं, नवस केले, परंतु रोग बिलकुल हटेना. शेवटीं, त्यांस असें वाटूं लागलें कीं, आतां मरण येईल तर बरें. आपण पांडुरंगाची, तुकोबाची निंदा केली त्याचें हें प्रायश्चित्त आपणास भोगावें लागत असेल असाही विचार त्यांच्या मनांत आला, तेव्हां त्यांनीं प्रार्थना केली कीं—

**जरी तुकाराम निंदिला त्या गुणें । असेल दुखणें व्यथा मज ॥**
**तरी चमत्कार दाखवावा सद्या ॥ जिवीं विश्ववंद्या तुकारामा ॥**

बाई म्हणतात, " अशा रीतीनें माझ्या भ्रतारास पूर्ण पश्चात्ताप झाला. तो अंतर्साक्ष पांडुरंगास कळतांच, कोणी एक वृद्ध ब्राह्मण माझ्या पतीपाशीं येऊन त्यास म्हणाला, 'अरे, तुला मृत्यूची इच्छा कां झाली? तुझ्या मनाला इतका वैताग कशानें आला? आपल्या धर्मपत्नीचा त्याग करण्यास कां प्रवृत्त होतोस? अगोदर, हिनें अपराध काय केला आहे याचा विचार कर आणि मग रागाव. तुला जर वांचण्याची इच्छा असेल तर हिचा अंगीकार कर. ही जर स्वधर्म सोडून वागूं लागली तर मग तूं हिला खुशाल सोडून जा. परंतु "ही आहे विरक्त निश्चयें हरिभक्त, । तुवांही निश्चित करावेंसें." असें केलेंस तर तुझें कल्याण होईल, असेंही त्या ब्राह्मणानें सांगितलें. तेव्हां बाईंच्या भ्रतारानें त्याच्या चरणावर आपलें मस्तक ठेविलें व इत्थंभूत हकीकत त्यास निवेदन करून म्हटलें, "महाराज, मला आतां जीवदान द्या-

**ये व्यथेपासुनी वांचवीं स्वामिया । जीव तुझ्या पायां लावीन मी ।**
**स्त्रियेसी सर्वथा न बोलें आपण । हरीसी शरण जीवें भावें ॥**
**केला नमस्कार प्रत्यक्ष उठोन । होईल कल्याण म्हणे द्विज ॥**

बाई म्हणतात, "त्या दोघांचें हें भाषण मी ऐकत होत्यें. माझ्या भ्रतारास अनुताप झालेला पाहून मी त्यास लोटांगण घातलें. तो ब्राह्मणही तात्काळ अदृश्य झाला व त्याच घटकेस माझ्या भ्रताराची व्यथाही दूर झाली

**बहेणि म्हणे देव कृपा करी तरी । सर्व सिद्धी द्वारीं तिष्ठतील"**

एवढा अनुभव आल्यावर, बहिणाबाईच्या पतीनें तिजविषयींची आपली द्वेषबुद्धि सोडून दिली व तो तिच्याशीं चांगल्या रीतीनें वागूं लागला. मग त्यानें बहिणाबाईच्या आईबापांस सांगितलें कीं, देवानें ब्राह्मणवेषानें येऊन आमची भावी स्थिति आम्हांस अगोदरच सांगून ठेवली आहे. तरी तुम्ही आतां देवगांवास जाऊन रहा. आम्ही आमचें शेष आयुष्य आतां हरिभक्तींत घालविणार. यापुढें, पत्नीसह अरण्यवास करण्याचें मी ठरविलें आहे-

**" हो आतां कल्याण अथवा अकल्याण ।**
**आम्ही तों संपूर्ण भक्ति करूं ॥**

**तुकोबाचे गावीं जाउनीच राहों । मनींचा दृढावो धरूनियां ॥"**
**ऐसी पालटली भ्रतारांची बुद्धि । स्वामी कृपानिधि अंतरसाक्ष ॥**
**काय एक देव करील तें नव्हे । प्रत्यक्ष अनुभव सर्व जनां ॥**

नंतर ही सर्व मंडळी तुकोबांच्या दर्शनार्थ देहू गांवाकडे निघाली. मृत वत्साची आई कपिला गाय बरोबर होती. इंद्रायणीतीरीं आल्यावर सर्वांनीं स्नान करून श्रीपांडुरंगाचें दर्शन घेतलें. मंडळीच्या मनास मोठा आनंद झाला. देवळांत तुकोबा पांडुरंगास आरती करीत होते. त्यांस सर्वांनीं भक्तिपूर्वक वंदन केलें. बहिणाबाईनीं स्वप्नांत जशी तुकोबांची मूर्ति पाहिली होती, तशीच हुबेहूब ती त्यांस या वेळीं दिसली.

माध्यान्हकालीं क्षुधाशमनार्थ बहिणाबाईचा भ्रतार गांवांत भिक्षा मागण्यास गेला असतां, **कोंडाजी** नामक एका ब्रह्मणानें त्यास आपल्या घरीं जेवणाचें आमंत्रण दिलें. तेव्हां त्यानें त्यास सांगितलें कीं "आम्ही एकंदर पांच माणसें आहोंत; इतक्या माणसांची सोय तुमच्या येथें कशी होणार ?" तेव्हां कोंडाजी म्हणाला, "तुम्ही सर्वच मंडळी इकडे या. ईश्वरकृपेनें सर्व यथास्थित होईल. वस्तीस एखादी जागा पाहून तेथें रहा व माध्यान्हकालीं भोजनास इकडे या." त्या वेळीं देहू येथें **मंबाजी** गोसावी रहात असे. त्याचें घर चांगलें प्रशस्त पाहून बहिणाबाईच्या पतीनें त्याजपाशीं राहण्यास जागा मागितली. तेव्हां मंबाजीस मोठा क्रोध येऊन तो त्याला मारावयास उठला, इतकेंच नव्हे तर त्यानें त्यास घराबाहेर हांकून लाविलें! नंतर ही मंडळी एका ओवरींत राहिली. दुपारीं सर्व माणसें कोंडाजीच्या घरीं जेवावयास गेलीं. जेवण झाल्यावर कोंडाजीनें विचारलें, "तुम्ही कोठून आलां व कोठें जाणार ?" तेव्हां मंडळीनें आपला पूर्ववृत्तांत त्यास सांगितला. तो ऐकून कोंडाजी म्हणाला,

**"सोमवारीं आहे अमावास्या पुढें । रहा भक्तिकोडें सुख घ्यावें ॥**
**नित्य हरिकथा होतसे देऊळीं । तुकोबा माउली वैष्णवांची ॥**
**रहा येथें तुम्हा भक्षावया धान्य । देऊं हेंही पुण्य तुम्हा घडे ॥**

आणि या त्याच्या आग्रहास मान देऊन व तुकोबांच्या कीर्तनाचा लाभ घ्यावा या उद्देशानें मंडळीनें देहू येथें मुक्काम केला. बहिणाबाई म्हणतात–

**देवळांत कथा सर्वकाळ होत । श्रवण करीत दिनरात्रीं ॥ १ ॥**
**तुकोबांची कथा वेदांतील अर्थ । पावे माझें चित्त समाधान ॥ २ ॥**
**तुकोबाचें ध्यान पूर्वीं कोल्हापुरीं । जें स्वप्नामाझारी देखीयेलें ॥ ३ ॥**
**तेंचि ध्यान डोळां प्रत्यक्ष देखोनी । आनंद लोचनीं हेलावत ॥ ४ ॥**
**दिनरात्रीं निद्रा नये तिळभरी । तुकोबा अंतरीं प्रवेशला ॥ ५ ॥**
**बहेणि म्हणे येती सुखाचे डोलावे । जाणती अनुभवें जाणते जे ॥ ६ ॥**

तुकारामबुवांसारख्या, " घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिति सांडईन " अशी प्रतिज्ञा करणाऱ्या महावैष्णवाचें कीर्तन आणि बहिणाबाईसारखी श्रोते मंडळी, मग त्या कीर्तनरंगाचें काय वर्णन करावें? असो. ही मंडळी देहू येथें असतां, एके दिवशीं मंबाजी गोसावी बहिणाबाईच्या भ्रतारास म्हणाला, "अहो, तुम्ही व तुमची पत्नी दोघेंही विरक्त आणि हरिभक्त दिसतां. तरी माझें शिष्यत्व तुम्ही कां पतकरीत नाहीं ?" ही गोष्ट मंबाजीनें पुन: पुन: दोन चार वेळां काढली, तेव्हां बाईच्या पतीनें त्यास स्पष्ट सांगितलें कीं "आम्ही दुसऱ्या गुरूचा उपदेश पूर्वींच घेतला आहे." परंतु मंबाजीस तें खरें वाटेना म्हणून बहिणाबाईच्या भ्रतारानें, कोल्हापूर येथें घडलेला सर्व वृत्तांत त्यास निवेदन केला. तो ऐकतांच तुकारामद्वेष्ट्या मंबाजीच्या अंगाचा रागानें अगदीं तिळपापड झाला. तो म्हणाला, "काय गप्पा मारतां ? स्वप्नांतल्या गुरूकडून कधीं कोणाचें समाधान झालें आहे ? जोंपर्यंत सद्गुरुसेवा घडली नाहीं व प्रत्यक्ष सद्गुरूनें मस्तकावर हात ठेविला नाहीं, तोंपर्यंत मनुष्य अनुग्रहशून्यच समजला पाहिजे. तुकाराम तर बोलून चालून शूद्र, त्याला ज्ञानप्राप्ति कशी होणार?—

**स्वप्नींचा अनुग्रह गुरु केला शूद्र । तोहि बळिभद्र ज्ञानहीन ॥**

तुम्ही या गुरुभक्तीच्या गप्पा मजपाशीं मारूं नका, तुम्हीं शूद्राचे शिष्य म्हणवितां ही गोष्ट ब्राह्मणांस कळवून तुम्हांस वाळीत टाकीन तरच मी नांवाचा मंबाजी !" येवढें नुसतें बोलूनच मंबाजी थांबला नाहीं, तर त्या मंडळीशीं त्यानें उघड उघड द्वेष मांडला ! एके दिवशीं बहिणाबाईस वाटेंत मंबाजी भेटला असतां त्या त्याला नमस्कार करावयास गेल्या, तोंच तो दूर

होऊन बाईस म्हणाला, " तुमची जात कोणती आहे कोण जाणें! तुम्ही सोनार आहांत कीं गोळक आहांत? तुमच्या ठायीं ब्राह्मणाची क्रिया कांहींच दिसत नाहीं; म्हणून आम्ही तर तुम्हांला शूद्र समजतों. तुम्ही जर कोणाचे घरीं जेवावयास जाऊन भ्रष्टाकार कराल तर तुम्हाला मी दिवाणांत खेंचल्याशिवाय राहणार नाहीं. " मंबाजीनें दिलेली ही धमकी बहिणाबाईनीं आपल्या भ्रताराास व **महादाजी** कुळकर्णी आणि कोंडाजीपंत यांस कळविली. तेव्हां त्यांनीं त्यांस आपल्या घरीं नेऊन म्हटलें, " मंबाजीस ह्या उठाठेवी करण्याचें वस्तुतः कांहीं कारण नाहीं. "

**परंतु तो द्वेष चालवी अत्यंत । मारूं पाहे घात चिंतुनियां ।**
**म्हणे " हे ब्राह्मण गुरु तरी शूद्र" । हेंचि तया छिद्र सांपडलें ॥**
**द्वेषही वाढला अत्यंत अद्भुत । सर्वांही लोकांत कळों आलें ॥**
**बहेणि म्हणे देव छळे नानापरी । निश्चय निर्धारीं पाहतसे ॥**

परंतु मंबाजीची द्वेषबुद्धि वाढतच चालली. बाई म्हणतातः—

**आपाजी** गोसावी या नांवाचे एक विख्यात राजयोगी पुण्यांत राहात असत. त्यांस मंबाजीनें पत्र लिहिले कीं, "तुकोबा गोसावी हा जातीने शूद्र असून, देवळांत नेहमीं कथा करतो व ब्राह्मण त्याच्या पायावर डोकें ठेवतात! **रामेश्वरभट्ट** हे थोर विद्वान् ब्राम्हणदेखील त्याला नमस्कार करतात. आम्हांस हा मोठा अधर्म वाटतो; कारण हा प्रकार अगदीं वेदबाह्य आहे. ह्या अधार्मिक तुकोबास शासन करण्यास आपण समर्थ आहांत; तरी त्याला आपण पुण्यास बांधून न्यावें. शिवाय आणखी एक गोष्ट येथें नमूद करण्यासारखी आहे ती ही कीं, एक नवीन जोडपें येथें आलें असून, त्यानें तुकारामाचें शिष्यत्व पतकरलें आहे. हीं नवरा बायको स्वतःस ब्राम्हण म्हणवितात, परंतु वस्तुतः तीं सोनार आहेत. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, गांवचे कुळकर्णी ह्या जोडप्यास मोठा मान देतात! तेव्हां आतां ह्या अधर्मास काय म्हणावें? हा जो स्वधर्माचा उघड उघड उपमर्द होत आहे, त्याला आपण कांहीं तरी आळा घालाल ह्या आशेनें हें पत्र लिहीत आहें. ह्या धर्मभ्रष्ट लोकांस जर योग्य शासन केलें नाहीं तर उद्यां राज्यदखील बुडेल!" मंबाजीचें हें पत्र वाचून आपाजी गोसावी यांच्या अंगाची

अगदीं लाही लाही झाली. ते आपल्याशींच म्हणाले, "तुकाराम शूद्र असून लोकांचे नमस्कार ग्रहण करतो ? कोण हा अधर्म !

**सोनाराची जात म्हणविती ब्राह्मण । तयांचें दर्शन घेऊं नये ॥**
**शूद्राचा अनुग्रह घेताती ब्राह्मण । अष्टाकार पूर्ण होत असे ॥**

अशा या पापी लोकांस शिक्षा केलीच पाहिजे." मग त्यांनीं मंबाजीस उत्तर पाठवून कळविलें कीं, "तुम्ही लिहिलेला मजकूर समजला. यथाकालीं जें काय करावयाचें तें करूं."

इकडे मंबाजीनें बहिणाबाई व त्यांचा भ्रतार ह्यांच्या मागें सारखें टुमणें लावलें कीं, तुम्ही येथून गेलेंच पाहिजे. त्यामुळें त्या उभयतांस मोठी काळजी लागली. बाई म्हणतातः—

**कोणाचें न घेतां न बोलतां कांहीं । नसोनी अन्यायी द्वेष कां हा ॥**
**देवासी आठवीं चिंतुनी मानसीं । साक्ष तूंचि यासी पांडुरंगा ॥**
**माझे अंतरींचें जाणतोसी तूंचि । चित्तांत द्वेषासी थार नाहीं ॥**
**हें विघ्न आणिलें यासीं तूं निवारीं । तुकारामा शिरीं आहेसी तूं ॥**
**बहेणी म्हणे देवा संचितासारखीं । नाना सुखदुःखें प्राप्त होती ॥**

बहिणाबाईनीं कोल्हापूरची आपली गाय बरोबर आणली होती, ती दूध देत असे. ह्या गाईस मंबाजीनें आपल्या घरांत नेऊन बांधून ठेवलें; आणि तिला तो सोटयांनीं बडवूं लागला ! गाईचें दर्शन होईना म्हणून बहिणाबाईंस फार वाईट वाटलें व त्यामुळें तुकोबाही फार कष्टी झाले. मंबाजीनें तीन दिवस गाय बांधून ठेवली होती. तेवढ्या वेळांत तिला गवत, पाणी वगैरे कांहीं न मिळाल्यामुळें ती एकसारखी ओरडत होती. तिसऱ्या दिवशीं सकाळीं तुकोबा जागृत झाले तेव्हां त्यांची पाठ सुजली आहे असें दिसून आलें. सोटयांच्या आघातांचे वळही त्यांच्या पाठीवर स्पष्ट दिसत होते. मंबाजीकडून गाईस मिळत असलेला मार तुकोबांस लागत होता. गाईच्या मुक्ततेविषयीं तुकोबांनीं पांडुरंगाची फार विनवणी केली. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, मंबाजीच्या घरास अकस्मात् आग लागली. चोहोंकडून लोक धांवले व आग विझविली. गाय सारखी हंबरडे फोडीत होती. तीन दिवस

ज्या गाईचा शोध लागत नव्हता, ती मंबाजीनें आपल्या घरांत बांधून ठेवलेली पाहून लोकांस मोठा संताप आला. त्यांनीं गाय सोडून बाहेर आणली तेव्हां तिच्या पाठीवर माराचे वण स्पष्ट दिसत होते. लोकांनीं बहिणाबाईंच्या भ्रतारास बोलावून आणलें आणि, ही आपली गाय सांभाळ, म्हणून सांगितलें. आणि तुकोबांनीं काय केलें ? बाई सांगतात—

**तुकोबा धाऊनी करी प्रदक्षणा । नमस्कारी ' गुण धन्य तुझे ॥**
**दाखविलें स्वप्न मज माये तुवां । न कळेची धांवा केला मग ॥**
**तुझा माझा आत्मा एक सर्वगत । ते साक्षी निश्चित आली मज ' ॥**

तुकोबांचे हे कळवळ्याचे उद्गार ऐकून बहिणाबाईस फार दुःख झालें. त्या म्हणतात—

**मजही तैसेच क्लेश झाले फार । साक्ष हें अंतर विठ्ठलाचें ॥**

दुष्ट मंबाजीनें गाईच्या पाठीवर ओढलेल्या रट्यांचे वण तुकोबांच्या पाठीवर उमटलेले सर्वांनीं स्पष्ट पाहिले. पुढें ही हकीकत, रामेश्वरभट्टांस समजतांच ते धावून आले व त्यांनीं तुकोबाचें दर्शन घेतलें, व गाईच्या आणि तुकोबांच्या दोघांच्याही पाठीवर वण उठलेले पाहून त्या सहृदय ब्राह्मणास रडें कोसळलें. तें पाहून सर्वच मंडळी स्फुंदस्फुंदून रडूं लागली. बाई म्हणतात—

**तुकोबाचा पार वर्णिलसा कोण । कलियुगीं जाण प्रल्हाद हा ॥**
**सर्वांतरसाक्षी करुनियां स्तुति । स्वसुखें रमती आपुलिया ॥**
**बहेणि म्हणे लोक बोलती सकळ । तुकोबा केवळ पांडुरंग ॥**

पुढें बहिणाबाई आपल्या भ्रतारासह देहू येथेंच महादाजीपंत कुळकर्णी यांचे घरीं राहिल्या. कांहीं दिवसांनीं बाईंस एक मुलगी झाली, तिचें नांव काशीबाई ठेविलें. बहिणाबाईस तर असें वाटलें कीं, कोल्हापुरास मरण पावलेलें वांसरूंच या मुलीच्या रूपानें आपल्या पोटीं आलें आहे !

येथवर बहिणाबाईंच्या चरित्राचा जो भाग येऊन गेला त्यावरून आपणास काय बोध होतो व कोणकोणते निष्कर्ष काढतां येतात हें थोडक्यांत पाहूं. बाईंची परमार्थप्रवण वृत्ति बाळपणापासूनच होती. त्यांचा भ्रतार

इतर कर्मठ भिक्षुकांप्रमाणेंच जरी जमदग्नीचा आवतार होता तरी, कालांतरानें, बाईंच्या सात्विक साहचर्यामुळें त्याचीही वृत्ति पालटली व तुकोबांसारख्या, बाह्यतः शूद्रवर्णीय सत्पुरुषाचा उपदेश घेण्यास, तो शेवटीं, सपत्निक तयार झाला. कोल्हापूर येथील हकीकतींत ज्या जयराम गोसाव्याचा अनेकवार उल्लेख आला आहे, ते रामदासपंचायतनांतले प्रसिद्ध साधु **जयराम गोसावी वडगांवकर** होत. अशा वरिष्ठ वर्णीय सत्पुरुषाचा, किंवा रामदास, आनंदमूर्ति, केशवस्वामी, रंगनाथ वगैरे तत्कालीन इतर ब्राह्मण संताचा उपदेश न घेतां तुकोबांचा अनुग्रह घेण्याकडे बाईंची प्रवृत्ति झाली ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. गाई व वांसरूं यांची कथा, बहिणाबाईचा छल केल्यामुळें तिच्या भ्रतारास जडलेली व्यथा व एका ब्राह्मणाच्या उपदेशामुळें त्यास पश्चात्ताप होतांच, प्राप्त झालेलें आरोग्य; बहिणाबाईस स्वप्नांत तुकोबांनीं दिलेलें दर्शन; मंबाजीनें गाईचा छळ केल्यामुळें त्याच्या घरास लागलेली आग; गाईस मिळालेल्या माराचे तुकोबांच्या पाठीवर उठलेले वण, इत्यादि अलौकिक चमत्कारांच्या गोष्टी स्वतः बाईनींच सांगितलेल्या असल्यामुळें त्या सत्य मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. मंबाजीच्या दुष्टपणाविषयीं जर कोणास कांहीं शंका असेल तर, वरील वृत्तांत वाचल्यावर, ती दूर झाल्याशिवाय राहणार नाहीं. मंबाजीसारखे ग्रामकंटक जगाच्या आरंभापासून अस्तित्वांत आहेत व त्यांची परंपरा हा कालपावेतों अव्याहत चालू आहे. सत्पुरुषांचा छल करून त्यांस कसोटीस लावण्यासाठींच असले हे 'निकष पाषाण' यदृच्छेनेंच निर्माण होत असले पाहिजेत यांत संशय नाहीं. गाईच्या प्रकरणांत तुकोबांचें जें वर्णन बाईनीं दिलें आहे, तेवढ्यावरूनच, त्या संतशिरोमणीच्या साधुचरितावर किती तरी प्रकाश पडतो. "भूतांची दया हें भांडवल संतां। आपुल्या ममता नाहीं देहीं" आणि "अवघीं भूतें साम्या आलीं। देखिलीं म्यां कै होतीं॥" ह्या त्यांच्याच उद्गारांची यथार्थता त्यांच्या ठायीं कशी उत्कटत्वानें प्रतिबिंबित झाली होती हें गाईस अनुलक्षून काढलेल्या, तुझा माझा एक आत्मा सर्वगत। ते साक्षी निश्चित आली मज॥ ह्या त्यांच्या उद्गारांवरून स्पष्ट दिसत आहे. असो. बहिणाबाईचें हें चरित्र जितकें अलौकिक आहे त्याहून, त्यांनीं दिलेली आपल्या पूर्वजन्मांची हकीकत, फारच अलौकिक आहे. आजपर्यंत जगांतल्या

दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीनें आपल्या पूर्वजन्माची अशी विस्तृत हकीकत देऊन ठेवलेली माझ्या तरी निदान अवलोकनांत नाहीं. प्रो. शिवराम महादेव परांजपे एम्. ए. यांनीं, बहिणाबाईंनीं दिलेल्या या माहितीच्या आधारानें, 'चित्रमय जगत्' मासिकाच्या सन १९१४ च्या मे महिन्याच्या अंकांत 'पूर्वजन्म आणि पुनर्जन्म' या मथळ्याखालीं एक सुंदर लेख लिहिला आहे.

बहिणाबाईंच्या वयाला ७२ वर्षें लोटल्यावर आतां आपला अंतकाळ समीप आला आहे, असें जाणून, त्यांनीं आपल्या पुत्राला, तो ज्या गांवीं होता तेथून, आपल्याजवळ बोलावून आणलें व आजपासून पांच दिवसांनीं म्हणजे आश्विन शुद्ध १ चे दिवशीं आपण देह ठेवणार असें त्यास सांगितलें. ही आपल्या निर्याणाची हकीकत बहिणाबाईंनीं ३५ अभंगांत सांगितली आहे. त्यांतील पहिला अभंग महत्त्वाचा आहे तो असा—

**रुक्मिणीसी केली आम्ही बोळवण। आम्हासी प्रयाण त्याचि मार्गें॥१॥**
**पाठवावें पत्र गोदेसी सत्वर। पडेल अंतर पुत्रपणा॥**
**टाकोनी सकळ कामधाम धंदा। मरणमर्यादा वाट पाहे॥**
**म्हणोनियां पत्र लिहिलें तांतडी। मरणाची गुढी उभी पुढें॥**
**तेराविया दिवशीं ब्राह्मणभोजन। करोनी निघणें अतित्वरें॥**
**पडेल आक्षेप वाटेसी खोळंबा। टाकोनी विठोबा त्वरें येई॥**
**पांच दिवस पुढें देहांतसमय। रोधोनियां वायु वाट पाहें॥ २॥**

**आश्विनाची शुद्ध जाण प्रतिपदा। मरणमर्यादा सांगितली॥**
**बहेणि म्हणे पुत्रपणाचें उत्तीर्ण। होशील म्हणोन त्वरा करीं॥**

या अभंगाचा भावार्थ असा दिसतो कीं, बहिणाबाईंच्या विठोबा नामक पुत्राची रुक्मिणी नामक स्त्री नुकतीच वारली होती व इकडे बहिणाबाईही "वायचें निरोधन" करून आपल्या मृत्यूकालाची वाट पहात होत्या. त्या

वेळीं, आपला पुत्र आपल्यापाशीं असावा म्हणून बाईनीं त्यास पत्र पाठवून मुद्दाम बोलावून आणलें. रुक्मिणीबाईचें तेरावें होतांच तूं ताबडतोब इकडे निघून ये असें विठोबास बाईनीं लिहिलें.

बाईचा मुलगा विठोबा हा शुक्लेश्वर येथें होता, त्यास वरील पत्र मिळतांच, आईच्या समाधीसाठीं तिला गोदातीरीं आणावें या उद्देशानें तो, बाई शिवपुर गांवीं होत्या तेथें आला. तेव्हां,

**ऐकोनियां पत्र आलासी तांतडी । बोलोनियां उडी पुत्रराया ॥ १ ॥**
**तेरावा दिवस केला रुक्मिणीचा । सद्गदित वाचा कंठ दाटे ॥ २ ॥**
**झालासी उत्तीर्ण तूंचि रे सर्वांचा । मनें काया वाचा सर्व भावें ॥ ३ ॥**
**देखोनियां तुज संतोष वाटला । प्रेमानें दाटला कंठ माझा ॥ ४ ॥**

इत्यादि शब्दांनीं बाईनीं त्याचा गौरव केला. त्यानेंही, आईच्या भावी मृत्यूचा देखावा आपण स्वप्नांत कसा पाहिला वगैरे वृत्तांत तिला सांगितला व म्हटलें, "ज्या रात्रीं मला हें स्वप्न पडलें त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळींच तुझें पत्र मला मिळालें. गोदातीरीं शुक्लेश्वर हें स्थळ तुझ्या समाधीसाठीं आम्ही पसंत केलें आहे. तरी तुझी मर्जी असेल तसें करूं." यावर बहिणाबाई म्हणाल्या, "तुम्ही योजिलेलें स्थळ मलाही पसंत आहे. परंतु तेथवर जाण्यास आतां अवकाश उरला नाहीं. आश्विन शुद्ध प्रतिपदेदिवशीं मी हा देह टाकणार, आणि आज तर भाद्रपद वद्य १२ आहे. आतां फक्त तीनच दिवसांचा अवधि राहिला. शिवाय, हें शिवपुरदेखील मोठें तीर्थच आहे. रावणानें येथेंच अनुष्ठान करून शंकरास प्रसन्न करून घेतलें. येथें झालेल्या यज्ञाचे वेळीं, अवभृथस्नानार्थ जमलेल्या अठ्यांयशीं सहस्र ऋषींनीं या 'प्रणिता' तीर्थास वर दिलेला असून, ह्याच पवित्र तीर्थस्थानीं समाधि घेण्याचें मी ठरविलें आहे." पुढें बाई म्हणाल्या:—

तीर्थें देव यात्रा वर्ततां स्वधर्म । तुझे माझ जन्म गेले बारा ॥ १ ॥
तेरावा हा जन्म पुत्रपणें झाला । नाहीं तुझी तुला आठवण ॥ २ ॥
तेरा जन्म तुझा माझा असे संग । अद्वय अभंग एकनिष्ठ ॥ ३ ॥
पतिव्रता धर्म आमुचा सांगाती ! बोलतां ती गति ग्रंथ वाढे ॥ ४ ॥
ज्ञानेश्वरी पूर्ण पहावी ते झाली । आतां हे उरली दशा थोडी ॥ ५ ॥
संभवतां तुज मज झाली कृपा । ओळखी ते बापा सांगितली ॥ ६ ॥
बहेणि म्हणे आतां नाहीं जन्म घेणें । उठलें धरणें वासनेचें ॥ ७ ॥

गोदा भागीरथी यमुना सरस्वती । तापी भोगावती सर्व तीर्थें ॥ १ ॥
येती प्रणितेसी माझ्या अंतकाळीं । निश्चळ अंतरीं राहें पुत्रा ॥ २ ॥
कृष्णा तुंगभद्रा भीमा फल्गु रेवा । पुष्कर हे सर्वा पृथिवीचीं ॥ ३ ॥
दैवतेंही सर्व येती तये वेळे । मृत्यु हा अनुभवे तुज तेव्हां ॥ ४ ॥
ऋषिगण सर्व पांडुरंग उभा । जेव्हां मृत्युसभा येईल ते ॥ ५ ॥
बहेणि म्हणे तुज वाटेल असत्य । सांगेन तें तथ्य ऐक आतां ॥ ६ ॥

आत्मज्ञानाऐसें तीर्थ कोण दुजें । ज्ञानिया उमजे पूर्वपुण्य ॥ १ ॥
जेथें हें मानस केलें असे शुद्ध । तीर्थ हें प्रसिद्ध वेदशास्त्रीं ॥ २ ॥
तयाच्या मज्जनें जन्म गेले बारा । शुद्ध ते अंतरा करावया ॥ ३ ॥
तेरावा हा जन्म लाधलें साधन । तया तीर्थीं स्नान जन्म नाहीं ॥ ४ ॥
केले वो प्रयास साधनाचे कष्ट । होतें योगभ्रष्ट म्हणोनियां ॥ ५ ॥
वासना मळीण शुद्ध झाली येथ । ज्ञानियासी तीर्थ तेंचि खरें ॥ ६ ॥
वृत्ती शून्य होय मानस तें सरती । तीर्थ सर्वांहुनी श्रेष्ठ तेंचि ॥ ७ ॥
विचारूनि बरें पाहें तू अंतरीं । बाह्य तीर्थांतरीं हेत नाहीं ॥ ८ ॥
बहेणि म्हणे वृत्ति झालिया निमग्न । तीर्थाची ते संज्ञा तेचि खरी ॥ ९ ॥

अंतकाळवेळीं होईल निरभ्र । दिशा होतो शुभ्र पाहें कां रे ॥१॥
घेईं याची साक्ष आपुले अंतरीं । राहून निर्धारीं आपुलिया ॥२॥
येऊं तें निघालें तीर्थासी विमान । हेलावे हे जाण तीन येती ॥३॥
दग्ध झालियानें अस्तंगत देहे । पुत्रा तूंचि पाहें मनामाजी ॥४॥
बहेणि म्हणे तुम्ही धरुनी विश्वास । पहा साक्ष यास तुकाराम॥५॥

हे सगळे उद्गार, मरणोन्मुख झालेल्या एका थेरडीची, वायूच्या लहरींतली बडबड म्हणून जर दुर्लक्षित करावयाचे नसतील, तर ह्या उद्गारांवरून अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा खुलासा होण्यासारखा आहे. विशेषत, "पूर्वजन्म आणि पुनर्जन्म" या विषयावर, जुन्या काळापासून जो मोठा वाद माजून राहिला आहे, त्याचा निकाल, बहिणाबाईंनीं स्वतःच्या तेरा पूर्वजन्मांचा जो खुलासेवार उल्लेख केला आहे, त्यावरून, लावतां येण्यास कांहीं हरकत आहे असें मला वाटत नाहीं; व या दृष्टीनें, प्रो. शिवरामपंत परांजपे यांचा पूर्वोल्लेखित लेख अवश्य वाचण्यासारखा आहे.

"हल्लीं जो तुझा तेरावा जन्म चालू आहे त्या पूर्वींचे बारा जन्म कोणते ?" असा पुत्रानें प्रश्न केल्यावरुन बहिणाबाईनीं पूर्वीच्या आपल्या बारा जन्मांची हकीकत बऱ्याच विस्तृत रीतीनें वर्णिली आहे. प्रो. परांजपे ह्मणतातः- आपल्या संस्कृत आणि मराठी वाङ्मयांतून, जुन्या भारतभागवतादिकांसारख्या इतिहास पुराणांतून आणि नव्या भक्तिरसाच्या भाविक ग्रंथांतून पूर्वीच्या जन्मांचीं आणि पुनर्जन्मांचीं वर्णनें प्रसंगवशात् पुष्कळ आलेलीं आहेत, परंतु बहिणाबाईनीं दिलेल्या वर्णनाइतकीं तीं सविस्तर नाहींत. शिवाय बहिणाबाईचे पूर्वजन्म हे अगदीं अलीकडच्या काळांतील असल्यामुळें ते पौराणिक प्रदेशापेक्षां अधिक विश्वासार्ह आणि विचारार्ह वाटणें स्वाभाविक आहे." बाईच्या तेरा जन्मांचा तक्ता प्रो. परांजपे यांनीं आपल्या लेखांत दिला आहे. तोच मी येथें उतरून घेतोंः-

| जन्माचा अनुक्रम | गांव | जात | वय | पुरुष किंवा स्त्री | नांव | बाप | आई | पूर्वजन्मीं पुत्र कोण होता. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेटावद | वैश्य | १३ | स्त्री | वारुणी | केदार | रूपवंती | सेवक |
| २ | फल्गु-तीरीं कुमचक्र | ,, | २८ | ,, | | सात्त्वि-क | | गुरुपुत्र |
| ३ | गोदा तीरींब्र-ह्मगिरी | ,, | २४ | ,, | हेम-कळा | वर्ध-मान | भामिनी | भाऊ |
| ४ | | गवळी | | ,, | | | | |
| ५ | | | | ,, | | | | |
| ६ | | | | ,, | | | | |
| ७ | | | ६६ | ,, | | | | |
| ८ | वेरूळ | क्षेत्री | १८ | ,, | | धर्मदत्त | | |
| ९ | | ,, | ९ | ,, | | | 'तेचि' | |
| १० | | ब्राह्मण | ४२ | ,, | | कौशिक | | पहिला पुत्र |
| ११ | प्रवरा-संगम | ,, | ४३ | ,, | सौजि-न्या | गोकर्ण | सगुणा | गुरुबंधु-पुत्र |
| १२ | लाख-खणी | ,, | ३६ | ,, | | रामचंद्र | जानकी | |
| १३ | देव-गांव | ,, | ७२ | ,, | बहिणा-बाई | आऊ-देव | जानकी | पुत्र |
| | | | ३५१ | | | | | |

वरील कोष्टकांत ज्या सदराखालीं कांहीं माहिती दिलेली नाहीं, ती मूळ अभंगांतच दिलेली नाहीं असें समजावें. आतां, बहिणाबाईच्या ह्या तेरा जन्मांचा संक्षिप्त वृत्तांत येणेंप्रमाणें आहे. तापीतीरीं बेटाउद गांवीं केदार नामक एक शिवभक्त वैश्य होता. त्यास संतति नसल्यामुळें त्यानें शंकराचें अनुष्ठान केलें. शंकरानीं स्वप्नांत दृष्टांत देऊन त्यास सांगितलें कीं, तुझ्या

नशिबीं पुत्रसंतति नाहीं, परंतु एक सुंदर मुलगी तुला होईल. ह्या मुलीचें नांव 'वारुणी' असें ठेव. ही मुलगी फक्त तेरा वर्षें जीवंत राहील. केदार वैश्याची रूपवंती नामक स्त्री मोठी पतिव्रता होती. तिच्या उदरीं, यथाकालीं, महारुद्राच्या प्रसादानें बहिणाबाईंचा पहिला जन्म झाला. नांव 'वारुणी' ठेविलें. बाई म्हणतात:—

**पूर्वील संस्कार होता कांहीं शुद्ध । जन्मतां प्रसिद्ध कळों आला ॥**
**जन्मलिया मज वर्षांचिया कोडी । पाहतांचि दृष्टी वदन माझें ॥**
**आणिला सद्गुरु केदारें आपुला । तयातें दाविला भाव माझा ॥**
**नाहीं लग्न करूं दिधलें आपण । माझा सहज गुण ओळखला ॥**
**दिधली ते दीक्षा शंकराचा मंत्र । जपें अहोरात्र खेळतांही ॥**
**खेळतां देऊळ शंकराची मूर्ति । करीतसें भक्ति प्रेमरसें ॥**

शंकराच्या भक्तीशिवाय वारुणीस दुसरें कांहींच प्रिय नव्हतें. अशा रीतीनें तेरा वर्षें लोटल्यावर, तेराव्या वर्षी, बहिणाबाईचा मुलगा विठोबा याची व त्यांची ओळख झाली. बाईंच्या पहिल्या जन्मांत हा विठोबा, केदार वैश्याच्या गुरूपाशीं नोकर होता ! पुढें थोड्याच दिवसांनीं वारुणी मरण पावली.

बाईंचा दुसरा जन्म, फल्गुनदीतीरीं कुमचक्र नामक गांवीं, सात्विक नामक वैश्याच्या पोटीं झाला. हा वैश्यही मोठा शिवभक्त आणि 'विरक्त आत्मवेत्ता' होता. त्याचा गुरु 'सुवर्णा' नामक ब्राह्मण होता. तो आगमाचा ज्ञाता असून, पूर्ण आत्मज्ञानी व मंत्रविद्याप्रवीण होता. त्या वेळीं, बाईंचा मुलगा विठोबा हा या सुवर्णा ब्राह्मणाचा शिष्य होता. सात्विक वैश्यास सात पुत्र होते, परंतु कन्या नव्हती. म्हणून, कन्याप्राप्तीसाठीं त्याच्या गुरुनें त्याला वैष्णवी मंत्रोपासनेचा अनुष्ठानविधि सांगितला. त्याप्रमाणें अनुष्ठान केल्यावर सात्विक वैश्यास स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, "तुला एक सुशील कन्या होईल व तिच्या हातून तुला द्रव्यप्राप्ति होईल. ही कन्या तुजपाशीं

२८ वर्षे अविवाहित स्थितींत राहून ईश्वरभक्ति करील." त्याप्रमाणें बाईंनीं त्या वैश्याच्या घरीं लवकरच जन्म घेतला व दृष्टांताप्रमाणें तेथेंअठ्ठावीस वर्षें राहून देहत्याग केला. तिसऱ्या जन्मीं, गोदावरीकांठीं ब्रह्मगिरी येथें, वर्धमान शेटी नामक एका धनवान् वैश्याच्या स्त्रीच्या उदरीं बाई जन्म पावल्या. त्या वैश्यस्त्रीचें नांव भामिनी होतें. तिला चार पुत्र असून विठोबा हा त्यांपैकीं एक होता. एका कालीं वर्धमान शेटी स्थानभ्रष्ट झाल्यामुळें, त्यानें पांचाळेश्वरीं जाऊन मोठें यज्ञानुष्ठान केलें. त्यानंतर, बाईंनीं त्याच्या स्त्रीच्या पोटीं जन्म घेतला. ह्या जन्मीं बाईचें नांव हेमकळा होतें. कन्या झाल्यामुळें वर्धमान शेटीस मोठा आनंद होऊन त्यानें पुष्कळ दानधर्म केला. पुढें हेमकळा वयांत आल्यावर शेटीनें तिच्या लग्नाचा विचार चालविला. तोंच, त्याची स्त्री भामिनी हीस असें स्वप्न पडलें कीं, 'मुलीचें लग्न करूं नये.' त्याप्रमाणें, तिच्या पित्यानें तिच्या लग्नाचा बेत रहित केला. हेमवतीनें आपलें पुढील आयुष्य 'रागकळा' नामक ब्राह्मणाच्या सेवेंत व हरिनामस्मरणांत घालविलें. त्या 'रागकळा' ब्राह्मणाच्या घरीं विठोबा होता; व हेमवती आपलें हितगुज त्याला सांगत असे. पुढें वयाच्या २८ व्या वर्षीं हेमवतीनें देह ठेविला. अशा रीतीनें, बाईचे पहिले तीन जन्म वैश्यांच्या घरीं झाले.

चौथा, पांचवा, सहावा आणि सातवा हे बाईंचे जन्म योगभ्रष्टावस्थेंत गेले. ही हकीकत ज्या अभंगांत बाईंनीं सांगितली आहे, तो थोडासा संदिग्ध असल्यामुळें, त्यावरून स्पष्ट अर्थबोध होत नाहीं. हा अभंग येणेंप्रमाणें:—

चौथा जन्म सांगों पांचवा सहावा । आणि तो सातवा योगभ्रष्ट ॥
गौळियाचे घरीं कन्याचि होऊनी । गाईसंरक्षणीं वर्ततसें ॥
नामसंकीर्तन काळाची क्रमणा । संगति ते जाणा वैष्णवांची ॥
आवडति देव तीर्थ क्षेत्र यात्रा । ब्राह्मणां सर्वत्रां पूजा करीं ॥
गाईचें रक्षण अरण्यांत वास । तंव झाला सहवास संन्याशाचा ॥
देखोनी तयासी करीं नमस्कार । जाणुनी संस्कार कृपा केली ॥

ही हकीकत चार, पांच व सहा या तीन जन्मांची असावी असें वाटतें. कारण, पुढें बाई म्हणतातः—

सातवे जन्मींचा सांगेन वृत्तांत। मागीलचा प्रांत सांडियेला ॥
गौळियाचे घरीं गाईचें रक्षण। करूनी कीर्तन देह पोशीं ॥
मग भेटले ते सिद्ध आत्मज्ञानी। तेंहीं ओळखोनी नेलें मज ॥
म्हणती योगभ्रष्ट आहे हे विरक्त। दास्यत्वें सारीत काळ बहु ॥
विरक्तीचें अंग ज्ञानाचा अभ्यास। करीं रात्रंदिवस एकनिष्ठें ॥
सासष्टी वरुषें सातविये जन्मीं। क्रमुनियां धर्मीं प्रवर्तलिये ॥
अभ्यास करुनि टाकिलें शरीर। तुज हा प्रकार सांगितला ॥
बहेणि म्हणे जन्म पुढें उरले साही। प्रसंगेंचि तेही सांगतसें ॥

यावरून बहिणाबाईंचे हे चारी जन्म गौळ्याचे घरीं गोपालनांतच गेले असें दिसतें. या चारही जन्मांत त्या अविवाहितच असाव्या असेंही वाटतें. त्यांची पारमार्थिक उन्नति मात्र एकसारखी चालू होती. आतां त्यांच्या आठव्या जन्माची कथा येणेंप्रमाणें:– वेरूळ क्षेत्रीं, धर्मदत्त क्षेत्री नामक एक 'शास्त्रज्ञ समर्थ ब्रह्मवेत्ता' होता. सर्व लोक त्यास फार मान देत असत. त्याची स्त्री मोठी पतिव्रता होती, तिच्या पोटीं बहिणाबाईनीं आठवा जन्म कन्यारूपानें घेतला. तेथें त्यांनीं वयाचीं अठरा वर्षें भागवतश्रवणांत घालविलीं. या जन्मीं त्यांचें लग्न झालें होतें परंतु भ्रतार लवकरच वारला. बाई म्हणतात, "पारमार्थिक दृष्टया, ही गोष्ट माझ्या पथ्यावरच पडली." नववा जन्म बाईनीं त्याच ठिकाणीं, त्याच आईबापांच्या पोटीं घेतला. दहावा जन्म कौशिक नामक अग्निहोत्री ब्राह्मणाचे घरीं झाला.

नित्य हरिकथा वेदांत श्रवण। नित्य करीं स्नान शिवालयीं ॥
देवाचें दर्शन नित्य सेवाविध। आत्मज्ञानें बोध शांत देह ॥
कन्येचिया रूपें जन्म म्यां घेतला। काळ तो क्रमिला कांहीं तेथें ॥
पितयानें लग्न केलें कन्यादान। पाहोनी ब्राह्मण शुक्लभिक्षा ॥
ब्राह्मणाची भिक्षा करितां कोरान्न। गाईचें पाळण घरीं तया ॥

या जन्मीं बाई ४२ वर्षें जिवंत राहिल्या व त्यांस तीन पुत्र झाले. त्यांतला पहिला पुत्र विठोबा होता. या जन्मीं बाईंचा व विठोबाचा गुरु एकच होता, त्याचें नांव केशव.

आता अकराव्या जन्माचा वृत्तांत असा:—गोदातीरीं, प्रवरासंगमीं, एक माध्यंदिन ब्राम्हण अयाचित वृत्तीनें रहात असे. आल्या गेल्या अतिताला तो अन्नदान करीत असे. तो शांतिक्षमादि गुणांनीं युक्त असून त्याचें नांव गोकर्ण होतें. त्याच्या पवित्रता स्त्रीचें नांव सगुणा. तिच्या पोटीं बहिणाबाईनीं अकरावा जन्म घेतला. या जन्मीं त्यांचें नांव " सौजिन्या " होतें. सौजिन्या सात वर्षांची होतांच एका ज्ञानी व योगी पुरुषाशीं तिचें लग्न झालें. तो विरक्त योगाभ्यासी असून त्याला सर्व सिद्धि अनुकूल होत्या. या पुरुषाचें नांव योगेश्वर. सौजिन्येनें त्याची उत्तम प्रकारें सेवा करून त्यास संतुष्ट केलें, तेव्हां त्यानें तिला " योगाचें आसन " शिकविलें. या जन्मींही विठोबा बाईंचा पुत्र होता.

बाईंचा बारावा जन्म ' लाखखणी ' नामक गांवीं झाला. साडेतीन नदां-पैकीं शिवनदाचे तीरीं 'महाउग्र' संगमस्थलीं हें गांव असून तेथें एक अनुष्ठानी ब्राह्मण रहात असे. त्याचें नांव रामचंद्र असून त्याच्या पत्नीचें नांव जानकी होतें. या दांपत्यास दोन पुत्र असून, तिसरी कन्या झाली तीच बहिणाबाई होय. ही कन्या मुळीच बोलत नसे, त्यामुळें हिला वाचाच नाहीं असें सर्व लोक म्हणूं लागले. एका ज्योतिषी ब्राह्मणाशीं या मुलीचें लग्न करण्यांत आलें. ह्या ब्राह्मणास गणपति प्रसन्न असून तो त्याच्याशीं प्रत्यक्ष बोलत असे. बाई म्हणतात—

तयाचिया घरीं निराहार देहीं। सेवासुख पाहीं घेतलें म्यां ॥
विरक्त मानस विषयभोगीं त्रास। सदा निजध्यास आत्मनिष्ठ ॥
रामचंद्र पिता राम उपासक। अत्यंत विवेक ज्ञान तया ॥
माझे अंतरींचा जाणोनियां हेत। केलें माझें चित्त स्थिर तेणें ॥
लाऊनी समाधि बैसवी सन्निध। अंतरीं तो बोध ठसावला ॥

**स्वधर्म गौरव देऊनियां पति । सेवा आत्मस्थिति करीं त्याची ॥**
**कोठें चित्त अणुमात्रहि न बैसे । सदा निजध्यासें देह वर्ते ॥**

शेवटीं ह्या बाराव्या जन्मांत बहिणाबाईंनीं छत्तिसाव्या वर्षी देह ठेवला. याच जन्मांत त्या मुक्त व्हावयाच्या, परंतु कांहीं भोक्तृत्व शेष राहिल्यामुळें त्यांस तेरावा जन्म घ्यावा लागला. या तेराव्या जन्माची विस्तृत हकीकत पूर्वी येऊन गेलीच आहे. मागील सर्व जन्मांचा वृत्तांत, बहिणाबाईंस 'आरशांतील प्रतिबिंबा' प्रमाणें अगदीं स्पष्ट दिसत होता इतकेंच नव्हे तर तेरा जन्मांपूर्वींच्याही आपल्या अनेक जन्मांची त्यांस पूर्ण आठवण होती. त्या म्हणतातः—

**कित्येक संशय राहिले सांगतां । त्वरा झाली चित्ता अंतकाळीं ॥**
**विवेक तें शस्त्र अनुभव अंगींचा । असेल तो साचा अर्थ जाणे ॥**
**अवघेची ते जन्म आठवती मज । अंतरींचें गुज मृत्युवेळा ॥**
**आरशांत जैसें दिसे प्रतिमुख । तैसे जन्म देख दिसती डोळां**
**लटिकेची शब्द व्यवहारी मानिती । मूर्ख तयांप्रती बोलों नये**

* * *

**तेरा जन्मांपूर्वी आठवे समस्त । परी तैसा हेत नाहीं मज ॥**

* * *

**बहेणी म्हणे देव कृपा करी जेव्हां । सर्वही तें तेव्हां कळे मनीं॥**

"व्यवहारी लोकांस असल्या गोष्टी खऱ्या वाटणार नाहींत, परंत तसल्या मूर्ख लोकांशीं आपण बोलूंच नये म्हणजे झालें," असें बाइनीं म्हटलें आहे.

तेराव्या जन्मीं, बहिणाबाई देहू येथें असतांना, एकदां, तीन अहोरात्र त्या इंद्रायणीतीरीं एकांतात बसल्या होत्या, तिसरे दिवशीं तुकाराम-* बुवांनीं त्यांस सोपे तीन मंत्र सांगितले व म्हटलें, "हल्लीं तुझा तेरावा

* "तुकाराममहाराज" असें बाईनीं म्हटलें आहे. कदाचित् ही भेट दृष्टांतरूपानें घडली असेल.

जन्म चालू आहे. पूर्वजन्मीं तूं योगसाधन केलेलें असल्यामुळें यापुढें आतां तुला पुनर्जन्म नाहीं. तुझ्या उदरीं जो पुत्र आहे तो तुझा तेरा जन्मांचा सोबती आहे. हा पुत्रही मोठा आत्मनिष्ठ ज्ञानी होईल व त्याला आणखी पांच जन्म घ्यावे लागतील. तुला कवित्वशक्ति दिली आहे व तुझी बुद्धि आत्मज्ञानांत स्थिर राहील." इतकें बोलून व बाईच्या भिवयांच्या मध्यभागीं अंगुष्ठस्पर्श करून तुकोबा गुप्त झाले. मग बाई आपल्या बिऱ्हाडीं गेल्या व इंद्रायणीचें स्नान करून त्यांनीं विठ्ठलदर्शन घेतलें; व पांच पदें आणि एक आरती रचून ती विठ्ठलास वाहिली. हीच बहिणाबाईनीं केलेली पहिली कविता.

इतकी हकीकत मुलास सांगितल्यावर बाई म्हणाल्या, "चालू जन्मांतली माझी ७२ वर्षांची आयुष्यमर्यादा आज या सिद्धासनीं पूर्ण झाली. आतां माझें देहावसान होण्यास फक्त सोळा प्रहरांचा अवधि राहिला आहे." या वेळीं बाई सिद्धासनारूढ असल्यामुळें त्यांस दिव्यदृष्टि प्राप्त झालेली होती व तिच्या योगानें भूतकालीन व भविष्यकालीन गोष्टी सिनेमांतल्या चित्रपटाप्रमाणें त्यांस अगदीं स्पष्ट दिसत होत्या. त्या पुढें म्हणतात, "तुला जे मी माझे तेरा जन्म सांगितले ते या वेळीं मला अगदीं स्पष्ट दिसत आहेत. त्याच प्रमाणें माझा मृत्युकालही १८ दिवसांपूर्वींच मला समजला आहे, परंतु मी त्याची वाच्यता केली नाहीं. तुझी पत्नी रुक्मिणी मरण पावली तिच्या उत्तरक्रियेसाठीं तुला गोदातीरीं जावें लागणार होतें व त्या वेळीं, माझा मृत्यु अठरा दिवसांनीं होणार आहे ही गोष्ट जर मी तुला कळविली असती तर गोदातीरीं न जातां मजपाशींच रहावें असें कदाचित् तुला वाटलें असतें. तूं गोदातीरीं गेल्यावर गांवांतल्या लोकांस, माझा मृत्युकाल समीप आल्याचें मी कळविलें व रुक्मिणीच्या तेराव्याचे दिवशीं तुला पत्र पाठविण्यास मी त्यांस सांगितलें. याप्रमाणें ज्या ज्या गोष्टी मला आठवल्या त्या त्या तुला कवितारूपानें सांगितल्या आहेत. यांत जर काहीं अशुद्ध आढळलें तर तें मागाहून सवडीप्रमाणें दुरुस्त कर." इतकें सांगितल्यावर बाई म्हणतातः—

बहेणि म्हणे देव बोलवी जे वाणी। असत्य जो मानी नरक तया

पुढें त्या म्हणतात, " मनुष्यानें मृत्युसमयीं " आत्मनिष्ठ बोध राखून" सावध असावें असें गीतेंत भगवंतानीं सांगितलें असून, तो प्रसंग आज मला प्राप्त झाला आहे. आज माझ्या देहांत अग्नीचें बल असून हृदयांत ज्योति सावधान आहे. माझा मृत्यु शुक्लपक्षांत दिवसा आहे. आतां, हल्लीं उत्तरायण नाहीं हें थोडेसें व्यंग आहे खरें, परंतु सद्‌गुरुकृपा असल्यावर उत्तरायणाची काय जरूर ? उत्तराभिमुख आसन घालून व प्राणनिरोधन करून, मी बसलें आहें. सद्गुरुस्मरणाच्या योगानें पांचही योगांची मला सिद्धि झाली आहे. प्रपंचविमुक्त झालेल्या मनुष्याला उत्तरायणाचें महत्त्व नाहीं ज्याचें मानस सर्वदा प्रपंचाभिमुख असेल त्याला नेहमींच दक्षिणायन असतें. याला वेदशास्त्रांचें संमत आहे आणि माझा अनुभवही तसाच आहे. अजूनही मला मगील कांहीं जन्म आठवत आहेत, परंतु मृत्युकाल जवळ येत चालल्यामुळें, त्या जन्मांची हकीकत सांगण्यास आतां अवकाश नाहीं. माझें संचित क्रियमाण मी सर्व भोगून चुकलें आहें. विरक्ति आणि वैराग्य यांच्या योगानें माझी मनोभूमिका शुद्ध झाली असून, वृत्ति तदाकार झाल्या आहेत आणि विवेकाच्या योगानें विदेही दशा प्राप्त झाली आहे. " पुढील भाषण त्यांच्याच प्रासादिक शब्दांत देतों:—

मन हें विरक्त विषयीं सर्वदा । इंद्रियें गोविंदा समर्पिलीं ॥
तेंचि प्रायश्चित्त घेतलें अंतरीं । सबाह्य अंतरीं एकनिष्ठें ॥
मंत्रज्ञान सदा श्रीरामचिंतन । सद्‌गुरुभजन सर्वकाळ ॥
दश दानें दशा कुपरेंसी ( ? ) समर्पू । गोदानें संकल्पु वासनेचा ॥
पंचगव्य तेंचि जाण अर्धमात्रा । सोहं ते सशब्दा प्राशियेलें ॥
ज्ञानगंगे स्नान मनाचें वपन । वृत्ति ह्या निमग्न ब्रह्मरूपीं ॥
हेंचि प्रायश्चित्त सदा सर्वकाळ । मन हें अढळ निश्चयाचें॥
माझे अंतरींचा जाणोनियां हेत । केलें माझें चित्त स्थिर तेणें ॥
बहेणि म्हणे ऐसें केलें प्रायश्चित्त । शास्त्राचा संकेत शास्त्र जाणे ॥

हेत तो प्रमाण जन्मासी कारण । अनुभव खूण हेचि चित्ता ॥
ऐसें जाणुनियां हेत निर्दाळिला । अद्वय तो झाला हेत चित्ता ॥
इंद्रियां आणूनि दिलें प्रायश्चित्त । ज्ञान महातीर्थ आत्मनिष्ठा ।
विषयवासना भोगिली बहुकाळ । तियेचें निर्मूळ आजि केलें ॥
सद्गुरुवचनीं धरूनियां निष्ठा । वासना त्या भ्रष्टा शुद्ध केल्या ॥
बहेणि म्हणे मना दिलें प्रायश्चित्त । आतां झालें मुक्त ज्ञानबोधें ॥

तीन शतें आणि वरुषें एकावन्न । आयुष्य निर्माण तेरा जन्मीं ॥
चातलें स्त्रीरूपें साधनें हरीच्या । निमाल्या मनाच्या वृत्ति जंव ॥
आतां निश्चयानें सांगेन निर्धार । झालें निर्विकार चित्त माझें ॥
बहेणि म्हणे कांहीं पुढें नाहीं हेत । स्वरूपीं निवांत चित्त माझें ॥

इतकी स्वतःची हकीकत सांगून बाई आपल्या पुत्रास म्हणाल्या, "तूंही या जन्मांत पुष्कळ ज्ञान मिळविशील व यापुढें तुला एकाहून एक श्रेष्ठ जन्म प्राप्त होऊन, योगभ्रष्ट स्थितींत तूं कांहीं जन्म घालविशील. तुझे तीन जन्म काशीक्षेत्रांत होतील. एक जन्म संन्याशाचा येईल व त्या जन्मांत थोडेंसें चित्तस्थैर्य प्राप्त होईल. पांचव्या जन्मीं, वयाच्या अठराव्या वर्षी तुला विदेहावस्था प्राप्त होईल; व पुढें जन्म होणार नाहीं."

'आपुलें मरण पाहिलें म्या डोळां' असें तुकारामबुवांनीं एका अभंगांत म्हटलें आहे. बाईचे पुढील अभंगही त्याच अर्थाचे पण विशेष खुलासेवार आहेत.

आपलें आपण देखिलें मरण । तो झाला शकुन स्वानंदेंसी ॥
उभारिली गुढी मनाच्या शेवटीं । झाली मज भेटी आत्मारामीं ॥
केला प्राणायाम सोहंधारणेसी । मिळाली ज्योतीसी ज्योति तेणें ॥
सरलें संचित आयुष्य देहाचें । क्रियमाण अंतींचें रामरूप ॥
उठती रात्रंदिवस कामक्रोधमाया । म्हणती अहा अहा यमधर्म ॥
वैराग्याच्या श्रेणी लागती शरीरा । ज्ञानाग्नि लाविला ब्रम्हस्वेंसी ॥
झाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥
फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्यध्वनि बोंब झाली ॥

दिला तिळांजळि कुळनामरूपासी । शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ॥
बहेणि म्हणे रक्षा झाली त्रिपुटेची । तुकारामें साची कृपा केली ॥

शेष प्राक्तनाची रक्षा भरूनियां । नेली ते अद्वयानंदतीर्थी ॥
त्रिकोण वेदिका त्रिगुणाचा देह । शिंपोनी विदेहरूप केलें ॥
निर्गुणाचे ठाव येती जे आठही । गोमुत्र लें पाहीं तयावरी ॥
लाविल्या पताका सात्त्विक भावना । मंत्राची धारणा ब्रह्मनिष्ठा ॥
ऐसा सिंचनविधि संपादिला येथें । पुढें मोक्षपंथ क्रियायोग ॥
बहेणि म्हणे क्रिया करितां स्वदेहाची।माझी मीचि साचि होउनि ठेलें ॥

प्रथमादारभ्य आरंभिली क्रिया । पिंडीं पिंड पहा निवेदिला ॥
दुसरे दिवशीं द्वैत हारपलें । अद्वैत बिंबलें परब्रह्मीं ॥
तिसरे दिवशीं त्रिगुणाची शांति । पिंडाची समाप्ति याच परी ॥
चवथे दिवशीं चौदेहा अतीत । उघडा संकेत ओळखिला ॥
पांचवे दिवशीं केलें पिंडदान । पांचही ते प्राण बोळविले ॥
सहावे दिवशीं षड् उर्मी निमाल्या । वृत्ति स्थिरावल्या आत्मरूपीं ॥
सातवे दिवशीं सप्त धातु अंत । राहे अखंडत्व अद्वयत्वें ॥
आठवे दिवशीं नाश अष्टभाव । अद्वय अनुभव राहे सुखें ॥
नवमीं नवांक भक्ति नवविधा । सरल्या आत्मबोधामाजीं आल्या ॥
दहावे दिवशीं इंद्रियें दहाही । बोळवण देहीं केली त्यांची ॥
अश्मा ते उत्तरी पंचधा विषय । ज्ञानगंगे वाहे ओघ त्यांचा ॥
अकरावे दिवशीं अकरावें मानस । परब्रह्मीं त्यास निवेदिलें ॥
वृषोत्सर्ग केला भवविरक्तीचा । विजनीं तयाचा वास केला ॥
होम केला सर्व शेष प्राक्तनाचा । हेतु सुतकाचा पुढें नाहीं ॥
सपिंडीचें कर्म बाराव्या दिवसांत । वासनेचा प्रांत होय तंव ॥
व्हावया निर्वासना बाराव्या दिवशीं । अद्वयसरसी परब्रह्म ॥
माया अविद्येचें जाळिलें बिंबलें । असिपदीं आलें ऐक्य मना ॥
सच्चिदानंद दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता ध्यान विसरलें ॥
त्रिपुटीचा नाश तोचि रे बारावा । ब्रह्मत्व या जीवा केलें तेणें ॥

बिंब प्रतिबिंब हारपलें तेंचि । बाराव्या दिवसाची हेचि संज्ञा ॥
सोहं हंस याची केली बोळवण । बारावा तो दिन आजि खरा ॥
उल्लंघोनी कळा चालले द्वादश । तेचि बारा मास श्राद्ध केलें ॥
चंद्राचिया कळा सोळांचा उपरम । न्यूनाधिक सीमा तेचि आम्हां ॥
ज्ञान तेचि गंगा सांगे गुरु क्रिया । साक्षात्कार गया तेचि आम्हां ॥
करूं मंगलश्राद्ध गुरूचे वचनीं । ब्रह्माचि होऊनी ब्रह्मदेवी ॥
ऐसी जाण क्रिया केली या शरीरें । विवेकनिर्धारें आपुलिया ॥
बहेणि म्हणे आतां असो देहभाव । आमुचा दृढभाव हाचि खरा ॥

बोलावा ब्राह्मण मंत्रस्नान करूं । दानविधि सारूं अंतकाळीं ॥
द्यावें प्रायश्चित्त वेदाचिया मतें । आमुचें दैवत द्विज तुम्ही ॥
दश दानें देऊनी केला नमस्कार । आतां कृपा फार असों द्यावी ॥
सात प्रहर शेष उरला अंतकाळ । दिंडी टाळघोळ कथाभारें ॥
ज्ञानेश्वरी ग्रंथ संपला पर्जन्य । करावे ब्राह्मण सिद्ध उभे ॥
वाद्याचिये ध्वनि वाजती अंबरीं । दश नाद भीतरीं आईका रे ॥
घालूनी आसन बैसोनी ध्यानस्थ । पाहें मी प्रशस्त गुरुखुणें ॥
शंख चक्र गदा तुळसीच्या माळा । ब्राह्मणांच्या गळां शोभताती ॥
सावधान तुम्ही म्हणा ज्ञानेश्वर । विठ्ठल निर्धार नाम जपा ॥
सांगेन तें तुम्ही ऐका रे सर्वही । अंतकाळ देहीं जवळ आला ॥
बहेणि म्हणे आतां पांचही ते योग । पाहें पां प्रसंग येचि क्षणीं ॥
आसनीं बसोन उत्तराभिमुख । सहजासन देख अंतकाळीं ॥

सूर्योदयापूर्वीं घटिका तीन जाण । आसनीं बैसोन ध्यान मुद्रे ॥
नऊ घटिका नाम न सांडीं उच्चार । चित्ताचा निर्धार सांगितला ॥
सात घटिका पुढें तयाची वांटणी । इंद्रियें गोठणीं सर्व येती ॥
चार घटिका ध्यानीं राहेन तटस्थ । तुवां मन स्वस्थ असों द्यावें ॥
ऐशा वो घटिका तेरा गेलियानें । सद्गुरुस्मरणें वदे जिव्हा ॥
तुकाराम मुखीं गंगाधरस्मरण । अठरा वेळ माळ करीं तेचि ॥
यानंतर पुढें नासीकाग्रीं दृष्टि । वळोनियां मुष्टी हात दोन्ही ॥

माळ तेव्हां कंठीं घालीत स्वहस्तें । करूनी प्रशस्त चित्त राहें ॥
एकाग्रता सर्व वायूचा उपरम । उदानीं संभ्रम योग त्याचा ॥
हृदयीं धरून नारायणध्यान । राहे समरसोन चित्त तेव्हां ॥
अखंड अद्वय हृदयव्यापक । स्मरण तें एक अद्वयाचें ॥
बहेणि म्हणे ऐशी अंतकाळस्थिति । सांगितली गति निश्चयेंसी ॥

सद्गुरु ओंवळा ओंवाळा । उजळुनि बीज ज्योतिज्वाळा ॥
पिंड हारपला पिंडीं । तेज व्यापिलें ब्रह्मांडीं ॥
शांतीसुखाचें आसन । अद्वय बोधाचें पूजन ॥
चिद्घन चिदानंदगाभा । सच्चिदानंद निजप्रभा ॥
तेज प्रकाशलें लोचनीं । बहेणि हारपली चिद्घनीं ॥

घट फुटलियावरी । नभ नभाचे अंतरीं ॥
ऐसा देह गेलियानें । उरे स्वरूप चिद्घन ॥
जळ आटलिया जाण । प्रतिबिंब म्हणे कोण ॥
लागली कापुरासी । अग्निरूप नाहीं म्हैसी ॥
बहेणि ऐसें नाम माया । गेले ध्याऊनि अद्वया ॥

इतके अभंग लिहून बहिणाबाई समाविस्थ झाल्या. वरील लांबलचक उतारे येथें देण्याचें कारण हें कीं, बहात्तर वर्षांची ही वृद्ध बाई अगदीं अखेरच्या क्षणापर्यंत पूर्ण शुद्धीवर राहून, अभंगरचना करण्यास कशी समर्थ होती हें वाचकांच्या लक्षांत यावें. मृत्यु म्हणजे शरीरांतर अशी पूर्ण भावना होऊन ज्यांचें मृत्युभय अगदींच नाहींसें झालेलें असेल अशाच मनुष्यांची चित्तवृत्ति, मृत्युकालीं, इतकी स्थिर राहूं शकेल; इतरांची स्थिति मृत्युकालीं कशी काय होते हें आपण नित्यश: पहातच असतों. बहुतेक सर्व संतांचे मृत्यु मनाच्या अत्यंत शांत स्थितींत झाल्याचें आपण ऐकतों याचें कारण, मरणापूर्वींच त्यांनीं आपलें मरण डोळयांनीं पाहिलेलें असतें हें होय. परंतु अशी स्पृहणीय स्थिति प्राप्त करून घेण्यास मनुष्यप्राण्यास किती जन्म धारण करावे लागतात, हें या बहिणाबाईंच्या चरित्रावरून अगदीं उघड दिसत आहे. बाईंनीं आपल्या

ज्या तेरा जन्मांची माहिती सांगितली आहे, त्या जन्मांपूर्वी आणखी किती तरी जन्म त्यांना घ्यावे लागले होते व त्या प्रत्येक जन्मांत परमार्थसोपानाची एकेक पायरी चढतां चढतां ह्या शेवटच्या जन्मांत त्यांना मुक्तिलाभ झाला. तेराही जन्मांत त्या स्त्रीरूपानेंच अवतीर्ण होत गेल्या, हें लक्षांत ठेवण्यासारखें असून, स्त्रीजन्म हा मोक्षप्राप्तीस व्यत्ययकारक नाहीं हें यावरून निर्विवाद सिद्ध होतें. त्याचप्रमाणें, मनुष्यप्राणी पुन: पुन: त्याच त्याच ठिकाणीं व त्याच त्याच आईबापांच्या पोटीं जन्म घेऊं शकतो व त्याचे पुत्रादि आप्तही अनेक जन्मांत त्याचे निकट सहवर्ती असूं शकतात हेंही बहिणाबाईचा मुलगा विठोबा याच्या उदाहरणावरून सिद्ध होत आहे. बहिणाबाई आपल्या अनेक पूर्वजन्मीं अविवाहित स्थितींतच मोठ्या होऊन मरण पावल्या, यावरून, व ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाइच्या उदाहरणावरून, पूर्वकालीं, स्त्रियांनीं आजन्म अविवाहित राहाणें हें फारसें दोषास्पद मानलें जात नसावें असेंही समजण्यास हरकत नाहीं. बहिणाबाईची इतकी पारमार्थिक उन्नति झालेली असतांही, त्या बाबतींत आपल्याहून अवनत स्थितींत असलेल्या आपल्या पतीची अवज्ञा त्यांनीं केली नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलट पातिव्रत्यधर्माची महति त्यानीं मुक्तकंठानें वर्णिली आहे, हेंही विसरतां कामा नये. तुकारामबुवा देहूकर हे केवळ भक्तिमार्गी संत होते अशीच महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व लोकांची हा कालपावेतों समजूत आहे, परंतु, कविवर्य मो[1]रोपंतांनीं व रंगनाथ[2] स्वामीनीं म्हटल्याप्रमाणें, तुकारामबुवांची योगमार्गांतही चांगली गति होती हें बहिणाबाईंच्या एतद्विषयक उद्गारांवरून सिद्ध होत आहे. तुकारामबुवांच्या मृत्यूनंतर बहिणाबाई ५१ वर्षे हयात होत्या व बुवांनीं आपल्या मृत्यूनंतर ज्या व्यक्तींना दर्शन दिल्याचा उल्लेख आहे, त्यांत बहिणाबाईचें नांव आहे. "काया ब्रह्म करून वैकुंठास गेले" या नांवाचें 'नामा शिपी' कत्रींचें एक अभंगबद्ध प्रकरण आहे त्यांत तो म्हणतो:—

---

१ "कर जोडितों सुटाया तनुरूपा तापहेतुकारा मी। कीं सतनु मुक्त झाला **योगाची सिद्धि** हे तुकारामीं ॥" ही पंतांची सन्मणिमालेंतील आर्या प्रसिद्धच आहे. २ "जड देहा घेउनि वाणी। गेला तो ऐका वाणी" हें रंगनाथस्वामीचें पद पहा.

बहिणाबाई नामें ब्राह्मणाची कांता। श्रुत झाली वार्ता तिजलागीं ॥
कां हो बापा मज नाहीं दरुशन। केलीं उपोषणें सत्रा तिनें ॥
येउनियां स्वप्नीं भेटले तियेला। अनुग्रह दिला तिजलागीं ॥

त्याचप्रमाणें, तुकारामबुवांचे नातू गोपाळबावा यानीं एक ओवीबद्ध तुकारामचरित्र लिहिलें आहे त्यांत ते म्हणतात—

असो हें, तुकया कृपाळू पूर्ण। आणिकही ऐका सावधान।
केला निश्चय बहिणाबाईनें। नयनीं पाहीन तुकयासी ॥
तेव्हांचि भक्षीन मी अन्न। ऐसी शपथ वाहिली जाण।
अठरा झालिया उपोषणें। पातली येऊन देहू क्षेत्रीं ॥
बहिणाबाई गेली स्नाना। इंद्रायणीच्या तीरीं जाणा।
तों वीस हस्तांतरें योगीराणा। देखिला ध्यानारूढ पैं ॥
जैसें शशिबिंब उदया आलें। तैसें संतस्वरूप विलोकिलें।
दुरूनिच नमुनी बहिणा बोले। 'स्वामी कोण कोठील सांगिजे जी' ॥
तव बोलता झाला वैष्णव वीर। बहिणा तूं निश्चय धरूनि थोर।
ज्यासाठीं दंडिलेंस शरीर। तो मी साचार जाण पां ॥
तिच्या अंतरी बाणली खूण। वेगें चालली वंदाया चरण।
तों पुढें होतें स्वल्पसें जीवन। किंचित व्यवधान तेणें झाली ॥
तों तुकेया गुप्त झाला ते अवसरीं। परम विस्मित झाली द्विजकुमरी।
समाधान पावूनी अंतरीं। निजनिर्धारीं राही सुखें ॥

बहिणाबाईंचा मुलगा विठ्ठल यानें बाईंवर एक आरती रचिली आहे तींत त्यानें बाईंचा मृत्युशक 'शत षोडसवरी द्वाविंशत' म्हणजे शके १६२२ दिला आहे मरणकालीं त्यांचें वय ७२ वर्षांचें होतें. यावरून त्यांचा जन्म शक १६५० मध्यें झाला होता, हें उघड दिसतें.

बहिणाबाईंच्या पूर्वजन्मांविषयीं प्रो. परांजपे यांनीं लिहिलेल्या ज्या लेखाचा उल्लेख पूर्वी केला आहे, तो लेख फार महत्त्वाचा असल्यामुळें त्याचा सारांश, वाचकांच्या माहितीसाठीं येथें देतों. प्रोफेसर साहेब म्हण-

१ तुकारामबुवांच्या निर्याणाची वार्ता.

तात. "आपण इहलोकीं जन्माला येण्यापूर्वी आपल्याला जन्म नव्हता, आणि आपण इहलोकांतून एकदां मरून गेल्यावर आपल्याला पुनरपि जन्म नाहीं असें मानणारे कित्येक नास्तिक लोक आणि धर्मपंथ आहेत. परंतु अशांची संख्या या जगांत फार कमी आहे. याच्या उलट पूर्वजन्म आहे आणि पुनर्जन्मही आहे असें मानणारे लोक आणि धर्म यांची मोजदाद केली असतां ती खात्रीनें पुष्कळ पटींनीं ज्यास्त * भरेल. या ज्यास्त लोकांची या विषयासंबंधानें कांहीं प्रत्यक्ष प्रमाणांवरून खात्री पटलेली असते असें नाहीं. तरी पण असल्या गोष्टींवर विश्वास ठेवण्याकडे मानवी मनाची थोडीशी स्वाभाविकच प्रवृत्ति असते. त्यामुळें या गोष्टी खऱ्या म्हणून धर्माच्या औपचारीक दृष्टीनें मानल्या जातात. परंतु सांप्रदायिक विश्वासाच्या थराच्या खालीं बहुतेक मनांतून एक संशयाचा गुप्त थर असतोच; व 'या पूर्वजन्माच्या आणि पुनर्जन्माच्या प्रश्नासंबंधानें इहजन्मीं जर कांहीं थोडाबहुत प्रत्यक्ष अगर दुसऱ्या कांहीं प्रकारचा पुरावा मिळेल तर तो मला पाहिजे आहे,' असें तो संशय प्रत्येक मनुष्याच्या मनाशीं हळूच बोलत असतो. त्या संशयाच्या निवृत्तीसाठीं जें कोठें कांहीं प्रमाण मिळेल, त्याचें परीक्षण करणें अवश्य आहे." यानंतर, पूर्वी दिलेलें बहिणाबाईच्या तेरा पूर्वजन्मांचें कोष्टक देऊन प्रो. शिवरामपंत म्हणतात, "या कोष्टकांत दिलेल्या तेरा जन्मांपैकीं अखेरच्या म्हणजे तेराव्या जन्माच्या अखेरीस बहिणाबाई ही मुक्त झालेली आहे; आणि मुक्त होण्याच्या स्थितीला येणें म्हणजे अर्थात् जीवाची आध्यात्मिक उन्नति अत्यंत परिपक्वतेला येऊन पोहोंचणें असाच अर्थ होय हें उघड आहे. एखादा जीव तावडतोब उद्धरत नाहीं, तर उद्धरण्याच्या पूर्वी त्याला अनेक जन्म घ्यावे लागतात, अशी आपल्यामधील या विषयासंबंधाची कल्पना आहे. 'अनेक जन्म संसिद्धस्ततो याति परां गतिम्" या

---

* हें विधान थोडेंसें आक्षेपास्पाद दिसतें. कारण ख्रिस्ती आणि बौद्ध हे जगतांले मोठे धर्म पूर्वजन्म आणि पूनजन्म मानतात असें दिसत नाहीं. पूर्वजन्म आणि पुनर्जन्म निर्विवादपणें मानणारे दोनच धर्म आहेत, ते हिंदु धर्म आणि पारशी धर्म हे होत. ग्रंथकर्ता

भगवद्गीतेंतील वचनामध्येंही हाच भावार्थ सांगितलेला आहे. या आध्यात्मिक उन्नतीच्या वाढीचें चित्र या बहिणाबाईच्या तेरा जन्मांच्या वर्णनामध्यें आपल्याला जसें पाहावयाला सांपडतें, तसें तें अन्यत्र क्वचितच दृष्टीस पडतें. परंतु या विषयाचा विचार करण्यापूर्वी एक शंका उत्पन्न होते ती अशी कीं बहिणाबाईनें दिलेलें हें आपल्या तेरा जन्मांचें वर्णन अगदीं यथार्थ असेल काय? कोणीही सामान्य नास्तिक मनुष्य असें म्हणेल कीं बहिणाबाईनें आपल्या भाविकपणाच्या आणि भोळपणाच्या भरांत जी आपल्या पूर्वजन्मांची काल्पनिक कविता लिहिली, तीच जर सत्य नसेल तर त्यांतील विधानांच्या तुलनात्मक विवेचनानें काढलेल्या सामान्य सिद्धांतांना तरी सत्यतेच्या दृष्टीनें काय किंमत असणार! ही शंका अगदींच निराधार आणि निष्फळ आहे असें नाहीं; परंतु जे वाचक हे निर्याणाचे अभंग मनामध्यें ही शंका ठेवून वाचतील त्यांना देखील यांत बनावटपणाचा प्रयत्न केल्याची स्थळें शोधून काढण्याला पुष्कळ प्रयास पडतील, आणि ते प्रयासही पुष्कळ अंशीं निष्फळच होतील. हे अभंग फार सरळ आणि स्वाभाविक दिसतात. अंतकाळच्या अदृष्टदर्शी* अवस्थेमध्यें बहिणाबाईला जी स्फूर्ति झाली, तिचेंच वर्णन यांत असावें, अशी प्रेमळ वाचकांची खात्री पटण्यासारखी आहे. प्रयत्न करून आणि बनावट रचून जर ही हकीकत लिहिण्यांत आलेली असती, तर या हकीकतीमध्यें हल्लीं जे कित्येक दोष दिसून येत आहेत, ते ही बनावट हकीकत रचणाऱ्या जीवानें बहुधा त्यांत ठेविले नसते."

"वरील कोष्टकाकडे आपण पाहिलें, तर पुष्कळ ठिकाणच्या सदरांतून कांहींच माहिती दिलेली नाहीं, असें आपल्याला आढळून येतें मुख्यत्वेंकरून

---

* ही अदृष्टदर्शी अवस्था सर्वच मनुष्यांस अंतकालीं प्राप्त होत असते, असें जरी खात्रीपूर्वक म्हणतां येत नाहीं, तरी कांहीं व्यक्तींस अशी स्थिति निःसंशय प्राप्त होत असली पाहिजे, अशी, माझ्या कांहीं मृत आप्तांच्या अंतकालिक स्थितीच्या सूक्ष्म निरीक्षणानें व त्या स्थितींत त्यांनीं काढलेल्या उद्गारांच्या श्रवणानें माझी तरी निदान पूर्ण खात्री होऊन चुकली आहे.
ग्रंथकर्ता

आपल्या मुलाचा आणि आपला मागील लागोपाठच्या बारा जन्मांमध्यें जो एकसारखा एकत्र सहवास होता तो कसकसा होता, मागच्या निरनिराळ्या जन्मांतून आपण कोण होतों, आणि त्याच वेळीं तेथें आपला मुलगा कोण होता हें आपल्या मुलाला सांगण्याच्या उद्देशानें बहिणाबाई ही हकीकत लिहिण्याला प्रवृत्त झाली आहे. असें असतां, तिनें आपलें व आपल्या मुलाचें मागील फक्त पांचच जन्मांतील नातें सांगितलें आहे. बनावट काव्यांतून नीटनेटकेपणाकडे सहसा इतकें दुर्लक्ष्य होणें शक्य नसतें. तसेंच बहिणाबाईनें मागील कित्येक जन्मांतील आपलीं, आपल्या बापाचीं व आईचीं कांहीं नांवें सांगितलीं आहेत व बाकीचीं नांवें तशींच सांगायचीं राहून गेलेलीं आहेत. ही गोष्ट वरच्यासारखीच आहे. सारांश या अभंगांतील स्वाभाविकपणावरून त्यांत सत्यता असावी असें वाटतें. शिवाय बहिणाबाईसारख्या पवित्र अंतःकरणाची बाई, अंतकाळच्या सारख्या पवित्र –निदान मिथ्याचरणाच्या पातकाला अयोग्य–अशा वेळीं मुद्दाम जाणून बुजून खोटी आणि बनावट हकीकत लिहिण्याला बसून हें काव्य रचील ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. परंतु असल्या कितीही गोष्टी सत्यतेच्या पुराव्यासाठीं पुढें आणल्या, तरी मूळ शंका अगदीं नष्ट होईलच, असें म्हणतां यावयाचें नाहीं. तरी पण असत्यतेपेक्षां सत्यतेकडेच कोणाच्याही मनाचा कांटा ज्यास्त झुकेल यांत शंका नाहीं. तेव्हां एवढ्या सारासारनिर्णयानें यांत जितकी कांहीं सत्यता असेल, तितकीच गृहीत धरून तेवढ्यावरून जीवाची आध्यात्मिक उत्क्रांति कसकशी होत जाते याचें आपण शक्य तेवढें परीक्षण करूं.”

बहिणाबाईनीं सांगितलेली आपल्या पूर्वजन्मांची हकीकत सत्यच असली पाहिजे हें सिद्ध करण्यासाठीं प्रो. परांजपे यांनीं लढविलेला वरील युक्तिवाद कौतुक करण्यासारखा आहे यांत संशय नाहीं. परंतु, मला वाटतें कीं, या गोष्टीची सत्यता सिद्ध करण्यासाठीं, इतक्या खोल पाण्यांत शिरण्याचें कांहीं कारणच नाहीं; कां कीं, हा प्रश्न निव्वळ श्रद्धेचा नसून, मानसशास्त्राशीं त्याचा निकट संबंध आहे. आत्यंतिक आध्यात्मिक

उन्नति पावलेल्या मनुष्यप्राण्यास, त्याच्या अंतकालीं, एक प्रकारची दिव्यदृष्टी प्राप्त होऊन, तिच्या योगानें त्यास अनंत पूर्वकालाच्या उदरांत गडप होऊन गेलेल्या अनंत गोष्टी, चित्रपटाप्रमाणें स्पष्ट दिसत असाव्या, हें अनेक महात्म्यांच्या अंतकालिक उद्गारांवरून, उघड दिसतें. अर्थात् हा एक अत्यंत महत्त्वाचा शास्त्रीय प्रश्न असून, त्याचें समर्पक उत्तर देण्याचा अधिकार फक्त तज्ज्ञांचाच आहे; इतरांनीं याविषयीं नुसत्या बुद्धीच्या किंवा तर्कशक्तीच्या जोरावर निष्कारण काथ्याकूट केल्यानें कांहींच निष्पन्न होण्यासारखें नाहीं, असें माझ्या अल्प बुद्धीस वाटतें. खुद्द बहिणाबाईच सांगतात कीं,

**अवघेचि ते जन्म आठवती मज । अंतरींचें गुज मृत्युवळा ॥**
**आरशांत जैसें दिसे प्रतिमुख । तैसे जन्म देख दिसतो डोळां ॥**
**लटिकेचि शब्द व्यवहारी मानिती । मूर्ख तयांप्रती बोलों नये ॥**

\+ + +

**बहेणी म्हणे देव कृपा करी जेव्हां । सर्वही तें तेव्हां कळे मनीं ॥**

अत्यंत पुण्यशील, परम पतिपरायण आणि तुकारामासारख्या परम भागवतास गुरुस्थानीं मानणाऱ्या बहिणाबाईनें "या अंतकाळीं मला सगळेच जन्म आठवत आहेत. आरशांत जसें मुखाचें प्रतिबिंब दिसावें तद्वत् माझ्या डोळ्यांपुढें सगळे जन्म अगदीं स्पष्ट दिसत आहेत. व्यावहारिक लोकांस ही माझी हकीकत खरी वाटणार नाहीं, परंतु तसल्या मूर्खांशीं बोलण्याचें आपणास कांहीं कारण नाहीं. ईश्वराची जेव्हां कृपा होते, तेव्हां सर्व गोष्टींचें ज्ञान मनुष्यास आपोआप होतें," इतकें निक्षून सांगितल्यावर तिच्याविषयीं असत्यतेचा संशय आपण घेणें, म्हणजे संशयीपणाची पराकाष्ठाच झाली असें म्हटलें पाहिजे. असो.

प्रो. शिवरामपंत पुढें म्हणतात, "आध्यात्मिक उत्क्रांतीच्या दृष्टीनें ६, ८ व ९ नंबरच्या कोष्टकांचें फारसें महत्व नाहीं, हें उघड आहे; म्हणून तीं वगळून बाकीच्या कोष्टकांकडे आपण वळूं. कोष्टक नं. ५ यांत बहिणाबाई ही आपल्या तेरा जन्मांतून पुरुष किंवा स्त्री होती, हें नमूद केलेलें आहे. सामा-

न्यतः पाहिलें असतां स्त्रीजन्मापेक्षां पुरुषजन्म हा वरच्या दरज्याचा होय; व जर जीवात्म्याची सर्व बाजूंनीं उत्क्रांति व्हावयाची असेल तर स्त्रीजन्मांत असलेल्या जीवात्म्याला पुरुषजन्म मिळावा हें साहजिक दिसतें. परंतु बहिणाबाईची हकीकत खरी असेल, तर तिला लागोपाठ तेराही स्त्रीजन्मच प्राप्त झाले होते असें दिसतें; व अखेरीस ती स्त्रीदेहांतूनच उद्धरून मुक्त झाली. यावरून असा निष्कर्ष निघतो कीं मनाची उन्नत्ति झालेली असली आणि वासनांचें बीज नष्ट झालेलें असलें म्हणजे मग कोणताही*–स्त्रीचा अगर पुरुषाचा–देह असला तरी जीवात्मा त्यांतून उद्धरून जातो."

"वरील कोष्टकाच्या मागील जें ४ नंबरचें कोष्टक आहे, त्यांत बहिणाबाईनें आपलीं निरनिराळ्या जन्मांतील जीं निरनिराळीं वयें दिलेलीं आहेत, तीं दाखल केलीं आहेत. उत्क्रांति तत्त्वाच्या दृष्टींनें पाहतां वयाच्या संबंधानेंही सामान्य दृष्टीला असें वाटणें साहजिक आहे कीं, जो अधिक अधिक उत्क्रांत होत चालला त्याला अल्पायुषी मरण न येतां तो दीर्घायु असावा. परंतु नं. ४ च्या कोष्टकाच्या तुलनेवरून तसें मुळींच दिसून येत नाहीं. बहिणाबाईचें दीर्घ जीवित्व उत्तरोत्तर सारख्या क्रमानें मुळींच वाढत गेलेलें नाहीं. यावरून असें म्हणावें लागतें की, जीवात्म्याची आध्यात्मिक उत्क्रांति आणि त्याच्या देहाचें दीर्घायुरारोग्य यांच्यामध्यें फारसा कांहीं संबंध नसावा. अमुक जन्मीं त्याचा देह लवकर कां पतन पावावा आणि अमुक जन्मीं तो दीर्घकाल कां टिकावा याबद्दलचें नियमन करणारीं उत्क्रांतीशिवाय आणखी कांहीं तरी निराळीं कारणें असावीं असें दिसतें."

---

* जीवात्म्याच्या उद्धारास पुरुषजन्माचीच आवश्यकता असेल तर मुक्ताबाई, जनी, मिराबाई, कान्होपात्रा, प्रेमाबाई, कर्माबाई इत्यादि स्त्रिया मोठ्या भगवद्भक्त असूनही त्यांचा उद्धार झाला नाहीं असें म्हणण्याचा प्रसंग येईल ! **ग्रंथकर्ता.**

" कोष्टक नं. ३ यामध्यें बहिणाबाईच्या निरनिराळ्या जन्मांतील तिची जाति दिलेली आहे. तिचे पहिले तीन जन्म वैश्य जातींत झालेले आहेत. पुढें कांहीं जन्म गवळ्याच्या जातींत होऊन मग ती दोन जन्म क्षेत्री (क्षत्रिय) कुळांत जन्मलेली आहे. आणि नंतर शेवटचे तिचे चार जन्म ब्राह्मण कुळामध्यें झालेले आहेत. या जातीच्या कोष्टकामध्यें मात्र बहिणाबाईच्या बाबतींत उत्क्रांतीचें तत्त्व बऱ्याच रीतीनें अनुकूलपणें लागू पडतें. वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण, ह्या जातींच्या चढत्या पायऱ्या उत्क्रांतीच्या चढत्या कलेबरोबर वाढत गेलेल्या दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु इतर जातींतील लोक-देखील उद्धरून गेल्याच्या कथा आपल्यापुढें पुष्कळ आहेत. त्यामुळें जातीच्या उत्क्रांतीच्या पायऱ्यांनीं एकादा जीवात्मा जेव्हां ब्राह्मणत्वाच्या पायरीपर्यंत येऊन पोहोंचेल, तेव्हांच त्याची आध्यात्मिक उन्नति पुरी होऊन तो उद्धरेल असा कांहीं नियम * दिसत नाहीं. बहिणाबाईच्या बाबतीमध्यें ब्राह्मणत्व आणि मुक्ति हा केवळ काकतालीय न्याय झालेला आहे. तरी पण या बाबतीमध्यें मानसिक उत्क्रांतीच्या बरोबर भौतिक उत्क्रांतीच्या पायऱ्या चढत चढत गेलेल्या आहेत, एवढी गोष्ट निर्विवाद आहे. "

" बहिणाबाईच्या तेरा जन्मांमधून तिच्या जीवात्म्याची जर उत्तरोत्तर अधिकाधिक उत्क्रांतिच होत चाललेली होती तर कोणालाही साहजिकपणें असेंच वाटेल कीं, बहिणाबाईची जसजशी उत्क्रांति होत चालली होती, तसतसें तिला पुढील पुढील जन्मांतून ज्यास्त ज्यास्त संसारसुख प्राप्त होत जावें. परंतु बहिणाबाईच्या तेराही जन्मांतील चरित्राचें परीक्षण करून

---

* मुक्तीला ब्राह्मणत्वाची आवश्यकता तर नाहींच, पण उलट, स्त्रिया, वैश्य व शूद्र यांस देखील आमच्या उदार सनातन धर्मानें मोक्षाचा अधिकार देऊन ठेवलेला आहे. गजेंद्रादि पशूंच्या उद्धाराच्या गोष्टी अतिशयोक्तिपूर्ण मानल्या तरी, वाल्मीकि, पिंगला, महानंदा, अजामिळ ह्यांच्या चरित्रांवरून च गोष्ट सिद्ध होते. **ग्रंथकर्ता.**

पाहिलें, तरी या तत्त्वाला कोठेंही सत्यत्व प्राप्त झालेलें दिसून येत नाहीं. सांसारिक सुखांतील मुख्य अंगें म्हटलीं म्हणजे स्त्रियांना पतिसुख आणि पुत्रसुख हीं होत. त्यांपैकीं बहिणाबाईला पहिल्या तीन जन्मांमध्यें, या सुखाचें वारेंही लागलेलें नव्हतें. कारण त्या तीन जन्मांत तिचें मुळीं लग्नच झालेलें नव्हतें, असें वर्णन आढळतें. बहिणाबाईचीं पहिल्या तीन जन्मांतील वयें अनुक्रमें १३, २८, आणि २४ अशीं होतीं. इतकीं उपवर वयें झालेलीं असून त्या काळच्या चालीरीतींविरुद्ध बहिणाबाई अविवाहित कशी राहिली असेल हें समजणें कठीण आहे. परंतु तिचें पहिल्या तीन जन्मीं लग्न झालेलें नव्हतें हें तिच्या लिहिण्यावरून स्पष्ट होतें. तेव्हां या तीन जन्मांत तिला सांसारिक सुखाचा अनुभव लाधला नाहीं हें उघड आहे. पुढल्या चार जन्मांत तिची या बाबतींत कशी काय स्थिति होती याबद्दल मुळांत कांहींच उल्लेख नसल्यामुळें हे मधले चार जन्म सोडून व त्याचप्रमाणें आणि त्याच कारणाकरितां नववाही जन्म वगळून बाकीच्या जन्मांकडे पाहिलें असतां त्यांपैकीं बहिणाबाईच्या आठव्या जन्माचीही कहाणी या बाबतींत दुःखप्रदच आहे. "लग्न केलें परी भ्रतार नासला, हितावह झाला तोही मज" ह्या अभंगांत वर्णन केल्याप्रमाणें आठव्या जन्मीं तिचा भ्रतार नष्ट होऊन तिच्या संसाराचें मातेरें झालें. पुढें १०,११,१२ व १३ या चारी जन्मांत तिचें लग्न होऊन तिला पतिसुख व कांहीं जन्मांत तिला पुत्रसुखही प्राप्त झाल्याचें वर्णन आहे. तरी पण सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें पाहतां तिचे हे शेवटले जन्म फारसे स्पृहणीय नव्हते. भिक्षा मागून तिनें चरितार्थ चालवावा, अशा प्रकारचीं वर्णनें यांतून आढळतात. सारांश, बहिणाबाईची जरी आध्यात्मिक उन्नति या सर्व जन्मांतून होत चाललेली होती, तरी त्या मानानें तिचें ऐहिक सुख जन्मोजन्मीं वृद्धि पावत चाललें होतें असें दिसून येत नाहीं. आणि परमार्थाच्या दृष्टीनें पाहिलें असतां असें होणें हेंहि स्वाभाविकच आहे. प्रपंचाच्या सुखांत मन रमलें, तर मग तें परमार्थाच्या सुखाला पात्र होण्याला व्यत्यय येईल; प्रत्यक्ष भ्रतार मरण

"कोष्टक नं. ३ यामध्यें बहिणाबाईच्या निरनिराळ्या जन्मांतील तिची जाति दिलेली आहे. तिचे पहिले तीन जन्म वैश्य जातींत झालेले आहेत. पुढें कांहीं जन्म गवळ्याच्या जातींत होऊन मग ती दोन जन्म क्षेत्री (क्षत्रिय) कुळांत जन्मलेली आहे. आणि नंतर शेवटचे तिचे चार जन्म ब्राह्मण कुळामध्यें झालेले आहेत. या जातीच्या कोष्टकामध्यें मात्र बहिणाबाईच्या बाबतींत उत्क्रांतीचें तत्त्व बऱ्याच रीतीनें अनुकूलपणें लागू पडतें. वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण, ह्या जातींच्या चढत्या पायऱ्या उत्क्रांतीच्या चढत्या कलेबरोबर वाढत गेलेल्या दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु इतर जातींतील लोक-देखील उद्धरून गेल्याच्या कथा आपल्यापुढें पुष्कळ आहेत. त्यामुळें जातीच्या उत्क्रांतीच्या पायऱ्यांनीं एकादा जीवात्मा जेव्हां ब्राह्मणत्वाच्या पायरीपर्यंत येऊन पोहोंचेल, तेव्हांच त्याची आध्यात्मिक उन्नति पुरी होऊन तो उद्धरेल असा कांहीं नियम * दिसत नाहीं. बहिणाबाईच्या बाबतीमध्यें ब्राह्मणत्व आणि मुक्ति हा केवळ काकतालीय न्याय झालेला आहे. तरी पण या बाबतीमध्यें मानसिक उत्क्रांतीच्या बरोबर भौतिक उत्क्रांतीच्या पायऱ्या चढत चढत गेलेल्या आहेत, एवढी गोष्ट निर्विवाद आहे."

"बहिणाबाईच्या तेरा जन्मांमधून तिच्या जीवात्म्याची जर उत्तरोत्तर अधिकाधिक उत्क्रांतिच होत चाललेली होती तर कोणालाही साहजिकपणें असेंच वाटेल कीं, बहिणाबाईची जसजशी उत्क्रांति होत चालली होती, तसतसें तिला पुढील पुढील जन्मांतून ज्यास्त ज्यास्त संसारसुख प्राप्त होत जावें. परंतु बहिणाबाईच्या तेराही जन्मांतील चरित्राचें परीक्षण करून

---

* मुक्तीला ब्राह्मणत्वाची आवश्यकता तर नाहींच, पण उलट, स्त्रिया, वैश्य व शूद्र यांस देखील आमच्या उदार सनातन धर्मानें मोक्षाचा अधिकार देऊन ठेवलेला आहे. गजेंद्रादि पशूंच्या उद्धाराच्या गोष्टी अतिशयोक्तिपूर्ण मानल्या तरी, वाल्मीकि, पिंगला, महानंदा, अजामिळ ह्यांच्या चरित्रांवरून च गोष्ट सिद्ध होते. ग्रंथकर्ता.

पाहिलें, तरी या तत्त्वाला कोठेंही सत्यत्व प्राप्त झालेलें दिसून येत नाहीं. सांसारिक सुखांतील मुख्य अंगें म्हटलीं म्हणजे स्त्रियांना पतिसुख आणि पुत्रसुख हीं होत. त्यांपैकीं बहिणाबाईला पहिल्या तीन जन्मांमध्यें, या सुखाचें वारेंही लागलेलें नव्हतें. कारण त्या तीन जन्मांत तिचें मुळीं लग्नच झालेलें नव्हतें, असें वर्णन आढळतें. बहिणाबाईचीं पहिल्या तीन जन्मांतील वयें अनुक्रमें १३, २८, आणि २४ अशीं होतीं. इतकीं उपवर वयें झालेलीं असून त्या काळच्या चालीरीतींविरुद्ध बहिणाबाई अविवाहित कशी राहिली असेल हें समजणें कठीण आहे. परंतु तिचें पहिल्या तीन जन्मीं लग्न झालेलें नव्हतें हें तिच्या लिहिण्यावरून स्पष्ट होतें. तेव्हां या तीन जन्मांत तिला सांसारिक सुखाचा अनुभव लाधला नाहीं हें उघड आहे. पुढल्या चार जन्मांत तिची या बाबतींत कशी काय स्थिति होती याबद्दल मुळांत कांहींच उल्लेख नसल्यामुळें हे मधले चार जन्म सोडून व त्याचप्रमाणें आणि त्याच कारणाकरितां नववाही जन्म वगळून बाकीच्या जन्मांकडे पाहिलें असतां त्यांपैकीं बहिणाबाईच्या आठव्या जन्माचीही कहाणी या बाबतींत दुःखप्रदच आहे. "लग्न केलें परी भ्रतार नासला, हितावह झाला तोही मज" ह्या अभंगांत वर्णन केल्याप्रमाणें आठव्या जन्मीं तिचा भ्रतार नष्ट होऊन तिच्या संसाराचें मातेरें झालें. पुढें १०,११,१२ व १३ या चारीं जन्मांत तिचें लग्न होऊन तिला पतिसुख व कांहीं जन्मांत तिला पुत्रसुखही प्राप्त झाल्याचें वर्णन आहे. तरी पण सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें पाहतां तिचे हे शेवटले जन्म फारसे स्पृहणीय नव्हते. भिक्षा मागून तिनें चरितार्थ चालवावा, अशा प्रकारचीं वर्णनें यांतून आढळतात. सारांश, बहिणाबाईची जरी आध्यात्मिक उन्नति या सर्व जन्मांतून होत चाललेली होती, तरी त्या मानानें तिचें ऐहिक सुख जन्मोजन्मीं वृद्धि पावत चाललें होतें असें दिसून येत नाहीं. आणि परमार्थाच्या दृष्टीनें पाहिलें असतां असें होणें हेंहि स्वाभाविकच आहे. प्रपंचाच्या सुखांत मन रमलें, तर मग तें परमार्थाच्या सुखाला पात्र होण्याला व्यत्यय येईल; प्रत्यक्ष भ्रतार मरण

"कोष्टक नं. ३ यामध्यें बहिणाबाईच्या निरनिराळ्या जन्मांतील तिची जाति दिलेली आहे. तिचे पहिले तीन जन्म वैश्य जातींत झालेले आहेत. पुढें कांहीं जन्म गवळ्याच्या जातींत होऊन मग ती दोन जन्म क्षेत्री (क्षत्रिय) कुळांत जन्मलेली आहे. आणि नंतर शेवटचे तिचे चार जन्म ब्राह्मण कुळामध्यें झालेले आहेत. या जातीच्या कोष्टकामध्यें मात्र बहिणाबाईच्या बाबतींत उत्क्रांतीचें तत्त्व बऱ्याच रीतीनें अनुकूलपणें लागू पडतें. वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण, ह्या जातींच्या चढत्या पायऱ्या उत्क्रांतीच्या चढत्या कलेबरोबर वाढत गेलेल्या दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु इतर जातींतील लोक-देखील उद्धरून गेल्याच्या कथा आपल्यापुढें पुष्कळ आहेत. त्यामुळें जातीच्या उत्क्रांतीच्या पायऱ्यांनीं एकादा जीवात्मा जेव्हां ब्राह्मणत्वाच्या पायरीपर्यंत येऊन पोहोंचेल, तेव्हांच त्याची आध्यात्मिक उन्नति पुरी होऊन तो उद्धरेल असा कांहीं नियम * दिसत नाहीं. बहिणाबाईंच्या बाबतीमध्यें ब्राह्मणत्व आणि मुक्ति हा केवळ काकतालीय न्याय झालेला आहे. तरी पण या बाब-तीमध्यें मानसिक उत्क्रांतीच्या बरोबर भौतिक उत्क्रांतीच्या पायऱ्या चढत चढत गेलेल्या आहेत, एवढी गोष्ट निर्विवाद आहे."

"बहिणाबाईच्या तेरा जन्मांमधून तिच्या जीवात्म्याची जर उत्तरोत्तर अधिकाधिक उत्क्रांतिच होत चाललेली होती तर कोणालाही साहजिकपणें असेंच वाटेल कीं, बहिणाबाईची जसजशी उत्क्रांति होत चालली होती, तस-तसें तिला पुढील पुढील जन्मांतून ज्यास्त ज्यास्त संसारसुख प्राप्त होत जावें. परंतु बहिणाबाईच्या तेराही जन्मांतील चरित्राचें परीक्षण करून

---

* मुक्तीला ब्राह्मणत्वाची आवश्यकता तर नाहींच, पण उलट, स्त्रिया, वैश्य व शूद्र यांस देखील आमच्या उदार सनातन धर्मानें मोक्षाचा अधिकार देऊन ठेवलेला आहे. गजेंद्रादि पशूंच्या उद्धाराच्या गोष्टी अतिशयोक्तिपूर्ण मानल्या तरी, वाल्मीकि, पिंगला, महानंदा, अजामिळ ह्यांच्या चरित्रांवरून च गोष्ट सिद्ध होते. ग्रंथकर्ता.

पाहिलें, तरी या तत्त्वाला कोठेंही सत्यत्व प्राप्त झालेलें दिसून येत नाहीं. सांसारिक सुखांतील मुख्य अंगें म्हटलीं म्हणजे स्त्रियांना पतिसुख आणि पुत्रसुख हीं होत. त्यांपैकीं बहिणाबाईला पहिल्या तीन जन्मांमध्यें, या सुखाचें वारेंही लागलेलें नव्हतें. कारण त्या तीन जन्मांत तिचें मुळीं लग्नच झालेलें नव्हतें, असें वर्णन आढळतें. बहिणाबाईचीं पहिल्या तीन जन्मांतील वयें अनुक्रमें १२, २८, आणि २४ अशीं होतीं. इतकीं उपवर वयें झालेलीं असून त्या काळच्या चालीरीतींविरुद्ध बहिणाबाई अविवाहित कशी राहिली असेल हें समजणें कठीण आहे. परंतु तिचें पहिल्या तीन जन्मीं लग्न झालेलें नव्हतें हें तिच्या लिहिण्यावरून स्पष्ट होतें. तेव्हां या तीन जन्मांत तिला सांसारिक सुखाचा अनुभव लाधला नाहीं हें उघड आहे. पुढल्या चार जन्मांत तिची या बाबतींत कशी काय स्थिति होती याबद्दल मुळांत कांहींच उल्लेख नसल्यामुळें हे मधले चार जन्म सोडून व त्याचप्रमाणें आणि त्याच कारणाकरितां नववाही जन्म वगळून बाकीच्या जन्मांकडे पाहिलें असतां त्यांपैकीं बहिणाबाईच्या आठव्या जन्माचीही कहाणी या बाबतींत दुःखप्रदच आहे. "लग्न केलें परी भ्रतार नासला, हितावह झाला तोही मज" ह्या अभंगांत वर्णन केल्याप्रमाणें आठव्या जन्मीं तिचा भ्रतार नष्ट होऊन तिच्या संसाराचें मातेरें झालें. पुढें १०,११,१२ व १३ या चारीं जन्मांत तिचें लग्न होऊन तिला पतिसुख व कांहीं जन्मांत तिला पुत्रसुखही प्राप्त झाल्याचें वर्णन आहे. तरी पण सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें पाहतां तिचे हे शेवटले जन्म फारसे स्पृहणीय नव्हते. भिक्षा मागून तिनें चरितार्थ चालवावा, अशा प्रकारचीं वर्णनें यांतून आढळतात. सारांश, बहिणाबाईची जरी आध्यात्मिक उन्नति या सर्व जन्मांतून होत चाललेली होती, तरी त्या मानानें तिचें ऐहिक सुख जन्मोजन्मीं वृद्धि पावत चाललें होतें असें दिसून येत नाहीं. आणि परमार्थाच्या दृष्टीनें पाहिलें असतां असें होणें हेंहि स्वाभाविकच आहे. प्रपंचाच्या सुखांत मन रमलें, तर मग तें परमार्थाच्या सुखाला पात्र होण्याला व्यत्यय येईल; प्रत्यक्ष भ्रतार मरण

पावला असतां, " हितावह झाला तोही मज " असें जें बहिणाबाईनें आपल्या आठव्या जन्माच्या हकीकतींत म्हटलें आहे, तेंही याच दृष्टीनें होय, हें उघड आहे.'

यापुढें, बहिणाबाईची, तिच्या प्रत्येक जन्मांत, आध्यात्मिक उन्नति कसकशी होत गेली हें दाखविणारीं तिच्याच अभंगांतलीं कांहीं अवतरणें देऊन प्रोफेसरसाहेब म्हणतात, " बहिणाबाईचें हें तेरा जन्मांचें वर्णन म्हणजे मानवी बुद्धीला अगम्य, अदृश्य आणि अज्ञेय प्रदेशाचें थोडेंसें दारच उघडलेलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा दुर्लभ प्रसंगाचा फायदा घेऊन मानवी बुद्धीला बहुधा दुर्ज्ञेय अशा आणखी कांहीं ज्या शंका असतात, त्यांचें समाधान झाल्यास करून घ्यावें, अशी कोणाला जिज्ञासा उत्पन्न झाली, तर ती केवळ अस्थानींच आहे, असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं. कोणी मांत्रिक, अंगांत आलेला, ज्योतिषी किंवा सामुद्रिक आला असतां त्याला प्रश्न विचारून घेण्याची जशी स्वाभाविक प्रवृत्ति असते, तसाच बहुतेक हा प्रसंग आहे. म्हणून या प्रसंगीं आणखी एक प्रश्न उपस्थित करण्याकडे मानवी मनाची प्रवृत्ति होणें क्षम्य आहे. तो प्रश्न असा कीं, एका जन्मांतील मृत्यु आणि दुसऱ्या जन्माचा प्रारंभ यांच्यामध्यें किती काळ जातो ? बहिणाबाईच्या या तेरा जन्मांच्या हकीकतीमध्यें या प्रश्नाला कोठें कांहीं उत्तर सांपडतें काय, याचा आपण थोडासा तपास करूं. छांदोग्योपनिषदामध्यें या प्रश्नाबद्दलचा उल्लेख क्वचित् प्रसंगीं आलेला आहे व शंकराचार्यांनीं ब्रह्मसूत्रांवर जें भाष्य लिहिलें आहे त्यांतही ओघानें या विषयाचा उल्लेख केलेला आहे. परंतु कांहीं जन्म लवकर* प्राप्त होतात आणि कांहींना पुष्कळ अवधि लागतो, असें फक्त सामान्यत्वेंकरून त्यांत सांगितलेलें आहे, कालासंबंधीं विशेष नियम कांहींच सांगितलेला नाहीं."

"महाभारत, पुराणें, योगवासिष्ठ, गुरुचरित्र, इत्यादिकांतून पूर्वजन्माच्या ज्या कथा आहेत, त्यांत मधील अंतरें ठरविण्याला गमक अशीं प्रमाणें फारच

* या बाबतींत 'तृणजलूका'न्याय प्रसिद्धच आहे. ग्रंथकर्ता.

थोडीं आढळतात. त्यामुळें तेथें कांहींच निश्चय करितां येत नाहीं. प्लेटोनें, तसेंच थिऑसफिस्ट पंथांतील कांहीं लेखकांनीं यासंबंधीं प्रसंगवशात् जीं कांहीं विधानें केलेलीं आहेत, त्यांवरून त्यांच्या कल्पनेप्रमाणें एक जन्माचा शेवट आणि दुसऱ्या जन्माचा प्रारंभ यांच्यामध्यें शेंकडो वर्षें * लोटत असलीं पाहिजेत असें दिसतें. परंतु बहिणाबाईच्या या हकीकतीवरून इतकीं अतिशय वर्षें मध्यंतरीं लोटत असतील, असें दिसत नाहीं. बहिणाबाईनेंही मध्यंतरीं किती वर्षें लोटत होतीं, याबद्दल कोठेंच कांहीं स्पष्ट उल्लेख केलेला नाहीं. परंतु तिचे तेराही जन्म लवकर लवकर होत गेले असें अनुमान काढण्याला तिच्या कवितेमध्यें कित्येक ठिकाणी कांहीं आधार आहेत. बहिणाबाई आपल्या आठव्या जन्मीं वेरूळ येथील धर्मदत्त नामक एका क्षत्रियाच्या पोटीं जन्मास येऊन अठरा वर्षांची होऊन निवर्तल्यानंतर फिरून **नववीये जन्मीं तेथेंचि जन्मलें । नऊ वरुषें केलें स्थान तेंचि ॥ तेचि माता पिता तेचि बंधुवर्ग,'** असें बहिणाबाई म्हणते. आठव्या जन्मांत बहिणाबाई धर्मदत्ताच्या पोटीं आली तेव्हां त्याचें कमींत कमी वय धरलें तरी तें निदान १८ वर्षांचें असलें पाहिजे. त्या वर्षी त्याला मुलगी होऊन ती १८ वर्षांच्या वयाची होऊन मरण पावली असतां त्या वेळीं त्याचें वय ३६ वर्षांचें असलें पाहिजे. पुढें तीच मुलगी म्हणजे बहिणाबाई आपल्या नवव्या जन्मीं जेव्हां त्याच्या पोटीं आली, तेव्हां तो अतिशय वृद्ध झालेला असला तर पराकाष्ठा ६० वर्षांचा झालेला असेल; कारण या वयाच्या पलीकडे सामा-

---

* अलीकडे स्पिरिच्युआलिझम म्हणून जें एक नवीन शास्त्र अस्तित्वांत येऊं पहात आहे त्या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या लोकांचेंही असेंच म्हणणें आहे कीं मनुष्यप्राण्याचा आत्मा कांहीं वर्षें परलोकीं राहतो व नंतर तो पुनर्जन्म धारण करतो. 'प्लँचेट'च्या साहाय्यानें आमंत्रित केलेल्या एका आत्म्यास, दुसऱ्या एकाद्या आत्म्यास पाठवून देण्याची विनंति केली असतां, "त्या आत्म्यानें आतां पुनर्जन्म धारण केला असल्यामुळें त्याला पाठवून देतां येत नाहीं," असें उत्तर पहिल्या आत्म्याकडून अनेक वेळां मिळतें असें ते लोक सांगतात. **ग्रंथकर्ता.**

न्यत: संततिजननसामर्थ्य मानण्यांत येत नाहीं. तेव्हां अशा प्रकारची कल्पना केली तरी बहिणाबाईचा आठवा जन्म आणि नववा जन्म यांच्या दरम्यान पराकाष्टा २४ वर्षें गेलीं असावींत. याच्या पेक्षां कमीच गेलीं असलीं पाहिजेत; जास्त जाणें मात्र शक्य नाहीं."

"बहिणाबाईनें आपल्या तेरा जन्मांच्या जीवंतपणाच्या आयुष्याची म्हणून एकंदर बेरीज ३५१ वर्षांची असल्याचें सांगितलें आहे. परंतु वास्तविक पाहतां हा आंकडा बरोबर नाहीं. तिनें ज्या ज्या जन्मांचें आयुष्यमान सांगितलें आहे त्या त्या जन्मांच्या त्या त्या आयुष्यमानाची बेरीज केली असतां ती ३५१ होते हें खरें आहे. परंतु बहिणाबाईनें आपल्या चौथ्या, पांचव्या व सहाव्या जन्मांचीं वयमानें मुळींच कोठें सांगितलेलीं* नाहींत. तीं अंदाजानें मिळविलीं असतां तिच्या तेरा जन्मांच्या आयुष्यमानाची बेरीज सुमारें ४०० वर्षांची होईल. म्हणजे अठराव्या+ शतकांतील बहिणाबाईचे तेरा जन्म लागोपाठ मधल्या अंतराशिवाय झाले असें मानलें, तर बहिणाबाईचा या तेरा जन्मांपैकींचा पहिला जन्म चौदाव्या शतकांत झाला असें प्राप्त होतें. परंतु प्रत्येक जन्मामध्यें कांहीं तरी अंतर गेलेलें असलेंच पाहिजे. परंतु तें अंतर फार नसावें, हें पूर्वींच्या आठव्या आणि नवव्या जन्मामधील अंतराच्या विवेचनावरून दिसून येत आहे. याशिवाय आणखीही एक कारण दिसत आहे, तें असें कीं, बहिणाबाईनें आपल्या जन्मांचीं ठिकाणें दिलेलीं आहेत, त्यांपैकीं पहिल्या जन्माचें ठिकाण बेटावद हेंच गांव होय, याबद्दल कोणालाही शंका येण्याचें कारण नाहीं. आतां बेटावद हें नांव कांहीं फारसें जुनें नाहीं. हें पौराणिक नांव नाहीं. हें संस्कृत

* कदाचित् ह्या तीन जन्मीं ती अगदींच अल्पायुषी होऊन वारली असेल. **ग्रंथकर्ता.**

+ येथें 'सतराव्या शतकांतील' असें पाहिजे. कारण बाईचा जन्म शके १५५० त व मृत्यु १६२२त झाला. यांत ७८ मिळविले म्हणजे इ. स. १६२८ हा जन्म सन व १७०० हा मृत्यु सन येतो. अर्थात् हें सतरावें शतक. **ग्रंथकर्ता.**

नांव नाहीं. हें अलीकडील काळांतील आणि अपभ्रष्ट भाषेंतील ( व्युत्पत्तीच्या दृष्टीनें तळोदें ( तल+उदक किंवा तल देश ), सावदें, शहादें वगैरे सारख्या खानदेशांतील इतर गांवांच्या नांवांशीं अंशतः साम्य असलेलें ) कांहीं तरी एक नांव आहे. तेव्हां आतां बहिणाबाई ही आपल्या पहिल्या जन्माचें ठिकाण आपल्या तेराव्या जन्माच्या भाषेंत बदलून न सांगतां पहिल्या प्रचलित असलेल्या रूढ शब्दोच्चारपद्धतीप्रमाणें स्वाभाविक सांगत आहे, अशी सरळ कल्पना घेऊन जोंपर्यंत आपण चाललों आहों, तोंपर्यंत बेटावद या गांवाला ज्या कालीं बेताउद असें म्हणत असतील, तो काळ चौदाव्या शतकापेक्षां पराकाष्ठा दोनतीन शतकांहून फारसा मागें असेल असें मानण्याला कांहीं कारण नाहीं. ही विचारसरणी आपण ग्राह्य धरली, तर दहा अकराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतच्या दरम्यानच्या काळामध्यें बहिणाबाईचे हे तेरा जन्म झाले असावेत, असें अनुमानानें म्हणतां येतें. याच्यापेक्षां जास्त अनुमानें काढण्याला मूळ ग्रंथांत जास्त आधार नाहींत; यामुळें या अज्ञेय प्रदेशांतील ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा मोठ्या कष्टानें येथेंच थांबवावी लागत आहे, त्यास इलाज नाहीं.''

बहिणाबाईंनीं आपल्या अंतकालीं, घाईघाईनें नमूद करून ठेवलेल्या, आपल्या अनेक पूर्वजन्मांच्या तुटपुंज्या व त्रोटक माहितीच्या आधारानें प्रो. शिवरामपंतांनीं केलेलें हें विस्तृत विवेचन त्यांच्या विद्वत्तेस शोभण्यासारखें आहे, यांत संशय नाहीं. जितक्या निरनिराळ्या दृष्टींनीं या विषयाचा विचार करणें शक्य होतें, तितक्या सर्व दृष्टींनीं विचार करून, त्यावरून जेवढीं अनुमानें काढतां येण्यासारखीं होतीं, तेवढीं सर्व त्यांनीं काढलीं आहेत व अशा या सुंदर लेखाचा संग्रह एखाद्या मासिक पुस्तकांत होण्यापेक्षां, खुद्द बहिणाबाईंच्या या चरित्रांतच होणें अधिक योग्य होय, हें लक्ष्यांत घेऊन सदर लेखाच्या बऱ्याच मोठ्या भागाचें अवतरण मी येथें मुद्दाम केलें आहे.

आतां प्रोफेसरसाहेबांच्या सूक्ष्म दृष्टींतून निसटलेल्या दोन गोष्टींचा येथें उल्लेख करून पुढें वळतों. पहिली गोष्ट ही कीं, बहिणाबाईंच्या तेरा जन्मस्थलांपैकीं, ज्या सात स्थळांचीं नांवें बाईंनीं दिलेलीं आहेत, तीं सर्व स्थलें

न्यतः संततिजननसामर्थ्य मानण्यांत येत नाहीं. तेव्हां अशा प्रकारची कल्पना केली तरी बहिणाबाईचा आठवा जन्म आणि नववा जन्म यांच्या दरम्यान पराकाष्टा २४ वर्षें गेलीं असावींत. याच्या पेक्षां कमीच गेलीं असलीं पाहिजेत; जास्त जाणें मात्र शक्य नाहीं. ”

“ बहिणाबाईनें आपल्या तेरा जन्मांच्या जीवंतपणाच्या आयुष्याची म्हणून एकंदर बेरीज ३५१ वर्षांची असल्याचें सांगितलें आहे. परंतु वास्तविक पाहतां हा आंकडा बरोबर नाहीं. तिनें ज्या ज्या जन्मांचें आयुष्यमान सांगितलें आहे त्या त्या जन्मांच्या त्या त्या आयुष्यमानाची बेरीज केली असतां ती ३५१ होते हें खरें आहे. परंतु बहिणाबाईनें आपल्या चौथ्या, पांचव्या व सहाव्या जन्मांचीं वयमानें मुळींच कोठें सांगितलेलीं* नाहींत. तीं अंदाजानें मिळविलीं असतां तिच्या तेरा जन्मांच्या आयुष्यमानाची बेरीज सुमारें ४०० वर्षांची होईल. म्हणजे अठराव्या+ शतकांतील बहिणाबाईचे तेरा जन्म लागोपाठ मधल्या अंतराशिवाय झाले असें मानलें, तर बहिणाबाईचा या तेरा जन्मांपैकींचा पहिला जन्म चौदाव्या शतकांत झाला असें प्राप्त होतें. परंतु प्रत्येक जन्मामध्यें कांहीं तरी अंतर गेलेलें असलेंच पाहिजे. परंतु तें अंतर फार नसावें, हें पूर्वींच्या आठव्या आणि नवव्या जन्मामधील अंतराच्या विवेचनावरून दिसून येत आहे. याशिवाय आणखीही एक कारण दिसत आहे, तें असें कीं, बहिणाबाईनें आपल्या जन्मांचीं ठिकाणें दिलेलीं आहेत, त्यांपैकीं पहिल्या जन्माचें ठिकाण बेटावद हेंच गांव होय, याबद्दल कोणालाही शंका येण्याचें कारण नाहीं. आतां बेटावद हें नांव कांहीं फारसें जुनें नाहीं. हें पौराणिक नांव नाहीं. हें संस्कृत

---

* कदाचित् ह्या तीन जन्मीं ती अगदींच अल्पायुषी होऊन वारली असेल. **ग्रंथकर्ता.**

+ येथें ‘ सतराव्या शतकांतील’ असें पाहिजे. कारण बाईचा जन्म शके १५५० त व मृत्यु १६२२त झाला. यांत ७८ मिळविले म्हणजे इ. स. १६२८ हा जन्म सन व १७०० हा मृत्यु सन येतो. अर्थात् हें सतरावें शतक. **ग्रंथकर्ता.**

नांव नाहीं. हें अलीकडील काळांतील आणि अपभ्रष्ट भाषेंतील (व्युत्पत्तीच्या दृष्टीनें तळोदें (तल+उदक किंवा तल देश), सावदें, शहादें वगैरे सारख्या खानदेशांतील इतर गांवांच्या नांवांशीं अंशतः साम्य असलेलें) कांहीं तरी एक नांव आहे. तेव्हां आतां बहिणाबाई ही आपल्या पहिल्या जन्माचें ठिकाण आपल्या तेराव्या जन्माच्या भाषेंत बदलून न सांगतां पहिल्या प्रचलित असलेल्या रूढ शब्दोच्चारपद्धतीप्रमाणें स्वाभाविक सांगत आहे, अशी सरळ कल्पना घेऊन जोंपर्यंत आपण चाललों आहों, तोंपर्यंत बेटावद या गांवाला ज्या कालीं बेताउद असें म्हणत असतील, तो काळ चौदाव्या शतकापेक्षां पराकाष्ठा दोनतीन शतकांहून फारसा मागें असेल असें मानण्याला कांहीं कारण नाहीं. ही विचारसरणी आपण ग्राह्य धरली, तर दहा अकराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतच्या दरम्यानच्या काळामध्यें बहिणाबाईचे हे तेरा जन्म झाले असावेत, असें अनुमानानें म्हणतां येतें. याच्यापेक्षां जास्त अनुमानें काढण्याला मूळ ग्रंथांत जास्त आधार नाहींत; यामुळें या अज्ञेय प्रदेशांतील ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा मोठ्या कष्टानें येथेंच थांबवावी लागत आहे, त्यास इलाज नाहीं."

बहिणाबाईंनीं आपल्या अंतकालीं, घाईघाईनें नमूद करून ठेवलेल्या, आपल्या अनेक पूर्वजन्मांच्या तुटपुंज्या व त्रोटक माहितीच्या आधारानें प्रो. शिवरामपंतांनीं केलेलें हें विस्तृत विवेचन त्यांच्या विद्वत्तेस शोभण्यासारखें आहे, यांत संशय नाहीं. जितक्या निरनिराळ्या दृष्टींनीं या विषयाचा विचार करणें शक्य होतें, तितक्या सर्व दृष्टींनीं विचार करून, त्यावरून जेवढीं अनुमानें काढतां येण्यासारखीं होतीं, तेवढीं सर्व त्यांनीं काढलीं आहेत व अशा या सुंदर लेखाचा संग्रह एखाद्या मासिक पुस्तकांत होण्यापेक्षां, खुद्द बहिणाबाईंच्या या चरित्रांतच होणें अधिक योग्य होय, हें लक्ष्यांत घेऊन सदर लेखाच्या बऱ्याच मोठ्या भागाचें अवतरण मी येथें मुद्दाम केलें आहे.

आतां प्रोफेसरसाहेबांच्या सूक्ष्म दृष्टींतून निसटलेल्या दोन गोष्टींचा येथें उल्लेख करून पुढें वळतों. पहिली गोष्ट ही कीं, बहिणाबाईंच्या तेरा जन्मस्थलांपैकीं, ज्या सात स्थळांचीं नांवें बाईंनीं दिलेलीं आहेत, तीं सर्व स्थलें

या भरतखंडांतलींच आहेत व सहा स्थळें तर खुद्द महाराष्ट्रांतलींच आहेत. यावरून, एकदा या कर्मभूमींत–भारतवर्षांत–जन्मास आलेला मनुष्यप्राणी, पुनः दुसऱ्या कोणत्याही देशांत जन्म न पावतां, मुक्त होईपर्यंत, सगळे जन्म याच देशांत धारण करितो, असें अनुमान काढतां येईल कीं काय, हें वाचकांनीं ठरवावें. दुसरी गोष्ट ही कीं, बाईंनीं आपल्या तेरा जन्मांतल्या आईबापांपैकीं ज्यांचीं नांवें नमूद केलीं आहेत, त्यांतील अकराव्या जन्मापर्यंतचीं, केदार सात्विक, वर्धमान, धर्मदत्त, कौशिक आणि गोकर्ण हीं बापांची व रूपवंती, भामिनी, आणि अद्भुता हीं आईचीं नांवें हल्लीं प्रचारांत नसलेलीं परंतु पूर्वीं रूढ असलेलीं अशीं आहेत. त्याचप्रमाणें वारुणी, हेमकळा, आणि सौजिन्या हीं खुद्द बाईचीं, अनुक्रमें, त्यांच्या पहिल्या, तिसऱ्या व अकराव्या जन्मांतील नांवें अशाच प्रकारचीं आहेत. दुसऱ्या जन्मांतील गुरूचें सुवर्मा हें नांवही जुन्यापैकींच आहे. यावरून बाईंनीं दिलेली हकीकत, कालक्रमानें होत गेलेल्या नांवांच्या सुधारणेसही धरून आहे असें दिसतें. अस्तु.

बहिणाबाईंच्या अभंगांचा जो एक भाग प्रसिद्ध झाला आहे, त्याचे प्रकाशक रा. उमरखाने यांनीं "बाईंच्या कवितेचा आणखी शोध चालविला असून, नवीन माहिती व अभंग त्यांना मिळत आहेत. ती सर्व माहिती व ते सर्व अभंग प्रसिद्ध झाल्यावर बहिणाबाईंच्या चरित्रावर आधिक प्रकाश पडेल," असें 'मुमुक्षु' पत्राच्या, ता. १९ फेब्रुवारी, सन १९१४ च्या अंकांत संपादकांनीं लिहिलें आहे, परंतु त्या नंतरच्या ९ वर्षांत रा. उमरखाने यांजकडून कांहींच नवीन माहिती प्रसिद्ध झालेली दिसत नाहीं. 'मुमक्षु' पत्राच्या उपरिनिर्दिष्ट अंकांतील, " संत बहिणाबाई, लेखांक १" यांत संपादकांनीं बाईंच्या गुरुपरंपरेविषयीं पुढीलप्रमाणें माहिती दिली आहे:—बाईंची गुरुपरंपरा अशी आहे. आदिनाथ शंकरापासून मत्स्येंद्रनाथ, त्यांचे गहिनीनाथ, त्यांचे निवृत्तिनाथ व त्यांचे शिष्य ज्ञानेश्वर. ही परंपरा आदिनाथ शंकरापासून ज्ञानेश्वरमहाराजांपर्यंत अशीच ज्ञानेश्वरीच्या उपसंहारांत दिलेली आहे.

**तेथोनि ज्ञानेश दिधले प्रसाद । झाले ते प्रसिद्ध सिद्धासनीं ॥**
**सच्चिदानंदबाबा भक्तीचा आगर । त्यासी अभयवर ज्ञानें केला ॥**
**पुढें विश्वंभर शिवरूप सुंदर । तेणें राघवीं विचार ठेविलासे ॥**
**केशव चैतन्य बाबाजी चैतन्य । झालेसे प्रसन्न तुकोबासी ॥**
**एकनिष्ठ भाव तुकोबाचे चरणीं । म्हणोनि बहेणि लाधलीसे ॥**

ज्ञानेश्वरांचे शिष्य व ज्ञानेश्वरीचे लेखक सचिदानंदबाबा, त्यांचे अनुग्रहित विश्वभंर, त्यांचे राघव, त्यांचे केशवचैतन्य, त्यांचे बाबाजीचैतन्य, त्यांचे तुकाराम महाराज व त्यांची बहिणाबाई म्हणजे ही गुरुपरंपरा अशी आहे:-

आदिनाथ शंकर-मत्स्येंद्रनाथ-गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तिनाथ-ज्ञानेश्वर-सच्चिदानंद बाबा-विश्वंभर-राघवचैतन्य-केशवचैतन्य-बाबाजी-चैतन्य-तुकाराम-बहिणाबाई.

ही गुरुपरंपरा फार महत्त्वाची आहे. तुकाराम महाराजांनीं,

**राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची ॥**
**बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ॥**

एवढेंच म्हटलें आहे, पण यावरून बुवांच्या गुरुपरंपरेचा पूर्ण बोध होत नव्हता. त्याचा उलगडा बहिणाबाईच्या अभंगावरून बराच होतो. ज्ञानेश्वर-महाराजांच्या परंपरेंतले तुकारामबुवा आहेत, हें पाहून "ज्ञानेबा • माउली तुकाराम" हें भजन करणाऱ्या लोकांस, वरील इंगित लक्ष्यांत येऊन आनंद वाटेल यांत शंका नाहीं. तुकारामबुवांचे दुसरे शिष्य निळोबा यांनीं आपली गुरुपरंपरा येणेंप्रमाणें दिली आहे:—

महाविष्णु ( हंस )—ब्रम्हदेव—नारद—व्यास—राघव चैतन्य—केशव चैतन्य—बाबाजी चैतन्य—तुकाराम—निळोबा.

बहिणाबाई व निळोबाराय दोघेंही तुकाराममहाराजांचे शिष्य असतां त्यांच्या परंपरा कांहींशा भिन्न कां असाव्या हें गूढ दिसतें." हें गूढ, रा. पांगारकर यांस आपल्या तुकाराम-चरित्रांतदेखील उकलतां आलेलें नाहीं. असो.

बहिणाबाईच्या कवितांचें जें पुस्तक रा. उमरखाने यांनीं प्रसिद्ध केलें आहे त्यांत, अभंग, ओव्या, पदें, श्लोक, आरत्या वगैरे मिळून बाईंच्या एकंदर ५८१ कविता समाविष्ट झालेल्या आहेत. शिवाय, बाईंचा मुलगा विठ्ठल यानें बाईंवर रचलेल्या दोन आरत्या शेवटीं दिल्या आहेत. रा. उमरखाने यांनी प्रस्तावनेंत असे म्हटलें आहे कीं "हा हस्तलिखित प्राचीन ग्रंथ संत बहिणाबाई यांचे वंशजांपाशीं होता; त्यांना मी हा ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याची उत्कट इच्छा प्रदर्शित केल्यावरून, त्यांनीं अनमान न करतां तो दिला, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें." यावरून, बाईंच्या वंशजांपाशीं असलेली बाईची सगळी कविता रा. उमरखाने यानीं प्रसिद्ध केली आहे हें उघड दिसतें. अर्थात् याशिवाय बाईंची आणखी कांही कविता अनुपलब्ध असेल असें अनुमान करण्यास फारशी जागा आहे असें वाटत नाहीं. बहिणाबाईंची कविता अगदीं सोपी असून, अपरिचित असे फारसे शब्द तींत नाहींत. परंतु बाईंचा पारमार्थिक अधिकार फार मोटा असल्यामुळें व त्यांची सगळीच कविता स्वयंस्फूर्तिजन्य असल्यामुळें, एक प्रकारचें दिव्य तेज ह्या कवितेंत सर्वत्र चमकत आहे. नमुन्यासाठीं बाईंच्या कवितेंतले २५ वेंचे येथें देतों.

१ आम्ही तों निर्हेत साक्ष ऐसी येत। भोगांमाजी चित्त क्षण नाहीं ॥
आतां मना तुझें येथें काय चाले। निर्हेत पाउलें विठ्ठलाचीं ॥
मनांत पाहिलें बुद्धींत गाइलें। चित्तांत ध्याइलें विठ्ठलासी ॥
वासना गाळिली सर्वही चाळिली। शांति स्थिरावली विठ्ठलीं हे ॥
काम क्रोध लोभ मत्सराचें अंग। झाला पांडुरंग आपणचि ॥
बहेणि म्हणे मना हेतूचा उगाणा। करुनी निर्वाणा पहातसे ॥

२ नयन गोंविलें ध्यानीं केशवाचे। श्रवण ते हरीचे कीर्तनीं हो ॥
विवेकें इंद्रियां दाखवुनी सुख। गोंविलीं आणिक नाठविती ॥
वाचा हे गोंविली नामसंकीर्तनीं। सेवा मुक्तपाणि केशवातें ॥
पाय तीर्थयात्रा देवांच्या दर्शना। कर्मेंद्रिय खुणा ओळखाव्या ॥

दहाही इंद्रियें विवेकें गोंविलीं । मना तूं निर्बळी याचि योगें ॥
बहेणि म्हणे मना विषयसेवनीं । न येती नेमुनी टाकिलीं तीं ॥

३ भक्ति हें कारण साधन वरिष्ठ । रोकडें वैकुंठ हातीं वसे ॥
स्थिर करीं चित्त प्रेम अखंडित । पावसी अच्युतपद पाहें ॥
भक्तीपाशीं ज्ञान वैराग्य आंदणें । सर्वही साधनें लया जाती ॥
बहेणि म्हणे भक्ति विरक्तीचें मूळ । चित्त हें निश्चळ करीं कां रे ॥

४ नामसंकीर्तन सर्व काळ जया । भक्तिवंत तया म्हणों आम्ही ॥
क्षण एक नाहीं नामेवीण वाचा । सोस हा भक्तीचा सर्व काळ ॥
नेत्रीं हरिध्यान मुखीं तें कीर्तन । सर्वदां श्रवण मोक्षशास्त्रें ॥
सेवा घडे हातें पायीं प्रदक्षिणा । विश्रांति धारणा आत्मयाची ॥
आठही प्रहर नाहीं आराणुक । संतां घरीं रंक होउनि ठेला ॥
बहेणि म्हणे भक्ति खरी मोक्षदाती । पाहिजे संगती संतसेवा ॥

५ प्रपंच असत्य कळों आला जया । विषय हे तया नावडती ॥
उदासीनापरी वर्ततो प्रपंचीं । आशा हे मनाची सांडोनियां ॥
मनाचा स्वभाव संकल्प विकल्प । होय साक्षीरूप तयांचाही ॥
बुद्धीचा निश्चय अनुसंधानीं चित्त । अहंकारीं हेत अहंतेचा ॥
सर्वही मायिक व्यवहार जाणती । निश्चय अद्वैतीं ठेवुनियां ॥
बहेणी म्हणे माया सत्य ना असत्य । श्रीगुरूनें तथ्य सांगितलें ॥

६ ब्रम्ह तों अद्वय श्रुतीचे संमतें । वेगळी माया ते म्हणों कैसी ॥
कोणासी पुसावें मायेचें ठिकाण । सद्गुरूवांचून सत्य जाणा ॥
सुवर्ण कांकण नाम मात्र भिन्न । ज्ञानदृष्टी जाण ओळखावें ॥
तोय तरंग एक भेद नाममात्र । ऐक्य हें सर्वत्र ज्ञानदृष्टी ॥
सूत वस्त्र दोन्ही ऐक्यता सहजें । ज्ञानदृष्टी ओजें पाहिलिया ॥
बहेणि म्हणे ऐसा पाहतां विवेक । सहजचि ऐक्य माया ब्रह्मीं ॥

७ सूर्याचिये घरीं राहणें जयासी । अंधकार त्यासी स्वप्नीं नाहीं ॥
तैसा स्वानुभवी न देखे तो माया । ब्रम्ह तो अद्वयानंद अंगें ॥
परीस तो जाणे काय सोनें लोह । निर्ममते मोह कदा नाहीं ॥
बहेणि म्हणे न लागे तृषा ते जीवना । पूर्णत्वें भावना भावशुद्धि ॥

८ सूर्याचिये अंगीं भासलें मृगजळ । सूर्य तो केवळ नेणे तया ॥
तैसी जाण माया ब्रम्हींच आभासे । परी स्पर्श नसे ब्रम्हत्वासी ॥
चुंबकासन्निध लोहासी भ्रमण। सूर्यसत्ते जन वर्ततसे ॥
बहेणि म्हणे ऐसा अनुभव पाहिजे । स्वसुखीं राहिजे निरंतर ॥

९ द्रश्य आणि द्रष्टा दर्शनें समवेत । ब्रम्ह सदोदित सर्व काळ ॥
काय घेऊं काय सांडूं कोणीकडे । अनंत ब्रम्हांडें रोमरंध्रीं ॥
ध्येय ध्याता ध्यान ज्ञेय ज्ञप्ति ज्ञान । साध्य तो साधन आपण झाला ॥
बहेणि म्हणे द्वैत स्वप्नामाजी नसे । अवघाचि प्रकाशे राम माझा ॥

वरील अभंगांत व्यक्त झालेलें बहिणाबाईचें विलक्षण अध्यात्मज्ञान पाहून वाचकांस मोठें कौतुक आणि आश्चर्य वाटेल यांत संशय नाही. "बाईचें हें वेदांतज्ञान पाहून आमच्या स्वतःच्या ज्ञानाच्या आकुंचितपणाबद्दल लाज वाटते," अशा अर्थाचे उद्गार कै. गुलाबरावांसारख्या महान् अधिकारी पुरुषानें काढले ते उगाच नव्हत.

आपणास मोक्षमार्गाचें ज्ञान करून देणारा अधिकारी पुरुष कोणी भेटत नाहीं. निव्वळ शब्दज्ञान सांगून स्वतःची प्रशंसा करणारांचाच भरणा मोठा, असा स्वानुभव सांगतांना बाई म्हणतात:—

१० जेथें पुसों जावें तेथें अभिमान । आपुलेंचि ज्ञान प्रतिष्ठी तो ॥
जाणोनी अंतर न सांगती कोणी । कोणाचे वचनीं स्थिर राहों ॥
तप हें लक्षण सांगती धारणा । नाना उपासना नाना मंत्र ॥
एक ते सांगति पंच मुद्रा जप । एवं खटाटोप आसनाचा ॥

एक ते सांगती तीर्थें तपें व्रत । एक ते अनंत पूजाविधि ॥
बहेणि म्हणे आतां नव्हे स्थिर मन । जेथें तेथें गुण अविद्येचा ॥

११ कामाचे विकिले क्रोधाचे जिंकिले । लोभाचे अंकिले सर्वभावें ॥
तयांसी पुसतां काय देती सुख । अंतरीं विवेक नाहीं जयां ॥
आशेलागीं जयां आंदण दिधलें । ममतेचे झाले सेवक ते ॥
बहेणि म्हणे तेचि ग्रासिले मायेनें । आम्हां सोडवणें केंवी होती ॥

संतमहिमा—

१२ दुसरियाचे दुःखें शिणे ज्याचें चित्त । तोचि एक संत* ओळखावा ॥
तयासी पुसतां हरील तो शीण । दुःख घे हिरोन रोकडेंचि ॥
परोपकार जया आलासे विभागी । शांति हे सर्वांगीं डोलतसे ॥
बहेणि म्हणे नाहीं आपुलें पारिखें । वर्तती विवेकें ज्ञानदृष्टी ॥

श्रीपांडुरंगवर्णन—

१३ माझा दीननाथ दीनबंधु हरि । नांदे भीमातीरीं पंढरिये ॥
विटे नीट उभा समचरण साजिरीं । पाउलें गोजिरीं सकुमार ॥
वैजयंती माळा रुळतसे गळां । कांसेसी पिंवळा पीतांबर ॥
भाळीं उर्ध्व पुंड्र कुंडलें गोमटीं । चंदनाची उटी सर्वांगासी ॥
शिरीं टोप साजे रत्नाचा साजिरा । काढियेला तुरा मोतियांचा ॥
जैशा हिऱ्याचय़ा शोभती दंतपंक्ति । बहेणि म्हणे ध्याती हृदयामाजी ॥

उपदेश—

१४ आणिलें उसनें पांचांचें शरीर । साधावया सार मोक्षपंथ ॥
येथें तुवां जरी मांडिला आळस । होइल तरी नाश स्वहिताचा ॥

---

* बहिणाबाईंची ही संताची व्याख्या आणि "जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा॥" ही तुकारामबुवांची व्याख्या, जवळ जवळ एकच आहे.

भाड्याचें घोडें करुनी आणिलें । पाहिजे साधिलें कार्य त्वरें ॥
बहेणि म्हणे ज्याचें नेईल तो धनी । होईल ते हानि स्वहिताची ॥

मृत्युलोकीं पुन: पुन: जन्म घेणें कोणास भाग पडतें ?

१५ कर्म करी देहीं धरूनि फळाशा । द्वैताचा वळसा जयापाशीं ॥
तयासी हा जाण प्राप्त मृत्युलोक । रजोगुणी एक ओळखावा ॥
गर्व जयापाशीं क्रोध सर्व काळ । निद्रा ते जवळ ठेविलिसे ॥
मोहाची सांखळी सर्व काळ कंठीं । परस्त्रिया दृष्टी न्याहाळीत ॥
आलियानें घरा इंद्राची संपत्ति । समाधान चित्तीं नाहीं जया ॥
पापिया निष्ठुर विषयांचा ध्यास । जया अविश्वास सर्व काळ ॥
चुंबक निंदक भूतमात्रीं द्रोह । नाहीं नि:संदेह चित्त ज्याचें ॥
बहेणि म्हणे ऐसा वर्ते जो मानसीं । मृत्युलोकीं त्यासी देह घेणें ॥

बहिणाबाईचे कांहीं अभंग तुकारामबुवांच्या अभंगांशीं अगदीं सदृश आहेत. खालील अभंग पहा:—

१६ भक्तिप्रेमसुख न कळे आणिकां । पंडितां वाचकां वैदिकांसी ॥
जीवन्मुक्त जरी झाला आत्मनिष्ठ । भक्तिप्रेमसुख दुर्लभ त्या ॥
अभेदुनी भेद स्थापिला पैं अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥
बहेणि म्हणे देव कृपा करिल कांहीं । तरीच हें ठायीं पडे वर्म ॥

आतां तुकारामबुवांच्या खालील अभंगाशीं वरील अभंग ताडून पहा-

भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसी ॥
आत्मनिष्ठ जरी जाले जीवन्मुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥
तुका म्हणे कृपा करिल नारायण । तरीच हें वर्म पडे ठावें ॥

किती विलक्षण साम्य !

बहिणाबाईनीं ब्राम्हणाचें महत्व फार वर्णिलें आहे, परंतु ब्राह्मणाच्या जातींत जन्म पावला तो ब्राह्मण अशी मात्र त्यांची ब्राह्मणाची व्याख्या नाहीं, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. या संबंधानें त्यांनीं खालील अभंगांत केलेलें विवरण मननीय आहे:—

१७ जीव हा ब्राह्मण ह्मणावें इत्यर्थ । तरी येथें अर्थ सांपडेना ॥
सर्वां ठायीं जीव सारिखाचि एक । पशुपक्षी देख चांडाळादि ॥
पुढें जीव होती मागें बहु झाले । ब्राह्मणत्व आलें नाहीं तया ॥
बहेणि म्हणे जीव प्राणीमात्रीं एक । ब्राह्मणत्व देख म्हणों नये ॥

१८ जरा—मृत्यु-भय सर्वांसी समान । तरी ते ब्राह्मण केंवि म्हणों ॥
यालागीं विवेक धरुनी मानसीं । ब्राम्हणपदासी ओळखावें ॥
माता पितृव्याचे जाळिलें शरीरा । ब्रह्महत्या नरा केंविं नोहे ॥
बहेणि म्हणे देह ब्राह्मण तो नव्हे । विवेकवैभवें विचारितां ॥

१९ आतां वर्ण हाचि ब्राह्मण म्हणावा । तरी तो अनुभवा नये कांहीं ॥
ब्राह्मण वेगळा वर्णही अतीत । पहातां निश्चित भासतसे ॥
श्वेत तो ब्राम्हण क्षत्री तो आरक्त । वैश्य वर्ण पीत नाहीं ऐसे ॥
कृष्ण वर्ण शद्र नाहीं ऐसा भेद । आयुष्याचा नाद सारिखाचि ॥
बहेणि म्हणे वर्ण ब्राम्हण तो नव्हे । विवंचुनी पाहें मनामाजी ॥

२० आतां यातीलागीं म्हणातें ब्राह्मण । तरी तें निर्वाण नये चित्ता ॥
निरसुनी सर्वही विचारावें हातें । उरे ते आईतें ओळखावें ॥
ऋष्यशृंगी झाला मृगीचीये पोटीं । गौतम शेवटीं कुशास्तरणीं ॥
जंबुक ऋषी तो जन्मला जांभुळीं । वाल्मीकाची कुळी वारुळीं ते ॥
कैवर्तकीपोटीं व्यास तो जन्मला । विश्वामित्र झाला क्षेत्रणीचा ॥
वसिष्ठाचा जन्म उर्वशी उदरीं । अगस्ति निर्धारीं कलशोद्भव ॥
नारद प्रसिद्ध ठाउका सर्वांसी । दासी हे तयासी प्रसवली ॥
बहेणि म्हणे जाती नव्हेची ब्राह्मण । ब्राह्मणाची खूण वेगळीच ॥

पुढें, पांडित्य, ब्रम्हकर्म, इत्यादिकांचाही ब्राह्मण्यार्शा कांहीं संबंध नाहीं असें स्पष्ट सांगून, खऱ्या ब्राह्मण्याची व्याख्या बाईनीं पुढीलप्रमाणें केली आहे:—

२१ गुणांत असोन गुणासी नातळे । क्रियेसी न कळे अणुमात्र ॥
तोचि रे ब्राह्मण ओळखावा जनीं । द्वैत तया स्वप्नीं आढळेना ॥
षडुर्मिरहित षड भाव नातळे । दोषांचेनि मेळे सांपडेना ॥
बहेणि म्हणे सत्य न सांडी सर्वथा । ब्राह्मण तत्वता तोचि एक ॥

२२ निर्विकल्प जया समाधि जोडली । चित्तासी अमोलीं परब्रम्हीं ॥
तोचि एक खरा ब्राम्हण वेदार्थें । आणिक तीं मतें पाखंडाचीं ॥
सर्वां भूतीं एक आत्मा देखियेला । शांतीचा ओतिला मूर्तिमंत ॥
बहेणि म्हणे जैसें आकाश सर्वत्र । तैसा तो एकत्र जगामाजी ॥

२३ शम दम सर्व साधिले नवगुण ॥ संतोषसंपन्न सर्वदा जो ॥
ब्राम्हण वरिष्ठ श्रेष्ठाचाही श्रेष्ठ । जयाचेनि भ्रष्ट मोक्ष पावे ॥
तृण मोह दंभ गेला अहंकार । वृत्ति निर्विकार सर्व कर्मीं ॥
बहेणि म्हणे ज्याची निरसली वासना । ब्राह्मण तो जाणा ब्रम्हनिष्ठ ॥

बहिणाबाईंच्या श्लोकाचा नमुना—

२३ गुरुकृपा जरि पूर्ण असे तया । शरण त्या श्रुतिशास्त्रकथा तया ॥
हरिहरादिक किंकर दास हे । म्हणतसे बहिणी कवतूक हें ॥

२४ गुरू तो खरा जो बरा ज्ञाननिष्ठ । स्वधर्मक्रिया पाळि जो वेदनिष्ठ ॥
जया ज्ञानतत्वार्थ शुद्ध प्रकाशे । बहेणी म्हणे ब्रम्ह सर्वत्र भासे ॥

२५ निजगुरु निजदाता भेटतां कोण चिंता ।
भवतमशमकर्ता शोकसंतापहर्ता ।
त्रिभुवनिं सुखदानी भक्त दासाभिमानी ॥
बहिणि म्हणतसे तो राम तूका निदानीं ॥

तुकारामबुवांचे समकालीन रामदास, वामन, रंगनाथ, केशवस्वामी, आनंदमूर्ति, शिवरामस्वामी इत्यादिकांचा उल्लेख बाईंच्या कवितेंत कोठें आढळत नाहीं. रामदास पंचायतनांतल्या जयरामस्वामी वडगांवकरांचा व देहू येथील मंबाजी आणि रामेश्वर भट्ट यांचा उल्लेख मात्र कारणपरत्वें यांनीं केला आहे.

"ज्ञानप्रकाश" या नांवाचें २९ ओव्यांचें बहिणाबाईचें एक वेदांतप्रकरण आहे, त्याच्या शेवटीं त्या म्हणतात:—

जयासी स्वहितचि करणें । तेणें शुद्ध भावार्थ धरणें ।
करावें अध्यात्म ज्ञानावें शोधन । जेणें लाधे निदान परब्रम्ह ॥
बहेणि म्हणे गुरुकृपा जेथें । ज्ञानासि काय उणें तथें ।
परि निष्ठाबळ पाहिजे यथार्थ । तेव्हां भगवंत प्राप्त होय ॥

बहिणाबाईंच्या कवितेंतले असे आणखी किती तरी वेंचे देण्यासारखे आहेत, परंतु विस्तारभयास्तव मी हात आखडता घेतों; व बाईंचा मुलगा विठ्ठल यानें बाईवर केलेल्या दोन आरत्यांपैकी एक आरती येथें देऊन हा लेख संपवितों.

## बहिणाबाईंची आरती.

सांगसि सकळां मृत्यू पांचा दिवसांचा ।
प्रायश्चित्तविधि सारुनि द्विज पूजिले हरि वाचा ॥
सकळां आशीर्वचनें देउनि गीतेचा ।
स्मरणीं तत्पर होउनि अष्टादश याचा ॥ १

जयदेव जयदेव जय बहिणाबाई ।
अंतीं आरति उजळुनि मानस तव तव पायीं ॥ ध्रु० ॥

ज्ञानेश्वरिचें करिसी पारायण अंतीं ।
निशिदिनिं सावध करणें लावुनि निजपंथीं ॥
रामस्मरणीं तत्पर वाचा रूपवती ।
नकळे तवरूपमहिमा जाणितला संतीं ॥ २ ॥

दशनादाचे ध्वनि तूं सांगसी सकळां ।
वैष्णव जयजयकारें तुळसीच्या माळा ॥
आले हरिहर ब्रह्मादिक जन ऋषिमेळा ।
नकळे पामर जन या भगवत्पथलीला ॥ ३ ॥

धन्य शतशोडशवरि द्वाविंशत काळीं ।
धन्य आश्विन शुद्ध प्रतिपदा बुधमेळीं ॥
सद्गुरुभजनीं सावध राहुनि ते काळीं ।
त्यागुनि तूं देह निजपद पावसि वनमाळी ॥ ४ ॥

धन्य घटिका धन्य पळ लव तें जाणा ।
धन्य धन्य जन ते देखति तव निधना ॥
धन्य प्रणितातीर्थ शिवपुर निजस्थाना ।
तेथें तूं स्थिर राहुनि करिसी गुरुध्याना ॥ ५ ॥

आरति याचि थाटें गायन जन करिती ।
रामस्मरणें सर्वहि आनंदें वदती ॥
नेणों स्वर्गींहुन त्या देवांच्या पंक्ती ।
आल्या मज्जनवेळे त्या प्रणितातीर्थी ॥ ६ ॥

मृदंग वाद्य नानापरिच्या गजरानें ।
तुलसी बुक्का उडवुनि मिरवत नगरानें ॥
गर्जत हरिनामाच्या श्रेणी अधरानें ।
प्रणितातीर्थीं मज्जन केलें मग ध्यानें ॥ ७ ॥

पूर्वे हनुमंत शोभे सहित अश्वत्थें ।
पश्चिमभागीं सुस्थळ रामेश्वर जेथें ॥
उत्तरभागीं सन्निध हें प्रणिता तीर्थ ।
दक्षिणभागीं भगवति दुर्गा माता ते ॥ ८ ॥

ऐसें स्थळ अति उत्तम शिवपुर ते स्थानीं ।
समाधि घेउनि राहसी तूं देह-अवसानीं ॥
त्रिकाळ आरति पूजन इच्छित फळदानी ।
पावति तव कर वरदें सुत विठ्ठल चरणीं ॥ ९ ॥

# उत्तमश्लोक.

महाराष्ट्रांतील जुन्या कवींपकीं हे एक चांगले कवि असतांही यांचें नांव फारसें प्रसिद्ध नाहीं, याचें कारण आणि निरंजनमाधव, कृष्णदयार्णव इत्यादि कवींच्या अप्रसिद्धीचें कारण एकच होय. भागवताच्या दशमस्कंधावरील प्रसिद्ध 'हरिवरदा' नामक सरस टीकेचे कर्ते जे श्रीमत्कृष्णदयार्णव* त्यांचे उत्तमश्लोक हे शिष्य होत व त्यांच्याच सहवासामुळें कवितारचनेकडे यांची प्रवृत्ति झाली. जुन्या कवींच्या कवितेचा अभ्यास करणाऱ्या लोकांस यांचें इतके दिवस फक्त नांव मात्र ठाऊक होतें; परंतु अलीकडे, उमरखेड येथील सद्गृहस्थ रा. सर्वोत्तम रघुनाथ पांडे यांनीं या कवीच्या वंशजांपाशीं असलेले कागदपत्र पाहून 'मुमुक्षु' पत्रांत या कवीच्या चरित्राची बरीच विश्वसनीय माहिती प्रसिद्ध केल्यामुळें, प्रस्तुत ग्रंथांत त्याच्या या अल्पशा चरित्राचा समावेश करण्याची संधि प्राप्त झाली आहे. याबद्दल रा. पांडे यांचें आभार मानणें जरूर आहे.

उत्तमश्लोक हे नाथसांप्रदायी असून त्यांचा जन्म शके १६३१ (इ. स. १७०९) सालीं बीड येथें झाला. हे आश्वलायनसूत्री देशस्थ ब्राह्मण. यांचें गोत्र भारद्वाज. यांच्या वडिलांचें नांव बाळाजी महादेव. हे दुकानदारीवर आपल्या कुटुंबाचा योगक्षेम चालवीत असत. हे अत्यंत गुरुनिष्ठ असून, गुरुगीतेचा पाठ झाल्याशिवाय अन्नपाणी सेवीत नसत. उत्तमश्लोकांनीं सप्तशतीवर एक ओवीबद्ध ग्रंथ लिहिला आहे त्यांत आपल्या वडिलांविषयीं त्यांनीं "कुटुंबार्थ लौकिक व्यापारी। स्वस्थ अंतरीं निर्व्यापार" असे उद्गार काढले आहेत. उत्तमश्लोकांच्या आईचें नांव चिऊबाई. ही बीडच्या देशपांडे घराण्यांतली मुलगी. या दांपत्याच्या पोटीं, उपरिनिर्दिष्ट सालीं विरोधी नाम संवत्सरीं, मूळनक्षत्रावर उत्तमश्लोकांचा जन्म झाला. यांचें पाळण्यांतलें नांव माधवराव. मूळ नक्षत्रावर जन्मल्याचा ठरावीक परिणाम असा झाला कीं, कवीचे वडील त्याच्या वयाच्या तेरावे वर्षी व

---

* यांचे संक्षिप्त चरित्र कविचरित्राच्या पहिल्या भागांत दिलें आहे.

नं.
ना.

आई सोळावे वर्षी वारली. उत्तमश्लोक यांचें लग्न कधीं झालें याचा उल्लेख कोठेंच आढळत नाहीं, परंतु त्यांना मुकुंदराव या नांवाचा एक विद्वान् मुलगा होता व त्याचे वंशज हल्लीं उमरखेड येथें रहात आहेत.

उत्तमश्लोक यांस कृष्णदयार्णवस्वामीचा अनुग्रह झाला तत्संबंधानें एक आख्यायिका सांगतात ती अशी:–बीड नगरांत कोणा राजपुत्राची थाटाची मिरवणूक निघाली होती. तींत कृष्णदयार्णव स्वामीहि होते. त्यांची व माधवरावांची ( उत्तमश्लोकांची ) दृष्टादृष्ट होतांच, माधवरावांस स्वामींच्या नेत्रांत कांहीं एक अपूर्व चमत्कार दिसला. "त्यांत त्याला त्याचें मूर्तिमंत जन्मसाफल्य दिसलें. निर्वाण, मोक्ष, मुक्ति, सर्व कांहीं त्यांत त्याला दिसूं लागलें. त्याच्या जीवाचें जीवपण मोडून स्वानंदसुखाच्या सोहळ्यांत तो रंगला. त्याचें सबाह्याभ्यंतर भक्तिप्रेमानें ओथंबून गेलें. तो दिव्यज्ञानदृष्टीनें प्रेमाचा आनंद लुटूं लागला. त्याचा सर्वात्मभाव जागृत झाला. त्याचें चित्त हरिमय होऊन सर्व विश्व चिदानंदानें भरलेलें त्याला दिसलें." देहभानावर आल्यावर माधवानें श्रीकृष्णदयार्णवांच्या चरणीं लोळण घेतली व अनुग्रह करण्याची विनंति केली. माधव कसोटीस कितपत उतरतो हें स्वामीस पहावयाचें होतें. बराच वेळ, उडवाउडवीचीं उत्तरें देऊन स्वतःबद्दल त्यांनीं कांहींच थांग लागूं दिला नाहीं. शेवटीं त्याचा निश्चय पाहून ते त्यास म्हणाले, "मजबरोबर मठांत चल. उपदेश असा कांहीं वाटेवर पडलेला नसतो." नंतर उत्तमश्लोकांस घेऊन स्वामी पैठणास आले. मठांत गेल्यावर स्वमीनीं सांगितलें, "हें आमचें भगवें निशाण व ही आमची झोळी. उचल निशाण व झोळी खाकेंत मार आणि गांवांतून भिक्षा मागून आण." "येथें तुझे कोणी आप्त आहेत काय?" असा स्वामीनीं सवाल केला तेव्हां उत्तमश्लोकांनीं आपली सासुरवाडी तेथें असल्याचें सांगितलें. तेव्हां स्वामींनीं, प्रथम तेथूनच सुरुवात करून नऊ घरें भिक्षा मागावी अशी आज्ञा केली. गुरूची आज्ञा वेदप्रमाण मानून माधवानें "ब्राह्मणाची मुख्य दीक्षा" जी भिक्षा ती मागण्यास खाकेंत झोळी मारली व पहिल्यानें आपल्या सासुरवाडीस जाऊन

**"जिंकावया षड्रिपु प्रमदोत्कटातें। सोसावया त्रिविध तापहि संकटातें॥**
**साधावया पद अचंचल केशवाचें। भिक्षाप्रदान मज कृष्णदयार्णवाचें"॥**

हा श्लोक म्हणून "जयजय श्रीकृष्णदयार्णव समर्थ" असा गुरुनामाचा जयजयकार केला. आंत त्यांचेंच कुटुंब वेणीफणी करीत बसलें होतें. त्यांना तो शब्द परिचयाचा वाटला म्हणून त्यांनीं बाहेर येऊन पाहिलें तों आपलें मूर्तिमंत सौभाग्य भिक्षुकवृत्तीनें दारीं उभें असल्याचें दिसलें. वृत्तींत एकदम इतका बदल होण्याचें कारण काय वगैरे खुलासा त्यानीं पतीस विचारला; परंतु कार्यकारणभावाशिवाय ज्या कांहीं गोष्टी केवळ यदृच्छेनें घडून येतात त्यांचा खुलासा कोण कसा करणार ? माधवरावांस तें कारण कांहीं सांगतां आलें नाहीं. शेवटीं पतिसमागमेंच निघण्याचा बाईंनीं निश्चय केला व नऊ घरची भिक्षा घेतल्यावर तें दांपत्य स्वामीच्या मठांत आलें; व गुरुसेवेंत आपली कालक्रमणा करूं लागलें. शिष्याची सेवा व उत्तरोत्तर आत्मानुसंधानपरायणत्वामध्यें त्याची प्रगति पाहून स्वामीस परम संतोष वाटूं लागला. त्यांच्या कृपेनें माधवाचें अनुसंधान दृढ झालें. याच सुमारास श्रीकृष्णदयार्णव श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधावर श्रीहरिवरदा नामक विस्तृत ओवीबद्ध टीका लिहीत होते. ही टीका 'दयार्णवदशम' या नांवानेंही प्रसिद्ध आहे. मराठी भाषेंत अत्यंत सुरस, प्रसन्न, सहृदयाल्हादकारक आणि प्रतिभासंपन्न असे जे ग्रंथ आहेत, त्यांतील प्रमुखांत ह्या 'श्रीहरिवरदा' ग्रंथाची गणना होते. कृष्णदयार्णवस्वामींनीं ग्रंथाचा पूर्वार्ध संपवून उत्तरार्धाच्या ८७ व्या अध्यायाच्या २३ व्या श्लोकाची टीका लिहिल्यावर ते समाधिस्थ झाले. तत्पूर्वीं त्यांनीं, उत्तमश्लोकांस ग्रंथाचा राहिलेला भाग पुरा करण्याची आज्ञा केली होती व नंतर पुन: स्वप्नांत दृष्टांत देऊन तीच आज्ञा त्यानीं केल्यावरून उत्तमश्लोकांनीं, ८७ व्या अध्यायाचा अपुरा राहिलेला भाग व पुढील तीन अध्याय लिहून, शके १६६५ त ग्रंथ पुरा केला. ग्रंथाच्या अखेरीस ग्रंथसमाप्तिकालनिर्देश स्पष्ट केलेला आहे:—

**जें शालिवाहन शकातें समे । सोळा शतें पांसष्टी नेमें ॥**
**क्रमिलिया यथानुक्रमें । षट्षष्टितमेमाझारी ॥**
**रुधिरोद्गारी संवत्सरीं । मार्गशीर्षीं शंतमकरीं ।**
**शुक्लपंचमी गुरुवासरीं । तृतीय प्रहरीं पुण्योत्सवीं ॥**

प्रतिष्ठानीं गोदातटीं । वृन्दावनीं विश्रांति मठीं ।
श्रीमत्पूज्यपादुकानिकटीं । लेखनसृष्टि अलंकारिली ॥

त्याविषयीं लिहितांना 'मुमुक्षू'तील लेखक रा. पांडे म्हणतात, "कृष्णदयार्णवांचा वृद्धापकाल झाला होता व दशमाच्या शेवटल्या चार अध्यायांवर टीका करावयाची राहिली होती. तेव्हां त्यांनीं माधवास तो ग्रंथ पुरा करण्यास आज्ञा केली. माधवानें वेदस्तुतीच्या अध्यायापासून लिहिण्यास सुरुवात केली. वेदस्तुतीसारखा वेदांतविषय; परंतु माधवांच्या सुबोध रचनाचातुर्यानें व भाषेच्या मनोरम तेजानें त्या अध्यायांतील वेदांताचीं प्रमेयें स्पष्ट उजळलेलीं आहेत. चारी अध्यायांवर टीका लिहून झाल्यावर श्रीकृष्णदयार्णवानीं ती वाचली. उत्तमश्लोकांचें भाषालाघव व शब्दगौरव पाहून स्वामीस मोठा संतोष वाटला. "तूं फार उत्तम श्लोक लिहिलेस" असे उद्गार त्यानीं काढले व तेव्हांपासून माधवास 'उत्तमश्लोक' या नांवानेंच लोक संबोधूं लागले." परंतु रा. पांडे यांनीं दिलेली ही माहिती सर्वांशीं खरी नाहीं, हें कवीच्या लिहिण्यावरून स्पष्ट दिसतें. श्रीमत्कृष्णदयार्णव हे समाधिस्थ झाल्यावर कवीनें पुढील ग्रंथ पुरा केला. अर्थात्, तो वाचून पाहून, "वत्सा लिहिलेस उत्तम श्लोक" असे गौरवपर उद्गार काढण्यास कृष्णदयार्णव मुळीं हयातच नव्हते. ८८ व्या अध्यायाच्या आरंभीं कवि म्हणतात:—

जगदात्मया जगद्गुरो । निजजनजनका कल्पतरो ।
तवपदस्मरणें भव हा हरो । मानस मुरो तव वेधें ॥ १ ॥
म्हणोनि सद्गुरो सुखनिधाना । प्रणतवरदा प्रबोध गहना ।
नमन साष्टांग तुझिया चरणा । संसृतिशमना मुहुर्मुहु ॥ २ ॥
करितां तवचरणाचें स्मरण । होय देहत्रया विस्मरण ।
बाह्य दाटे सच्चिद्घन । ब्रम्ह परिपूर्ण अभेदें ॥ ३ ॥
तेव्हां नम्यनमक हा भाव । नुरविसी देऊनि स्वगौरव ।
त्रिपुटि ग्रासूनि सुखानुभव । साक्षित्वभाव अभिविलयें ॥ ४ ॥

ऐसा नैसर्गिक अगाध महिमा । सहसा न वदवेचि निगमा ।
परंतु स्फुरवी अनन्यप्रेमा । गुणगणगरिमा प्रणतांसी ॥ ५ ॥

बहुधा वदती युगानुयुगीं । अजस्र चालती स्तवनमार्गीं ।
होवूनि तव पदीं अनुरागी । न करिती वावुगी भवचिंता ॥ ६ ॥

अनंत युगीं अनंत मूर्ति । तारक जड जीवां भवावर्ती ।
सच्चित्सुखमय धरूनि आर्ती । निरसूनि कीर्ति प्रकाशिती ॥ ७ ॥

एक उद्धरिले प्रबोधामृतें । एक ते भाविक चरणतीर्थें ।
मौळ स्पर्शोनि पद्महस्तें । कितिएकांतें तारिलें ॥ ८ ॥

एकां सदयावलोकें पाहिलें । ते तत्काळचि कृतार्थ झाले ।
एकीं हृदयामाजी ध्याइलें । तेही चुकले भवभया ॥ ९ ॥

एकां अनुदिनीं नामस्मरणें । एक ते चिद्रूपचिंतनें ।
एक परिचर्येच्या गुणें । समानपणें उद्धरिले ॥ १० ॥

ऐसीं अनेक शुभ पवित्रें । मोक्षप्रदें श्रवणमात्रें ।
साकल्यें न वदती वेदशास्त्रें । पुराणें पवित्रें यथामति ॥ ११ ॥

द्वापारान्तीं सगुण विग्रह । कृष्णनामक भवापह ।
घेऊनि तारिला जीवसमूह । चरित सुखावह प्रकटिलें ॥ १२ ॥

उद्धवार्जुनादि अनन्य शरण । केले चिन्मात्र बोधें पूर्ण ।
उरले जे कां मादृश दीन । कळिकाळीन भवग्रस्त ॥ १३ ॥

तयांचिये करुणेस्तव । प्रकटावया पूर्णानुभव ।
श्रीमत्कृष्णदयार्णव । नामें स्वयमेव प्रस्तुत ॥ १४ ॥

पूर्ण दयेनें अवतरून । केलें अपार जगदुद्धरण ।
विशेष तारिले भाविक जन । गुह्यज्ञानप्रबोधनें ॥ १५ ॥

भक्ति ज्ञान आणि विराग । कर्मधर्मादि सन्मार्गयोग ।
जनीं प्रकटिला अभंग । यथासाङ्ग आचरणें ॥ १६ ॥

दिवसें दिवस बुद्धिहीन । प्राणी होती कलिकालीन ।
न कळे वेदशास्त्र पुराण । कळवळून तयांस्तव ॥ १७ ॥

दशमस्कंधाचें व्याख्यान । देशभाषा प्राकृतटीकाग्रथन ।
ज्यामाजी सांठविला संपूर्ण । अर्थ गहन श्रुतींचा ॥ १८ ॥

अगाध गुण चरित्र महिमान । तेथ अन्वयवक्ता समर्थ कोण ।
म्हणोनि प्रकटिलें आपुलें आपण । अबळांकारणें सुभाषितें ॥ १९ ॥

इत्यादि अनेक अवतारकार्य । संपादूनि स्वविग्रहवर्य ।
उपसंहरिला देऊनि धैर्य । शेषान्वयग्रथनार्थ ॥ २० ॥

मीं तों केवळ अकोविद । अनधीत विशेषें मतिमंद ।
न कळे काव्यरचनाछंद । आज्ञार्थ सिद्ध स्वयें कीजे ॥२१॥

तुमची अभिनव न कळे लीला । उदकावरी तारिल्या शिळा ।
समुद्रीं हुताशन ठेविला । अनळीं सलिला प्रकटिलें ॥ २२ ॥

शून्यीं सृजिला प्रभंजन । प्रभंजनीं हुताशन ।
न पढवूनि चतुरानन । वेदप्रेरण त्या केलें ॥ २३ ॥

ऐसिया देखूनि महिमाना । न होय चित्तीं असंभावना ।
प्रकटूनियां सत्तास्फुरणा । काय एक रचना न कराल ॥ २४ ॥

असो येविषयीं विज्ञप्ति । करणें नलगे चरणाप्रती ।
लेखनी न प्रार्थी लेखनार्थीं । लेखका निश्चिती कदापिही ॥ २५ ॥

किंवा वाद्यें प्रार्थनापूर्वक । सहसा न विनविती वादक ।
ते आपुलियासाठीं बहुतेक । चातुर्य सम्यक प्रकटिती ॥ २६ ॥

तेंवि अंतर्यामित्वें बोलवणें । हें इष्टचि समर्थाकारणें ।
म्हणोनि ग्रंथसमाप्ति करणें । संदेह धरणें मज नाहीं ॥ २७ ॥

ऐसें ऐकोनि श्रोते सज्जन । म्हणती हें कैसें येथ भाषण ।
हा अभिप्राय विशद करून । आम्हां संपूर्ण कथावा ॥ २८ ॥

तरी ऐकावें श्रोतीं सकळीं । जे का अलिसम गुरुपदकमळीं ।
हे जगदुद्धारार्थ नव्हाळी । ग्रंथरूपें केली गुरुवरें ॥ २९ ॥

शायशीं अध्यायपर्यंत । निरूपिलें श्रीकृष्णचरित ।
पुढें सत्यायशीवा प्राप्त । जेथ वेदस्तुत परमात्मा ॥ ३० ॥

तो तेवीस श्रुत्युक्त श्लोक । पर्यंत वाखाणिला सम्यक ।
तंव पुरला अवधि अंक । अवतारात्मक प्रभूचा ॥ ३१ ॥

यथोक्त केलें विधिपाळणा । यास्तव काळातिक्रमणा ।
न करूनि सायुज्यसदना । प्रत्युद्गमना आदरिलें ॥ ३२ ॥

तेव्हां समीप स्वभक्त मेळा । होता त्यामाजी अनन्यशीळा ।
मज आज्ञासंकेत केला । ग्रंथ राहिला करावया ॥ ३३ ॥

सोळा शतें बासष्टी अब्दें । शालिवाहन परिमित शब्दें ।
क्रमितां रौद्रवत्सरीं मोदें । मार्गशीर्षीं शुभ मासीं ॥ ३४ ॥

शुक्ल पंचमीं गुरुवासरीं । ब्राम्ही मुहूर्तीं शुभावसरीं ।
प्रतिष्ठानीं गोदातीरीं । स्वधाम निर्धारीं स्वीकेलें ॥ ३५ ॥

त्यावरी सगुण वियोगें खेद । करूनि जाहलों मतिमंद ।
द्विमासानंनर पुनः विशद । स्वप्नीं अनुवाद हा केला ॥ ३६ ॥

मज संबोखूनि बहुतां परी । म्हणती असो तुज अंतरीं ।
प्रज्ञा स्फुरेल शंका न धरीं । ग्रंथ पुढारी चालवणें ॥ ३७ ॥

ऐसी सद्गुरूची समर्थ आज्ञा । विशेष संमत सकळां सुज्ञां ॥
येऱ्हवीं सामर्थ्य मज अल्पज्ञा । कैचें प्रज्ञारहितासी ॥ ३८ ॥

आतां भरंवसा मज निश्चित । कीं दूरस्थ चंद्रमा गगनांत ।
स्वकान्ति प्रकटित अमृत । असे विदित सर्वांसी ॥ ३९ ॥

कीं सूर्यकान्ति दिवाकर । अंतरें प्रसवे ज्योति प्रखर ।
मा हृदयस्थ सद्गुरु भ्रमहर । स्वउद्धार न स्फुरवी ॥ ४० ॥

पूर्वीं स्वमुखें ओवीप्रबंध। वदोनि सद्गुरु नित्यबोध।
लेखनक्रियेसी पैं विशुद्ध। मजकरूनि विशद करविलें॥ ४१॥

\+ \+ \+ \+

नामरूपेंसी पालटिलें। आपुलें नाम मज ठेविलें।
उत्तमश्लोक संज्ञा थिलें। प्रेम दिधलें निजभजनीं॥ ४४॥

श्रीहरिवरदा, अध्याय ८८

हा लांबलचक उतारा देण्याचें मुख्य कारण हें कीं, कविचरित्रविषयक अनेक गोष्टींचा खुलासा त्यांत स्पष्ट झाला आहे. श्रीहरिवरदा ग्रंथ लिहिण्याचें काम आरंभापासून उत्तमश्लोकांनींच केलें. कृष्णदयार्णवांनीं ओवी उच्चारावी आणि उत्तमश्लोकांनीं ती उतरून घ्यावी असा क्रम चालला होता. कृष्णदयार्णव मरणोन्मुख झाले त्या वेळीं ग्रंथाचा उरलेला भाग पुरा करण्याची उत्तमश्लोकांस त्यांनीं आज्ञा केली. परंतु स्वामी समाधिस्थ झाल्यावर त्यांच्या वियोगानें विषण्णचित्त झाल्यामुळें व आत्मविश्वासाभावीं उत्तमश्लोकांनीं पुढील ग्रंथरचनेस सुरुवात केली नाहीं. पुढें दोन महिन्यांनीं स्वामींनीं स्वप्नांत दृष्टांत दिल्यावर मग कवीनें ग्रंथाचा पुढील भाग लिहिण्यास प्रारंभ केला. शके १६६२ त श्रीमत्कृष्णदयार्णव समाधिस्थ झाले व उत्तमश्लोकांनीं ग्रंथाचा राहिलेला भाग शके १६६५ त पूर्ण केला. म्हणजे ३४७७ ओंव्या रचण्यास कवीस सुमारें तीन वर्षें लागलीं. वरील उताऱ्यांतील कवींच्या उद्गारांवरून त्याची अत्युत्कट गुरुभक्ति, प्रशंसनीय शालीनता, सुबोध व भारदस्त पद्यरचना आणि प्रचंड विद्वत्ता सहज दृष्टोत्पत्तीस येते. उत्तमश्लोकांनीं ग्रंथाचा सांधा इतका बेमालुम बसविला आहे कीं अध्यायाच्या शेवटचा कविनामनिर्देश दृष्टोत्पत्तीस येईपर्यंत, अमुक एक भाग हा एका कवीचा आणि पुढील भाग दुसऱ्या कवीचा, अशी शंकादेखील वाचकास येत नाहीं.

" ज्याप्रमाणें अलीकडे कोण्याही शब्द पंडितानें उठावें आणि गीतेवर व्याख्यान किंवा भाष्य करीत सुटावें त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरांच्या कालापासून बहुतेक संतकवींना, भगवद्गीतेवर आपण जर टीका

लिहिली नाहीं तर आपलें कवित्व अपूर्ण राहिलें असें वाटे. या सामान्य प्रवृत्तीला उत्तमश्लोकही अपवाद नव्हते. त्यांच्या ग्रंथलेखनासंबंधीं एक अर्थपूर्ण गोष्ट प्रसिद्ध आहे ती अशी. उत्तमश्लोकांनी गीतेवर प्राकृत टीका लिहिण्यास सुरुवात केली. एक दोन अध्याय लिहून झाले. पुढें एके दिवशीं उत्तमश्लोक सहज घराबाहेर पडले तों एका ठिकाणीं एक अत्यंत तेजस्वी असा तपोधन महर्षीसमान वृद्ध गृहस्थ आपल्या बहुमोल शालजोडीस गोधडीचें ठिगळ लावीत बसला होता. तो विचित्र प्रकार पाहून उत्तमश्लोक त्यास म्हणाले, "महाराज, हें काय करितां? शालीस गोधडीचें टिगळ लावणें बरोबर आहे का? आपणाजवळ रेशमी कापडाचा तुकडा नसल्यास मी देतों." त्यावर तो वृद्ध महर्षि अर्थपूर्ण भाषेंत म्हणाला, "बाबा रे, शालीस गोधडीचें ठिगळ लावण्याचाच हा काळ आहे. तें कसें दिसेल याचा विचार कोण करतो? येनकेन प्रकारेण प्रसिद्धीस यावें असेंच सर्वांस वाटत असतें." या उत्तराचा गर्भितार्थ उत्तमश्लोकांच्या लक्षांत ताबडतोब आला. त्या गृहस्थाच्या म्हणण्याचा भावार्थ हा कीं "गीतार्थावर श्रीज्ञानदेवमहाराजांनीं भावार्थदीपिकेचा अमोलिक शालू पांघरला आहे. आतां त्या ग्रंथावर दुसरी प्राकृत टीका लिहिण्याचा अट्टाहास करणें म्हणजे शालजोडीस गोधडीचें ठिगळ लावणेंच होय." उत्तमश्लोकानीं गीतेवर टीका लिहिण्याचें सोडून देऊन, पुढें ते सहकुटुंब यात्रेस निघाले. श्रीक्षेत्र माहूर येथील "अंबाबाई" हें त्यांचें कुलदैवत होय. उत्तमश्लोकांचें कुटुंब त्या वेळीं गरोदर होतें तें वाटेंतच प्रसूत होऊन त्यांस पुत्ररत्न झालें. नंतर बऱ्याच दिवसांनीं त उमरखेडास गेले. हें गांव वऱ्हाडच्या दक्षिणेस पैनगंगा नदीच्या कांठीं आहे. त्या वेळीं तेथें श्रीआईनाथमहाराज नामक सत्पुरुष वास्तव्य करीत होते. त्यांच्या साधुत्वावर ढोंगीपणाचा आरोप करणारे कांहीं कुटाळ लोक तेथें होते. असें सांगतात कीं त्या कुटाळ लोकांनीं आईनाथ महाराज यांस मजेखातर एका खोल खड्ड्यांत पुरून ठेविलें होतें. सरासरी दोन महिनेपर्यंत ते तेथेंच

* एकनाथानीं ज्ञानेश्वरीचें शुद्धीकरण केलें त्यासंबंधेंही अशीच एक आख्यायिका प्रसिद्ध आहे.

होते. ज्या वाटेनें उत्तमश्लोक उमरखेडास चालले होते त्या वाटेवरच कर्मधर्मसंयोगानें तो खड्डा होता. "मला येथून कोणी काढा रे" असा आर्त स्वर भूगर्भातून आलेला ऐकतांच उत्तमश्लोकांनीं तेथें जाऊन त्या सत्पुरुषास वर काढलें व त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून ते त्यांस शरण गेले. तेव्हां आईनाथमहाराजांनीं त्यांस उठवलें व त्यांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून "मला आतां लवकरच देह ठेवणें आहे, परंतु माझें और्ध्वदेहिक करण्यास कोणी नाहीं. पुत्रधर्मानें माझा अंत्यविधि करणारा तुझ्याशिवाय कोणी दिसत नाहीं. तरी यात्रा करून लवकरच परत ये." अशी आज्ञा केली.

पुढें तीर्थयात्रा करीत करीत उत्तमश्लोक माहुरगडास आले. तेथें ग्रंथ लिहिण्याविषयीं त्यांस जी आज्ञा झाली ती त्यानीं सप्तशतीवरील स्वकृत मराठी टीकेंत नमूद केली आहे:—

**आत्मानुसंधान चिन्मात्र कृष्णीं । धरून विचरतां प्रारब्धक्षपणीं ।**
**ईश्वरी प्रेरणेनें भूधर वाणी । वदली गर्जोनी मातापुरीं ॥**
**कीं तूं गुरुपदसेवका । श्रीसप्तशतीवरी टीका ।**
**करीं देशभाषेनें भाविका । न धरूनि शंका मानसीं ॥**

श्रीउत्तमश्लोक उत्तम कवि व जाडे विद्वान् होते. "त्यांनीं सप्तशतीवर जो अपूर्व परंतु अद्याप अप्रसिद्ध असा ग्रंथ लिहिला आहे त्यांतील वागर्भसौंदर्य फारच श्रेष्ठ दर्जाचें आहे. त्यांची प्रासादिक भाषा, सुबोध रचना, व निस्सीम गुरुप्रेमा यांच्या संगमानें हा ग्रंथप्रयाग फार मनोहर झाला आहे." असें रा. पांडे यांनीं म्हटलें आहे.

त्यांच्या वयाच्या ५५ व्या वर्षी म्हणजे शके १६९० मध्यें पैठण येथें

**"पूर्णाचिया पूर्णानुमोदनें । पूर्ण देवता पूर्णानुग्रहणें ।**
**पूर्ण सद्गुरु पूर्ण कृपेनें । पूर्ण लेखन संपूर्ण झालें. ॥**

त्यांच्या आयुष्याचा कांहीं भाग येथें श्रीआईनाथ महाराजांच्या सेवेंत गेला. [म]हाराज समाधिस्थ झाल्यावर त्यांचें और्ध्वदेहिक उत्तमश्लोकानींच केलें.

उत्तमश्लोकांनीं स्वतः श्रीआईनाथ महाराजांचा एक ओतींव मुखवटा तयार केला आहे त्यावरून त्यांचें घटनाचातुर्य अघटित होतें हें उघड दिसतें.

उत्तमश्लोकांचें देहावसान पैठण मुक्कामीं झालें. मृत्युशकाचा उल्लेख कोठें आढळत नाहीं. त्यांची समाधि पैठण येथें त्यांचे गुरु श्रीमत्कृष्णदयार्णव यांच्या समाधीजवळच आहे. श्रीधर, महीपति, निरंजनमाधव, अवचितसुत काशी हे उत्तमश्लोकांचे समकालीन कवि होत.

उत्तमश्लोकांच्या मठांत त्यांच्या वंशजांपाशीं उत्तमश्लोकविरचित पदें व स्तोत्रें बरींच आहेत. त्यांच्या वृत्तबद्ध कवितांत छंदोभंग सहसा आढळतनाहीं.

उत्तमश्लोकांचा "सप्तशती" हा प्राकृत ग्रंथ माझ्या अवलोकनांत आलेला नाहीं. परंतु माझे मित्र रा. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं त्या ग्रंथाचे पहिले दोन अध्याय पाहून असें म्हटलें आहे कीं "ग्रंथ प्रासादिक वरदी आहे यांत संशय नाहीं." रा. पांगारकर यांनीं आपल्या 'मुमुक्षु' पत्रांत सदर ग्रंथांतले कांहीं वेंचे दिले आहेत, तेच मी येथें, एका चांगल्या जुन्या पण अप्रसिद्ध ग्रंथाचा वाचकांस परिचय करून द्यावा या उद्देशानें, उद्धृत करितों. पहिली ओवी:—

**श्रीमत्सच्चिदानंद सुवेषा । जय जय प्रकृतिपुरुषा ।**
**अनादिसिद्धा निर्विशेषा । एकत्वीं नरयोषा रूढविसी ॥ १ ॥**

उपास्य श्रीकृष्णाचें वंदन करून ग्रंथकार लिहितातः—

**तदंश नारद कपिलमुनि । शुकशौनक वैष्णवाग्रणी ।**
**गोरक्षादि सिद्धगणीं । नमन तच्चरणीं सद्भावें ॥ ३५ ॥**
**व्यास वाल्मीक पराशर । इत्यादि आदिकवि प्रवीर ।**
**मुकुंदराज ज्ञानेश्वर । बोधसागर वंदिले ॥ ३६ ॥**

यापुढें उत्तमश्लोकांनीं आपली गुरुपरंपरा दिली आहे, ती त्यांच्या गुरूंनीं आपल्या 'हरिवरदा' ग्रंथांत दिलेल्या परंपरेशीं अगदीं मिळती आहेः—

---

+ प्रस्तुत मठपतीचें नांव ह. भ. प. यादव जनार्दन मुनि, मुक्काम उमरखेड.

श्रीदत्तात्रेय—जनार्दन स्वामी—एकनाथ—चिदानंद-स्वानंद—गोविंद—कृष्णदयार्णव—उत्तमश्लोक—अशी ही परंपरा आहे. गुरुपरंपरला वंदन केल्यावर कवि म्हणतात:—

आणि जे वर्तमानकाळीं । गुप्त प्रकट संतमंडळी ।
भक्तिज्ञानवैराग्यशाली । तत्पदकमळीं प्रणाम ॥ ३९ ॥

यावरी वंदूं श्रीगुरुराव । श्रीमत्कृष्णदयार्णव ।
देऊनियां स्वसुखवैभव । मम दैन्य सर्व निरसिलें ॥ ४० ॥

होतां तापत्रयें संतप्त । दयार्णव पावलों मूर्तिमंत ।
तेथें मज्जुनी विकल्परहित । निवालों अत्यंत सुखलाभें ॥ ४१ ॥

श्रीकृष्णदयार्णवांचा सुप्रसिद्ध ग्रंथ जो 'हरिवरदा' त्या संबंधानें कवि लिहितात:—

श्रीभागवत दशमस्कंध । जेथ श्रीकृष्णचरित अगाध ।
त्यावरी टीका अत्यंत विशद । केली स्वानंदसुखदायी ॥ ४३ ॥

सकळ शास्त्रार्थ प्रमेय । भक्ति विरक्ति ज्ञानान्वय ।
वेदांततत्त्व निःसंशय । निजपदसोय जीमाजी ॥ ४४ ॥

गुरुसेवेसंबंधानें लिहितात:—

तत्सेवनीं बहु प्रेमळ । त्यामाजी मी मूढ केवळ ।
सेवुनियां चरणकमळ । सम अळिकुळ एकाग्र ॥ ४७ ॥

सदा वसुनियां निकट । प्रबोधोद्गार उच्छिष्ट ।
प्राशून धालों उत्कृष्ट । निमाली अधिष्ट भवतृष्णा ॥ ४८ ॥

सप्तशतीवर प्राकृत ग्रंथ करण्याची प्रेरणा:—

ऐसिया मज अप्रवीणा । सप्तशतीवरी टीकाग्रथना ।
कां नेणों ईश्वरी प्रेरणा । भाषानुवचना करावया ॥ ४९ ॥

**काय दैवरेखा उदेली । पूर्वजसुकृतें परिणमलीं ।**
**वाग्वल्ली अमृतफळीं फळली । कीं वोडवली हे रचना ॥ ५२ ॥**

येथून पुढें प्रणवनिरूपणास प्रारंभ होऊन ग्रंथ सुरू झाला आहे. कठिण विषय सुलभ रीतीनें सांगितला आहे. सुस्थ राजाचें त्याच्या शत्रूंनीं राज्य घेतलें. त्या शत्रूंस 'कोलाविध्वंसिन:' असें मूळांत म्हटलें आहे. या पदाचे उत्तमश्लोकांनीं चार अर्थ सांगितले आहेत !

( १ ) निघंटाधारें क म्हणजे ब्रह्मा; अ म्हणजे विष्णु; व उ म्हणजे शंकर.

**तया त्रिदेवांचें ग्रहण । औपासनार्थ करिती पूर्ण ।**
**ते ब्राह्मण प्रमुखवर्ण । कोला म्हणोनि जाणावे ॥ १६० ॥**
**त्यांचें करिती विध्वंसन । ते कोलाविध्वंसी यवन ।**

( २ ) कोला शस्त्रप्रभेदे स्यात् या अमरकोशोक्त वचनावरून कोला शस्त्रानें वध करणारे ते.

( ३ ) अथवा 'कोला' नामक राजधानीचा विध्वंस करणारे.

( ४ ) कोला म्हणजे सूकर त्याचें हनन करणारे. यावरून कवीचा शोधकपणा व विद्वत्ता यांची कल्पना येईल.

मेधा मुनीचें वर्णन पहा:—

**मुनि समदर्शी आत्माराम । सर्वीं प्रगटलें तयांचें साम्य ।**
**जेंवि मैलागरें वेधती परम । तरुस्तोम आघवे ॥ २०४ ॥**

**व्याघ्र गाईतें कुरवाळिती । आखुबिडाळें क्रीडती ।**
**हिंसा सांडूनि परस्परीं । स्वेच्छा विहारी सुखरूप २०५ ॥**

उत्तरोत्तर भाषा अधिक सुंदर आणि प्रवाह सरळ चालला आहे. पहिल्या अध्यायाच्या ८६३ ओव्या असून, १३ अध्याय मिळून ग्रंथाची एकंदर ओवीसंख्या ५३०० आहे. ग्रंथ अद्याप अप्रकाशित* आहे.

---

* उत्तमश्लोकांच्या परंपरेंतील एका सभाग्य गृहस्थानें सदर ग्रंथ छापण्याचें ठरविलें आहे असें रा. पांडे 'मुमुक्षू'त म्हणतात.

उत्तमश्लोककृत **श्रीदत्तात्रेयस्तोत्र** दत्तभक्तांस नित्यपाठास फार उपयुक्त आहे असें वाटल्यावरून त्याचा येथें संग्रह करितों:—

### श्लोक ( मालिनी )

सकळकिरणकीर्णी भास्वत स्वप्रकाशें ।
उजळित तनु ज्याऱ्ही योगमायाविकाशें ॥
करुनि जग अकर्ता, गातसे वेद कीर्ति ।
गुरुवर विभु दत्तात्रेय चिद्‌ब्रम्हमूर्ति ॥ १ ॥

अखिल हृदयसाक्षी निर्गुणी निर्विकारी ।
प्रकटुनि निजभक्तां पूर्ण आनंदकारी ॥
गुणमय भवपाशीं भंगिता चित्तआर्ति ।
गुरुवर विभु दत्तात्रेय चिद्‌ब्रह्ममूर्ति ॥ २ ॥

रहित वसन संगातीत अंगें विराजे ।
षडरिवरि जयाचा तोडरू मुख्य गाजे ॥
मुनिगण गुण लेती मोक्षगा बोधितातीं ।
गुरुवर विभु दत्तात्रेय चिद्‌ब्रह्ममूर्ति ॥ ३ ॥

करुनि सुरनदीचें स्नान विश्वेश-गांवीं ।
तदुपरी मग कोल्हापूर भिक्षार्थ सेवी ॥
वसत शिखरिं सह्याद्रीचिया जो दिनांतीं ।
गुरुवर विभु दत्तात्रेय चिद्‌ब्रह्ममूर्ति ॥ ४ ॥

विविध विविध लोकीं सांप्रदायें प्रवृत्ति ।
भजन सुगम मार्गें जीव आणी निवृत्ति ॥
जगभरि सम वर्षे जे सुधा सौख्यकर्त्री ।
गुरुवर विभु दत्तात्रेय चिद्‌ब्रह्ममूर्ति ॥ ५ ॥

शरण रिघुनि भावें प्रार्थना हेचि आतां ।
भ्रमित मन असारीं आंवरीं विश्वताता ॥
स्वपदनिरत दासा वोपिजे पूर्णशांति ।
गुरुवर विभु दत्तात्रेय चिद्ब्रह्ममूर्ति ॥ ६ ॥

हरिहर विधि यांतें विग्रहीं सांठवीलें ।
म्हणउनि निजबोधा षड्भुजा दाखवीलें ॥
परमसुखद ध्यातां अंतरीं मोहहर्त्री ।
गुरुवर विभु दत्तात्रेय चिद्ब्रह्ममूर्ति ॥ ७ ॥

अनुदिनिं धरितां हे उत्तम श्लोक जीवीं ।
श्रवणपठनयोगें पूर्ण बोधोपजीवी ॥
अनुभवपर दीजे भक्ति ते मुक्तिदाती ।
गुरुवर विभु दत्तात्रेय चिद्ब्रह्ममूर्ति ॥ ८ ॥

श्रीएकनाथमहाराजांचे गुरु जनार्दनस्वामी यांचें उत्तमश्लोकानीं केलेलें स्तोत्र संग्रहणीय असल्यामुळें तें येथें उतरून घेतों.

## श्लोक

पूर्णावतार गुणकार्य विलिप्त आंगें ।
मायामयारहित अद्वय वेद सांगें ॥
तोडील पाश भवजन्य कृपाप्रभावें ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ १ ॥

जे साधनें शमदमादिक साधितातीं ।
षट्चक्र भेदुनि जिवा स्वपदासि नेती ॥
ते प्राप्ति गौण मग त्यां सुख नित्य फावे ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ २ ॥

कित्येक काळवरि घालुनि अन्नसत्रा ।
होतां प्रसन्न मुनिसत्तम अत्रिपुत्रा ॥

लाहोनि चित्सुखघना सुजनासी पावे ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ३ ॥

केला प्रबोध मग ठेउनि हस्त माथां ।
तारावया जड जिवांप्रति एकनाथा ॥
ज्याचे घरीं करि निरंतर कृष्ण सेवे ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ४ ॥

विश्वेश्वर प्रकट तारक मंत्र बोधी ।
काशींत मृत्यु समयीं तरि मोक्षसिद्धि ॥
येथेंचि सद्य करितो निजगुह्य ठावें ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ५ ॥

जें दुर्घट भ्रमकरी विषयार्थ लोकां ।
ब्रह्मादिकांसहित लाउनि मोह शोका ॥
तें दुर्निवार मन चंचळ आवरावें ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ६ ॥

ब्रम्हांडिंचा सकळ तीर्थसमूह किंवा ।
यज्ञादि योग तपदान सुपुण्य ठेवा ॥
आला फळासि मज सर्वहि शुद्ध दैवें ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ७ ॥

वाचील भक्तिपर सांडुनि सर्व कामें ।
श्लोकोत्तम स्तवन अष्टक नित्य नेमें ॥
तेणें चतुर्विधहि अर्थ सुखें वरावे ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ८ ॥

आतां 'हरिवरदा' ग्रंथांतील एका संस्कृत श्लोकावरील उत्तमश्लोककृत टीकाव्याख्यान येथें उतरून घेऊन हा लेख पुरा करितों:—

श्रीभगवानुवाच ।

यस्याहमनुगृण्हामि हरिष्ये तद्धनं शनैः ।
ततोऽधनंत्यजंत्यस्य स्वजनादुःखदुःखितम् ॥ ८ ॥

टीका—

म्हणे जया मी शेषशायी। पूर्ण कृपेनें अनुग्रहीं।
तया सुख द्यावया अक्षयी। उपाधि सर्वही तोडीतसें ॥ ९१ ॥

सर्व उपाधीचें मूळ। राया धनचि असे केवळ।
जेणें विषयभोग पुष्कळ। संग बाष्कळ जोडे पैं ॥ ९२ ॥

तया विषयसेवनासाठीं। पडे परमार्थाची तुटी।
मग जन्म मरणें वोखटीं। कल्पकोटि होताती ॥ ९३ ॥

यास्तव तयांचें संपूर्ण धन। हळुहळु करितसें हरण।
केवळ निर्धन झालिया जाण। विषयसेवन घडेना ॥ ९४ ॥

धान्यचि नसतां पक्वान्न। कीं वृक्ष नसतां फळपुष्पग्रहण।
कीं सुवर्ण नसतां अळंकरण। होय कोठून संप्राप्त ॥ ९५ ॥

तेंवि धनचि नाहीं हातीं। तरी काय विषय सेवील माती।
म्हणोनि धनाची अपहृती। करितां खंती बहु करी ॥ ९६ ॥

देहादि इंद्रियां अहंपणें। केवळ आत्मत्वें कवळिलें तेणें।
त्यातें सौख्य विषयसेवनें। तें न घडतां प्राणें तळमळी ॥ ९७ ॥

जैसा जीवनेंवीण मासा। कीं प्राणरोधें जीवदशा।
तैसा तळमळी आपैसा। दरिद्रें क्लेशा बहु पावे ॥ ९८ ॥

जनीं अभिमानें संसार। महत्त्वें केला निरंतर।
तैसा न घडतां चिंतातुर। धरूनि फार जनलज्जा ॥ ९९ ॥

एवं दुःखें करूनि दुःखित। धनरहित शोकाभिभूत।
ऐसी दशा झालिया प्राप्त। तैं कैंचा स्वार्थ सुहृदांचा ॥ ३०० ॥

स्वार्थानिमित्त झाले वल्लभ। ते स्वार्थ न घेतां पावती क्षोभ।
मग सोडूनियां स्नेहकोंभ। स्वजन निर्लोभ त्या त्यजिती ॥ १ ॥

जेंवि सरोवरीं असे जळ। तोंवरी जळाशयीं केवळ।
सारसादि सेवनशीळ। त्यजिती सकळ जळ नसतां ॥ २ ॥

कीं फळपुष्पादि पर्णयुक्त। जोंवरी असे द्रुम निश्चित्त।
पक्षी राहती तोंपर्यंत। टाकिती निभ्रान्त खांकरा ॥ ३ ॥

कीं कमळीं असे सुगन्ध। तोंवरीच स्नेहें विविध।
गुंजारवती ते षट्पद। त्यजिती आमोद गेलिया ॥ ४ ॥

तेंवि स्वार्थासाठीं सेविती। ते स्वजन अवघे त्यागिती।
ऐसी निर्धन झालिया गति। होय निश्चिती तयांची ॥ ५ ॥

येथ श्रोते म्हणती जरी। भगवत्प्रसादाधिकारी।
त्यांसी भगवान् निर्धन करी। कें सभाग्य तरी ध्रुवादिक ॥ ६ ॥

याचें ऐसें असे प्रत्युत्तर। कीं हरिभक्ताचे दोन्ही प्रकार।
एक बहुतां जन्मीं भक्तिपर। कृपापात्र हरीचें ॥ ७ ॥

दुसरें विद्यमान जन्मीं। विषयसेवन परमकामी।
परी कांहीं पूर्व सुकृतोद्गमीं। कमलास्वामी अनुग्रही त्यां ॥ ८ ॥

यांमाजी पूर्वानुग्रहीत हरीचे। प्रारब्धानुवशें जन्मती साचे।
उत्कृष्ट भजनचि त्यांतें रुचे। कोड विषयांचें न करिती ॥ ९ ॥

त्यांसी जन्मानुजन्मीं सद्विवेक। भगवत्कृपेनें अधिकाधिक।
तैसेंचि पुण्यही निष्कळंक। होय अनेक सहजस्थिति ॥ १० ॥

तथा सुकृताचें ऊर्जित फळ। पूर्ववासना बीज समळ।
जाणूनियां लक्ष्मीलोल। देत पुष्कळ संपत्ति ॥ १२ ॥

संपत्तियोगें नाना विलास। न इच्छितां पावती विशेष।
परि स्वसुखीं निमग्न बहुवस। म्हणूनि निःशेष अनासक्त ॥ १३ ॥

संप्राप्त विषयीं न रमती। निरंतर भगवत्स्वरूप चिंतिती।
ऐसियां बाधक न होय संपत्ति। जेंवि सूर्याप्रती मृगजळ ॥ १४ ॥

मग प्रारब्धक्षयान्तीं निजधाम। पुनरावृत्तिवर्जित परम।
अभेदबोधें ते निस्सीम। पावती निष्काम पूर्णत्वें ॥ १५ ॥

यासी संमत भगवद्गीते— । माजी किंबहुना जन्मनांमंते ।
ज्ञानवान्मप्रपद्यते । जाणोनि सर्व हें वासुदेव ॥ १६ ॥

ऐसे परमदशेचे भक्त । पूर्वसाधनसिद्ध निश्चित ।
दुर्लभचि विरळागत । विकाररहित सत्पुरुष ॥ १७ ॥

ते श्रीमंत अथवा अकिंचन । त्यां न होय कधीं विषयभान ।
वृष्टि अनावृष्टि समान । समुद्रा पूर्ण स्वतोयें ॥ १८ ॥

ऐसिया भक्तकोटीमाजी । प्रऱ्हाद ध्रुवादिकांची राजी ।
संपत्ति वेंचूनि धर्मकाजीं । सप्रेम आजि एकनिष्ठ ॥ १९ ॥

आतां द्वितीय जे कां पूर्वसुकृति । किंचित् भगवंतीं अनुसरती ।
स्वरूप समाधानेंवीण चित्तीं । न सुटे आसक्ति विषयांची ॥ २० ॥

विद्यमान जे जे विषय । भोगितां मानसतृप्ति न होय ।
म्हणूनि करिती बहु व्यवसाय । क्लेशमय मग होती ॥ २१ ॥

परन्तु कांहीं भक्तिलेश । पूर्वार्जित अंतरास ॥
म्हणोनि अधिकारी कृपेस । करी परेशानुग्रह त्यां ॥ २२ ॥

ज्या विषयांसाठीं भोगिती कष्ट । ज्यांस्तव विषयवासना बळिष्ट ।
ते विषयासहित संग दुष्ट । तोडी परमेष्ट श्रीहरी ॥ २३ ॥

जैसा रोगें झाला क्षीण । तो स्वेच्छा भक्षितां अन्न ।
अधिकचि क्लेश पावोन । पुष्ट अरुग्ण नव्हे कदा ॥ २४ ॥

तयाप्रती सद्वैद्य दैवें । दिव्यमात्रा देऊं पावे ।
तें पथ्योपचार आद्यवें । तोडी स्वभावें तयाचे ॥ २५ ॥

तेंवि उपतिष्ठावया स्वबोध । श्रीपरमात्मा परमबुध ।
विषयसंग तोडी विविध । हें वर्म शुद्ध येथींचें ॥ २६ ॥

असो शंकानिवृत्तीसाठीं । हें कथिलें विस्तारपरिपाटीं ।
यावरी श्रीकृष्ण पांडवा गोठी । कथी वाक्पुटीं तें ऐका ॥ २७ ॥

म्हणे अगा हे पाण्डुनंदना। जया करूं इच्छीं अनुग्रहणा।
तयाच्या करीं धनापहरणा। विषयवासना तुटावया॥ २८॥
तों हळुहळु झालिया निर्धन। तया सांडू पाहती स्वजन।
तेणें दुःखित होत्साता विषयाचरण। इच्छूनि प्रयत्न पुनः करी॥ २९॥
ते प्रयत्न झालिया व्यर्थ। त्रासूनि राहतां श्रमित।
तंव स्वजन अवदेती बहुत। करूनि लज्जित निखंदिती॥ ३०॥
म्हणती वडील कैसे नांदले। तिहीं जें नांवरूप केलें।
तें अभिमानें राखिलें। पाहिजे वहिलें आपण॥ ३१॥
पुरुषें न टाकावा उद्योग। उद्यां देव फेडिल पांग॥
डोहाचे ठायीं डोह सांग। पडे अव्यंग मागुता॥ ३२॥
इत्यादि आमकां वचनीं। सज्ज होय तो धनार्जनीं।
परि ममानुग्रहास्तव निदानीं। उद्योगकरणीं मोघ घडे॥ ३३॥
एवं स्वजनेच्छा करि यत्न। ते निष्फळ झालिया संपूर्ण।
त्या टाकिती स्वार्थी स्वजन। मग तो निर्धन होय दुःखी॥ ३४॥
ऐशियावरी अनुग्रहण। कैसें करीं मी कृपाघन॥
तें अवधारीं सावधान। कुरुकुलमंडन धुरंधरा॥ ३५॥

श्रीहरिवरदा, अध्याय ८८ वा.

'श्रीहरिवरदा' ग्रंथ म्हणजे महाराष्ट्रसाहित्यवैरागरांतलें एक मोठें अमोलिक रत्न आहे. श्रीमद्भागवताचा दशमस्कंध आधींच फार गोड, त्यांत कृष्णदयार्णव आणि उत्तमश्लोक यांच्या सुरस वाणीची जोड मिळाल्यामुळें, ग्रंथ अगदीं बिनतोड उतरला आहे. सगुण हरिभजनाचा महिमा या ग्रंथाच्या वाचनमननानें वाचकाच्या मनावर ठसून प्रेमळ भक्तिमार्गाकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति वळल्याशिवाय राहणार नाहीं. शेवटीं, उत्तमश्लोकांच्याच गोड शब्दांत आशीर्वाद देऊन हा लेख पूर्ण करितों:—

सर्वही सुखरूप होत। सकळ निरामय असोत।
समस्त कल्याणें पावोत। अखिल नांदोत आनंदें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# नरहरि महीपति.

( संशोधकः—भास्कर रामचंद्र भालेराव, ग्वाल्हेर. )

उत्तर हिंदुस्थानांतील ज्या अप्रसिद्ध संतकवींनीं मराठी भाषेच्या द्वारें तत्वज्ञानाच्या प्रसाराची अपूर्व कामगिरी बजावली, त्यांत प्रस्तुत कवीचें नांव प्रमुखतेनें मोडतें. तंजावर येथील झोळीराम बावाच्या मठापासून तों काशी-प्रयागपर्यंत ज्यांच्या कवनाचा प्रसार झाला, त्यांच्या-बद्दलची माहिती इतिहासप्रिय महाराष्ट्रास असूं नये हें मोठें आश्चर्य होय ! इतिहाससंशोधनाचार्य विसूभाऊ राजवाडे यांनीं भारतइतिहाससंशोधक मंडळाच्या शके १८३३ च्या वार्षिक इतिवृत्तांत ( पृ. ९७ ) नाथांच्या कांहीं उपलब्ध पदांच्या आधारें असें एक विधान * केलें होतें कीं सदर महीपति व संतचरित्रकार महीपति ताहराबादकर हे एकच असून त्यांचे गुरु नरहरिनाथ होत ! पण त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या पदांत ' शिवदिनगुरुका चेला, नरहरि महिपति नाथ रंगेला ' असा स्पष्ट उल्लेख व ताहराबादकर बोवांची संपूर्ण माहिती उपलब्ध असून देखील त्यांचें तिकडे कां लक्ष्य गेलें नाहीं, हें कळत नाहीं. पुढें ठाणेंकर रा. भावे यांनीं सदर संस्थेच्याच १८३४ च्या द्वितीय षाण्मासिक वृत्तांत ( पृ. ३०७ ) रा. राजवाडे यांचें व अगदीं प्रथम नाथांचीं कांहीं पदें छापून त्यांस संतचरित्रकार ठरविणाऱ्या काव्यसंग्रहकारांचें सदर मत खोडून ताहराबादकरांस तुकारामाचा स्वप्नांत अनुग्रह झाला होता व त्यांचे लौकिक गुरु मोरोबा तांभेकर होते आणि नरहरि महीपति निराळाच कवि होता, असें प्रतिपादिलें आहे. शिवाय त्यांनी शनीमाहात्म्यकर्त्या तात्याजी महीपतीचा उल्लेख करून, वाचकांस घोंटाळ्यांत टाकून, विष्णुदास महीपति नांवाच्या एका कवीची कविता ताहराबादकर बोवांचीच असल्याचें लिहिलें आहे ! सदर दोन्ही टांचणें

---

* टीप—हें विधान चुकीचें असल्याचें कविचरित्राच्या पांचव्या भागाच्या प्रस्तावनेंत मी दाखविलें आहे. ग्रंथकर्ता.

माझ्या दृष्टिपथांत आल्यावरून मी माझे सन्माननीय मित्र रा. पांगारकर यांच्या अनुरोधानें त्यांच्या मुमुक्षूंत (ता. १० मे १९१५) नरहरि महीपति बद्दलची खरी माहिती प्रसिद्ध करून भा. इ. सं. मंडळांत एक-टांचणही वाचलें (वा. वृ. १८३७ पृ. ३५९). याप्रमाणें आमच्या नाथांचा महाराष्ट्रास परिचय झाला. यानंतर रा. देव यांनीं 'रामदास रामदासी' मासिकांत, सरदार मुजुमदार यांनीं भा. इ. सं. मंडळांत व रा. भावे यांनीं 'महाराष्ट्र सारस्वतांत' नाथांच्या कवितेची चर्चा केली. पैकीं. रा. भावे यांनीं मात्र माझ्या टांचणाचा उपयोग केला. पण माझी सदर माहिती अपूर्ण व कांहीं अंशी चुकीची होती; कारण ती नाथ उज्जनीस ज्या संतकवि दत्तनाथ राक्षसभुवनकरांच्या मठांत राहत असत त्यांच्या वर्तमान मठाधिपतीकडून मिळविली होती. पुढें मी ग्वाल्हेर येथून कांहीं माहिती मिळवून येथील 'विजय' मासिकांत 'ग्वाल्हेर येथील साधुपंचायतन' या लेखमालेंत नाथांचें संक्षिप्त चरित्र लिहिलें व आतां खुद्द महीपतिनाथ ढोलीबुवांच्या ग्वाल्हेर येथील मठांतील दप्तरें चाळून खालील प्रमाणभूत माहिती लिहीत आहें. असो.

महीपतिनाथ हे देशस्थ आश्वलायन विश्वामित्र गोत्री ब्राह्मण. आडनांव केरसुणे. त्यांचे तीर्थरूप गोविंदराव पेशव्यांच्या फडांत कारकून होते. महीपतिनाथ हें नांव नाथपंथाची दीक्षा घेतल्यानंतरचें होय. त्यांचें मूळचें नांव सखाराम. त्यांच्या जन्मकालाची माहिती मिळत नाहीं. त्यांस एक वडील बंधु व बहीण होतीं, पण आतां त्यांचा वंश नाहीं. नाथांच्या अल्प-वयांतच त्यांच्या तीर्थरूपांचें प्राणोत्क्रमण झालें. तसेंच आईपासूनही त्यांना सुख लाभलें नाहीं. तेव्हां अर्थातच त्यांचें पालकत्व त्यांच्या वडील बंधू-कडे आलें. १२ वे वर्षीच नाथांचें लग्न करण्यांत आलें होतें, पण त्यांचें हें कुटुंबही लवकरच वारलें. एकदां नाथांचें आपल्या भावजयीशीं तुपावरून भांडण झालें. ती म्हणाली, 'कमावून आणावें व तूप खावें'. तेव्हां पूर्व-जन्मींचें सुकृत, बाल्यावस्थेंतील उनाडपणा व सांसारिक कलह यांचा जोर होऊन ते आपल्या घरांतून तडक निघून त्यांनीं आळंदीची वाट धरली. नाथांचें घराणें कुलीन कुटुंबांत मोडत असल्यानें त्यांची लहानपणापासूनच धर्माकडे प्रवृत्ति होती व म्हणूनच त्यांचे हातून वरील प्रमाणें वर्तन

घडणें योग्य होतें. मानसिक संताप व ईश्वरावरील श्रद्धा यांमुळें त्यांनीं श्रीज्ञानोबारायांस शरण जाण्याचा निश्चय केला व दिवसां समाधीच्या सेवेंत राहून रात्रीच्या वेळीं समोरील अश्वत्थाच्या वृक्षावर निजून खालीं पडूं नये म्हणून स्वतःच्या धोतरानेंच वृक्षास बांधून घेण्याचा क्रम सुरू केला ! याप्रमाणें सतत सात दिवस निराहारवृत्तीनें त्यांनीं त्या झाडावरच काढले व शेवटीं त्यांच्या पूर्वसुकृताचा उदय झाला. सातवे रात्रीं प्रत्यक्ष श्रीज्ञानोबारायांनीं नाथांस जागें करून म्हटलें, 'ऊठ. येथें कां निजलास? पैठणास जा म्हणजे तुला सद्गुरुची प्राप्ती होईल व तूं जगद्विजयी होशील.' त्याप्रमाणें ते तेथून पैठणाकडे चालते झाले. व तेथील तत्कालीन साधुवर्य शिवदिन-केसरी-शिष्य नरहरिनाथांच्या मठासमोर येऊन उभे राहिले. त्या वेळीं नरहरिनाथ जणूं काय आपल्या भावी महान् शिष्याची वाट पहातच, मठाबाहेर, आपल्या इतर शिष्यसमुदायासह उभे होते. त्यांनीं दुरून महीपतीस येतानां पाहतांच म्हटलें, 'बरें बाबा, जबर शिफारस आणलीस. तरी आतां इतरांप्रमाणें तूंही येथेंच रहा.' याप्रमाणें महीपतिनाथ संसार-चरकांतून निघून सत्संग पावले. असो.

गुर्वाज्ञेप्रमाणें महीपतिनाथ मठांत राहून गुरुसेवेचें श्रेय संपादूं लागले. त्यांनीं केर काढण्यापासून तों चरणसेवेपावेतों निःसीम भावानें सेवा केली. तेव्हां नरहरिनाथांनीं प्रसन्न होऊन महीपतींना महावाक्याचा बोध, योगमार्गाची सिद्धि व नाथपंथाचा बाणा देऊन, 'तुझ्यासारखा तूंच होशील. तुझें नांव आजपासून महीपति. तूं विजयी होशील.' असा आशीर्वाद देऊन बाण्याचा प्रसार करण्याची आज्ञा केली व नंतर सांगितलें, 'आमचे जवळ नाहीं, अशी वस्तु तुला देतों' आणि डंक्यासहित ढोल दिला. सदर ढोलाच्या गुरुदेणगीच्या वैशिष्टयामुळेंच नाथांनीं स्वतःस व नंतर आपल्या संप्रदायासही '**ढोलीबुवा संप्रदाय**' नांव ठेवून घेतलें. पैठण येथील मठांत हातानें ढोल वाजविण्याचा परिपाठ आहे; तर ढोलीबुवांच्या, मठांत गुर्वाज्ञेप्रमाणें डंक्यानें ढोल वाजतो व सदर परिपाठास पैठण येथें, गुरु-गृहींही अद्याप मान्यता मिळते.

महीपतिनाथांच्या तपःसामर्थ्याच्या खऱ्या स्वरूपास येथूनच सुरुवात झाली. गुरूंचे चरणीं मस्तक ठेवून ते पैठणहून निघाले ते बडोद्यास पोंचले व तेथें रावपुऱ्यांत सूर्यनारायणाचे मंदिरांत उतरले. पैठणहून निघते-वेळीं कांहीं मंडळी त्यांचेबरोबर आली होती त्यांसह महीपतिनाथांनीं '**नाथपंथका बाणा यारों, सब दुनियासे न्यारा है।**' ची ललकार फेंकूत कीर्तनसेवा करण्याची सुरुवात केली. वास्तविक नाथपंथांत सगुणोपासनेपेक्षां निर्गुणोपासनेलाच जास्त महत्व आहे व म्हणूनच महाराष्ट्रांत वारकरी वगैरे भागवतपंथीयांखेरीज इतर पंथांत कीर्तनसेवेचा प्रचार नाहीं. पण महीपतिनाथांस कुलधर्माचें बाळकडू मिळाल्यानें त्यांनीं आपल्या कीर्तनानें सारें बडोदें हालवून सोडलें व त्यांचें कीर्तननैपुण्य आणि साधुत्व यांची कीर्ति राजद्वारापर्यंत पोंचली. आनंदराव गायकवाडांनाही कांहींसा पारमार्थिक नाद होता व दातृत्वाबद्दलही त्यांची ख्याती होती. गायकवाडाजवळ, कोणत्या कां मिषानें होईना, स्वामी नारायण नांवाच्या साधूचेंही जाणें येणें होतेंच. एकदां राजदरबारांत कीर्तन करण्याची महाराजांनीं आपली इच्छा दर्शविल्यामुळें नाथांनीं राजदरबाऱ्यांस कीर्तनसुखांत तल्लीन केलें. नाथ आपल्या कीर्तनांत मधून मधून यौगिक फटकेही म्हणत असत. तेव्हां सदर प्रसंगीं स्वामी नारायणांनीं नाथांस सहज प्रश्न केला, 'जिस गुरूने चढना सिखाया उसने उतरना भी सिखाया है क्या?' नाथांनीं तावडतोब उत्तर दिलें, 'पहले चढ तो चुके? उतरनेका फिर देखा जावेगा.' या प्रमाणें प्रथम दिवसाचें कीर्तन आटोपतांच दुसरे दिवशीं पुन्हां कीर्तन करण्याचा महाराजांचा आग्रह पडला. नाथांचा स्वामी नारायणाशीं झालेला संवाद सर्वश्रुत झाला होताच. तेव्हां उभयतांची दृष्टादृष्ट न होऊं देण्याच्या उद्देशानें त्यांच्या मध्यें एक कांचेचें फाणूसांचें झाड मांडण्यांत आलें. कीर्तनास सुरुवात झाली—

**सांईं अलख पलखमो झलके। लखलखाट बिजली चमके ॥**

**मन गरक हुआ मन गरक ॥ ध्रु० ॥**

**गुरु सांइनाथ आज पाया। मुझे पकड हस्त बैठाया ॥ मन गरक० ॥१॥**

हो अच्छर बीज पढाया। मुझे हस्त पकड बैठाया ॥
मन गरक हुआ मन गरक ॥ २ ॥
अब तूं सच्चा, गुरूका बच्चा, देख परिच्छा,
खूब देख नजरसे अभी।
रज सुन्ना बिखरा सभी।
मूल मायाकी वो छबी।
छोड माया स्वरूप परखे।
लखलखाट बिजली चमके ॥

हें पांच कडव्यांचें पद नाथांनीं म्हटलें. नाथांचें सदर स्वकृत व सामयिक पद होतांच काय चमत्कार झाला ! तें मधलें कांचेचें झाड कोसळून पडलें ! तेव्हां स्वामी शरण आले व 'आपण स्वत: परिपूर्ण आहांत' असें म्हणाले. 'सावध होउनि पाहीं बाई आतां पाहीं आपुल्या डोळा' हें यौगिक चढाव उताराचें ज्ञानोबांचें पद सदर प्रसंगीं त्यांनीं म्हटल्याचेंही सांगतात. नाथांनीं बडोदें येथें दाखविलेल्या कित्येक योगसामर्थ्याच्या चमत्कारांपैकीं एक असा चमत्कार सांगतात कीं, नाथ भिक्षा मागून भंडारा उर्फ ब्राह्मणभोजनें घालीत. तेव्हां एका साधूनें आपल्या तुंबडीच्या बळावर दक्षिणा पुरविण्याचें वचन दिलें. त्या तुंबडींत एक वैशिष्ट्य होतें तें असें कीं इतरांपासून कर्ज काढल्यानंतरच ती पैसे देत असे. याप्रमाणें रोजच्या ब्राह्मणदक्षिणेचें कार्य सावकारांपासून कर्ज काढून भागविण्यांत येत असे. पण रोजच्या कर्जाचा त्रास टाळण्यासाठीं सावकारानें कर्ज देणें बंद केलें, तेव्हां अर्थात् ती तुंबडीही निकामी ठरल्यामुळें सदर साधूची तिरपिट उडाली. परंतु नाथांचें भंडाऱ्याचें व्रत मात्र पूर्ववत् चालू राहिलें, त्यामुळें बडोद्यांत त्यांच्या कार्यैकनिष्ठतेची व राजयोगीत्वाची पुष्कळ वाहवा झाली. असो.

मठाधिपति म्हणतात कीं महाराणी गहिनाबाई गायकवाडानींही त्यांचा उपदेश घेतला होता. पण त्याचा पुरावा आम्हास उपलब्ध झाला नाहीं. मठांत राखून ठेवलेल्या होळकर व गायकवाड नामक दोन ढोलांपैकीं एक ढोल व कांहीं वार्षिक उत्पन्न व लवाजमाही बडोद्याहून मिळाल्याचें सांगतात.

एकदां गहिनाबाईनीं नाथांस गोपीचंद आख्यानावर कीर्तन करण्यास सांगितलें व अत्यंत आग्रह पडल्यामुळें इच्छा नसूनही त्यांनीं—

**जल जाय पापी कम्बख्त बुरा कर दिया ।**
**हुई खाख दुनिया राजा मूर्च्छित भया ॥**

हें पद कीर्तनांत म्हणून आपला दुपेटा फेंकतांच गायकवाडांचा नगारखाना जळाला ! असो.

पुढें नाथ बडोद्याहून निघून फिरत फिरत माळव्यांत आले व काशीस जाण्याचा बेत ठरविला तों रस्तांत भोपाळ नजीक त्यांस उज्जनीस दत्तनाथ राक्षसभुवनकर नांवाचे संत असल्याची बातमी लागली. तेव्हां ते त्यांना भेटण्यासाठीं उज्जनीस गेले. नाथांनीं तेथें दत्तनाथांच्या संगतींत बराच काळ घालविला. उज्जनी हें एक प्रसिद्ध क्षेत्र असल्यामुळें तेथें त्यांच्या कीर्तनावर भाविकांच्या उडया पडत असत. व त्यांच्या कवनांस लेखनाचें स्वरूप तेथेंच प्राप्त जाहलें. उज्जनी येथील, सिंगपुरींत, सदूभाऊ दत्तात्रेयांच्या मंदिरांत महीपतिनाथांच्या भक्तिपर भजनांचीं व अभंगवृत्तात्मक भक्तचरित्रांचीं प्रचंड बाडें आणि बराच पत्रव्यवहार अद्याप जपून ठेविला आहे. दत्तनाथही स्वतः महान् योगी व कवि होते व त्यांजवर नाथांची किती श्रद्धा होती हें त्यांच्या खालील पत्रावरून कळून येईल--

## श्रीनाथप्रत.

श्रीदत्तभक्त परायेणांतःकरण सरसिरुह स्मरण शठचरण दुस्तरतर संसारसागर शरण समुद्धरण तरी भूतमंदर महीधर पंखितवेदांत सकलगुण संपन्न पित्रादि सम समसाम पद्याभूत हृदयस्थ ईश्वरीमान्य तीर्थस्वरूप दत्तात्रय भाऊ वडीलांचे शेवेसीं--

अपत्ये दासानुदास चरणरजवांछित देह नामाभिधान जनरूढस्थान महीपतीनें दोन्ही कर जोडून त्रिकालचरणीं सिरसा॥ न॥ वि॥ येथील कुशल ता॥ आ शु॥ ६ परियंत स्वामी कृपेंकरून ठाणें टोंक येथें क्षेमरूप असों. विशेष आपल्या कडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ घडत नाहीं ऐसें अयोग्यतेस

दिसतें. येदर्थीं कूर्मदृष्टी करून पालन जालें म्हणजे संसारदुर्गमीं परिणाम लागेल. शेवकानुशेवक मी आहें. मजपासून सेवा काय घडेल? सर्वोपरी पदरीं घेतलें, त्या पक्षीं गुणअवगुणीं स्वामींनीं दृष्टीस न आणितां परामर्ष करीत जावा. यानंतर पत्र कारणें "भगवंत भक्तजनांचें, निजनामें संकट वारी" हा धांवा क्षणाच्या अवकाशें लेखन करून ती॥ रा. रा. अन्याबा समागमें पाठवून द्यावा. वरकड मजकूर स्वामीचे भेटीस येऊं तेव्हां सर्व निवेदन करीन. बहुत काय लिहिणें, कृपालोभाची वृद्धि करीत असावी हे विज्ञापना.

ती॥ सौ. मा. गंगाबाई जीजीस सा. न. महीपति गोविंद"

'मुमुक्षु' पत्राच्या २५ जुल १९१९ च्या अंकांत माझे बंधु मुकुंदराव रामचंद्र भालेराव, 'देवदास,' यांनीं श्रीअवंतिकाक्षेत्रमाहात्म्याचें नाथांचें 'अवंतिका हे पावन नगरी सहावी मोक्षपुरी, स्वयंभुज्योती महाकाल हा जागृत हृदयीं धरी' हें पद प्रसिद्ध केलें होतें, त्यावरून नाथांचा उज्जनीवर असलेला प्रेमाही दिसून येतो. नाथ माळव्यांत गांवोगांवीं कीर्तन करून भक्तिज्ञानाचा प्रसार करीत फिरत असत. त्यांमुळें त्यांची कीर्ति वीरमर्द मराठे गडी यशवंतराव होळकरांपर्यंत पोंचली व त्यांनीं नाथांस आपली तत्कालीन राजधानी भानपुर येथें अत्यादरानें बोलावून त्यांजकडून उपदेश घेतल्याचा उल्लेख 'होळकरांच्या कैफियतीं'त सांपडतो. (पृ. १२५) पाश्चिमात्य इतिहासकार व बखरकार, बहाद्दर यशवंतराव होळकरांना विध्वंसक म्हणोत, परंतु आमच्या संग्रहांतील कागदपत्रांवरून त्यांस आम्हीं विधायक, स्वाभिमानी, व वीर मुत्सद्दी असल्याचें सिद्ध केलें आहे. (अरविंद, मार्च १९२०). होळकरानीं नाथास पालखीसह खालील सनद दिली.

## श्रीम्हाळसाकांत.

३ सप्टेंबर १८०८

### म्हाळसाकांत चरणीं तत्पर तुकोजीसुत यशवंतराव होळकर

हरिभक्तिपरायण राजश्री महीपतबुवा चिदानंद स्वामी बिन नारायणबावा गुरु नरहरिबावा परमगुरु सिवदिनबावा नाथपंथी ढोले गोत्र विश्वामित्र सूत्र आश्वलायन शाखा शाकल वास्तव्य क्षेत्र प्रतिष्ठान गंगातीर स्वामीचे शेवेशी

शेवक येशवंतराव होळकर दंडवत विज्ञापना. आपण श्रीगुरुप्रसादें अपरोक्ष अनुभवी सर्वकाल निजध्यासीं तत्पर. आपले दर्शनाचा लाभ कोो भानपुर मुकामीं होऊन चरणप्रसादें करून कृतार्थता घडली. स्वामी सर्व विषयांपासून व्यतरीक्त तथापि लौकिकरीत्या शेवा घडावी म्हणोन विनंति केली ती मान्य होऊन श्रीगुरूचे उच्छाह व ब्राम्हणभोजनानिमित्य साल म॥र शके १७३० देसी मालवी संमत १८६५ चे सालापासून पोो देपालपुर येथील सं॥ गांवा पै॥ देहे इनाम येणें प्रमाणें—

१ मौजे हातोद.

१ मौजे भील बडोली.

येकुण देहे दोन खेरीज हकदार व इनामदार करून बाकी दरोबस्त अमल व जकात जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधि निक्षेप सुद्धां देऊन हें पत्र लेहून दिल्हें असे. तरी आपण हरदू गांव लेखनान्वयें हकदार व इनामदार खेरीज करून बाकी अमल जकात सहित आपले दुमाला करून घेऊन आपण व आपले शिष्यप्रशिष्यादि परंपरेनें तेथील अनुभव सन म॥र पासून साल दर साल घेत जाऊन सदोदित चरण शेवेचा लाभ देऊन शेवेंत चित्त निमग्न राही तें करावें. 'रा छ. ११ रजब सुर सन तीसा मयातेन व अलफ. बहुत काय लिा हे विज्ञापना' मोर्तब खुद

टीप—कंसांतील अक्षरें निराळ्या वळणाचीं उर्फ खाशांच्या हातचीं असून याच मजकुराचें (१) कमाविसदार वर्तमान व भावी यांच्या नांवचें ताकीदपत्र व (२) मंडलोई व कानगो देपाळपुरचा परवाना हीं उपलब्ध आहेत.

सदर सनदेवरून यशवंतरावांच्या धर्मपरायण अंतःकरणाची चांगली साक्ष पटेल. यशवंतरावांच्या समकालीन मराठे सरदारांत एकी नसल्यानें व मुख्यतः त्या वेळीं एखादी केंद्रीभूत व्यक्ति नसल्यानें, 'स्वराज्यांत जलचरांचा प्रसार न होऊं देण्याची' त्यांची इच्छा पुरी झाली नाहीं. तेव्हां अर्थातच ते विषण्ण झाले. अशा वेळीं त्यांस नाथांसारख्या सद्गुरूचा लाभ मिळाल्यामुळें त्यांच्या अंतःकरणास बराच शांति मिळाली असेल असें वाटतें. यशवंतरावांवर

नाथांची कशी छाप होती, हें त्यांची मुलगी भीमाबाई बुळे यांनीं नाथांस दिलेल्या खालील सनदेवरून चांगल्या प्रकारें दिसून येईल. भीमाबाई ही मोठी स्वाभिमानी बाई होती. १८१५ त महीदपूरच्या युद्धांत होळकरांचा पराभव झालेला तिला आवडला नाहीं व तिनें स्वत: घोड्यावर स्वार होऊन मालकणास चकविल्याचें महशूरच आहे. सदर बाईंनीं नाथांस पितृतुल्य मानलें. ही सनद खालीलप्रमाणें

( सं. १८७२=२५ आक्टो. १७ )
( सं. १८७२=६ आक्टो. १६ )

श्रीगुरुभक्तिपरायण ती रा. रा. महिपतबाबा संस्थान प्रतिष्ठान स्वामी वडिलांचे शेवेसी बाळकें भीमाबाई बुळे चरणीं मस्तक ठेवून सा। दंडवत विज्ञापना संमत १८७३ शके १७३८ नर्मदा उत्तर तीर सर्वजित नाम संवछरे. आपण सत्पुरुष थोर ब्राह्मण श्रीजीची पूजा अर्च्या उछाह संतर्पण धर्ममार्ग पाहून या दौलतींत आपणांस कांहीं आश्रय असावा यानें अभीष्टदायक जाणोन मौजे खजूरी प॥ झाबवे दि॥ खासगी हा गांव धर्मादाय इनामदार जमीनदार हाकदार जकाद सुधा मार्ग खेरीज करून सरकारांतोन जमा तुम्हांकडे दुमाला लाऊन देऊन हे सनद अर्पण केली आहे. त्यास पेस्तर साल सन समान अशर संमत १८७४ चे सालापासून मौजे मजकूर येथील जमीदार इनामदार हाकदार जकात उभा मार्ग खेरीज करून ऐन जमेचा उपभोग साल दर साल आपण व आपले शिष्य परंपरा घेत जावा. आमचे वंशी ही परंपरा आपला गांव निर्वेध चालवितील. मिती आश्विन शु॥ १५ 'शेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.' मोर्तब खुद

टीप—कंसांतील अक्षरें खाशाबाईंच्या हातचीं. कमाविसदाराच्या नांवानें ताकीदपत्र व जमीनदारांच्या नांवाचा छ. १२ जिलकाद सबाअशर मयातेन व अलफचा परवानाही उपलब्ध आहे. ( ४ आक्टो. १८१६ )

नाथांचा मानपान यशवंतरावांप्रमाणेंच त्यांचे चिरंजीव मल्हारराव होळकरांनीं कायम ठेविला होता. इतकेंच नव्हे तर त्यांनीं नाथांच्या इच्छेप्रमाणें

त्यांचे 'बराबरचा ब्राह्मण समुदाय व प्रतिवर्षींच्या श्रीच्या उछाहाच्या खर्चास अवलंब असावा' म्हणून वार्षिक उत्पन्नही करार करून दिलें होतें. त्याची सनद खालील प्रमाणें—

## श्रीम्हाळसाकांत.

**म्हाळसाकांतचरणीं तत्पर यशवंतरावसुत मल्हारराय होळकर**

२४ सप्टेंबर १८१३.

राजश्री वर्तमान व भावी कमाविसदार प॥ रामपुर गो।

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ मल्हारराव होळकर दंडवत अ॥ रामराम सुमा आर्बा अशर मयातेन व अलफ शके १७३५ तारण-नाम संवत्सरे हरिभक्तपरायण राजश्री महीपती बावा ढोली वास्तव्य क्षेत्र प्रतिष्ठान गंगातीर यानीं स्वारींत येऊन विदित केलें कीं आमचे बराबर ब्राह्मण-समुदाय व प्रतिवर्षी श्रीचे उछाह करावे लागतात, त्यांचे खर्चास अवलंब नाहीं. यास्तव सरकारांतून नूतन योजना करून दिल्ही पाहिजे. त्यावरून मनांत आणितां ढोलीबावा थोर ब्राह्मण सत्पात्र प्रतिवर्षी श्रीचे उछाह करितात व ब्राह्मणसमुदायेदि संग्रहीं. त्यांचें चालविल्यास श्रेयस्कर जाणोन मौजे जळोद बमय मजरे देवरी तो॥ हवेली पो। मजकूर हा गांव साल मजकूर पासून हकदार इनामदार खेरीज करून सरकार अमल सरकारांतून धर्मार्थ इनाम द्यावयाचा करार करून ही सनद सादर केली असे. तरी तुम्हीं सन म॥रपासून मौजे म॥र येथील खेरीज हकदार इनामदार करून बाकी सरकार अमल ढोलीबावा यांचे दुमाले करून देऊन बावा व यांचे सिष्यपरंपरा साल दरसाल वहिवाट सुरळित चालवून प्रतिवर्षी सरकार पत्राचा आक्षेप न घेतां या सनदेची नकल करून घेऊन हें असल पत्र म॥ निल्हे यांजपासीं भोगवटी यास परतोन देणें जाणिजे छ. २८ 'रमजान बहुत काय लिहीणें'

**टीपः**—कंसांतील अक्षरें खुद्द खाशांचे हातचीं. बावांस दिलेली सनद उपलब्ध नाहीं. ( १ ) परवाना छ. २८ रजब ( २७ जुलै ) सन सदरचा असून दुसरा चं. ८ शवाल आर्बा अशर ( ४ आक्टो१३ )आसोज सु॥ १० सं. १८७० चा रांगडी आहे (द्वितीया भाद्रपद वद्य ९, २३ सप्टें. १८१४)

आतां प्रसंगानुरोधानें एका महत्वाच्या बाबीचा येथें उलगडा करीत आहोंत. इतिहास किंवा कविकाव्यसंशोधनासाठीं, तत्संबंधीं मित्या ठरविणें हें एक महत्वाचें पण बरेंच अवघड काम असतें. सुदैवानें आज महाराष्ट्रांत इतिहासाची बरीच चर्चा होत आहे, पण तत्संबंधीं, आमच्या चुकीच्या मार्गाच्या अवलंबनामुळें, तारखा ठरविण्याचा आधारभूत संदर्भग्रंथ आम्हांस उपलब्ध नाहीं ! कै. बाळाजी प्रभाकरांची जंत्री आहे खरी; पण ती किती चुकीची आहे, हें वरील पत्रांवरून कळून येईल. विक्रम संवताचा आरंभ चैत्र शुद्ध १ पासून होतो, पण मोडकांनीं कार्तिकापासून दाखविला आहे. तसेंच मराठी दप्तरांत वर्षगणना तर अरबी ऊर्फ सूरसनाप्रमाणें असे; परंतु तारखांची मोजणी बहुधा हिजरी पद्धतीनें अर्थात् १ ल्या मोहर्रमपासून काढीत असत. यामुळें व इतर घोटाळ्यामुळें जुन्या पत्रांच्या तारखा मुळींच मिळत नाहींत. उदाहरणार्थ, वरील भीमाबाईचें पत्र पहा. सनदेंतील शक संवत् जंत्रींत एक येत नाहींत व जंत्री खरी मानल्यास सनदेच्या दोन दिवसांआधींच परवाना पाठविला जातो हें कसें ? हीच बाब मल्हाररावांच्या सनदेसही लागू आहे व त्यांच्या ताकीदपत्राच्या व परवान्याच्या तारखेंतही अशाच प्रकारचा घोंटाळा दिसून येतो. असो.

'सवाई यशवंतराव सवाई सवाई डंका बजाया' या माळव्यांत प्रसिद्ध असलेल्या यशवंतरावांच्या पोवाड्यांत त्यांच्या शौर्याखेरीज धार्मिक श्रद्धेचेंही वर्णन सांपडतें. ते नदीवर मल्हारि मार्तंडाचा भंडार उधळून पाण्यावरून चालून जात असल्याबद्दलच्या कित्येक आख्यायिकाही सांगतात. तेव्हां अर्थातच त्यांची नाथांवर अपूर्व श्रद्धाभक्ति असल्यास नवल नाहीं. ते नाथांस जिवंत पीर म्हणत व हत्ती आजारी झाल्यास त्यास त्यांचा अंगाराही लावीत असत. नाथांच्या कृपेनेंच महाराजांस पुत्ररत्नाचा लाभ झाला. असें सांगण्यांत येतें कीं त्या मुलाचें प्राणोत्क्रमण झालें, तेव्हां होळकरानीं स्वतः नाथांचें सत्व पहाण्याच्या हेतूनें त्या मुलास त्यांजपुढें नेऊन टाकलें व 'आपणच दिलेला मुलगा कसा मेला' अशी पृच्छा केली. नाथ कांहीं बोलेनात. तेव्हां यशवंतराव तेथून निघून गेले व रागाच्या आवेशांत त्यांनीं

मनांत प्रतिज्ञा केली कीं, उदईक मुलगा जिवंत न झाल्यास नाथांस सुळावर चढवूं अगर हत्तीच्या पायीं देऊं. असा बिकट प्रसंग पाहून नाथांनीं—

**अशा समयीं धांव रे नरहरी,**

हा अपूर्व व विस्तृत करुणापर धांवा म्हटला, तों तें मूल जिवंत झालें! दुसरे दिवशीं यशवंतरावानीं तेथें जाऊन लागलेलें द्वार पायानें तोडून टाकलें व आंत शिरून पाहतात तों मूल खेळत असलेलें दिसून आलें! शेवटीं होळकर नाथांस शरण गेले, पण सत्वपरीक्षा पाहिली म्हणून नाथ तेथें क्षणभरही न राहतां तेथून चालते झाले. पुढें यशवंतरावांस वेड लागलें व त्यांतच ते वारले हें प्रसिद्धच आहे. असो.

पुढें नाथ पुण्यास पोंचले व तेथें पेशव्यांनीं त्यांना कांहीं द्रव्य देऊं केलें होतें, पण आपले गुरुबंधु लक्ष्मणनाथ यांजप्रमाणेंच नाथ पेशव्यांच्या कपर्दि-केसही शिवले नाहींत. मल्हारराव होळकरांच्या वेळेस नाथ माळव्यांत येऊन नेमणुकी गांवांचें उत्पन्न येईना म्हणून द्वारकेस जातांना इंदूरावरून गेले, तेव्हां त्यांस उत्पन्न न देण्याचे मिषानें अटक करण्यांचें दरबाऱ्यांचें कपट दिसून आलें. तेव्हां त्यांनीं उत्पन्नावर पाणी सोडल्याचें सांगतात. म्हणूनच हल्लीं ढोलीबुवांच्या मठास सदर गांवांचें उत्पन्न चालू नाहीं. नंतर नाथ राज-पुतान्याकडे वळले व त्यांच्या हिंदी कीर्तनामुळें जोधपुर संस्थानांत त्यांचा बराच लौकिक झाला. तेथें त्यांनीं नारायण महाराज ऊर्फ सुंदरनाथ नामक एका शिष्यासही स्थापिलें. सदर संस्थानांतूनही नाथांच्या शिष्यास वार्षिक तैनात मिळाल्याचें ग्वाहेर येथील मठांतील दप्तरांवरून कळतें.

नंतर नाथ पैठण येथें गुरुगृहीं राहून आपला काळ घालवूं लागले. त्या वेळीं ग्वाल्हेर येथें दौलतराव शिंदे राज्य करीत होते. शिंद्यांचें चरित्रही बरेंच कलंकित रेखाटलें गेलें आहे. परंतु वास्तविक दौलतराव मोठे कुशल, स्वाभिमानी, गुणग्राहक व प्रगतिप्रिय असल्याचें उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येतें. दौलतरावांस योगमार्गाचाही बराच नाद होता. आम्हांस ग्वाल्हेर येथील राजपुस्तकालय ‘सरस्वतीभांडारांत’ दौलतरावांनीं केलेलीं योगमार्गपर पदें व त्यांनीं लिहविलेले कांहीं ग्रंथही सांपडले आहेत, त्या-वरूनही वरील गोष्टीची प्रचीती येते. त्यांच्याजवळ पैठण येथील नाथांचे

पुराणिक त्रिंबक ऊर्फ अण्णा महाराज नांवाचे हटयोगी साधू रहात असत. शिंद्यांनीं अण्णा महाराजांजवळ योग शिकण्याचा हट्ट घेतला, तेव्हां ते म्हणाले, 'आम्हीं हठयोगी; पैठणांत हल्लीं महीपतिनाथ नामक राजयोगी राहतात त्यांना बोलवावें.' तेव्हां महाराजांनीं अण्णा महाराजांच्या शिफारसीनें नाथांस पैठणाहून बोलाविलें. दौलतरावांस बुद्धिबलाचे डावाद्वारें नाथांनीं यौगिक पाठ दिल्याचें सांगतात. पुढें शिंदेही नाथांचे अनुयायी झाले. असो.

नाथ ग्वाल्हेरींत ११ महिने होते. 'कथा करावी महीपतीनें व ऐकावी त्रिंबकानें ( अण्णा महाराजांनीं )' ही म्हण त्या वेळीं फार प्रचारांत होती. आपली परंपरा कायम राखण्याच्या उद्देशानें त्यांनीं आपले साढू ( मेहुणे ) पर्वतीवरील ( पुणें ) विष्णूचे पुजारी हरीबावा पुरंदरे यांस, त्यांचे चिरंजीव काशीनाथ यांस पट्टशिष्य करण्याची इच्छा दर्शविली, पण जोगड्यास मुलगा देत नाहीं, असें म्हणून त्यांनीं मागणी भिरकावून दिली. पण काशीनाथांनीं त्यांचें चोरून शिष्यत्व पतकरिलें होतें. असो.

पुढें नाथांस आपला समाधिकाल जवळ आल्याचा दृष्टांत झाला व आम्हीं बसूं तेंच क्षेत्र असें म्हणून त्यांनीं ग्वाल्हेर येथेंच समाधि घेण्याचा निश्चय केला. त्यांनीं शक १७४५ पौष शुद्ध १० स संन्यासदीक्षा घेतली व त्रयोदशीस त्यांच्या टाळूस भोंक पडून त्यांचा आत्मा वैकुंठास निघून गेला. त्यांचे समाधिकालाविषयीं त्यांचे शिष्य अप्पाजी गुरुकृत खालील श्लोक आढळतो—

> **सत्राशें नृप शालिवाहन शके पन्नास पांचा उणें ।**
> **सृष्टयूव सर नाम तो जप पहा, पौषास या मंत्रणें ॥**
> **नक्षत्र शशिवाहिनी त्रयोदशी, यामार्ध आला रवी ।**
> **साधोनी बहु योग महीपती गुरू, कायापुरी गौरवी ॥**

सदर तिथीस नाथांच्या ग्वाल्हेर येथील समाधिस्थलीं मोठा भंडारा होत असतो.

नाथांनीं अप्पानाथांस पट्टशिष्य केलें, पण पुढें समाधीनंतर नारायण महाराजांस दृष्टांत देऊन काशीनाथास बोलाविलें, त्याप्रमाणें काशीनाथ महा-

राजांनीं नाथांचा संप्रदाय चालविला. निर्मलनाथ, अमरनाथ (भेडसो), दाजी महाराज वगैरे त्यांचे प्रसिद्ध शिष्य झाले. काशीनाथ महाराजही मोठे लौकिकसंपन्न होऊन गेले. त्यांनीं पायानें चारी धाम यात्रा करून ११ कावडी शृंगी रामपूरहून व २ गंगोत्रीहून गंगेच्या आणून गुरुऋण फेडलें. त्यांचे तीर्थरूप हरिबावा यांची समाधिही ग्वाल्हेरीसच आहे. बायजाबाई शिंदे यांनीं काशीनाथ महाराजांस ५० हजार रुपये देऊं केले होते, पण त्यांनीं ते घेतले नाहींत. तेव्हां बायजाबाई साहेबांनीं त्यांना हल्लीं मठांत असलेली अपूर्व व प्रचंड बावडी बांधून दिली. जयाजीराव महाराज शिंदे यांचे दिवाण बाळाजी चिमणाजी जठार यांच्या कुटुंबानें व सुनेनें त्यांचें शिष्यत्व पतकरून दौलतराव महाराजांनीं बांधून दिलल्या नाथांच्या समाधीचा मंडप बांधून दिला. शक १७९६ चैत्र व॥ ४ स त्यांनीं आपल्या गुरूंच्या तीर्थांत समाधि घेतली. त्यांच्या नंतरही या गादीवर योग्य पुरुष होऊन गेले व हल्लींचे मठपतिही नाथांचा लौकिक कायम ठेवून आहेत. नाथांच्या पुण्याईनें त्यांच्या संप्रदायाचाही बराच प्रसार झाला असून ग्वाल्हेरच्या हल्लींच्या थोरल्या राजमहिषी सौ. चिनसूराजासाहेबही नाथसंप्रदायाच्या अनुयायी आहेत.

महीपतिनाथांची विविध प्रकारची कविता उपलब्ध आहे, परंतु दुर्दैवानें मठपति ती छापूं देण्यास तयार नाहींत! त्यांचें अभंगात्मक विस्तृत भक्तचरित्रही उपलब्ध आहे. नाथांची परंपरा पुढील प्रमाणें:—

शिवदिनकेसरी
|
नरहरिनाथ
|
लक्ष्मणनाथ — महीपतिनाथ
|
काशीनाथ
|
नानामहाराज. — लक्ष्मणनाथ — गंगाधरनाथ

नाथांनीं आपली गुरुपरंपरा खालील पद्यांत गोंविली आहे:—

सकळा आदिनाथ शिवशंकर भोळा ।
विष्णूचा अवतार मछींद्र जाला ॥
गोरक्षाचे पोटीं गोरख उद्भवला ।
गुरुभक्तीनें गैणीनाथ उद्धरला ॥
जयजय स्वामीनाथा सद्गुरु गुरुमूर्ती ।
अखंड चरणांगुष्टीं वोवाळूं आरती ॥ १ ॥

निवृत्तीचा ज्ञानी त्याचा सोपान ।
चौथी मुक्ताबाई ब्रह्मचि परिपूर्ण ॥
सत्यामला तारी सांगे गुरुखूण ।
गैबी त्रैलोक्यामधिं जाला पावन ॥ २ ॥

गुप्त उदूबोधासी सांपडला ठेवा ।
केसरि जाला न कळे मोक्षाचा हेवा ॥
सिवदिनसुत हा नरहरि मज पावेल केंव्हां ।
अक्षयी महीपति होइन मी राजा तेंव्हां ॥ ३ ॥

नाथांच्या प्रायः सर्व पदांत कडक वैराग्य व निर्वाणपर फटक्यांचा रंग दिसत असूनही त्यांत त्यांच्या दिव्य वाणीचा प्रत्यय पहावयास मिळतो. यांची कविता अत्यंत प्रतिभासंपन्न असून, पराकाष्ठेची परिणामकारक आहे. रचना डौलदार, भाषा प्रायः शुद्ध आणि सुलभ व प्रसाद भरपूर आहे. वक्तृत्वाचा ओघ अस्खलित असून प्रास-अनुप्रासादिकांची रेलचेल असल्यामुळें, यांची बहुतेक कविता कर्णमधुर उतरली आहे. वैदर्भस्थ प्रसिद्ध संतकवि देवनाथ यांच्या कवितेशीं नरहरि महीपति यांच्या कवितेचें पुष्कळच साम्य आढळतें. उपमांचा व अलंकारांचा थाटही प्रेक्षणीय आहे. उदाहरणार्थ—

### लुगडें भरजरीचें.

भडक जरीचें परोपरीचें लुगडें नेसुनि बसेन गे ।
मुखि पदर लाउनी हंसेन गे ॥ ध्रु० ॥

माग आकाशीं घालुनि तंतू कातणिचे विणियले कसे ।
मज घडि घडि पाहतां येत हंसें ॥
लांबी रुंदी मोजतां शिणले शेष वेदही झाले पिसे ।
किती पदर कुठवरी असे ॥
कोण नेसणारीण राहते कवणें ठाइं तिचें आसन गे ॥ १ ॥

अंगणीं पसरलें लुगडें लोंबलें पदर शोध कर कुठें आहे ।
नव्हे फुकाचें गुरुकृपेचें विरळा अनुभव घेउनि पाहे ॥
पूस गुरूला जाउनि लवलाहें ।
मीच लाडकी लेक अमोलिक साडी उंची नेसेन गे ॥ २ ॥

बारा सोळा मिऱ्या घातल्या सरसावुन घेतें पदर गे ।
परपुरुषावर माझी नजर गे ॥
चार पायऱ्या चढून गेलें जवळ केली सदर गे ।
दशनादिं होति बहु गजर गे ॥
लुगडें फिटलें रूप प्रगटलें आसनावरती बसेन गे ॥ ३ ॥

आसनी बसतां पाहणें पाहतां मिळणीं गेलें मिळून गे ।
महातेजचि अवघें गिळून गे ॥
नरहरिनाथासंगें अनुभवसुख मज आलें कळून गे ।
दिलें लुगडें मोठें छळून गे ॥
महीपति म्हणे मी गुरु माउलिच्या पदराखाळीं बसेन गे ॥४॥

## चोळी

अनुभव चोळी उंच अमोलिक सद्गुरुपासुनि घेइन गे ।
माझी मीच अंगभर लेइन गे ॥ ध्रु० ॥
गगना येवढा विणुनि चोळखण तऱ्हतऱ्हेचे बुट काढिन गे ।
मधें भिंग बसविले जडून गे ॥
लाल भडक रेशमी कांठ ते शोभति दिसती दुरून गे ।
श्वेत पोत सुत भरून गे ॥
निळी सांवळी बुटि वाटोळी पाहातां उगीच राहिन गे ॥ १ ॥

नवरंगाचे नव तुकडे कसे शिवले पाहतां शिवे गडे ।
शिवणार सुघड कधिं दृष्टि पडे ॥
अखंड दोरा भरुनी सारा एकचि दिसतो मागें पुढें ।
त्याचा पदर लांबला कोणिकडे ॥
धुंडित जातां भिंग पाहिलें बुडून त्यांतचि जाइन गे ॥ २ ॥

मसुरे येवढी वाढी भरली उडी टाकितां गेलें जवळ ।
तेथें दृष्टिस पडलें मोठें नवल ॥
पिंपळावरी पार बांधिला मुंगीमुखिं गगनाचा कवळ ।
चोळी घालून बसलें प्रभा जवळ ॥
बिरडें सुटलें बंद उपटले स्वरूपीं गांठ देइन गे ॥ ३ ॥

गांठ सुटेना चित्त विटेना बळकट गेली बसून गे ।
चोळी तटतटीत राही कसून गे ॥
नरहरिनाथें कुंकु लाविलें जन्म मरण गेलें पुसून गे ।
चोळी घालूं नयनिं अजि हंसून गे ॥
महीपति बाळा लागेल दृष्टी चोळिंत लपवुन घेइन गे ॥ ४ ॥

वरील व याच प्रकारच्या त्यांच्या इतरही असंख्य पदांत व्यावहारिक व नित्याच्या अनुभवाची जोड देऊन तात्विक विषयांचा समावेश केल्याचीं किती तरी उदाहरणें दाखवून देतां येतील. मागें उल्लेख केलेला त्यांचा करुणापर धांवा खालीं देत आहोंत--

## धांवा नरहरीचा.

अशामधिं पाव रे नरहरी । धांवत ये लवकरी ॥ ध्रु० ॥
अजवरि सृष्टीशीं पाळियलें । आतांच कां दूर धरियेलें ॥
पतितपावन हें ब्रीद आपुलें । सोडुनियां कसें दिधलें ॥
नोहे उचित हें मनिं विचारीं ॥ १ ॥

निष्ठुर होउनि कां दातारा । करिं रे जगदोद्धारा ।
दुर्घट संकट हें संहारा । विश्वजनासी तारा ॥
आलें विघ्नचि टाळीं झडकरी ॥ २ ॥

नाहीं धीर जिवा कोण मला । रक्षिल दीनदयाळा ॥
करुणा येऊं दे कनवाळा । प्राणचि उरला डोळां ॥
काय पाहतोसी कृपा करीं ॥ ३ ॥

मागें बहुतांसी तारियलें । अतां कां मौन धरिलें ॥
हातिचें शस्त्र तुवां ठेवियलें । कोठें सुदर्शन गेलें ॥
सखया अड घालीं पण तारीं ॥ ४ ॥

बालक प्रल्हाद रक्षिशी । स्तंभीं प्रगट होशी ॥
हिरण्यकशिपूचा वध करिशी । आज कां विसरलाशी ॥
निद्रा सांडुनियां कैवारी ॥ ५ ॥

दुष्टें द्रौपदिसी गांजितां । चाटी होसि अनंता ॥
तुजला श्रम जाले गुणवंता । वस्त्रें काढुनि देतां ॥
तशि आज उडि घालीं श्रीहरी ॥ ६ ॥

कढईमाजी मंडुकबाळ । पडतांची तात्काळ ॥
तुजला स्मरतांची वेल्हाळ । त्वां केलें शीतळ ॥
पाहतों वाट तुझी बा मुरारी ॥ ७ ॥

पार्थें पण केला पुत्रासी । मारिन जयद्रथासी ॥
त्वां गा लपवीलें सूर्यासी । पण नेला सिद्धीसी ॥
किति तुज अळवावें परोपरी ॥ ८ ॥

पाहतां कलियुगीं नवल । भिंत चालविली ॥
नामा शिंप्याच्या भक्तिमुळें । बैसोनि भोजन केलें ॥
हुंडी मेहेत्याची खरी भरी ॥ ९ ॥

जनीच्या संगें तूं शिणलासी । दळण दळाया जाशी ॥
चोखामेळयाचें दहिं खाशी । खिचडीस भुकेलाशी ॥
कर्माबाईची नवल परी ॥ १० ॥

शेत राखियलें बोधल्याचें । ढीग करिसि धान्याचे ॥
पाणी वाहतां बा नाथांचें । श्रम तुज जाले साचे ॥
म्हणुनी बसलाशी कुठें तरी ॥ ११ ॥

कुंभाराचें बा तान्हूलें । झडकरी उठविलें ॥
भानुदासासी सुळीं दिधलें । त्यासी पल्लव फुटले ॥
आज कुठें गेला कंसारी ॥ १२ ॥

सर्वेश्वराचे कीर्तनीं । नाचसि रात्रंदिनीं ॥
कबिरापाशिं कसा बैसोनी । वस्त्रें विणसि सुखानें ॥
माझे गुण दोष न विचारीं ॥ १३ ॥

रोहिदास तुला विनवितां । कंकण देसि अनंता ॥
यवन दामाजी गांजिता । पोतें घेसी माथां ॥
न कळे पार तुझा पूतनारी ॥ १४ ॥

तुकया वाण्याचे कागद । तारियले प्रसिद्ध ॥
नरहरि सोनार मतिमंद । कांचन करून शुद्ध ॥
वस्ता घडविशि बा परोपरी ॥ १५ ॥

जनजसवंताचे संकटीं । तूं कैसा पावलासी ॥
लगबग प्राशन विष केलें । संतुष्ट केलें मिरेसी ॥
कोमळ हृदय तुझें गिरधारी ॥ १६ ॥

सांवता माळ्याच्या पोटांत । लपलाशी विख्यात ॥
लोलिंबराज वदे अद्भुत । अवसचि पुनव होत ॥
तूं त्या भक्तांचा साहकारी ॥ १७ ॥

प्रेमळ भक्ति पहा न्हाव्याची । स्मश्रू करिसि नृपाची ॥
सखुला आवड बहु भेटीची । इच्छा पुरवुन तिची ॥
बांधुन घेतलें कसें तरी ॥ १८ ॥

भक्ति पुंडलिकें गांजिलें । उभें विटेवरि केलें ॥
पंढरपुर हें चांगलें । सहजीं हाता आलें ॥
करुणा परिसोनी त्वरा करीं ॥ १९ ॥

अपार संत तुवां रक्षियले । काय तुझें त्यां केलें ॥
चिंता नरदेही गाळियले । बसोनि पार्थिव केलें ॥
सखया वेळ कशी या वरी ॥ २० ॥

शिवदिन केसरिच्या कृपाबळें । नरहरि उघडी डोळे ॥
महिपति करि धांवा पळोपळें । अभय गुरूनें दिधलें ॥
आलों आलों बा धीर धरीं । धांवत ये लौकरी ॥ २१ ॥

## प्रार्थना

क्षमा करीं अपराध सख्या रे । किति तरि विनवूं तुला ॥
भेट देईं विठोबा मला ॥ ध्रु० ॥

दामाजीनें धान्य लुटविलें वांचविली पंढरी ।
तुज काय म्हणावें तरी ॥
जाउनियां दरबारीं यवना लऊन मुजरा करी ।
तूं भार वाहसी शिरीं ॥
भक्तजनांची माय कृपाळू कळवळ आली तुला ॥ १ ॥

स्तंभि बांधुनि गृहीं टाकितां विचार केला नाहीं ।
गेली यात्रेला सखूबाई ॥
तिच्या पतीची सेवा केली बसुन पलंगीं पाहीं ।
तुझे अंगीं देवपण नाहीं ॥
सखू आण जा पाणी सासू घागर देते तुला ॥ २ ॥

जनाबाईनें दळण दळाया तुला कसें लाविलें ।
त्वां न्हाउं तिला घातलें ॥
बसूनियां सांगातिं प्रीतिनें उच्छिष्ट भोजन केलें ।
हें तुझें प्रगट कोणी केलें ॥
वाकळ पांघरुनि उभा राहसी शोभा आली तुला ॥ ३ ॥

राधाबाई कोण निघाली सुईण त्वां होउन ।
केलें तिचें बाळंतपण ॥
नरहरिनाथ म्हणे गा महिपति लीन जाल्यावांचुन ।
तुला दयाळ म्हणेल कोण ॥
संतां घरचीं कामें करितां उसंत नाहीं तुला ॥ ४ ॥

महीपतिनाथ निर्गुणवादी असूनही त्यांचीं विठ्ठल, राम, कृष्ण वगैरे देवतांच्या भक्तिपरही कित्येक पदें आढळतात. त्यांची खालील 'श्रीरामकृष्णस्तुति' ही मननीय आहे—

रामभक्त करि रामभजन तो रामराम ध्यातो ।
आसनिं शयनीं रामचि जपतां आरामचि होतो ॥ ध्रु० ॥
रामनाम शिव कंठीं धरितां शीतळ तनु जाली ।
रामचरणस्पर्श होतां सती अहल्या उद्धरली ॥
युद्ध रावणें करितां ज्योती रूपांत मिळविली ।
भक्त बिभीषण शरण घेतां लंकापुरी दिधली ॥
॥चाल॥ वाल्याचा वाल्मिक झाला उलटया नामें ।
शतकोटि ग्रंथ निर्मियला, हो पराक्रमें ।
गणिकेसि तारिलें पक्षी पढविले नेमें ।
रामनाम हें समजुनि तारक हृदयीं जो ध्यातो ॥ १ ॥

बाळपणामधिं अघ बक केशी दैत्यांसी वधिलें ।
सोळा सहस्र गोपी भोगुन ब्रह्मचर्य धरिलें ॥
शस्त्र न धरितां कौरवदळ तें सर्वहि संहरिलें ।

गोवर्धन पर्वतासि अंगुलि–अग्रावरि धरिलें ॥
॥चाल॥ तो विप्र सुदामा शरण येतां हरी ।
दवडोनी दिधली त्यासी कांचन पुरी ।
सर्व काळ रक्षी पांडव नानापरी ।
वस्त्रें पुरवी द्रौपदीस त्या वधिलें शिशुपाला ।
जन्म मरण त्या नाहीं जीवन्मुक्तिसि तो गेला ॥
कृष्णभक्त करि कृष्णभजन तो कृष्णरूप झाला ।
जन्ममरण त्या नाहीं जीवन्मुक्तिसी तो गेला ॥ २ ॥

रामभक्त म्हणे आहे रे ठाउक तुझा तो गिरिधारी ।
भ्रष्टविलें गोकुळ तें अवघें करितां परद्वारी ॥
माय यशोदा उखळीं बांधिलें घेउनि गौ दोरी ।
काळयवना भेणें गेला मुचकुंदा विवरीं ॥
॥ चाल ॥ मायबाप दुःख भोगिति रे कारागृहीं ।
कां उदरीं जन्म घेतला लाज कशि नाहीं ।
गौळिणी कोंडिती घरांत खातां दहीं ।
गोपाळांचें उच्छिष्ट भक्षी जारकर्मि रत तो ॥ ३ ॥

कृष्णभक्त म्हणे राम तुझा मी जाणतसें त्यासी ।
निरपराधी वाली मारुन स्त्री दिधली बंधूसी ॥
ताटिकेवरी शस्त्रचि धरितां लाज नाहिं त्यासी ।
सीता रावणें नेली सांगतो दुःख वानरांसी ॥
॥ चाल ॥ त्या दोघां अहिनें पाताळीं नेउन ।
बळि दिधलें उभयतां अंबिके कारणें ।
तेथें हनुमंतें रक्षिले त्यांचे प्राण ।
गर्भिणि कांता वनीं सोडिली पुरुषार्थचि केला ॥ ४ ॥

रामभक्त म्हणे कृष्ण तुझा तो भामेनें दान दिधला ।
पतिव्रता रुक्मिणिनें त्यासी सोडुनि घरीं आणिला ॥

कुरूप कुब्जा कुश्चळ तीसी कामलुब्ध झाला ।
दासीपुत्र विदुराच्या कण्या भक्षितां लुब्ध झाला ॥
॥ चाल ॥ धर्मा घरीं काढी उच्छिष्ट पत्रावळी ।
दिली लाथ भृगूनें कशी उरस्थळीं ।
पार्थाचे अश्व धुतो रणमंडळीं ।
युद्ध न करणें सहजचि पळोन द्वारकेस गेला ॥ ५ ॥

कृष्णभक्त म्हणे उच्छिष्ट बोरें भक्षी शबरीचीं ।
बंधूचा जामात वधियला लाज नाहिं त्याची ॥
दासीचे बुद्धीस लागली माता भरताची ।
तिनें तिघांसी वनीं धाडिलें कशि गत कर्माची ॥
॥चाल॥ शत्रुघ्ना दिधली राज्यपुरी संकिता ।
लंकेसि रावणें चोरुन नेली सीता ।
दशरथें सोडिला प्राण दुःख ऐकतां ।
नाहिं उभयतां भेट झालि श्रावणें शाप दिधला ॥ ६ ॥

गुरुभक्त म्हणे वाद कशासी दोघे समसमान ।
रामें राक्षसी वधिली कृष्ण करि पूतनाशोषण ॥
रामकृष्ण अवतारी भक्ति हें सत्य असे जाण ।
साधन नेणें कांहीं सद्गुरु नरहरिवांचून ॥
॥चाल॥ नरहरि बाळक अजाण ताहुन्लें परी ।
गुरुपायीं अयोध्या आणि द्वारकापुरी ।
सर्वोपरि पंगु सत्य सत्य वैखरी ।
रामकृष्ण अंतरीं सारखे द्वैत कदां नाहीं ।
देवयात्रा तीर्थ माझें सद्गुरुचे पायीं ॥ ७ ॥

नाथांचे गुरुबंधु नरहरिनाथ यांचे चिरंजीव लक्ष्मणनाथ यांजवरही नाथांची फार भक्ति असे. नाथांनीं त्यांजवर केलेल्या पदांत नाथपंथाच्या बाण्याचेंही सुरेख वर्णन दिलें आहे, ते खालील प्रमाणे —

महाराज लछमन प्यारा । साहेब बडा अलबेला ॥ ध्रु० ॥
कलाबतू की टोपी सिरपर । चीरा जरीका बांधे ऊपर ।
बभुत लगावे सबहि बदनपर । गावे नारायणलीला ॥ १ ॥

कीनखाबकी कफनी भारी । ऊपर सैली लंबी डारी ।
सिंगी पुंगी तुंबी न्यारी । और तुलसीमाला ॥ २ ॥

हाथमें तोडा पहुंची डारे । रेशमकाठी धोती पहरे ।
शाल दुशाला ओढे गहिरे । पांवमें लंगर मतवाला ॥ ३ ॥

ढोल झांझ टिपरिनका बाजा । तालतंबूरा और पखवाजा ।
नाचे हरिकीर्तनमो राजा । छंद मोहनमेसे झूला ॥ ४ ॥

जुडे सभा बडी संतनकी । घंटा होतसे हरिभजनकी ।
दोही रेसा पद निर्गुणकी । कहे कछु बानी अनमोला ॥ ५ ॥

शिवदिन नरहरि सच्चा सांई । उनका लछमनलाल गसाई ।
सबकी जूती सीस उठाई । महिपति बंदा गुरुचेला ॥ ६ ॥

नाथांची हिन्दी कविताही फार बहारीची आहे. उदाहरणार्थ, त्यांचीं कांहीं पदें येथें देत आहोंत--

### झुला मल्हाराचा.

धीरे धीरे झुलोजी नदके लाल ॥ ध्रु० ॥
वरषा ऋतु सावनका महिमा । गावोजी राग मलहार ॥ १ ॥
तुम सुकुमार कुंवर कन्हैया । ऊंची कदम की डार ॥ २ ॥
पवना छूटे बिजली चमके । उडत खांदे रुमाल ॥ ३ ॥
नरहरि महिपती गावे नाचे । सब संग बाल गुपाल ॥ ४ ॥

( २ )

गुरुचरणों पर मैं बलि जाऊं ॥ ध्रु० ॥
अज्ञान पडदा खोल दिया । भरपूर खजाना जहँ पाऊं ॥ १ ॥
चांदनी फौडके चंद दिखाके । अब मन उन्मन करदेऊं ॥ २ ॥

रंग देखकर दंग हुवा मैं। नैनोंमें भर भर रख लेउं ॥ ३ ॥
महिपति नाम उपाधी छोडी। नरहर साई तेरे गुण गाऊं ॥४॥

(३)

देखो भाई अजब तमासा। फेर बखत नहिं आने का ॥
रामनाम का लेना देना। हाट भरा सब संतन का ॥ ध्रु० ॥

सदगुरु मेरा मोदी पुराना। भरा किराना ज्ञानों का।
रोकड सौदा करलो यारो। नहीं है काम उधारी का ॥ १ ॥

भक्ति ज्ञान वैराग्य उधेडा। थैला जीवन मुक्ती का।
खोल दिया कोई लोरे प्यारे। जो सौदा नहिं मिलनेका ॥२॥

प्रेम तराजू तोलों भाव। भरा पारडा भक्ती का।
मनभर देवे पूरा साहेब। सच्चा तोल है उनका ॥ ३ ॥

मेरा नरहरिनाथ गुसाईं। बनिया है जी निरगुन का।
हमाल महिपति खडा पसारे। पल्लां यारों लेने का ॥ ४ ॥

वर दिलेलीं सर्व पदें आम्हीं संतकवि बाळकृष्णनाथ राजुरकर, कल्याणाचे निपणतु आबामहाराज, देवनाथशिष्य मल्हारनाथ, शिंद्यांचे दिवाण आत्माराम बाबा वारुडे वगैरेच्या संस्थानांतून मिळालेल्या बाडांवरून येथें उतरलीं आहेत. नाथांचे ग्वाल्हेरकर मठपति नाथांच्या पदांचीं बाडें व ग्रंथ असल्यास ते दाखविण्यास व त्यांतील एक अक्षरही छापूं देण्यास तयार नाहींत, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. सुमारें ३।४ वर्षें मठपतींच्या नादीं लागून, निरनिराळी आमिषें दाखवून व जबर शिफारशी आणूनही जुन्या खोडांची बुद्धि ताळ्यावर येत नाहीं. चरित्राच्या साधनासाठीं मठांतील दप्तरें मात्र मठपतींनीं चाळूं दिलीं व तोंडी माहिती दिली हीच महद्भाग्याची गोष्ट होय! महीपतींचे आश्रयदाते दत्तनाथ उज्जनीकर यांचे वंशजांनीं मात्र नाथांच्या भक्तचरित्रामृताच्या सुमारें ५००० अभंगांचीं चरित्रें सुमारें ५० यांची नांवनिशी व चरित्रांच्या अभंगांच्या संख्येची नोंद आमचे संग्रहीं आहे.)

व पदांची बाडें दाखविलीं होतीं व तीं मागें पुढें हस्तगत होण्याचीही आशा आहे. यामुळें नाथांच्या ग्रंथांचीं नांवें आज देत येतां नाहींत. पण योग आल्यास त्यांचें विस्तृत चरित्र व काव्य त यांच्या असंख्य भक्तांच्या साह्यानें प्रसिद्ध करूं. नाथांचीं दोन चित्रेंही ग्वाल्हेर मठांत उपलब्ध आहेत, त्यांवरून नाथ स्थूल व ठेंगू शरीराचे आणि दिव्य कांतीचे दिसतात. उज्जनी येथील मठांत निरनिराळ्या अप्रसिद्ध कवींच्या पदांचा व ग्रंथांचा तर संग्रह आहेच, पण ग्वाल्हेरच्या मठांतही आत्याबाईनें ऊर्फ शिवदिन केसरीच्या कन्येनें लिहिलेलें भक्तचरित्र, चिंतामणकृत ज्ञानकैवल्य, बोधवैभव, ज्ञानबत्तीशी वगैरे कित्येक ग्रंथही आहेत. भेलसा व जोधपुर येथील शाखामठांतही कांहीं माहिती व कवन मिळूं शकेल. आतां नाथांचीं आणखी कांहीं निवडक पदें देऊन हें चरित्र संपवितों--

(१)

धन्य पुत्र जगीं पुत्र जगीं । ध्वजा लावितो स्वर्गीं ॥ ध्रु० ॥
माता पितयाची सेवा । अखंड भजतो सद्गुरु देवा ॥ १ ॥
दास्य घडावें कांहीं । ऐसें मनांत इच्छित जाई ॥ २ ॥
प्रसूत जाहली जननी । पतिव्रता ते कुलउद्धरणी ॥ ३ ॥
जो जो पदार्थ मागे । मागितल्यावीण देतो वेगें ॥ ४ ॥
नरहरि महोपति वाचा । बोले कुलदीपक तो साचा ॥ ५ ॥

(२)

सावध व्हा गडे नीट उमगा शिमगा निघून जाइल कीं ॥
बसुन तमाशा पाहुं चला रे पहातां पहांट होइल कीं ॥ ध्रु० ॥
पांच पंचवीस पोरें यांची संगत सोडुन द्यावी कीं ।
त्रिगुण मोळी बांधुनि होळी औठ पिठावर न्यावी कीं ॥ १ ॥
सत्रावीचा घोंट घोटुन लक्ष्य सुनीळा लावीं कीं ।
फटफटित चांदणें ज्योति ज्वाळा त्यांत भासा येइल कीं ॥

नवरंगाचा एकच गोळा बहु बाभाळा भासेल कीं ॥
चंद्रसूर्य देखणें गेले पाहतां पाहणें नासेल कीं ।
लपेल ढवळें दिसेल पिवळें यांत कांहीं बाहीं असेल कीं ॥ २ ॥

त्यांत मिळावें तन्मय व्हावें साधनिं मन हें धांवेल कीं ।
गुरुची सेवा घडेल तेव्हां समाधि लागुन जाइल कीं ॥
नरहरिनाथा स्वामी समर्था कधिं हें घडोन येइल कीं ।
जन्म मरण या दुःखापासुनि सुटका कशि तरि होइल कीं ॥३॥

महिपति किंकर अखंड भोगी स्वरुप समाधिंत राहिल कीं ।
हा सुखसोहळा आपुल्या डोळां, आपणचि आपणा पाहिल कीं ॥
जनासि हंसतो मनासि पुसतो कधिं सण शिमगा येइल कीं ।
सद्‌गुरुनाथ कृपा करुनि मज माहेराप्रति नेइल कीं ॥ ४ ॥

( ३ )

## गुरुस्तुति

माझा लक्ष्मीकांत महाराज, गुरु राखों लाज, पुरवि काज, कल्पतरू॥
मला बैसविलें सन्मुख हो धरुनि करें ।
मौळ स्पर्शोनि कथिलें कानीं गुज बरें ॥
प्रणवयुक्त सोहं बीज अक्षर हेंचि खरें ।
वोढ लावी नयनिं दाखवी स्वरूपसागरु ॥ १ ॥

ब्रह्मा रक्तपीत स्थूल देह जाण बरा ।
विष्णु सूक्ष्म श्वेत वर्ण त्याचा पाहें खरा ॥
कारण श्याम बुबुळ रूद्र हाचि जीवीं धरा ।
महाकारण प्रपंच नीळ मसुर वरू ॥ २ ॥

सुनीळ पाहतां देहभान सर्व राहियलें ।
तिला पाहणें पाहतां सर्वचि राहियले ॥
..............................
बोलवेना आतां पुढें काय मी करूं ॥ ३ ॥

मला थापटोनि जागें करी माय माझी ।
गुरु कामधेनु गाथ नरहरि तुझी ॥
घालीं प्रेमपान्हा वत्स पाहुनि राजी ।
महिपति लडिवाळ बाळ खेळवीं लेंकरूं ॥ ४ ॥

कवीनें तत्कालीन अवनत परिस्थितीवरही खूप कडाका उडविला आहे व तत्संबंधीं त्यांचा—

पाहतां पाहतां धर्म बुडाला अधर्म झाला चोहिंकडे ।
जिकडे तिकडे कली मातला कठिण काळ हा आला पुढें ॥

हा फटका फार प्रसिद्ध आहे. तशाच मासल्याचें त्यांचें एक आणखी अप्रसिद्ध उपदेशपर पद खालीं देत आहोंत. त्यावरून ‘ कवि हे आपल्या कालचे इतिहासकारच होत ’ ह्या म्हणीचाही प्रत्यय येईल--

( ४ )

जन्मा येउनि प्राण्या संता शरण जाइना । कां हरिगुण गाइना ॥ ध्रु ॥
शिस्नोदरपोषण कराया देशावरि जाती । कोठें नाहीं विश्रांती ॥
एकादशीचे दिवशीं पापी अन्नचि खातातो । मुक्ति वांछितातो ॥
शूद्रदासिसी भांडण होतां कदापि राहिना । कां हरि० ॥ १ ॥

ब्राह्मणासी अडका देतां प्राण निघुन जातो । म्हणे कपाळ उठवितो ॥
तस्कर येतो चोरी मग उर बडवीतो । खळखळां मनीं रडतो ॥
वेश्या येती घेउन जाती तोंड तिचें पाहतो । मनि उगाच चुरमुरतो ॥
तोटा पडल्या उगाच घरीं बसून राहिना ॥ २ ॥

देवपुजेसी गंध उगाळी होउनियां कष्टी । आवडीनें भांग घोटी ॥
नाच तमाशा पाहतां हर्ष माईना पोटीं । हुक्क्याची आवड मोठी ॥
नाम हरीचें येइना वाचे पाप्याचे होटीं । विषयांत लाळ घोंटी ॥
पुराणीं कीर्तनीं आळी कपाळीं पडतां राहिना ॥ ३ ॥

नरहरिनाथ म्हणे गा महिपति हे गडि काळाचे । प्रियकर फराळाचे ॥
आप्त सोयरे जिवलग प्राणी यमाजीपंताचे । पाहुणे सदा घरचे ॥

भजनमार्गींचे मांग शत्रू साधुसंतांचे । ते वैरी देवाचे ॥
नाहीं सुख पाप्याचे दैवीं लीनता येईना । कां हरिगुण गाईना ॥ ४ ॥

नरहरि महीपति यांचीं वर दिलेलीं सर्वच पद्यें, त्यांच्या उत्कृष्ट कवित्वाचा भासला आहे, असें वाचकांनीं समजूं नये. कारण, एक तर, वरील पद्यांचें मूळ स्वरूप लेखकदोषामुळें बरेंच विकृत झालेलें उघड दिसतें, व दुसरें असें कीं, यांहून किती तरी सरस अशीं त्यांचीं शेंकडो पद्यें इतस्ततः पसरलेलीं आहेत. उदाहरणार्थ, 'पंढरपुर' या नांवानें प्रसिद्ध असलेलें त्यांचें खालील पद्य इतकें प्रेमळ आहे कीं, त्या प्रेमळपणामुळेंच आज सुमारें १०० वर्षें, महाराष्ट्रांत तें अत्यंत लोकप्रिय होऊन राहिलें आहे.

## पंढरपुर.

ऐसें वाटतें मनासि माझ्यां उडोनि जावें ते ठायीं ।
आवळुनि कवळुनि हृदयिं धरावें भेटावें त्या लवलाहीं ॥
लक्ष मंजऱ्या तुळसीमाळा मणभर बुक्का सखे बाई ।
अर्पण करुनी वेळोवेळां मस्तक ठेवावें हरिपायीं ॥ १ ॥

नाहिं मनाला धीर ग बाई भेटीसाठीं जिव झुरतो ।
शिणती डोळे अश्रु वाहती जिव माझा निघुं निघुं पाहतो ॥
आषाढीचा सोहळा मोठा संतमेळा किं ग मिळतो ।
गरुडपारीं नामकडाका गजर मोठा गर्जतो ॥ २ ॥

मिळालि यात्रा अपरंपार गर्दि मोठि दर्शनाची ।
माय बहीण विठाबाई कधिं भेटेल पंढरपुरची ॥
निढळावरती हात ठेवुनी वाट पाहतें केव्हांची ।
माय बहीण विठाबाई कधिं भेटेल पंढरपुरची ॥ ध्रु० ॥

एकिमेकिचा हात धरोनी प्रदक्षिणेला बाइ जावें ।
लोटांगण घालुनी आनंदें रंगशिळेवरि नाचावें ॥
वाळवंटावरि उडति पताका कौतुक डोळयांनीं पहावें ।

वेणूनादें खडकावरती गोडी घ्यावी काल्याची ॥
माय बहीण विठाबाई कधिं भेटेल पंढरपूरची ॥ ३ ॥

पंढरपुर वैकुंठ वसविलें भूमंडळिं ऐसें नाहीं ।
हाकेसरसा धाउनि येतो भेटे विठोबा रखुमाई ॥
नाथ नरहरी म्हणे महीपति हा भरला सर्वा ठायीं ।
सद्गुरुकृपेनें ओळखुनि घ्यावा हा विठ्ठल आपुले हृदयीं ॥
प्रेमळ कीर्तन भक्त करिती आवड ज्याला नामाची ॥
माय बहीण विठाबाई कधिं भेटेल पंढरपुरची ॥ ४ ॥

या बहारीच्या पद्यांत पंढरपुर येथील आषाढीच्या सुखसोहळ्याचें प्रत्यक्ष चित्र उमटलेलें जर वाचकांस दिसलें नाहीं तर त्याबद्दल त्यांनीं कवीस दोष न देतां, आपल्या अरसिकतेस द्यावा.

# ठाकुरदास बावा.

उत्तर हिंदुस्थानांत भागीरथीतीरीं गुसाईका शिवराजपुर या नांवाचें शहर आहे. त्या गांवीं अदमासें २२५ वर्षांपूर्वी कान्यकुब्ज ब्राम्हण कुळांत मकरंद या नांवाचे एक सदाचारसंपन्न गृहस्थ होते, त्यांच्या पुत्राचें नांव खड्गेश्वर. खड्गेश्वरांचा पुत्र नीलकंठ यास बालाप्रसाद, शिवप्रसाद, व गणपतप्रसाद असे तीन पुत्र होते. त्यांपैकीं वडील पुत्र बालाप्रसाद हे सोळा वर्षांचे वयांत घरून निघाले ते आधीं जगन्नाथास गेले. नंतर इतर तीर्थें करून पंढरपुरास आले. तेथें यात्रा होती. त्या वेळीं प्रेमळ वैष्णवांचीं कीर्तनें ऐकून बालाप्रसाद यांस असें वाटलें कीं, आपण स्वत: कीर्तन करावें. मग ते सभामंडपांत जाऊन डावे बाजूचे वोहरींत बसले व मनांत निश्चय केला कीं, कीर्तन करितां येईल तेव्हां उठेन. याप्रमाणें दोन दिवस बसले; अन्नोदक नाहीं. तिसरे दिवशीं ग्लानि येऊन झोंप लागली. तों स्वप्नांत एक ब्राम्हण येऊन म्हणाला, " ऊठ. " हे म्हणाले, " मला कीर्तन करितां येत नाहीं, तरी उठून काय करावयाचें ? " ब्राम्हण म्हणाला, "उभा रहा, कीर्तन येईल.", हे म्हणाले, "आपण कोण ? " त्यानें सांगितलें, " मी पैठणचा रहिवासी." बालाप्रसादानीं विचारलें, " आपलें नांव काय ? " ब्राम्हण म्हणाला, " माझें नांव एकनाथ. " बालाप्रसादानीं नमस्कार केला व ब्राम्हणानें त्यास कानांत उपदेश सांगितला. आणि " नारायण विधि अत्रीनाथ दत्तजनार्दन एकनाथ " ही गुरुपरंपरा सांगून आज्ञा केली कीं, कीर्तन करीत जा, कांहीं कमी पडणार नाहीं; व अधिक संग्रहीं राहणार नाहीं. माझी तुजवर कृपा आहे. इतकें सांगून ब्राम्हण गुप्त झाला. तेव्हांपासून बालाप्रसाद यांनीं आपलें नांव ठाकूरदास असें ठेवून घेतलें; व ते कीर्तन करूं लागले. सद्गुरु कृपा झाल्यावर अशक्य काय आहे ? तुकाराममहाराजानीं म्हटलेंच आहे कीं, " अशक्य तें काय तुम्हा नारायणा ? " एकनाथस्वामीच्या कृपेनें बुवा उत्तम प्रकारें कीर्तन करूं लागले.

पुढें ते दाभाडयांच्या तळेगांवीं गेले. तेथें दाभाडयाचे घराण्यांतील मुख्य बाईनीं त्यांचा उपदेश घेतला व राममंदिर बांधून दिलें. तें तेथें अद्याप आहे. त्यास गोरा राम म्हणतात. नंतर बुवा पुण्यास आले. तेथें दुसरे बाजीराव पेशवे राज्य करीत होते; व बापू गोखले सेनापति होते. बापूंनीं बुवांस शुक्रवारपेठेंत श्रीविठ्ठलमंदिर व वाडा बांधून दिला. सातारा जिल्ह्यांतील तारगांवचें उत्पन्नही त्यांच्याच मदतीनें बुवांस मिळालें. बापूंची बुवांवर फार भक्ति होती व त्यांनीं त्यांची फार सेवा केली. बुवा एकदां भिक्षेस निघाले असतां बापू मागें टाळ घेऊन निघाले. बुवांनीं त्यांस म्हटलें कीं, तुमच्यासारख्या थोर सरदारास हें योग्य नाहीं. बापूनीं सांगितलें कीं, गुरूनीं भिक्षा वर्ज्य केल्यास मी करीन. तेव्हांपासून बुवानीं भिक्षा वर्ज्य केली व त्यांचा सर्व खर्च बापू चालवूं लागले. त्यांनीं व पेशव्यांनीं बुवांस पुष्कळ वैभव दिलें. त्या वेळीं त्यांचा खर्च फार मोठा होता, म्हणून त्यांनीं संग्रह कांहींच केला नाहीं. पेशव्यांनीं लक्ष रुपयांचा ओटा करून तो आच्छादित केला व त्यावर यानां बसवून यांचें पूजन केलें व संकल्प सोडून म्हणाले कीं, आपल्या आसनाखालीं द्रव्य आहे तें घ्यावें. बुवानीं सांगितलें, रमण्यांत ब्राम्हणास दक्षिणा द्या. पेशव्यांनीं त्याप्रमाणें केलें. पेशवे सरकारास यांचीं पुष्कळ अद्भुत कृत्यें दिसून आल्यामुळें त्यांची त्यांजवर फार भक्ति बसली. त्या वेळीं त्यांनीं केलेले चमत्कार त्यांच्या चरित्रांत साद्यंत वर्णिले आहेत असें समजतें. हा चरित्रग्रंथ पुणें येथें त्यांच्या वंशजांपाशीं आहे.

पुढें पेशवाईचा अंत झाल्यावर, पुण्यांतलें आपलें सर्व वैभव सोडून बुवा साताऱ्यास गेले. त्या वेळीं थोरले प्रतापसिंह महाराज गादीवर होते. त्यांनीं बुवांची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवली. महाराजांची त्यांजविषयीं मोठी पूज्यबुद्धि असे. बुवानींही सद्गुरुकृपेनें मोठमोठ्या विद्वानाचें समाधान करावें.

**ठाकुरदासबुवांची कविता**—बुवानीं श्रीमद्भगवद्गीतेवर अभंग ३८९, श्रीमद्भागवत द्वितीय स्कंधावर ओवीबद्ध टीका सुमारें २०००, श्रीमच्छंकराचार्यकृत सप्तश्लोकीवर अभंग, वेदस्तुतीवर अभंग, व सहजबोध हे ग्रंथ, व शिवाय किरकोळ पदें व अभंग पुष्कळ केले आहेत. यांतील बहुतेक ग्रंथ बवानीं आपल्या इनाम गांवीं—तारगांवीं—असतांना केले. तेथें

वाडा बांधलला आहे. त्या वेळीं, कोल्हापुरकरांचे पराक्रमी सरदार अप्पा साहेब निपाणकर हे बुवांस प्रतिवर्षी उत्सवास बोलावून नेत असत. त्या वेळीं पैठणकर बुवा, देंठणकर बुवा वगैरे अनेक संतकुलोत्पन्न बुवांना निपाणकर आपल्या गांवीं नेऊन व त्या सर्वांस बरेच दिवस ठेवून घेऊन संतसमागमाचा लाभ घेत असत. त्यानीं बुवांस एक गांव दिला त्याचें नांव आर्टाळी. तो गांव त्यांचे संस्थानाबरोबर गेला. बुवांनीं आपला बहुतेक काल तारगांवीं सहकुटुंब राहून आनंदानें घालविला. आरंभीं ज्यांचीं नांवें निर्दिष्ट केलीं आहेत, ते यांचे धाकटे बंधु, हे पुण्यास असतानांच यांचा शोध करीत आले. त्यांपकीं शिवप्रसाद हे आपल्या गायनानें बुवांच्या कीर्तनास साथ करीत. त्यांना शेंकडो पदपदांतरें मुखोद्गत होतीं. ते थोड्याच दिवसांनीं पुणें येथें देवळांत पंचपदी करीत असतांना समाधिस्थ झाले. दुसरे गणपतप्रसाद हे पखवाज सुंदर वाजवून कीर्तनांत बुवांची साथ करीत. बुवाचें कीर्तन बहुधा वेदांतपर असावयाचें. ठाकुरदास बावांचा शरीरसंबंध जुन्नर येथें तिवारी उपनांवाचे गृहस्थ होते त्यांच्या कन्येशीं झाला. जुन्नर येथें बुवांनीं श्रीलक्ष्मीनारायणाची स्थापना केली. तो मठ अद्याप तेथें कोथळपुऱ्यांत आहे. बुवांस, एकनाथबावा व जगन्नाथबावा असे दोन पुत्र झाले. उभयतां अल्प वयाचे असतांना मातोश्री निवर्तली. पुढें बापू गोखले यांनीं बुवांस विनंति केली कीं, द्वितीय संबंध करावा. बुवा म्हणाले, कांहीं कारण नाहीं, संतति आहेच. बापू म्हणाले, आम्ही मातोश्रीवांचून दीन झालों आहों. शेवटीं बापूंच्या आग्रहावरून बुवांनीं द्वितीय संबंध केला. शुक्ल उपनांवाच्या घराण्यांतील मुलगी होती. तिला दोन पुत्र झाले. पहिल्याचें नांव कृष्णनाथबावा व दुसऱ्याचें रामनाथबावा. या चार पुत्रांपैकीं जगन्नाथबावांचे पुत्र विनायकबावा हे हल्लीं पुणें येथें शुक्रवारपेठेंत ठाकुरद्वारीं राहतात.

ठाकुरदासबुवा साताऱ्यास असतांना पाठीस फोड ( काळपुळी ) होऊन थोडे दिवस आजारी होते; नंतर शके १७५२ वैशाख शुद्ध ३ ( अक्षय्य तृतीया ) रोजीं साताऱ्यास शनिवारपेठेंत चौबे यांचे घरीं त्यांचें देहावसान झालें. चौबे हे त्यांच्या वडील चिरंजीवाचे श्वशुर. बवांचा काळ झाल्यावर

त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव जगन्नाथ बावा यांनीं त्यांची यथासांग उत्तरक्रिया करून त्यांच्या "भावनेची समाधि" तारगांवीं स्थापन करून सभामंडप व धर्मशाळा बांधली. या दोन्ही इमारती अद्याप आहेत. तेथें बुवांच्या पुण्यतिथीचा उत्सव अक्षय्य तृतीयेस व श्रीनाथषष्टीचा पुण्यांतील विठ्ठलमंदिरांत होत असतो. वडील चिरंजीव एकनाथबावा फार विद्वान् शास्त्री होते. ते बुवांच्या मागून दोन वर्षांनीं सातारा येथें निवर्तले पुढें. जगन्नाथबावांना निजामसरकारांतून सर सालरजंग यांनीं साडेपांचशें रुपयांच्या उत्पन्नाचें गांव दिलें, व कृष्णनाथबावांना मुंबईमध्यें थोरलें ठाकुरद्वार संस्थान मिळालें. त्या ठिकाणीं त्यांनीं श्रीअक्कलकोट स्वामीच्या पादुका स्थापन करून, चाळ व दुकानें बांधून उत्पन्न केलें. तें त्यांच्या वंशजांकडे आहे. पुढें जगन्नाथ बावा शके १८०० सालीं कार्तिकीचे यात्रेस सहकुटुंब पंढरपुरास गेले. तेथें कांहीं दिवस राहून मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेस कैलासवासी झाले. त्यांचे वंशज साताऱ्यास अगर पुण्यास आपल्या संस्थांनीं असतात. ठाकुरदासबुवांच्या सर्व वंशजांना ठाकुरदास हेंच नांव पडलें आहे. बुवांच्या ग्रंथांपैकीं सहजबोध नामक ग्रंथ छापला आहे. शिवाय, मुंबईंतील विद्वान् व हरिभक्तिपरायण नागरिक श्री. शांताराम नारायण दाभोलकर यांनीं सन १८९७ सालीं बुवांची भगवद्गीतेवरील अभंगबद्ध टीका, सहजबोध व स्फुट पदें, इतकी कविता प्रसिद्ध केली असून त्या ग्रंथाच्या आरंभीं त्यांनीं जें बुवांचें संक्षिप्त चरित्र दिलें आहे, त्याचेंच, प्रस्तुत लेख हें अवतरण होय.

बुवांचे चिरंजीव कृष्णनाथबुवा हेही शके १८०० सालीं माघ वैद्य ७ रोजीं मुंबईंत ठाकुरद्वारीं परलोकवासी झाले. एकंदर ठाकुरदास बावांचें चरित्र मोठें आहे. त्यांचीं अद्भुत कृत्यें व साक्षात्कार पंढरीस व पुण्यास असतांना बहुत जाहले होते, ते त्यांच्या वंशजापाशीं असलेल्या चरित्रांत सविस्तर वर्णन केले आहेत.

बुवा हे उत्तरेकडील कान्यकुब्ज ब्राह्मण असल्यामुळें त्यांची जन्मभाषा हिंदी असतांही, त्यांनीं महाराष्ट्रांत आल्यावर मराठी भाषेचें ज्ञान संपादन करून, त्या भाषेंत ग्रंथरचना केली, ही आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट आहे.

ज्यांची मातृभाषा मराठी नसतां, ज्यांनीं त्या भाषेंत ग्रंथरचना केली असे दुसरे मराठी कवि सोलापूरचे श्रीशुभराय महाराज होत. आणि हे दोन्ही कवि समकालीन होते हें विशेष. ठाकुरदासबावांच्या वंशजांस निजाम सरकारांतून उत्पन्न मिळालें ही गोष्टही लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

ठाकुरदासबुवांची कविता अगदीं साधी असून हरिभक्ति हा तिचा एकच विषय आहे. त्यांनीं आपल्या कवितेंत ठिकठिकाणीं एकनाथ महाराजांचा उल्लेख केला आहे. पुढील ओव्या पहा:—

**ऐसें श्रीएकनाथ आपण । करितसे सहज परमार्थकथन ।**
**सकळ शास्त्रांचें जें मथन । निर्वाण खूण ते दावी ॥**
**जडमूढ जे कां अज्ञान । त्यांसि तारावयालागीं पूर्ण ।**
**श्रीएकनाथ नामाभिधान । प्रगट जाण झालेंसे ॥**
**तेणें श्रीसद्‌गुरु एकनाथें । अति दीन जाणोनि स्वहातें ।**
**मिथ्यात्वें वारुनी भवातें । ठाकुरदासातें सहज ठेवी ॥**

**सहजबोध.**

ठाकुरदासबुवांची मराठी कविता वाचीत असतां, या कवीची मातृभाषा मराठी नसून हिंदी असेल अशी कल्पनादेखील होत नाहीं! अध्यात्मासारखा गहन विषय प्रतिपादितानांही त्यांची भाषा अस्खलित चाललेली दिसते. पुढील उतारे पहा:—

## ओव्या.

**शुद्धबुद्ध जें ज्ञानघन । स्वप्रकाश परिपूर्ण ।**
**दृश्यद्रष्टादर्शन । स्थान मान नसे जया ॥**
**तें आपणचि आपुल्या ठायीं । संगत्यागें पडेल ठायीं ।**
**संगत्याग तो कैसा कायी । आधीं पाहीं विचारुनी ॥**
**संग तो मुख्य प्रकृतीचा । त्यागावा आधीं तो साचा ।**
**परात्पर स्वस्वरूपाचा । निर्धार त्याचा कळे मग ॥**
**त्रिधा असे प्रकृतिभेद । बोधाबोध विपरीत बोध ।**
**होय जेणें तिचा छेद । तेंचि सावध परियेसा ॥**

स्वस्वरूपीं विस्मरण । हेंचि अबोधाचें लक्षण ।
मग देह मी म्हणोन । स्फुरे जाण विपरीत तो ॥
अबोधेंसि विपरीत बोध । जाय झालिया आत्मबोध ।
तो होय जेणें सावध । परिसा बाध नुरे मग ॥
ईश्वराचें नामस्मरण । करितां शुद्ध अंतःकरण ।
होय हे सर्वत्र खूण । वेदपुराणें गर्जती ॥
भावें करितां भगवद्भजन । अगर्वें वंदिलिया संतजन ।
सद्गुरुचरणीं अनन्यशरण । झालिया बंधन नुरेचि पैं ॥
ऐसा आचार जो करील । तयासीच ज्ञान होईल ।
कैवल्यपद पावेल । ब्रम्हता भोगील स्वानंदें ॥
सद्गुरुकृपा परिपूर्ण । झालिया लाभे आत्मखूण ।
त्याचें करोनियां मनन । निदिध्यासन पावावें ॥
तेचि आत्मखूण म्हणसी कैसी । तरि आतांचि तें परियेसीं ।
मी आत्मा सर्वसाक्षी त्यासी । संबंध देहासी असेना ॥
ऐसें वेगळेपणें जाणावें । मग सर्वही आपणचि व्हावें ।
कांहीं न होनि असावें । सहजस्वभावें निजीं निज ॥
निजीं नाहीं निजपण । हेचि अस्तिकत्वाची खूण ।
ऐसें जें कां भासणें । भाति जाण म्हणती तया ॥
नःहीं वृत्ति ना विषय । दिसेना तें जाणावें काय ।
तरी स्वप्रीति कदा न जाय । म्हणती प्रिय तयासी पैं ॥
एवं अस्ति भाति प्रियपण । हेचि आत्म्याची त्रिधा खूण ।
नामरूप ते माया जाण । त्याचें लक्षण बोलेन ॥
स्थूळाकारी दिसे जें जें । अथवा कल्पने कल्पिजे ।
तें नामरूप हें जाणिजे । जाणतां सहजें वेगळाचि ॥
वृत्तीचें स्फुरण व्हावें । तेणें नामरूप कल्पावें ।
तंव तेंचि नाहीं स्वभावें । ऐसें पहावें आपणचि ॥
नामरूप आपुल्या ठायीं । मुळींच कांहीं झालें नाहीं ।
वेगळें मानावें तें कायी । सर्वही पाहीं आपणचि ॥

आधीं वेगळेपणें जाणावें । मग सर्वही आपणचि व्हावें ।
कांहीं नहोनियां असावें । सहज स्वभावें उरे तें ॥
प्रळयोदकामाझारी । जेंवी नदीनदा नाहीं उरी ।
तेंवी ध्येय ध्याता ध्यान हरि । एकसरी प्रचीति ये ॥
दर्पणाचेनि आधारें । जेंवि एकचि भासे दुसरें ।
तें सारिलिया मग नुरे । सहज उरे निजरूप ॥
तेंवि जाणिवेतेंही जाणोनी । असिजे सर्वही नेणोनी ।
जाणीव नेणीव नुरोनी । सहजपणीं निजीं निज ॥
मनन करितां या रीती । निदिध्यासें चित्तवृत्ति ।
स्थिरावोनी सहजस्थिति । बाणे निश्चिती पूर्णत्वें ॥
यापरि अभ्यास करितां । नुरे मग द्वैतवार्ता ।
दृश्य दृष्टि देखता । हेही कथा मग नाहीं ॥
जेंवी लवण उदकीं धुतां । तें उदकचि होय तत्त्वतां ।
तेंवि तीव्राभ्यास करितां । चैतन्यता चित्तासी पैं ॥
असो हें बहु बोलणें । यापरी अभ्यास करणें ।
तेणें परमपद पावणें । अभ्यासी जाणे या खुणा ॥
नित्य एकांतीं बैसोनी । चित्तवृत्ति स्थिर करोनी ।
सांगितलें तें सावधपणीं । आणोनि ध्यानीं बैसावें ॥
तेथें जे कां वृत्ति स्फुरे । तें सांडोनियां माघारें ।
झालिया तें मग नुरे । निजीं निर्धारें राहिजे ॥
अथवा स्फूर्ति स्फुरे जें जें । तें चैतन्याकार पाहिजे ।
मग कांहीं न दिसे दुजें । येणें पाविजे सहजस्थिति ॥
नमस्कारोनि सद्गुरुमूर्ति । ध्यान करावें येणें रीति ।
कांहीं नुरे द्वैतभ्रांती । स्वानंदमूर्ति होऊनि ठाके ॥

सहजबोध, प्रकरण ७

हा सहजबोध ग्रंथ बुवांनीं—

शके सत्राशें सत्तावीस । ज्येष्ठमास मध्यदिवस ।
गुरुवासरीं माध्यान्हीस । ग्रंथ नाथांस समर्पिला ॥

या ग्रंथाचीं ९ प्रकरणें असून ओव्या २५६ आहेत. बुवांच्या भगवद्गीतेवरील टीकेचे ३८९ अभंग आहेत. गीतेंतीछ कांहीं प्रसिद्ध श्लोकांवरील बुवांचे अभंग येथें देतों:—

श्लोक

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्यधर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥
व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥

अध्याय २

अभंग

कर्मारंभ येथें नाश हा न करी । प्रत्यवाय तरी दिसेचिना ॥ १ ॥
संरक्षी स्वकर्म स्वल्पही केलिया । जन्ममृत्युभयापासोनियां ॥ २ ॥
येथें सांगितली हे कुरुनंदन । बुद्धि योगज्ञानपर एक ॥ ३ ॥
बहु शाखा त्याच्या अनंत बुद्धीस। योगज्ञानाभ्यास नेणती ते ॥४॥
म्हणे ठाकुरदास बहिर्मुख जन । विषयचिंतनपर सदा ॥ ५ ॥

श्लोक

न बुद्धिभेदं जनयेदज्ञाना कर्मसंगिनाम् ।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ २६ ॥
प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।
अहंकार विमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥ २७ ॥

अध्याय ३

अभंग

कर्मफळसंगी अज्ञानी जे मंद । त्यांचा बुद्धिभेद करूं नये ॥ १ ॥
ज्ञानी भक्त तेणें स्वयें आचरोनी । विहिताचरणीं लावावे ते ॥२॥
प्रकृतीचे सत्व गुण रज तम । क्रियमाण कर्म हेतु सर्व ॥ ३ ॥
तेणें मंदबुद्धि कर्ता मीचि मानी । देहीं स्वीकारोनी अहंभाव ॥४॥
म्हणे ठाकुरदास जयासी विचार। नाहीं सारासार तोचि बद्ध ॥५॥

### श्लोक

त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयाः ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥ २० ॥
निराशीर्यतचित्तात्मा त्यक्त सर्व परिग्रहः ।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २१ ॥

अध्याय ४

### अभंग

त्यागोनियां कर्मफळासह संग । नित्य जो निःसंग तृप्त सदा ॥१॥
जो सर्वही कर्मे करीत असतां । कांहींच तत्त्वता न करितो ॥ २ ॥
सर्वातीत ज्याचें चित्तचि चैतन्य । सर्व काळ शून्य परिग्रह ॥ ३ ॥
करोनिही कर्म शरीररक्षण । नव्हे त्या बंधन पापपुण्य ॥ ४ ॥
म्हणे **ठाकुरदास** ऐसे जीवन्मुक्त । देहीच दिसत लोकदृष्टी ॥५॥

ठाकुरदासांचीं कांहीं पदें देऊन हा लेख आतां पुरा करूं.

### पद १

नारायण गोविंद जयजय नारायण गोविंद ।
नारायण गोविंद कृष्ण हरि अतितर परमानंद ॥ ध्रु० ॥
शुकसनकादिक ज्याचें ध्याती अखंड चरणारविंद ॥ १ ॥
निर्भय मानुनि गुणगण गाती सकळहि जे मुनिवृंद ॥ २ ॥
शेष महेश निरंतर रमती जाणुनि स्वानंदकंद ॥ ३ ॥
नामप्रतापें ज्याच्या तरले अजामिळादि मंद ॥ ४ ॥
हनुमंतप्रमुख संतांसि सेव्य सदा जपति रामचंद्र ॥ ५ ॥
निगमागम पुष्पांतील जो कां परमसार मकरंद ॥ ६ ॥
उद्धव अक्रूरादिक ज्याचे कृपापरागमिलिंद ॥ ७ ॥
कृपाकटाक्षें मुक्तिदाता यास्तव नाम मुकुंद ॥ ८ ॥
वेदांतीं सिद्धांत सिद्ध जो सत्य ज्ञानानंद ॥ ९ ॥
ज्याच्या पादप्रसादें भीष्मादिकां मृत्यु स्वच्छंद ॥ १० ॥
आधारेंचि जयाच्या माया दावी नाना फंद ॥ ११ ॥

गोकुलवासी त्यांच्या प्रेमास्तव नंदाचा नंद ॥ १२ ॥
जगद्रूप जगदात्मा असुनी स्वतंत्र नित्यानंद ॥ १३ ॥
सगुण मूर्ति सेवाया ज्याची गोपी झाले छंद ॥ १४ ॥
प्रल्हादादिक भक्तजनांचें स्वयें निवारी द्वंद्व ॥ १५ ॥
ठाकुरदासा एका जनार्दन भजावयाचा छंद ॥ १६ ॥

पद २

रामनाम नागर विवेकाचे सागर ।
नित्य सिद्ध शुद्ध बुद्ध आनंदाचें आगर ॥ ध्रु० ॥
नामबळें साधितातित ज्ञानी ज्ञानजागर ।
नामधारका न बाधी विषयमालागर ॥ १ ॥
अमानित्वादि चिन्हांचें निजनाम आकर ।
नाम घेती तयां घरीं प्रभु होय चाकर ॥ २ ॥
ठाकुरदासाचा नामीं सदा भर ।
तेणें दिसे विश्वमिषें एक विश्वंभर ॥ ३ ॥

पद ३

ग्यान गगनमों बिराजत संत ॥ ध्रु० ॥
चांद सूरजबिन दीपक बाती ।
स्वयंज्योति निवांत ॥ १ ॥
जनबन एक निरंजन जाको ।
प्रगट सदा एकांत ॥ २ ॥
ठाकुरदास अभेद तथापि ।
गुरुसेवाको हेत ॥ ३ ॥

पद

ये दुनियामो सोई येक साधु अमोल ॥ ध्रु० ॥
अलख खलखमो सहज दिखावे । जाके सुनतहि बोल ॥ १ ॥
हरिगुण गावत ध्यावत ज्याको । आवत प्रेमको डोल ॥ २ ॥
ठाकुरदास जो गुरुपद ध्यावे । कपटको पट खोल ॥ ३ ॥

---

# दत्तनाथ उज्जनीकर.

महाराष्ट्राप्रमाणें मध्यप्रांत, वऱ्हाड, माळवा आणि तंजावर या प्रांतांतही बरेच मराठी कवि होऊन गेले असून, शोधकांच्या परिश्रमानें, सदर कवींच्यी चरित्रांची बरीच विश्वसनीय माहिती अलीकडे उपलब्ध होऊं लागली आह ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. ग्वाल्हेर येथील प्रसिद्ध शोधक व लेखक श्री. भास्कर रामचंद्र भालेराव यांनीं, माळव्यांतील ज्या कांहीं मराठी कवींचीं चरित्रें, प्रस्तुत ग्रंथासाठीं मोठ्या परिश्रमानें मिळवून पाठविलीं त्यांपैकीं दत्तनाथ उज्जनीकर हे एक होत. बाळकृष्णबावा राजूरकरकृत "संतमालिकेंत" म्हटलें आहे:—

**आणि दत्तात्रय बावा अवधूत । सोरटीबुवा परमभक्त ।**
**हे आदिकरोनी प्रगट गुप्त । राहती संत अनेक उज्जनीं ॥**

"उत्तर हिंदुस्थानांत मराठेशाही स्थापन होतांच ज्या महाराष्ट्रीय संतकवींनीं तिकडे धर्मजागृतीची अपूर्व कामगिरी बजाविली, त्यांपैकीं दत्तनाथ उज्जनीकर हे एक प्रमुख संतकवि होत. हे मूळचे राक्षसभुवन येथील राहणारे असून ह्यांच्या वडिलांचें नांव नारायण होतें. हे माध्यंदिन शाखेचे यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण; गोत्र भारद्वाज. कवींचे वडील नारायण हे दत्तोपासक होते. असें सांगतात कीं, नारायणरावजींस संतति होत नव्हती म्हणून त्यांची पत्नी लक्ष्मीबाई हिनें राक्षसभुवन येथील नाथपंथी साधु अंतोबादादा ऊर्फ अनंतनाथ यांची फार सेवा केली व आपणास पुत्र झाल्यास तो आपण सद्गुरुचरणीं अर्पण करूं असा संकल्प केला. तेव्हां सद्गुरूंच्या कृपेनें लक्ष्मीबाईस पुत्र होतांच तो त्यानीं अनंतनाथांच्या चरणावर आणून घातला व पुढें सहा वर्षें मुलाचें स्वतः पालन पोषण करून, सहाव्या वर्षीं

त्यास अनंतनाथांच्या स्वाधीन केलें. हाच मुलगा पुढें दत्तनाथ या नांवानें प्रसिद्ध झाला.

दत्तनाथांनंतर साध्वी लक्ष्मीबाईस आणखी दोन पुत्र झाले. ह्या दोन्ही पुत्रांस अनंतनाथांसच अर्पण करण्याचा नारायणरावजीनीं निश्चय केला, परंतु " ही माझी ठेव तुमच्यापाशीं असू दे " असें म्हणून नाथांनीं तीं मुलें त्यांजपाशींच ठेविलीं. इकडे दत्तनाथ गुरुगृहीं राहून गुरुसेवेचें पुण्य संपादन करूं लागले व अनंतनाथानींही त्यांस लेखन, वाचन, आसन, समाधि वगैरेचें योग्य शिक्षण देऊन त्या विषयांत त्यांस निष्णात केलें. दत्तनाथानीं आपल्या संप्रदायपरंपरेवर श्लोक केले आहेत ते येणेंप्रमाणें:—

**नमामि दत्तगोपालं नागनाथं चिदंबरं ।**
**निंबराज मितिख्यातं पश्चात् नरहरि स्मरेत् ॥**
**एकनाथ महाप्राज्ञ तथा परि जनार्दन ।**
**श्रीदत्त सद्गुरुं वंदे परंपरानुवर्णनम् ॥**

या श्लोकांखालीं एक टीप आहे ती अशीः—दत्तात्रय, गोपाळबावा, नागनाथ, निंबराज, नरहरि, जनार्दन, एकनाथ, दत्तभाऊ, त्यांचे बंधु सच्चिदानंद बाबा, त्यांचे पुत्र अंतोबादादा राक्षसभुवनकर, त्यांचा उपदेश दत्तनारायणास."

याशिवाय, दत्तनाथकृत एक परिणालिकाही त्यांच्या मठांतील संग्रहांत सांपडली, ती येणेंप्रमाणें:—

### अभंग

**दत्तपरंपरा अनंत सोयरा । जोडील निर्धार मायबाप ॥ १ ॥**
**वेडा जगन्नाथ निंबराज नरहरि । प्राप्त गिरिधारी जनार्दन ॥ २ ॥**
**तेथें एकनाथ विनटला पायीं । दत्तभाऊ तोही दत्तवरदी ॥ ३ ॥**
**भाऊ दत्तभावा केशव अनंत । दत्तमठीं राहत राक्षसभुवनीं ॥ ४ ॥**
**परंपरा वंदी दत्त नारायण । दत्तगुरुचरण भेटी जाहल्या ॥ ५ ॥**

वरील तिन्ही पद्यांवरून यांच्या संप्रदायपरंपरेचा उलगडा होतो तो असा—

दत्तनाथ
|
गोपाळ ( अनंत )
|
वेडा जगन्नाथ ( नागनाथ )
|
चिदंबर
|
निंबराज
|
नरहरि
|
गिरिधर
|
जनार्दन
|
एकनाथ
|
दत्तभाऊ–बंधु सच्चिदानंदबाबा ( केशव )
|
अंतोबादादा ( अनंतनाथ )
|
दत्तनाथ

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.

दत्तनाथानीं २४ वर्षें गुरूजवळ राहून, कडकडीत ब्रह्मचर्य पाळून योगविद्येंतही बरेंच प्रावीण्य संपादन केलें. नंतर अनंतनाथांनीं त्यांस गृहस्थाश्रमाचा स्वीकार करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें, एका कुलीन घराण्याशीं त्यांचा शरीरसंबंधही घडून आला. पुढें विक्रम संवत् १८२४ त त्यांचे गुरु अनंतनाथ हे समाधिस्थ झाल्यामुळें त्यानीं काशीयात्रेस जाण्याचा निश्चय केला; व राक्षसभुवन येथील आपल्या मठाची व्यवस्था आपल्या बंधूंकडे

सोंपवून ते उत्तर हिंदुस्थानांत तीर्थाटन करण्यास निघाले. प्रथमतः ते उज्जनी ऊर्फ अवंतिका क्षेत्रीं गेले. प्रवासांत ते कीर्तनावर आपला उदरनिर्वाह चालवीत असत. त्याप्रमाणें उज्जनींतही त्यानीं आपलीं कीर्तनें सुरू केलीं. त्या वेळीं महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबुवा ह्यांस त्यांच्या बंधूच्या जहागिरीचा वारसा मिळाल्यामुळें ते उज्जनीस येऊन राहिले होते. महादजी पूर्वी बीड येथें असतांना तेथील अवलिया मनसूरशहा यांजवर त्यांची फार भक्ति जडली होती, त्यामुळें परमार्थाची आवड त्यांस अगोदरच होती. ते पुष्कळ वेळ हरिगुणगायनांत मोठ्या प्रेमानें तल्लीन होत असत. उज्जनीस दत्तनाथांच्या कीर्तनाची प्रसिद्धि होतांच, तो वृत्तांत पाटीलबुवांच्या कानावर गेला, तेव्हां ते नाथांच्या दर्शनासाठीं त्यांच्या कीर्तनास गेले. त्यांचें कीर्तन ऐकून ते इतके संतुष्ट झाले कीं, त्यांनीं त्यांस आपल्याजवळ राहण्याचा आग्रह केला. त्यास मान देऊन नाथांनीं कांहीं दिवस तेथें राहण्याचें कबूल केलें, दिवसेंदिवस दत्तनाथांच्या कीर्तनाचा पाटीलबुवांस इतका नाद लागला कीं, त्यांस सदा-सर्वदा आपल्यापाशींच ठेवून घ्यावें असें त्यांस वाटूं लागलें; इतकेंच नव्हे तर ते त्यांस रणभूमीवरही आपल्या बरोबर घेऊन जात असत. महादजी शिंदे व विसाजी कृष्ण यानीं, दिल्लीचा बादशहा शहाअलम यास दिल्लीस परत आणून, त्याचे शत्रु जे रोहिले त्यांचा नाश करण्याचा निश्चय केला होता. महादजी तर नजीबखान रोहिल्याच्या घराण्याचें उच्चाटन कर-ण्याच्या खटपटींत पूर्वीपासूनच होते. त्यामुळें त्यांनीं नजीबखानाच्या जहा-गिरींतील शुक्रताल, फत्तरगड ( नजीबाबाद ) व घोसगड असे तीन बळकट किल्ले हस्तगत केले. फत्तरगडच्या किल्ल्यांत नजीबखानाचीं मुलें माणसें होतीं व पानिपतच्या लढाईंत मराठ्यांची जी संपत्ति नजीबखानानें लुटून आणली होती ती व पानपतावर कैद केलेल्या कांहीं मराठ्यांच्या बायकाही त्या किल्ल्यांत सांपडल्या. सदर युद्धाचे वेळीं दत्तनाथ स्वतः हजर होते व शत्रु-पक्षाकडील रणवाद्यांपैकीं, त्यांनीं आणलेले दोन ढोल अद्याप त्यांच्या उज्जनी येथील मठांत दाखविण्यांत येतात. असो.

यानंतर दत्तनाथ, कांहीं दिवसांनीं परत उज्जनीस येण्याच्या अटीवर महादजींचा निरोप घेऊन काशी, प्रयाग इत्यादि क्षेत्रांकडे निघून गेले; व उत्तर

हिंदुस्थानांतील दुसरीं प्रसिद्ध क्षेत्रें पहात पहात, मथुरा येथें येऊन दाखल झाले. त्या वेळीं महादजी शिंद्यांच्या छावणीचा मुक्काम तेथेंच असल्यानें त्या उभयतांची अवचित गांठ पडली; व तेव्हांपासून महादजींनीं नाथांस मथुरेहून दुसरीकडे कोठेंही जाऊं दिलें नाहीं. दत्तनाथांस स्वतःच्या कीर्तन-प्रसंगीं महाराष्ट्रीय प्रसिद्ध संतांचीं व स्वतःचीं पदें म्हणण्याचा नाद होता, त्यामुळें महादजींसही स्वतः कवन करण्याची स्फूर्ति झाली व प्राचीन मराठी कवितेवरही त्यांची फार भक्ति जडली. असें सांगतात कीं महादजी आपली कविता दत्तनाथांकडूनच शुद्ध करून घेऊन ती रामकृष्णबोवा श्रीगोंदेकर व वळे हरिदास यांजकडून कीर्तनप्रसंगीं म्हणवीत असत. महादजी-कृत पदांचीं दोन बाडें दत्तनाथांच्या उज्जनी येथील मठांत रा. भालेराव यांस सांपडलीं, तीं हल्लीं त्यांचे संग्रहीं आहेत व त्यांतील कांहीं पद्यें त्यांनीं प्रसिद्धहि केलीं आहेत.

दत्तनाथ मथुरेस असतांनाच प्रसिद्ध संतकवि सोहिरोबा आंबिये यांचें तेथें आगमन झालें होतें. त्या वेळीं भगवद्भक्त पाटीलबावांनीं त्या उभय संतांच्या संगतींत परमानंदाचा पुष्कळ लाभ घेतला. त्या वेळीं त्यांनीं सोहिरोबांस व दत्तनाथांस चरितार्थासाठीं जहानाबादची १२००० रु. उत्पन्नाची नेमणूक देऊं केली होती, परंतु वैभव विषवत् मानणाऱ्या त्या निरपेक्ष पुरुषांनीं तिचा स्वीकार केला नाहीं.

दत्तनाथांस मुक्ताबाई या नांवाची एक मुलगी होती. तिचें लग्न, मथुरा मुक्कामींच रामचंद्रपंत नांवाचे महादजी शिंद्यांकडे एक खाजगी कारकून होते त्यांच्याशीं झालें. होतें. असें सांगतात कीं, या लग्नाचा सगळा खर्च पाटीलबावानींच केला.

दत्तनाथ हे मोठे सिद्ध पुरुष व भूतभविष्य वर्तमान जाणणारे होते. पाटीलबावा एखाद्या मोहिमेवर जातांना, किंवा एखाद्या मोहिमेंत जय अथवा पराजय झाल्यास दत्तनाथांसमोर येऊन उभे राहात असत व त्या वेळीं ते जशी सल्ला देत त्याप्रमाणें आपलें पुढील धोरण ठरवीत असत.

विक्रम संवत् १८४९त महादजी शिंद्यांनीं, दत्तनाथांच्या वार्धक्यामुळें, त्यांचें आवडतें ठिकाण उज्जनी येथेंच मठ बांधून त्यांत राहण्याविषयीं त्यांस विनंति केली व स्वतःच्या खर्चानें त्यांस शिंगपुरींत मठही बांधून दिला. तेव्हांपासून नाथ उज्जनीसच राहूं लागले. महादजींच्या पश्चात् त्यांचे पुत्र दौलतराव हेही नाथांची योग्यता जाणून होते. त्यांनीं त्यांच्या नित्यखर्चासाठीं रोजीं एक रुपया उत्पन्नाची सनद करून दिली व त्यांच्या अत्याग्रहामुळें नाथानींही तिचा स्वीकार केला. तें उत्पन्न त्यांच्या मठाकडे आज तागायत चालत आहे. दौलतरावांचें कुटुंब बायजाबाई यांचीही नाथांवर फार भक्ति होती. दत्तनाथांस महादजी शिंदे गुरुस्थानीं मानीत असत म्हणून बायजाबाई नाथांस 'मामंजी' म्हणत असत. त्यांनीं नाथांची समाधि बांधण्याचेंही योजिलें होतें, परंतु नाथांनीं ती गोष्ट मान्य केली नाहीं.

मृत्यूपूर्वीं कांहीं दिवस दत्तनाथांची दृष्टि मंदावली होती. नंतर त्यांनीं परमहंस दीक्षा घेतली. त्यांना पुत्र नसल्यामुळें त्यांनीं आपल्या मुलीची मुलगी गजाबाई हिचा पुत्र सदूभाऊ यास आपल्या मठाचा वारस नेमलें. शेवटीं शके १७७१च्या आश्विन महिन्याची शुद्ध प्रतिपदा उजाडली. त्याच दिवशीं समाधि घेण्याची नाथांची इच्छा होती. परंतु त्यानीं आधीं सदूभाऊस विचारलें कीं "आज नवरात्र बसलें का?" तेव्हां त्यानीं होकारार्थी उत्तर देतांच दत्तनाथ बोलले कीं "बरें आहे. दिवस आणखी मागून घेऊं." त्याप्रमाणें रौद्रनाम संवत्सरीं पूर्वाषाढा नक्षत्र, शोभनयोग, आश्विनशुद्ध नवमी भौमवारीं पांच घटका रात्र गेल्यावर दत्तनाथ आपल्या वयाच्या १३६वे वर्षीं ब्रह्मानंदीं लीन झाले; व उज्जनीस दत्त आखाड्यासमोर त्यांची समाधि बांधण्यांत आली.

दत्तनाथांची शरीरयष्टि भव्य असे व त्यांजकडे पहाणाराची दृष्टि त्यांजवर टिकत नस. त्यांचे अनेक शिष्य होते, परंतु पट्टशिष्य चार होते. त्यांत प्रमुख शिवदिन केसरींचे प्रशिष्य व नरहरीचे शिष्य प्रसिद्ध नरहरि महीपति हे होत. त्यांचें चरित्र याच ग्रंथांत दुसरीकडे दिलें आहे. दत्तनाथांचे दुसरे शिष्य आत्मारामशास्त्री. हे योगविद्येंत फार प्रवीण होते. त्यांची समाधि इंदूर येथें मल्हारगंजांत गौरीकुंडाचे शेजारीं आहे. तिसरे शिष्य शिव-

दत्तजी गुजर गौड ब्राह्मण. हे काशीकडे निघून गेले होते. चौथ्या शिष्याचें नांव समजलें नाहीं. या चौघांपैकी महीपतिनाथ हे स्वतः मोठे अधिकारी पुरुष व कवि असून, दत्तनाथांची कीर्ति ऐकून, त्यांच्या आश्रयास येऊन राहिले होते. महीपतींनीं आपल्या कवनांत "तो दत्ताचा सखा" असा उलेख बऱ्याच ठिकाणीं केला आहे, तथापि ते दत्तनाथांस गुरूप्रमाणें मान देत असत. त्या उभयतां सिद्धांचें संयुक्त कीर्तन अथवा त्यांचें पारमार्थिक संभाषण यांच्या अनुपमेयत्वाविषयीं काय लिहावें? दत्तनाथांची योग्यता केवढी होती व महीपतींचा त्यांचे ठायीं केवढा पूज्य भाव होता हें नरहरि महीपति यांच्या चरित्रांत, त्यांनीं दत्तनाथांस लिहिलेलें एक पत्र दिलें आहे, त्यावरून, वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

दत्तनाथांची कविता महीपतीच लिहून काढीत असत. महीपतींच्या स्वतःच्या कवितेचीं व त्यानीं लिहिलेल्या दत्तनाथांच्या कवितेचीं कित्येक बाडें मठाच्या संग्रहीं आहेत. महीपतीनीं ग्वाल्हेर येथें ढोलीबवांचा मठ स्थापन केला. त्या मठाचे वारसही दत्तनाथांच्या मठास गुरुघराणें मानतात.

दत्तनाथांचा विठ्ठल नामक आणखी एक शिष्य होता, त्याची बरीच कविता रा. भालेराव यांच्या संग्रहीं आहे. त्यानें दत्तभाऊंस पाठविलेल्या एका पद्यमय पत्राची नक्कल येणेंप्रमाणें:—

श्री.

श्रीमद्रमारमणचरणकमलपरायण अंतःकरण...दायक गांभीर्य सदा भक्ति विराजमान आत्मस्वरूपी दत्तमूर्ति विराजित.

प्रतिपूर्वक करद्वय जोडून त्रिकाल चरणीं विठ्ठल सयुग्म भावें साष्टांग प्रणिपात.

श्रीमत्साधु जगत्रतारक सदा आत्मस्वरूपामधीं ।<br>
केला वास निरंजनीं तरि अतां पाहूं तयासी कधीं ॥<br>
ध्यानीं चिंतियलें पदांबुलसत श्रीसांवळयाचे कृपे ।<br>
साष्टांगीं प्रणिपात निश्चळ मनें दत्तस्वरूपीं रुपें ॥ १ ॥

मायातीत अतीत पूर्ण असतां तारावया या जिवा ।
आलां धाउनि दाविलें पद तुम्ही धन्यो महा साधवा ॥
नामें विठ्ठल हे सयुग्म चरणीं भावें असो कीं सदां ।
केली हे विनती दयार्णवप्रति सांभाळिजे सर्वदा ॥ २ ॥

विज्ञप्ती पदप्राप्ति हेचि कुशलें राहो सदा अंतरीं ।
पत्रीं गौरविलें अभीष्ट वहिलें आसी तया नंतरीं ॥
राधा गोपिसहीत कृष्ण क्रिडणें हा भाव साधू घरीं ।
अज्ञानासि किमर्थ हें पद घडे साधुकृपे नंतरीं ॥ ३ ॥

हे विनंति. ”

वरील श्लोकांची रचना अगदीं सामान्य प्रतीची आहे हें सांगावयास नकोच. असो. दत्तनाथांच्या मठांत खुद्द त्यांचीच नव्हे तर महीपति, शिवदिनकेसरी, गोपाळनाथ, केशव, शिवराम, देवनाथ वगैरे कवींचीही असंख्य हस्तलिखित कविता *अद्याप उपलब्ध आहे.

दत्तनाथांच्या पश्चात् मठस्थ पुरुषांची परंपरा येणेंप्रमाणेः–

- दत्तनाथ
  - सदूभाऊ
    - गोविंदराव
    - कुशाबा
    - गोपाळबुवा
      - बाळाभाऊ
        - भास्कर
    - नारायणबुवा
      - आनंदराव
        - रामचंद्र

* याशिवाय चांगदेव पासष्टी, तुकोबा (?) कृत अनुभवामृत, जगन्नाथकृत ज्ञानबत्तीसी वगैरे अनेक ग्रंथ मठांत आहेत. रा. भालेराव लिहितात “या एकाच मठांत संशोधकास कित्येक महिने पुरेल इतकी सामग्री आहे. महादजी शिंदे व इतर ऐतिहासिक व्यक्ति यांजविषयींही कांहीं पत्रव्यवहार दप्तरीं असण्याचा संभव आहे.”

या परंपरेंतील दुसरे पुरुष सदूभाऊ हे महान् भगवद्भक्त होते. ते संवत् १९३६ त वारले. त्यांचे चिरंजीव नारायणबुवा (वय वर्षे ८९) हे हल्लीं विद्यमान आहेत.

दत्तनाथांची बरीच फुटकळ कविता मराठी व हिंदुस्थानी भाषेंत आहे. कांहीं संतांचीं चरित्रेंही अभंग वृत्तांत त्यांनीं लिहिलीं आहेत. त्यांची कविता निर्वाणी फटक्यासारखी आहे. त्यांची कांहीं पद्यें येथें देतों-

### अभंग १

प्रकृति पुरुषाहूनि पर । ब्रह्म जें कां निरंतर ॥ १ ॥
ऊर्ध्व मूळाचें जें सार । ब्रह्म जें कां निरंतर ॥ २ ॥
क्षेत्रक्षेत्रज्ञाहूनि दूर । ब्रह्म जें कां निरंतर ॥ ३ ॥
सर्व निरासीजे पर । ब्रह्म तेंचि निरंतर ॥ ४ ॥
ब्रह्म ग्रासोनि ब्रह्मीं उरे । सहजीं सहज दत्ता तूं रे ॥ ५ ॥

### २

आब्रह्म भुवन लोक । यासी देणें तिलोदक ॥ १ ॥
हेचि स्नानसंध्या केली । देवपूजा सहज जाली ॥ २ ॥
मग उरे ब्रह्म पूर्ण । तोही ग्रासी पूर्णपणें ॥ ३ ॥
बोधीं अवबोधीं आनंद । पूर्णब्रह्मीं निजानंद ॥ ४ ॥
दत्तीं भरलें नीर सुष्णे । सहजीं सहज अबोलणें ॥ ५ ॥

### ३

आनंदामाजी आम्ही जाणा । बुडोनि गेलों मीतूंपणा ॥ १ ॥
तेथें सुख दुःख कोण गणी । कैंचीं गृह आणि कामिनी ॥ २ ॥
..........जाणा । तेथें कैंची यमयातना ॥ ३ ॥
मी तों ब्रह्म जगदाकारीं । नसोनी असें निर्विकारी ॥ ४ ॥
दत्त पूर्णानंदीं पूर्ण । हेंही सांगे तेथें कोण ॥ ५ ॥

४

चालताहे आंधळा । देखतां तो कीं पांगळा ॥ १ ॥
नपुंसकाचिये पोरें । शुण्यीं चालती वेवहारें ॥ २ ॥
त्यांची सोयरिक केली । मृगजळाची लहरी आली ॥ ३ ॥
आकाशाचीं तीं मोतीं । डोळां बाहुली होय लेती ॥ ४ ॥
मोतीयाचें पाणी । भरलें तिहीं त्रिभुवनीं ॥ ५ ॥
रत्नाची ते किळे । ज्योति प्रकाशीं हे मिळे ॥ ६ ॥
प्रकाशीं हा भरला बिंदु । सहज दत्ता निःशब्दु ॥ ७ ॥

५

आकाशामाजी नवल एक पाहिलें । शून्य हें बुडालें मोतिया पोटीं ॥ १ ॥
मोतीं हारपलीं वीज कडकली । लहरीं बुडालि सुवर्ण तारी ॥ २ ॥
काजळाचे पोटीं दीप तो लाविला । त्यानें प्रकाशला चंद्रसूर्य ॥ ३ ॥
चंद्र हारपला नक्षत्रें ग्रासिला । वर्षाव तो जाला जळेंवीण ॥ ४ ॥
महापूर आला त्रिलोक हरपती । दत्त हा पोहत दोहीं बाहीं ॥ ५ ॥

६

कान डोळा फाडुनि पाहीं । देव उभा सन्मुख देहीं ॥ १ ॥
पाहतां पाहतां विदेह होणें । देव भक्ता मी तूं नेणें ॥ २ ॥
विदेहानें भक्ति देवा । गुरुकृपें लाभ व्हावा ॥ ३ ॥
प्रकाशीं रंग कळा दावी । सहजीं सहज कांहीं नुरवी ॥ ४ ॥
नामरूप ध्यान त्रिपुटी । सर्व ग्रासी दत्तभेटी ॥ ५ ॥

७

ॐ काराचें ध्यान मध्यमेचे घरीं । श्रुतीनें निर्धारीं अनुभवीं ॥ १ ॥
परेचा जो अंत पश्यंति विराम । अलक्ष्य हें धाम दोन्ही लक्षीं ॥ २ ॥
तुर्या जे बोलती अर्धमात्रा लक्षीं । बिंदु तो भेदिती सहस्रदळीं ॥ ३ ॥

दोनीही अक्षरें उलटुनी पाहीं। बावनी पर जालें पाहणें त्याचें ॥ ४ ॥
वैखरी वेव्हारी रामकृष्ण हरि। जप निरंतरीं हाचि करी ॥ ५ ॥
याचा शोध करी देहींच विदेही। पश्यंति तो येई ॐकारबिंदु ॥ ६ ॥
ऐसें हें लक्षणें गुरुकृपें घेणें। दत्त म्हणे पाहणें गुरुरूप ॥ ७ ॥

८

आतां काय सांगों बाई। प्रकाश दाटे दिशा दाही ॥ १ ॥
गुरूचें देणें मोठें। आंत बाहेर तेज दाटे ॥ २ ॥
नाना रंगत लावणी। सांडी चिद्रूपखाणी ॥ ३ ॥
सारितां मागें दृष्टि खोंची। प्रभा दाटे स्वप्रकाशाची ॥ ४ ॥
गोकर्णीं वसे तीन्ही देव। सांठवले हो अपूर्व ॥ ५ ॥
त्याच्या शिखरीं बाळी असे। तेंचि क्रीडा करीतसे ॥ ६ ॥
तिचा स्वामी...पुतळा। सकळ चाळवितो कळा ॥ ७ ॥
डोळियाचा डोळा। खसखस तिळामाजी गेला ॥ ८ ॥
तिळ गेला अणुरेणूंत। तेथें तेज अति अद्भुत ॥ ९ ॥
विरालें तेज पाहणें अलक्ष्य। दत्त म्हणे तोचि आलेख ॥१०॥

९ (पद)

धाउनि येई विठाबाई। तुजविण मला कोणी नाहीं ॥ ध्रु० ॥
सर्वहि गणगोत आप्त आणि सुत तूंचि सखे आई ॥ १ ॥
कामक्रोधादिक गांजिति हे मज करूं गति कैसी काई ॥ २ ॥
जळावीण तळमळी मासा तवकृपाजीवन देईं ॥ ३ ॥
दत्तनाथ तव अंकीं लोळत आलिंगुनि प्रेमपान्हा देईं ॥ ४ ॥

१० (धांवा)

धांव रे दत्तराया। करीं कृपेची छाया।
शरण आलों तुज। निरसीं माझिया भया ॥ ध्रु० ॥

संसार दुःखमूळ । चहूंकडे विंगळ ।
त्रितापें तापलों गा । नाहीं वैराग्याचें बळ ।
संतप्त देह झाला । न सुटे मायाजाळ ॥ १ ॥

सद्‌बुद्धि उपजेना । रात्रंदिवस तळमळ ।
साधुसंगति नावडेचि । मन न राहे निश्चळ ।
काय करूं देवा आतां । म्हणुनि बाहें उतावेळ ॥ २ ॥

आयुष्य सरलें गा । भोग भोगावे किती ।
मी माझेपण सर्व । अहंभाव वसे चित्तीं ।
दुरवरी विचारितां । व्यर्थ गेलों बा क्षिती ॥ ३ ॥

मंत्र यंत्र अनुष्ठान । केले याग यज्ञ दान ।
क्षिती ही फिरलों गा । सर्व तीर्थीं केलें स्नान ।
जें जें कर्म करीं । तों तों वाढे अभिमान ।
फळार्थहित कांहीं । सिद्धि न पावे जाण ॥ ४ ॥

सर्वस्वी थकलों गा । तुज शरण आलों ।
पतिता तारा वेगीं । बहु योनी फिरलों ।
विश्रांति नाहीं कोठें । असें महा अपराधी ।
सोडवीं देवराया । त्राहि त्राहि कृपानिधि ॥ ५ ॥

पतितपावन हें । नाम गर्जती भुवनीं ।
स्वभक्तां तारिसी कीं । ऐसी ऐकें संतवाणी ।
ते मिथ्या न व्हावी । वेदशास्त्रीं पुराणीं ।
नाम हें जगद्गुरो । ऐसी ख्याति गाती मुनि ॥ ६ ॥

नामगुणकीर्तनीं गा । प्रेम अखंड द्यावें ।
देऊनी अभयदान । सगुणिं निर्गुणीं भेटावें ।
नाहीं मागत फार । आपुले चरणीं ठेवावें ॥ ७ ॥

ऐसी करुणा परिसुनी । धाउनि आले चक्रपाणी ।
षड्भुजीं दर्शनासी । देउनि वदे उदार वाणी ।
ना भी ना भी बाळका तूं । पाहें रूप माझें लोचनीं ॥ ८ ॥

वारंवार हेंचि आतां । गुरुनाम वदें तां ।
नाहीं जन्ममरणाची । तुजलागीं चिंता ।
सर्वव्यापक मी पाहें । गुरुनामीं अनंता ।
परंपरा दत्तवंशीं । अंतीं सांभाळीजे दत्ता ॥ ९ ॥

स्फुट कवितेशिवाय मठांत योगविद्येसंबंधींही बरेंच सारस्वत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे.

# त्र्यंबक अनंत ऊर्फ दादा नाईक भिडे.

संशोधकः— भास्कर रामचंद्र भालेराव, ग्वाल्हेर.

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहाससंशोधनाची गोष्ट सोडून दिली, तरी मराठी साहित्यसंशोधनाबद्दल सुप्रसिद्ध आंग्ल कवि ग्रेच्या

Full many a gem of the purest ray serene.

The dark unfathomed caves of ocean bear. ह्या उक्ती-प्रमाणें अज्ञात व अप्रसिद्ध अशीं किती तरी कविरत्नें कालाच्या व विस्मृतीच्या खोल दरींत दडून राहिलीं आहेत! ही उक्ति आमच्या चरित्रनायकाच्या बाबतींत तर तंतोतंत लागू पडते. काव्यसंग्रहकार रा. वामनरावजी ओकांनीं आपल्या 'अनेक महाराष्ट्र कविकृत पदसंग्रह, भाग पहिला' या ग्रंथांत पृ. ६२–६९ वर सदर कवीचीं निवडक १५ पदें देऊन पृ. ६२च्या पाद-टीपेंत लिहिलें आहे कीं 'हा कवि एकनाथाच्या शिष्यांपैकीं कोणी असावा' आणि 'रामदास रामदासी' कर्ते रा. शंकररावजी देव यांनींही तंजावर येथील झोळीराम बाबांच्या मठांतील एका बाडावरून त्र्यंबकाची एक कविता सदर मासिकांत प्रसिद्ध करून 'एकनाथशिष्य त्रिंबक' असल्याचें प्रतिपादिलें आहे.या कवीचीं कांहीं भाविक पदेंही महाराष्ट्रांत व इतरत्र ऐकूं येतात. पण त्याच्या बद्दलची प्रमाणशुद्ध अशी माहिती मात्र कोणासही नाहीं! त्रिंबक हे नाथांचे मोठे भक्त असत व त्यांनीं आपल्या प्रत्येक पदाच्या शेवटीं भक्ति-पुरःसर नाथांच्या नांवाचा उल्लेख केला आहे, त्यामुळें वरील दोघां विद्वान् संशोधकांची व इतरांची, कविवर्य त्रिंबक हे नाथशिष्य होते अशीच समजूत झाली.पुढें कवींचे सख्खे नातू रा. रा. भाऊसाहेब भिडे (नारायणपेठ, पुणें) यांनीं आपल्या घरचीं दप्तरें चाळून, जुन्या बाडांवरून, बरींच पदें व कांहीं माहिती लिहून काढली ती आणि त्रिंबकांचेच दुसरे नातू ग्वाल्हेर स्टेटचे हल्लींचे फायन्यान्स मेंबर ऊर्फ मुख्य फडणीस रावबहादूर रावजी जनार्दन भिडे बी. ए. मुंताजिम बहादूर यांजकडून मिळालेली तोंडी माहिती, व सदर बाड,

माझ्या पाहण्यांत आल्यावर मी 'मुमुक्षु' पत्रांत प्रसिद्ध होत असलेल्या माझ्या 'अप्रसिद्ध कविमालेंत' कवि त्र्यंबकांच्या चरित्राचाही सहावा मणि ओंवला! याप्रमाणें महाराष्ट्रास आमच्या कविवर्याचा परिचय झाला! पुण्याहून ग्वाल्हेरीस येऊन कवींनीं हिंदी व ऊर्दू भाषांचा व गायनकलेचा अभ्यास आणि काव्यरचना केली व त्या काव्याचा प्रसार महाराष्ट्राचें शेवटलें टोंक तंजावर तेथपावेतों होऊनही त्यांची संपूर्ण माहिती ग्वाल्हेरहूनच प्रसिद्ध व्हावी, हा मात्र एक मोठा विलक्षण योगायोग होय! असो.

मराठेशाहीच्या अमदानींत नाईक भिडयांचें नांव बरेंच प्रसिद्ध आहे. साम्राज्य कामगिरीप्रीत्यर्थ बाळाजी नाईक भिडे यांनीं केलेल्या द्रव्यसाहाय्याचा उल्लेख, नानासाहेब पेशव्यांची रोजनिशी, बडोद्याचे राज्यकर्ते आणि मराठयांच्या इतिहासाचीं फुटकळ साधनें यांतही बराच सांपडतो. बाळाजी नाइकांच्या सुनेस श्रीमंतांकडून वाडयांत डोहाळेजेवण झाल्याबद्दलचें एक पत्र उपलब्ध आहे, त्यावरून पेशव्यांचा भिडयांच्या घराण्याशीं किती व कसा घरोबा असे, हें चांगल्या प्रकारें कळून येतें. भिडे हे कोंकणस्थ चित्पावन नित्युंदन गोत्री. त्यांचें मूळ वसतिस्थान गणपतीचें पुळें, जिल्हा रत्नागिरी. पण पुढें ते अव्वल पेशवाईंत प्रथम सातारा व नंतर पुणें येथें आले आणि सावकारीच्या धंद्यांत बरेंच यश लाभल्यामुळें त्यांनीं पुणें हेंच स्थायिक राहण्याचें ठिकाण करून तेथें ते मोठाले दोन वाडे बांधून राहिले होते. असो.

कवि त्रिंबक ऊर्फ दादा साहेब यांच्या वडिलांचें नांव अंताजी बल्लाळ ऊर्फ बापूसाहेब. त्यांचाही बराच लौकिक असावा असें वाटतें. बापूसाहेबांची सख्खी बहीण सांगलीकर श्रीमंत चिंतामणराव पांडुरंग अप्पासाहेब पटवर्धन यांच्या मातोश्री असून, रावबाजीकडून दौलतराव शिंद्यांकडे गेलेले सुप्रसिद्ध वीर व मुत्सद्दी नारो हरि आपटे, यांचे चिरंजीव सरदार हरि नारायण ऊर्फ बाबासाहेब समशेरजंग बहादूर ( रावबाजींची कन्या कै. बयाबाई साहेब आपटे यांचे सख्खे सासरे ) यांस बापूसाहेबांची कन्या सौ. मनूबाई दिली होती. चिरंजीव त्रिंबकाचा ओढा परमार्थीकडे विशेष असल्यानें पूर्वापार धंद्यांत त्यांचें चित्त लागेना, त्यामुळें बापूसाहेबांचें दादा

साहेबांशीं पटलें नाहीं. याखेरीज अंताजी बल्लाळाबद्दल जास्त माहिती मिळत नाहीं. मिति पौष शुद्ध १ शके १७६३ रोजीं त्यांचा काल जाहला.

चरित्रनायक त्रिंबकाचा जन्मकाल अद्याप अज्ञात आहे व त्याच्या बालपणाची व पूर्ववयाची विशेष माहितीही उपलब्ध नाहीं. त्यांचें वडिलांशीं न जुळल्यामुळें ते ग्वाल्हेर येथें आपल्या बहिणीकडे जाऊन राहिले. ग्वाल्हेर हें गायनकलेचें माहेरघर असल्याचें प्रसिद्धच आहे. तेव्हां अर्थातच त्रिंबकाचे मूळ स्वभावाप्रमाणें पारमार्थिक भजनाकडे त्यांचें लक्ष वेधलें व भक्तिरसाच्या भरांत त्यांच्यांत काव्यस्फूर्तीही उद्भूत झाली. संस्कृत, हिंदी, फारशी भाषांचा अभ्यास, गायनकलेची आवड आणि काव्यस्फूर्ति जर त्रिंबकांना ग्वाल्हेर येथें झाली नसती, तर मराठी वाङ्मय त्यांच्या रसाळ कवनास पारखें झालें असतें. असो.

कवि त्रिंबकांनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला होता व त्यांस तिघे मुलगे व तिघी मुली अशी संतति झाली होती. घरचा धंदा सावकारीचा. शिवाय पेशव्यांकडून त्यांस दोन गांवें इनाम असून दोन तीन ठिकाणांहून आप्तसंबंधानें वगैरे वार्षिक तैनातीही मिळत असत. त्यामुळें त्यांना जीवनकलहार्थ उद्योग करण्याची कांहींच जरूरी नव्हती; म्हणून त्यांनीं आपला सर्व वेळ ईश्वरभजनांतच घालविला. सावत्र आईशीं न पटल्यामुळें त्यांनीं आपल्या आयुष्याचीं शेवटलीं अठरा वर्षें पंढरपुरीं श्रीविठ्ठलचरणाजवळच घालविलीं. त्यांनीं सकाळपासून दोनप्रहरपर्यंत मानसपूजा करावी व तिसरे प्रहरपासून सायंकाळपर्यंत श्रीविठ्ठलाचें पादसेवन व नंतर ज्ञानेश्वरीपठन करावें. स्वप्नांत दीक्षा व उष्टा विडा मिळाल्यामुळें ते एकनाथ महाराजांस आपले गुरु मानीत व म्हणूनच त्यांनीं आपल्या प्रत्येक पदाच्या शेवटीं 'एका जनार्दनाचा' मोठ्या भक्तीनें व अभिमानानें उल्लेख केला आहे. त्यांनीं सुरू केलेला श्रीएकनाथषष्ठीचा उत्सव अद्यापही त्यांचे वंशज मोठ्या भक्तिभावानें साजरा करितात.

कवींचे तीर्थरूप वारले तेव्हां आतेभाऊ श्री. चिंतामणराव अप्पासाहेब सांगलीकरांनीं त्यांच्या सांत्वनार्थ जें पत्र पाठविलें तें खालीलप्रमाणें—

चिरंजीव राजश्री दादा भिडे यांसी प्रती चिंतामण पांडुरंग आशीर्वाद. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. तीर्थरूप बापूसाहेब पौष शुद्ध प्रतिपदेच्या दिवशीं परमधामास गेले हें वर्तमान पुण्याहून लिहिलें आलेंच असेल. चि. सौ. मनुबाई लष्कराहून पुण्यास आली, ती अंतकाळीं वडिलांच्याच सन्निध होती. सांप्रत त्यांच्या पाठीमागें या ब्रह्मांडांत आपणावांचून आम्हांस दुसरा कोणी नाहीं म्हणोन लिहिलें तें कळलें. वडीलांचा काळ झाल्याबद्दल पुण्याहून चिरंजीव राजश्री चिंतामण नाईक यांचें पत्र आलें होतें. वडील गेले; ईश्वरी इच्छेस इलाज नाहीं. रवाना छ २७ जिल्हेज बहुत काय लिहिणें लोभ असावा हे आशीर्वाद. चिरंजीव आणास आशीर्वाद.

तसेंच श्रीमंत अण्णासाहेबांचें छ २४ सब्बास सुरसन तिस्सा अर्बेन ममतैन व अलफ शक १७७० कीलक नाम संवत्सरे भाद्रपद वद्य ११ मंदवारचें एजंटसाहेबांस लिहिलेलें पत्र उपलब्ध असून त्यांत राहटणी गांव त्र्यंबक अनंत यांचे नांवें सोडविण्याविषयीं विनंति केली आहे. सदर पत्रांतच श्रीमंतांनीं बापूसाहेब आपले मामा असल्याचें नमूद केलें आहे.

आपल्या वडीलांच्या मृत्यूनंतरही त्यांनीं श्रीविठोबाच्या चरणसेवेचा त्याग केला नाहीं व आपल्या इनाम गांवांची ( थिटेघर व राहाटणी ) व्यवस्था मुखत्यार मार्फत पंढरपुराहूनच ते पाहत असत. याप्रमाणें सुमारें १८ वर्षें सतत भूवैकुंठ श्रीपंढरीसच राहून इ. स. १८५२ सालीं तेथेंच त्यांनीं देहत्याग केला.

कवि त्र्यंबकांनीं बरीच काव्यरचना केली असावी असें वाटतें. पण दुःखाची गोष्ट ही कीं, हल्लीं त्यांच्या वंशजांच्या दप्तरांत एक बाड व इतर कांहीं फुटकळ पदांखेरीज जास्त रचना उपलब्ध नाहीं ! सदर बाडाच्या जीर्णतेमुळें व लिखाणही स्पष्ट नसल्यानें कांहीं पदें तर लागतच नाहींत ! तथापि उपलब्ध कवितेवरून कवि या नात्यानें त्यांची थोरवी चांगल्या प्रकारें कळून येते. विविधभाषानैपुण्य, भक्ति व जिव्हाळ्याचें प्रेम यांमुळें नाममहिमा, जन्मजराभय, गुरुप्रेम, नरदेहाचें सार्थक्य,

भौतिक बाबींबद्दलची उदासीनता वगैरे विषयांवरील त्यांची कविता अपूर्व वठली आहे. वाङ्मयाच्या दृष्टीनें उपमा, अलंकार, अनुप्रास, रसपूर्णता वगैरे बाबीही वाखाणण्याजोग्या आहेत. उदाहरणार्थ खऱ्या तपश्चर्येची खालील व्याख्या पहा—

( १ )

पद बागेसरी, कानडा.

तप हें वाङ्मय बा रे ॥ ध्रु० ॥
शांतरसें अलंकृत वाणी, सदा संतजन बोलति सारे ॥ १ ॥
सत्यप्रिय हितकर सर्वांसी, सबाह्य प्रेमें हरिगुण गारे ॥ २ ॥
शुद्ध ज्ञान जनां उपदेशी, वाजविते श्रुति शास्त्र नगारे ॥ ३ ॥
वाच्य नव्हो श्रीएकाजनार्दन, त्र्यंबक जाणुनि हेंचि उगा रे॥४॥

श्रीकृष्ण गोकुळाहून मथुरेस जाऊं लागले, त्या वेळची याता यशोदेची विनवणी व नंतरचा भक्तश्रेष्ठ राधिकेचा खालील विलाप मननीय आहेः—

( २ )

पद जंगला.

नको जाऊं दूर रे गोविंदा नको जाऊं दूर ॥ ध्रु० ॥
अनुदिनिं कृष्णा खेळविलें तुज पाजुनि निजतन क्षीर रे ॥ १ ॥
काळचि आला अक्रुर मेला, ग्रासी चैतन्य असुर रे ॥ २ ॥
जन गोकुळिंचे दीन तुझे हरि, हृदय करिसि निष्ठुर रे ॥ ३ ॥
सेवि शिदोरी एका जनार्दन, त्र्यंबका कैंचा धीर रे ॥ ४ ॥

( ३ )

पद—सोनी राग.

टाकुनि मजला कुठें तरि गेला, सांवळा माधव बाई ॥ १ ॥
वियोगदुःखें व्याकुळ केलें स्मरण तनूचेंहि नाहीं ॥ २ ॥
वृक्षा पाषाणासि पुसतसे, तूं कधीं देखिला कीं काई ॥ ३ ॥

खग नग मृग हो तुम्हि तरि सांगा होत्ये जीवाची या लाही ॥३॥
जो व्यापक बाह्यांतरिं त्र्यंबक एका जनार्दना सुखदाई ॥ ४ ॥

रुक्मिणीची करुणपत्रिका वाचून जगजेठी श्रीहरि द्रवला तेव्हां कवि तिला संबोधितात—

( ४ )

शुभांगे ! तुला वराया विबुधोद्यानवसंत ।
आला भगवंत ॥ ध्रु० ॥

पैल पहा गरुडध्वज झळके, यादव वीर अनंत ।
संभवले यादव वीर अनंत ॥ आला० १ ॥

पत्र तुझें पहातां घाबरला, क्षणभर नाहिं उसंत ।
हरिला क्षणभर नाहिं उसंत ॥ २ ॥

वरिल तुला जगदीश्वर ज्यातें, शुकसनकादिक संत ।
वंदिति शुकसनकादिक संत ॥ ३ ॥

नाभी नाभी स्वप्नीं जल्पे, त्रिभुवनिंचा श्रीमंत ।
हरि तो त्रिभुवनिंचा श्रीमंत ॥ ४ ॥

अंबे ! सेवीं एका जनार्दन, तुज प्रभृति महंत ।
त्र्यंबक तुज प्रभृति महंत ॥ ५ ॥

खालील भूपाळीही मननीय आहे—

५

उठीं उठीं उठीं उठीं चूडामणी । उभे नारद तुंबर आंगणीं ।
करी परिचर्या तनुसंगिनी । तुज स्मरती योगी रंगणीं ॥ ध्रु० ॥

मनमोहना ! गाइ ने वना । व्रजबाळें आलीं अंगणा ।
हो जागा श्रीमधुसूदना । मुख प्रक्षाळुनि करिं भोजना ॥ १ ॥
अरुणोदयीं निशिच्या कळा । वृन्दावनीं गुंजति कोकिळा ।
पय श्रवली धेनु सोज्वळा । रविरश्मी दिसति प्रांजळा ॥ २ ॥

यमुनेतीरीं मथुरच्या स्त्रिया । जप करिती साधन सत्क्रिया ।
त्यांहीं त्याजिले तुजसाठीं धीया । त्यांतें दर्शनें देईं मत्प्रिया ॥ ३ ॥

गीत गातां लज्जित गोपिका । एक दर्शन इच्छिती भाविका ।
तुज अंतर्भाव हा ठाउका । उठ माझ्या तान्हुल्या बालका ॥ ४ ॥

श्रुत जननीची काकुळती । मग जागा झाला श्रीपति ।
करी पयपानाची पंगती । तुज त्र्यंबक मागे सद्गति ॥ ५ ॥

जनकसुता सीताबाई भक्तश्रेष्ठ मारुतीस विचारतात—

( ६ )

षड्गुणतरु आराम । सबांधव राम । कपींद्रा सुखी असे कीं ॥ ध्रु० ॥
कनककुरंगा पाठीं गेला । प्रभु सर्वज्ञ काम ॥ १ ॥
निजकांतेतें दुष्टें हरिलें । स्मरतो मंगलधाम ॥ २ ॥
सौमित्रा दुर्वाक्यें छळिलें । त्याचा हा परिणाम ॥ ३ ॥
मजविरहित त्या चिंता कैंची । अखिल लोकाभिराम ॥ ४ ॥
त्र्यंबक भंगी एका जनार्दना । करितो विबुध प्रणाम ॥ ५ ॥

खालील कवनांवरून. कवीच्या काव्यकौशल्याची कल्पना होईल —

हरि हा संहर्ता । कळिचा ॥ ध्रु० ॥ हरि हा संहर्ता ॥
धर्ता ब्रह्मेशातळिचा । भोक्ता बुधपदरजधुळिचा ।
भर्ता श्रीवृत्त तारामंडळिंचा ॥ हरि हा संहर्ता ॥ १ ॥

वक्ता निगमागममुळिचा । शास्ता संतभूपावळिचा ।
सविता अति शांतबोधाचळिंचा ॥ हरि हा० ॥ २ ॥

दमिता अहि यमुनाजळिंचा । त्राता प्रिय पांचाळीचा ।
प्रणताश्रय कुंकुम श्रीनिढळींचा ॥ हरि हा० ॥ ३ ॥
वेत्ता सदसद्विदळीचा । जनिता अपिताशन बळिचा ।

रमता अळि त्र्यंबक हृत्कमळींचा ॥ ४ ॥

(८)

पद—झिंजोटी.

बा माझा श्रमला विठोबा। भक्तहितार्था ॥ ध्रु० ॥
नीचपणें सारथ्य करी ।ज्ञान बोधुनि पार्था ॥ १ ॥
भीष्मप्रतिज्ञा सत्य करी। स्वयें नेणुनी स्वार्था ॥ २ ॥
प्रल्हादा अतरुनी स्तंभीं । संकटिं रक्षि समर्था ॥ ३ ॥
करीत पावन एका जनार्दन। त्र्यंबका दीन अनाथा ॥ ४ ॥

(९)

पद—धनाश्री.

दया माझी कां नये करुणाघना हे ॥ ध्रु० ॥
मोहप्रवाहीं गुंतुनि पडलों। जातें व्यर्थ वय ॥ १ ॥
कामादिक तस्कर नागविती । वाटे काळभय ॥ २ ॥
निज हित कांहीं मज उमजेना। आवडती विषय ॥ ३ ॥
सोडवि त्र्यंबका एका जनार्दन । लाउनि पायीं लय ॥ ४ ॥

(१०)

पार्वती परमेश्वरा विठोबा रखुमाईच्या वरा रे ॥ ध्रु० ॥
ईश्वर होउनि गोंवऱ्या वळशी नामयाच्या घरा ।
व्यापक होउनि सावंत्याच्या पोटीं लपशी खरा
निर्मळ होउनि चोखोबाच्या न्हाणितोसी पोरा रे ॥ १ ॥
नित्यमुक्त होउनी बांधिती व्रजनारी सुंदरा रे ।
होउनी सर्वज्ञ विचार पुसशी...वानरा रे । •
खासी उष्टी बोरें त्या शबरीचीं विश्वंभरा रे ॥ २ ॥

• शेवटीं कविनाम नसल्यामुळें हें पद अपूर्ण असावें असें वाटतें.

त्रिंबकाचीं खालील दोन पदें फार प्रसिद्ध असून तीं सर्वत्र, एकतारीवर भजन म्हणून पोट भरणाऱ्या भिक्षेकऱ्यांच्या तोंडूनही ऐकूं येतात—

(११)

राम माझा धरिल कसा अभिमान। पाहतो काय निदान ॥ध्रु०॥
जप तप साधन कांहिं न जाणें। पातकी दुष्ट महान् ॥ १ ॥
परघातक मी गुरुवंचक मी। दोष हे काय लहान ॥ २ ॥
करुणाकर कां निष्ठुर झाला। त्र्यंबकप्राणनिधान ॥ ३ ॥

(१२)

रामदर्शनासि चला। लाभ हा भला ॥ ध्रु० ॥
रामजन्म रामनवमी नक्षत्र पुनर्वसु।
समय मध्यान्ह दिवा अवतार जाहला ॥ १ ॥

दशरथासि दाशरथी पुत्र जन्मला।
त्रिभुवनांत जयजयकार जाहला ॥ २ ॥

भजकाचे कोटि अन्याय हा क्षमा करी।
उद्धरितां महाराज नाहिं भागला ॥ ३ ॥

शबरीचीं बदरिफळें पदरिं घेउनि।
भावबळें भुलोनियां भक्षुं लागला ॥ ४ ॥

महाविष्णु त्र्यंबकासि अमृत लाधला।
पार्वतीसि थोर आनंद जाहला ॥ ५ ॥

कवीच्या मराठी कवितेप्रमाणेंच त्याची हिंदी कविताही उच्च दर्जाची आहे व त्यांत भक्तिप्रचुर कवितेखेरीज नाथपंथ आणि कबीराच्या निर्वाण फटक्या-सारख्या कवनांचाही अंतर्भाव झाला आहे. शिवाय त्यांनीं "पकडो लियो हकालो, बे बिसवामितर भाग जावे गा" सारख्या मोरोपंतांच्या एक चरण हिंदी व एक मराटीच्या धर्तीवरही कविता केली आहे. उदाहरणार्थ—

(१३)

जिनने तुझको पैदा किया, कर उसका संदेसा रे।
इंद्रजालवत् प्रपंच सारा, सुत वंध्येचा जैसा रे ॥ ध्रु० ॥

तन जोबन पर आशिक हुआ, क्या पाया आराम रे ।
इंद्रियजन्य सुखातें भाळुनि, नेणसि आत्माराम रे ॥ १ ॥
क्यों गफलत में गाफिल हुवा, किस लालच पर प्यारा रे ।
किरण न जाणुनि भ्रमती हरणें, जैशीं उदकाभासा रे ॥ २ ॥
क्या आसन ही किये कुफरसे, क्योंकर हुवा दिवाना रे ।
आत्मा तूं अविनाश होउनी, मानिसि जन्मा मरणा रे ॥ ३ ॥
तनकिल्ले मे एका जनार्दन लाल खंडा बेपर्वा रे ।
त्र्यंबकपण हें त्याला अर्पुनि भोगिं सुखाचा ठेवा रे ॥ ४ ॥

## (१४)

पद—रामकली

रोवत लाल सखीरि मनाना । अपने मंदर तैं ले जाना ॥ ध्रु० ॥
कौवा चिरिया शेर बुलाना । उसमो बताय के झूले झुलाना ॥ १ ॥
लड्डू मेवा खाउ खिलाना । माखन मिसरी दूध पिलाना ॥ २ ॥
मीठे सुरसे गाय हिलाना । लेमा गोद में खूब खिलाना ॥ ३ ॥
राई नोन उतार जलाना । प्रानजीवन त्रिंबक को पिलाना ॥ ४ ॥

## (१५)

सुंदर रूप तिहारो कहां पांऊं ॥ ध्रु० ॥
श्याम चतुर्भुज दामन ऐसो, मनमो किस बिधवाको ध्याऊं ॥१॥
बदन सुधाळा कुंडलमंडित, देखके तन मन धन बलि जाऊं ॥२॥
तूं महाराज श्रीएका जनार्दन, त्रिंबक निशिदिन तोहे मनाऊं ॥ ३॥

## (१६)

नरदेही का मोल, येहि कर नरदेही का मोल ॥ध्रु० ॥
ब्रह्मजानपर होय दिवाना, अबोल भाषा बोल ॥ १ ॥
आप दुजाको जिनने मारा, काम क्रोध क्या फोल ॥ २ ॥
जो जो देखो अरबीयन अंगें, सो साहेब का डोल ॥ ३ ॥
एकनाथ के पांव पकडके, दिलका पडदा खोल ॥ ४ ॥

आतां शेवटीं प्रपंचांत राहून परमार्थ साधणाऱ्या मुमुक्षूंस कवि त्रिंबकांच्याच शब्दांत खालीं दिलेल्या बाबींचा निश्चय करण्याचा आग्रहन करू हा अल्पचरित्रलेख संपवितों—

( १७ )

आग्रह हा ज्याला । देव सुलभ त्याला ॥ ध्रु० ॥
सच्छास्त्रें पाहिन सत्संगें राहिन अभ्यासिं निश्चळ झाला ॥ १ ॥
इंद्रिय दमिन चित्ता नेमिन त्यागिन, विषयविषाला ॥ २ ॥
सायास करिन सद्‌गुरु वरिन, लाहिन आत्मसुखाला ॥ ३ ॥
देहबुद्धि गाळीन भेदासि वाळिन त्र्यंबकें निग्रह केला ॥ ४ ॥

कवींचे नातू रावबहादुर भिडे यांनीं उत्तर हिंदुस्थानांतील इंदूर, देवास, ग्वाल्हेर या महाराष्ट्रीय संस्थानांत मोठमोठालीं कामें केल्यामुळें ते मुत्सद्दी या नात्यानें प्रसिद्ध असून संतति संपत्तियुक्त व मोठे विद्यारसिकही आहेत. परमार्थाचा व गायनभजनाचा नाद त्यांना आनुवंशिक असून त्यानींही कांहीं कविता केली आहे.

# मुकुंदसुत.

हा सरदेशपांडे कमलाकार । होता कवि महाचतुर ।
यानें कविता सुंदर । केली महाराष्ट्र भाषेमध्यें ।। ४० ।।

पदलालित्य गोड भारी । प्रसादवाणी असे खरी ।
उपास्यदैवत रावणारि । सीतापति रामचंद्र ।। ४१ ।।

दासगणूकृत संतकथामृत, अध्याय १५ वा.

मुकुंदसुत यांचें मूळ नांव कमलाकर असून हे मोगलाईतील, गोदावरीच्या नाभिस्थानीं असलेल्या, प्राचीन कालांतील नवनंदाच्या वसतिस्थानचे —नांदेडचे—रहिवासी. या कवीनें आपल्या घराण्याचा वृत्तांत एका ओवीबद्ध बखरींत लिहून ठेवला आहे. त्या बखरीचा पूर्वार्धच तेवढा कवीनें स्वतः लिहिलेला असून, उत्तरार्ध, कवीच्या वंशजांनीं, विद्यमान संतकवि दास गणू यांजकडून लिहवून घेतला आहे. ही सर्व माहिती, नांदेड येथील सद्गृहस्थ रा. गणेश अनंत सराफ यांनीं, कवीच्या वंशजांकडून मिळवून पाठविली.

कमलाकर ऊर्फ मुकुंदसुत हे वसमतकर श्री [1]शुकानंदांचे समकालीन होत. शुकानंदांचा समाधिकाल शके १७४९ म्हणजे इ. स. १८२७ धरल्यास, हे दोन्ही कवि १७ व १८ व्या शतकाच्या संधिकालांत विद्यमान होते असें समजण्यास हरकत नाहीं. मुकुंदसुतांचा जन्मकाल १७१३ पौष शुद्ध ५, समाधिकाल, शके १७७३ ज्येष्ठ शुद्ध ७.या घराण्याचे मूळपुरुष कृष्णाजीपंत.

मुकुंदसुत हे मूळचे अत्यंत गरीब घराण्यांतले असून, दैववशात् सरदेशपांड्यांच्या कुलांत दत्तक आले. यांचें जन्मनांव गोविंद. कनिष्ठ बंधु रेणुकादास हे आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी वारले. पहिली आई वारा-

---

१ शुकानंदांचीं कांहीं पदें काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालीं आहेत.

२ दास गणूकृत संतकथामृत, अध्याय २५ वा, ओवी १०१.

णसीबाई, पालिमकर विठ्ठलराव देशमुखांची कन्या. ही शके १७२१ त मरण* पावली. सापत्न माता कमलाबाई. हिच्या अंतकालीं गोदावरी नदीस महापूर आला होता. कवीची दत्तक माता ( मुकुंदरावांची स्त्री; वसमतकर तिमारावांची कन्या ) मथुराबाई. जन्मदाते वडील श्रीनिवासराव यांचा जन्मशक १६६८ व मृत्युशक १७३३ ज्येष्ठ वद्य ३०. यांच्या चितेंत पांच बिल्वपत्रें निघाल्याचें बखरींत वर्णन आहे. दत्तक पिता मुकुंदराव. जन्मशक १६८६. मृत्युशक १७३७ श्रावण शु० ३.

बालपणापासून कमलाकर हा अत्यंत शांतवृत्तीचा होता. त्याच्या अंगीं पुढें उत्पन्न झालेल्या दैवी संपत्तीचें बीज बालपणापासूनच अंकुररूपानें दृग्गोचर होऊं लागल्याची साक्ष पूर्वीच्या घराण्यांत घडलेल्या पुढील हकीकतीवरून पटते. एकदां आईच्या सांगण्यावरून कमलाकर पैसे घेऊन तेल आणावयास गेला. तेल घेऊन येत असतां, त्याला रस्त्यांत एक मनुष्य भेटला. त्या मनुष्याच्या टाळूस एक छिद्र होतें. त्यानें कमलाकराजवळ तेल मागितलें व तें त्यानें कांहीं आढेवेढे न घेतां दिलेंहि.तें घेऊन त्यानें आपल्या टाळूस लाविलें आणि तो निघून गेला. तेलाचें रिकामें बुडगें घेऊन कमलाकर घरीं आला व तें ओसरीवर ठेवून मातोश्री रागें भरेल या भीतीनें स्वारीनें पलायन केलें. मातोश्रीनें बराच वेळ वाट पाहून, सगळें घर शोधून पाहिलें, तों ओटीवर तेलाचें बुडगें कांठोंकांठ भरलेलें दिसलें. पण कमलाकर कोठेंहि दिसेना. शोध करितां स्वारी एकदांची सांपडली. मातोश्रीला पाहतांच भीतीनें त्याच्या हातांपायांस कंप सुटला. पण ती कांहीं बोलत नाहींसें पाहून तो तिच्याबरोबर घरीं आला.तेलाचा वृत्तांत कळतांच सर्वांनाच आश्चर्य वाटलें. विचारांतीं तो रस्त्यांत भेटलेला मनुष्य अश्वत्थामा असावा असें अनुमान झालें.

यानंतर थोड्याच वर्षांनीं कमलाकर हा सरदेशपांडे यांच्या कुलांत दत्तक आला. हें कुल निजामसरकारचें वंशपरंपरेचें आश्रित असून 'सरदेशपांडे

---

* त्याविषयीं कमलाकरानीं बखरींत, ' कमलेचिया देहांतासाठीं । गौतमी आली द्वारा निकटीं। चितास्थान समाधि गोमटी । निजद्वारीं शोभतसे ॥" असें म्हटलें आहे.

सरकार नांदेड' या बहुमानाच्या पदवीनें विभूषित अशा थोर वतनदारीचें आहे. पुढें या कुलाला एकाएकीं विपत्तिकाल आला व सर्व वतनदारी जप्त झाली. अलोट संपत्तींत लोळणाऱ्या पुरुषावर दारिद्र्यानें आपली कृपा-दृष्टि फिरविली.

पुरुष पडला धैर्याचा. एके दिवशीं आपलें उपास्य दैवत जें श्रीरामचंद्र, त्याजपुढें कमलाकरराव अनुष्ठानास बसले. रात्रीं श्रीरामचंद्रानें श्रीशुकानंद महाराजांना भेटून सांगितलें कीं, 'शुकानंद! माझा भक्त जो कमलाकर त्याला तूं अनुग्रह करून कृतार्थ कर.' प्रभु रामचंद्राच्या आज्ञेनें श्रीनीं कमला-कररावांचे स्वप्नांत येऊन 'यावानहं मयाभावो' या मंत्राचा बारा वेळ पाठ करण्यास सांगून गुरुमहाराज गुप्त झाले. जागृत झाल्यावर कमलाकरांनीं आपल्या सद्गुरूंचा शोध चालविला. अश्वत्थ वृक्षाच्या पारावर श्रीशुकानंद महाराजांचें प्रत्यक्ष दर्शन झालें.

गुरुमहाराजांनीं कमलाकरांस एक रुपया देऊन "तूं भागानगरास ( हैद्राबादेस ) जा. तुझें वतन थोडेंबहुत सुटेल. प्रयत्न कर. प्रयत्नांतीं पर-मेश्वर आहे' असें सांगितलें. त्या वेळच्या परिस्थितीवरून कमलाकरांना वतन परत मिळण्याची आशा दिसेना, तथापि सद्गुरूच्या वचनावर विश्वास ठेवून त्यांची आज्ञा त्यांनीं प्रमाण मानिली; आणि स्वारी भागानगरीं जाऊन निजाम सरकारचे त्या वेळचे दिवाण बहादुर चंदुलाल साहेब यांना भेटली. सर्व हकीकत निवेदन करितांच दिवाण साहेबांस ती विनंति मान्य होऊन, जप्त झालेल्या वतनाचा बराचसा भाग त्यांनीं सोडविला. एवढी अचाट कामगिरी कमलाकरांच्या हातून झाल्यामुळें ते आपल्या कुळांतील मूळपुरुष म्हणून गणले जात आहेत. अशा बिकट परिस्थितींतच कमलाकरांचे ठायीं काव्य-स्फूर्तीचा उद्भव झाला. त्यांना मराठी, फारशी, उर्दू, संस्कृत इत्यादि भाषांचें चांगलें ज्ञान होतें, त्यांनीं निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या कविता रचल्या; व आपल्या वृद्धापकालीं चतुर्थाश्रमाची दीक्षा घेतली. त्या आश्रमांतील त्यांचें नांव 'नित्यानंद स्वामी' असें होतें. आश्रमांतरानंतर त्यांनीं कविता रचलेली दिसत नाहीं. याप्रमाणें आपलें नांव अजरामर करून कमलाकरांनीं कैवल्यमुक्तीला वरिलें. सध्यां त्यांचे दोन पणतू हयात आहेत. त्यांपैकीं

किशनराव हे मुख्य असून, ज्या रामचंद्राजवळ कमलाकरांनीं अनुष्ठान केलें होतें त्या रामाचें मंदिरहि ह्यांच्याकडेच आहे.

**कविता**—कमलाकर हे कवि या नात्यानें मुकुंदसुत म्हणून प्रसिद्ध आहेत. यांच्या कवितेसंबंधीं शोध करितां, असें समजतें कीं, यांच्या कविता मराठीप्रमाणें उर्दू भाषेंतहि आहेत. शिवाय, यांनीं आपल्या वंशाची मूळापासून तों स्वत:पर्यंतची हकीकत ओवीबद्ध ग्रंथ रचून स्वत: लिहून ठेविली आहे, त्यापुढील कथाभाग विद्यमान संतकवि दासगणू यांनीं लिहून दिलेला आहे. प्रस्तुतची माहिती **दासगणूकृत** संतकथामृत ग्रंथांतून घेतलेली आहे. असो. वरील ग्रंथाचा शोध करितां तो त्यांच्या घरीं सांपडेना, व ज्या ज्या ठिकाणीं तो असेल असें त्यांच्या वंशजांकडून कळलें, तेथेंहि शोधून पाहतां सुगावा लागेना. ज्या ओवीबद्ध बखरीचा उल्लेख आरंभीं केला आहे तींत कवि म्हणतात:—

**मुकुंदमुखें श्रवण केलें । तैसेंच येथें कथिलें ।**
**जें कां असेल न्यून आगळें । पूर्णकर्ता श्रीहरि ॥**
**चैतन्योदधीमाजी विविध । उठती शब्दांचे बुद्‌बुद्‌ ।**
**तत्प्रकाशें हा प्रबंध । प्राकृत वाणी रचियेला ॥**
**श्रीशालिवाहनशक । सप्तदश एकोणषष्ठी देख ।**
**हेमलंबी संवत्सर सुरेख । शुद्ध कार्तिकी पौर्णिमा ॥**
**असतां वसुमती नगरीं । श्रीराम अंतरीं प्रेरणा करी ।**
**म्हणूनियां निजनिर्धारीं । पूर्वजाख्यान कथियेलें ॥**
**श्रीसद्गुरु शुकानंद । सच्चिदानंद आनंदकंद ।**
**तयाचें पदारविंद । कमलाकर वंदितसे ॥**

मुकुंदसुतांच्या स्फुट कवितेचा शोध करितां ती थोडीबहुत त्यांच्या वंशजांकडून मिळाली. तेवढयावरच वाचकांची काव्यतृष्णा भागविणें भाग आहे.

## श्रीगणेशमानसपूजा.

जया नसे आदि अंत । नमन तयातें अनंत ॥ १ ॥
योगैश्वर्य ही दक्षिणा । भावें अर्पूं गजानना ॥ २ ॥
जे जे चरणाची गति । तेचि प्रदक्षिणा होती ॥ ३ ॥
अहो परादि वैखरी । शब्द विविध उच्चारी ॥ ४ ॥
तेंचि प्रभूचें स्तवन । प्रणवरूप गजानन ॥ ५ ॥
प्रेमादरें नृत्य करूं । मुखें नामातें उच्चारूं ॥ ६ ॥
चारी वाचा पडे मौन । मौनीं स्फुरे गजानन ॥ ७ ॥
बोल बोलणें बोलका । सर्व तूंचि विनायका ॥ ८ ॥
विनायक शुकानंद । गुरु निजानंदकंद ॥ ९ ॥
दास कमलाकर सुखें । नाम उच्चारितो मुखें ॥ १० ॥

### पद १ लें गणपतीचें.

करितों भावें एक विनंती । मयुरेश्वर तव पायाला ॥ ध्रु० ॥
मंदमतीतें प्रकाश करुनी । स्फुरवीं तव गुण गायाला ॥ १ ॥
स्वात्मज्ञान जें बोधीं बरवें । जगद्रूप तुज पाह्याला ॥ २ ॥
मुकुंदात्मज ध्यातो अंतरीं । शुकानंद गुरुरायाला ॥ ३ ॥

### पद २ रें सरस्वतीचें.

ध्यातों अंतरीं ब्रह्मकुमारी । परिपालय निज दासाला ॥ ध्रु० ॥
स्वात्मसुखातें अनुभववीं मज । विषयाशा मनिं काशाला ॥ १ ॥
शुद्ध सत्वमय विश्वरूप तूं । परिहरिं जगदाभासाला ॥ २ ॥
पुज्य भगवती सुरासुरांतें । शुक सनकादिक व्यासाला ॥ ३ ॥
मुकुंदसुत प्रभु शुकानंद गुरु । नष्ट करी भव-पाशाला ॥ ४ ॥

### पद ३ रें रामाचें.

रामा ! करीं माझा प्रतिपाळ ॥ ध्रु० ॥
तुजविण मातें कोण न त्राता । म्हणविसी दीनदयाळ ॥ १ ॥
जेविं नदी-जल जाय पळोपळ । ने आयुर्बल काळ ॥ २ ॥

या संसारीं श्रमलों भारी । डंखिति विषयव्याल ॥ ३ ॥
मुकुंदात्मज विनवी चरणा । ब्रीद तूंच सांभाळ ॥ ४ ॥

## पद ४ थें नामस्मरणावरील

प्रेमवदन हरिनाम कहोजी । बनके भीतर काहेकु रहोजी ॥ ध्रु० ॥
गलेमे माला मस्तकीं टिळा । जटा शिरपर काहेकु धरोजी ॥ १ ॥
आप कवन है कहांसे आयो । जावो शरण श्रीगुरुसे पुछोजी ॥ २ ॥
वासुदेव सब विश्व बिराजे । अनुभवामृतपान करोजी ॥ ३ ॥
मुकुंदात्मज वंदी चरणको । दास कमलाकर ध्यान धरोजी ॥ ४ ॥

यांच्या पांचसहा आरत्याहि आहेत त्या सर्व न देतां फक्त नमुन्याकरितां एकच देतों.

## आरती सीतेची

जयदेवी जयदेवी जय मंगलसदने । जय ज्ञाननयने ।
निर्मल सत्वें ब्रम्हीं स्फुरसी ऐक्यपणें ॥ ध्रु० ॥
त्वत्संयोगें निर्गुण सगुणत्वा आलें ।
सत्वरजस्तम हे गुण त्वद्गर्भीं व्याले ॥
महदादिक सर्वहि हे तुजपासुनि झाले ।
विश्वाकारें तूंची विलससि निजलीले ॥ २ ॥

व्योमिं रजःकण फिरती ब्रम्हांडें तैसीं ।
उभयात्मकसंयोगें कल्पिसि तूं धरिसी ॥
अनंत, अद्वय, षड्गुणरूपें तूं स्फुरसी ।
अघटित घटना भगवति नकळे निगमासी ॥ २ ॥

लीलाविग्रहरूपें अवतार नाना ।
साकारत्वें क्रीडसि न कळे गुणगणना ॥
राघवरूपें वधिली रजनीचर-सेना ।
सर्वहि करणी तुझी वाचे वदवेना ॥ ३ ॥

चिन्मय विद्या शक्ति विक्षेपावरणा ।
हरुनी, स्वानुभवातें देसी भक्तजनां ॥
जननी कृपाकटाक्षें रक्षीं मज दीना ।
मुकुंदात्मज भावें वंदी श्रीचरणा ॥ ४ ॥

त्याचप्रमाणें पुढील खंडकाव्य पहा:—

## प्रकृतिपुरुषसंवाद

पुरुष प्रकृती सुखसंवादें विनोद करिती कसा ।
मुमुक्षु सज्जन मज्जन मिळुनी श्रवण करा त्या रसा ॥ ध्रु० ॥

मायादेवी म्हणे श्रीपती केवळ तूं गुणहिन ।
अंत आपला न जाणसी परि सर्वज्ञ म्हणवुन ॥
कर्म धर्म हे कांहिंच नसती तुजला मजवांचुन ।
मत्संयोगें सगुण साक्षी होशी गा षड्गुण ॥
चाल—रे प्रभु रे ! कांहीं प्रपंच न कळे तुला ।
व्यवहार होउनी निष्क्रिय दिधला मला ।
मज करून वाइट आपण राही भला ।
राहसी शेवटीं मज गिळुनी एकला ।
गुणत्रयाचा बंध जिवाला कशि झाली अवदशा ।
अशा पतीनें निराश रहावें बाइल केली कशा ॥ १ ॥

मायापति अतिकौतुक मानुनि हांसुनियां बोलले ।
भली वधू आम्हास मिळालिस त्यैलोक्या मोहिलें ॥
गुणत्रयात्मक आपण नटुनी मजला आच्छादिलें ।
विक्षेपाचें आवरण घालुनि जीवासी भुलविलें ॥
चाल—गे सखे चहुंकडे फिरसी तूं सन्मुख ।
कां नवल दाविसी एकींही अनेक ।

काय भुलवूनि जिवा केलें विषयोन्मुख ।
कां पडळ घातलें विसरला निजसुख ।
त्रिदश माझा मित्र असा गे कैसा केला पिसा ।
अखंड मानसिं भजतो तुजला, विषयाची लालसा ॥ २ ॥

श्रीगुरु साक्षी विनोद ऐकुनि झाला समजाविता ।
ऐक्य तुह्मासी संतत असतां कां हो संवादतां ॥
सागरलहरी तशी तुजवरी शक्ती, अभिन्नता ।
जिवांश असतां तद्रूप केवळ कैंची त्या भिन्नता ॥
चाल–पाहतां तंतु मग राहे कैसा पट ।
मातीस देखतां मग भासेना घट ।
बहु सोंगें धरि परि जैसा एकचि नट ।
बीज जसें एक होउनि विलसे वट ।
नाना खटपट सोडुनि झटपट टाकुनियां आळसा ।
मुकुंदसुत श्रीशुकानंदपदिं स्मरतो निज मानसा ॥ ३ ॥

शेवटीं ज्या एका काव्यानें मुकुंदसुतांचें नांव महाराष्ट्रकविचरित्रांत अजरामर होऊन राहील त्या काव्याचा गोड घांस देऊन हें अल्प चरित्र येथेंच संपवितों.

## भूपाळी ( वेदांतपर )

प्रबोधप्रात:काळीं ध्यावा आत्मा रघुराज । आत्मा गुरुराज ।
विश्वकारें सगुण षड्गुण अवतरला सहज ॥ ध्रु० ॥

अविद्येची रजनी गाढी आपआपणा ।
विक्षेपाच्या मेघावरणें जडतम हें नयना ॥
देह मी माझें गृहसुत दारा अंधारी दृष्टी ।
कामादिक हे मत्कुण मच्छर डसतां बहु कष्टी ॥

रज्जुंत नसतां भुजंग भासुनि भय दाखवि फार ।
स्थाणू असतां दृष्टिभ्रमानें भासतसे चोर ॥
तैसा स्वरुपीं जगद्भास हा नसोनियां भासे ।
गुरुकरुणोदय निजात्मभानु प्रकाशतां निरसे ॥ १ ॥

सकाम कर्मैं दीप लाविले वासना गेहीं ।
विषयात्मक हे अर्थ दीसती व्यवहरतां देही ॥
व्रत तपदानें अहं स्नेहें उजळिली दिवटी ।
तीर्थै हिंडुनि चंद्रज्योति हे प्रकाशली मोठी ॥
पुण्यप्रकाशें स्वर्गधाम हें पाहुनि सुख भोगी ।
पुण्यक्षीणें पुनरपि येथें जन्मतसे गर्भीं ॥
हटयोगादिक कष्टसाधनें चंद्रोदय होतां ।
परंपरेनें सत्यलोकगति पावे तत्वता ॥
मुद्रासाधन शुक्रोदय होतां निजनयनीं ।
अविद्येची रजनी न सरे परंतु हा मानी ॥
ऐसें साधन तेज उदेलें न सरे मोहतम ।
चिद्भानू हा नुगवे जांवरि सच्चित्सुखधाम ॥ २ ॥

अनेक जन्मीं हरिचरणार्पित निष्काम कर्मै ।
भजतां सद्गुरुरूपें प्रगटुनि बोधी श्रुतिवर्मै ॥
मुमुक्षुतेचे उषःकाळीं गुरुकरुणोदय ।
तत्वमसि महावाक्या विवरुनि बोधी अन्वय ॥
तत्पद त्वंपद शबलनिरासें असीपदीं ऐक्य ।
बुद्धी परते सच्चित्सुखघन स्वानुभवी एक ॥
निर्विकल्प व्यतिरेक अनुभव अरुणोदय झाला ।
अहं देहममताहंकृति हा अंधकार हरला ॥ ३ ॥

स्वात्मप्रकाशें विश्वाभासें जडत्व मग कैंचें ।
जें जयाचे आदी अंतीं मध्यें तें साचें ॥
ज्यावांचुनि जें न दिसे तेंचि तें पाहीं ।
घटीं मृत्तिका पटीं तंतु हे अन्य नसे कांहीं ॥
अलंकारीं कनकचि सारें सागरिं ये लहरी ।
मृगजळ किरणीं गुणीं फणी हें बरवें विचारीं ॥
सविकल्प समाधी अद्वय बोधी भानूदय झाला ।
जडतम हरपुनि स्वात्मप्रकाशें विश्वीं हा उरला ॥ ४ ॥

भोगकाळीं सत्वसलीलीं चिदर्क बिंबतां ।
हाले डोले परी अभोक्ता निजानंदसविता ॥
निर्निमित्त जे निजात्मप्रीती अखंड अनुभविता ॥
सर्वांभूतीं प्रियकर आत्मा विलसे निज सत्ता ।
अघटित घटना विभूतियोगें सत्वें हरि नटला ।
भक्तिरसायन सगुण षड्गुण विचित्र हरिलीला ॥
शुकानंद गुरु चित्सुर्योदय विकसित हृत्पद्म ।
होतां प्रेमें मुकुंदात्मज वंदी पदपद्म ॥ ५ ॥

रा. सराफ यांनीं, प्रस्तुत कवीच्या आणखी कांहीं कविता मागाहून पाठविल्या त्याही संग्रहणीय वाटल्यावरून येथें देत आहें.

## धांवा श्रीकृष्णाचा

रुक्मिणिकांता मज आक्रांता, धांव पाव करिं त्वरा ।
अंश कलीचा दुष्ट नष्ट हा गांजितसे पामरा ॥ ध्रु० ॥
भक्तसंकटीं धांवसि श्रीपती, श्रवणी हें ऐकिलें ।
ब्रीद तुझें हें काय हरपलें मज कां उपेक्षिलें ॥

पांडववनिता सभे गांजितां स्मरतां तुज मानसीं ।
निद्रा भंगुनि त्वरें धांवसी पृष्ठिं उभा ठाकसी ॥
असंख्य वस्त्रें पुरवुनि शेवटिं, पीतांबर झांकिसी ।
कोटि रवीसम चक्र सुदर्शन, निज हस्तें स्थापिसी ॥
थर थर थर थर सभा कंपिता, होउनि सोडिलि सती ।
मजविषयीं कां दया येइना अंतरिं कमलापती ॥ १ ॥

हिरण्यकश्यपु प्रऱ्हादासी, पीडी नाना परी ।
शुष्क स्तंभीं उग्ररूप तूं प्रगटसि श्रीनरहरी ॥
प्रदोषसंधी उदर विदारुनि असुरा संहारिलें ।
सर्वांभूतीं व्यापक श्रीपति सत्य करुनि दाविलें ॥
नक्रें गजेंद्र धरितां चरणीं, आठवि तुज मानसीं ।
अतित्वरेनें धाउनि नक्रा, चक्रें संहारिसी ॥
भक्तवत्सला दीनदयाळा बोलति ऐशा श्रुति ।
काय अर्थ ते व्यर्थ जाहले मजविषयीं यदुपति ॥ २ ॥

परीक्षितीसी गर्भीं रक्षिसि घेउनि हस्तीं गदा ।
गदाग्रजा हरि निजदासावर कां ऐसी आपदा ॥
पदाब्ज तूझें हृदयीं स्मरतों, निष्कपटें हरि सदा ।
बुधाप्रती हे मान्य होइना निष्करुणा तुझि कदा ॥
पूर्वकर्मफळ अवश्य भोगीं म्हणसी जरि श्रीहरी ।
पोहे भक्षुनि सुदामजीसी दिधली कांचनपुरी ॥
शरण रीघतां बिभीषणासी लंकापुरि अर्पिली ।
मजविषयीं कां आलस्य मनीं कृष्णाईमाउली ॥३॥

दामाजीचें संकट देखुनि अंत्यज होसी हरी ।
यवना सन्निध द्रव्य दीधलें जाउन बेदरपुरीं ॥

सेना न्हाव्यासाठीं त्याच्या वेषें नटसी कसा ।
मूर्ति चतुर्भुज यवना दाविसि विलोकितां आरसा ॥
कान्हूपात्रा दक्षिणद्वारीं तिज सन्निध स्थापिलें ।
कबीरपुत्रा सूळीं देतां पुनरपि संजीविलें ॥
नामा तुकया आदिकरूनी भक्तां संरक्षिलें ।
कलिमाजी हे असंख्य श्रीपति न बोलवे बोलें ॥॥४॥

माय बाप तूं धनी जगत्पति शरण रिघूं कवणा ।
तुजविण रक्षक अन्य दिसेना त्वरें करीं करुणा ॥
करुणासागर भवभय संहर, कलिकिल्मिषदहना ।
पतितपावन दीनदयाघन संकटभयहरणा ॥
भक्तसंकटें असंख्य हरिसी कोण करिल गणना ।
सहस्र माथा फणींद्र डोलवि न बोलवे वदना ॥
कमलनयन हरि कमल-वदन तूं हृत्पद्मीं कमला ।
चरणकमलरज मधुकर समुपम कमलाकर रतला ॥ ५ ॥

## धांवा तुळसीचा

### अभंग

मंगलाचरणीं । वंदूं गणपती ॥ विघ्नें सर्व जाती । स्मरणें ज्याच्या ॥
विद्यामय शक्ती । शुद्ध सत्व स्तुति ॥ देवि सरस्वती । वंदूं भावें ॥
शुकानंद गुरु । भक्तकल्पतरु ॥ भवाब्धीचें तारूं । प्रणमितों ॥ध्रु०॥
अनादीची शक्ती । पाहे अभिव्यक्ति ॥ नानाकारें मूर्ति । अवतरे ॥
रमादेवि तुळसी । क्षीराब्धितनया ॥ प्रिय केशवराया । दोघी झाल्या ॥
सुरासुरगण । एकत्र मिळोन ॥ क्षीराब्धिमंथन ॥ करिते झाले ॥
अमृताचा कुंभ । घेऊनियां करीं ॥ प्रभु वनांतरीं । प्रगटले ॥

अमृताचे बिंदु । पडले भूमीवरी ॥ तेथें हे सुंदरी । तुळसी झाली ॥
हृदयकमळा । गळां तुळसिमाळा ॥ गोविंद सांवळा । प्रेमें धरी ॥
ब्रह्मादि सुरगण । करीती वंदन ॥ सद्भावें पूजन । तुळसीचें ॥
तुळसी सप्रेमें । गृहीं जे लाविती ॥ प्रसन्न श्रीपति । तयांलागीं ॥१॥

वृन्देच्या स्मशानीं । श्रीपति लोळतां ॥ झालासे पेरिता । बीजत्रया ॥
हिमाचलबाळा । कमळा सावित्री ॥ वृक्षत्रयशक्ती । झाल्या तिघी ॥
मालती हे धात्री । तुळसी उत्तमा ॥ प्रिय पुरुषोत्तमा । आवडते ॥
विप्राची कुमरी । होनि जन्मांतरीं ॥ निरंतर करी । तुळसीसेवा ॥
तेचि सत्यभामा । श्रीकृष्णाची रामा ॥ झाली प्रियोत्तमा । सर्वांमाजी ॥
कल्पवृक्ष देवें । स्वर्गींचा आणिला ॥ अंगणीं लाविला । भामेचिया ॥
तुळसीच्या वनीं । तिष्ठे चक्रपाणी ॥ असें हें पुराणीं । बोले व्यास ॥२॥

पांचही पांडव । वनवासी असतां ॥ आला छलनार्थां । दुर्वासा हा ॥
दुर्योधना वर । देवूनी मुनिवर ॥ प्रवेशे कांतार । अर्ध्या रात्रीं ॥
साठी सहस्त्र मेळा । शिष्यगण गोळा ॥ करुनी पातला । वनांतरीं ॥
इच्छित भोजन । मागे पांडवांसी ॥ न देतां शापासी । देईन मी ॥
द्रुपदकुमरी । पांडवांची राणी ॥ उभी वृन्दावनीं । तुळसीपासीं ॥
सांवळा श्रीकृष्ण । आठवीला ध्यानीं ॥ तेव्हां चक्रपाणी । प्रगटला ॥
भाजीचें हें पान । अर्पिलें सतीनें ॥ तृप्त झाला तेणें । जगन्नाथ ॥
अघमर्षणी मावा । दाउनियां तया ॥ तृप्त मुनीवर्यां । सर्वां केलें ॥
तुझ्या सन्निधानीं । प्रसन्न वनमाळी ॥ कनवाळू माउली । निजदासा ॥
भक्तांचीं संकटें । वारिलीं बहुत ॥ कोण करी गणित । तयांचें हें ॥
नामस्मरणमात्रें । कामना पुरविसी ॥ करुणाकर होसी । शरणागता ॥३॥

अनाथ मी दीन । पापी कर्महीन ॥ नेणें जपध्यान । मंत्र तंत्र ॥
नेणें वेदशास्त्र । न कळे पुराण ॥ यास्तव शरण । चरणासी ॥
अर्चन वंदन । कैसी प्रदक्षिणा ॥ कांहींही कळेना । बाळकासी ॥

तानया माउली । वत्सासी गाउली ॥ कृपेची साउली । करीं प्रीते ॥
पाडसा हरिणी । अंडजा पक्षिणी ।। दृष्टीनें कूर्मीणी । पाळी जेवी ॥
......संतप्त । झालों मी संतप्त ॥ तुजवीण आप्त । दुजा नाहीं ॥
गणगोत्त माता । तूंचि माझा पिता ॥ संकटीं रक्षिता । दुजा नाहीं ॥
सर्वभावें शरण । तुझिया चरणा ॥ करीं तूं करुणा । जगन्माते ॥
कृपामेघवृष्टी । करीं बाळावरी ॥ संकटें निवारीं । मायबहिणी ॥
शुष्क झाला कंठ । मज बोलवेना ॥ काणुया कळेना । बालकासी ॥ ४ ॥

दृढ चित्तभावा । धरुनिया धांवा ॥ स्मरतां माधवा । दया उपजे ॥
नित्य नेमें करुनी । त्रिकाळ पठण ॥ करितां हे प्रसन्न । तुळसी होय ॥
अखंड सौभाग्य । दंपत्याची प्रीति ॥ संपत्ति संतति । वृद्धि पावे ॥
धन आणि धान्य । अश्वादि गोधन ॥ सदा परिपूर्ण । वृद्धि होय ॥
राजद्वारीं जय । शत्रुपराजय ॥ सर्व करी जय । सत्कीर्तीनें ॥
देहांतीं ते नर । विष्णुपदा जाती ॥ बोल हे भारतीं । श्रीव्यासाचे ॥
शुद्ध अंत:करण । करूनी पठण ॥ करितां प्रसन्न । फलप्राप्ति ॥
शुकानंदनाथ-। चरणांकिंकर ॥ दास कमलाकर । विनवितसे ॥
शुकानंद गुरु । भक्तकल्पतरु ॥ भवाब्धीचें तारूं । प्रणमितों ॥ ५॥

REFBK-0002479

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे